म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.

IRBK-0108247
IRBK-0108247

# क्रान्ति

[संक्षिप्त आवृत्ति]

ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
क्र. ८२४८

IRBK-0108247
IRBK-0108247

—साने गुरुजी—

अ.उ. ८८४०
आ.भा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

25 AUG 1975
11 FEB 1977
29 DEC 1982

# क्रांति

[ संक्षिप्त आवृत्ति ]

: लेखक :

साने गुरुजी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
अ. क्र. 2280 ............ नों. दि ............
वि. ..........: ... क्र. ..................

: संपादक :

त्र्यं. ग. बापट, बी. ए. बी. टी.

किंमत दीड रुपया

: प्रकाशक :
दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर
१२५७ सदाशिव, पुणें २.

पुनर्मुद्रण १९६०

[ मराठी आवृत्तीचे हक्क प्रकाशकाधीन.
शेषहक्क श्री. मो. धों. पुसाळकर, अमळनेर, यांचे स्वाधीन

: मुद्रक
म. वा. जोशी
ज्ञानविलास
२७ बुधवार पेठ

## ' क्रांति '-कारकांच्या सहवासांत—

"...साधुत्वाची उदात्त भव्यता व कविमनाची रमणीय रसात्मकता ांच्या वाङ्मयांतून सारखी प्रतीत होत असते. आपल्या प्राचीन संस्कृतींतील ानव्याचें इतकें हृदयंगम आविष्करण इतक्या सहृदयतेने, तन्मयतेने व ुकुमारतेने केलेलें मराठी वाङ्मयांत इतरत्र क्वचितच आढळून येतें. वात्सल्य व तत्संबद्ध कारुण्य या भावनांच्या चित्रणांत साने गुरुजींचा हातखंडा आहे.

"संस्था म्हणजे कांही दगडांच्या भिंती नव्हेत की शाळेंतील विविध उपकरणसामग्री नव्हे. संस्थेचें मूर्तिमंत चैतन्य म्हणजे त्यांतील विद्यार्थी व शिक्षक. ान्यांनी आपल्या गुणांनी नि प्रतिभेने छात्रालय व शाळा हें चैतन्याचें एक ीक बनविलें. ' छात्रानंद ' साने यांच्या मठीकडे विद्यार्थ्यांची सारखी रीघ े. दररोजचे बौद्धिक आणि शारीरिक परिश्रमाचे कार्यक्रम, प्रार्थना, मित्तिक उत्सव यांच्या चैतन्याने विद्यार्थ्यांचें जीवन कसें भरलेलें आणि ारलेलें असे."

—प्रा. वि. म. बेडेकर
यांची प्रस्तावना, ' **मृगाजिन.** '

सुटी झाली होती. विद्यार्थी आपआपल्या गावीं निघून गेले. पुन्हा ळा सुरू झाल्यावर विशेष औत्सुक्याने एक विद्यार्थी श्री. सान्यांच्या ठींत गेला. शिकार करून मिळविलेलें मृगाजिन त्याने तेथे आंथरलें व तो ा बाजूला उभा राहिला. कांही वेळाने आंघोळ करून वाळत घालण्याचें ोतर झटकीत गुरुजी तेथे आले. त्यांनी तें मृगाजिन पाहिलें. लपून बसलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांना त्या नावीन्यपूर्ण गुरुदक्षिणेची माहिती सांगितली. ुरुजींच्या एका डोळ्यांतून आनंदाचे अश्रु आले आणि दुसऱ्या डोळ्यांतून ुःखाचे अश्रु आले. याच वात्सल्याच्या आणि कारुण्याच्या पोटीं साने ुरुजींच्या जीवनाचें रहस्य आपणाला सांपडतें.

कांही ग्रंथ आपण वाचतों. करमणूक म्हणून त्याचीं पानें चाळतों व ते ंथ विसरून जातों. जीवन विसरण्याकरिता (Escape out of life), ोजच्या धकाधकीच्या धबडग्यांत स्वास्थ्य मिळविण्याकरिता आपण या ाचनाचा आश्रय करतों. पुढे ते ग्रंथ विस्मृतीच्या भुयारांत कायमचे नाहीसे ोतात. पण कांही ग्रंथ असे असतात की, त्यांतील विचारांची स्मृति आपल्या

मनांत सारखी रेंगाळत राहते, आणि त्या ग्रंथांबरोबर तो ग्रंथकार कसा होता अथवा आहे हेंहि कुतूहल आपल्या मनांत निर्माण होतें. सुमारे दहा-बारा वर्षांपूर्वी ' जीवन श्रेष्ठ की वाङ्मय श्रेष्ठ ' असा एक वितंडवाद निर्माण झाला. त्यांतून शाश्वत असें कांही निर्माण झालें नाही; तरी टीकाकारांच्या मनांत काय डाचत आहे तें पुष्कळांना उमगलें. सान्यांनी सुमारें पन्नास पुस्तकें लिहिलीं त्यांच्या कांही पुस्तकांच्या पांच–पांच आवृत्त्या निघाल्या; पण कांहींच्या मताने वाचकांत रसिकताच नाही. वाचकांना काय वाचावें हें समजत नाही. टीकाकारांनी आपल्या मतांच्या आवृत्त्या काढल्या तरीसुद्धा गुरुजींच्या वाङ्मयाच्या आवृत्त्या बाहेर पडतच आहेत.

या वादांतून आपल्याला कांही कळतें का हें पाहण्याकरिता साने यांचें वाङमय आणि त्यांचें जीवनचरित्र या दोहोंचा अभ्यास केला. त्यामध्येच क्रांति ही कादंबरीहि वाचली. ' क्रांति ' या कादंबरीपेक्षा ' क्रांति '-कारवाने म्हणजे ' क्रांति ' लिहिणाऱ्या लेखकाने, त्या लेखकाच्या क्रांतिकारक चरित्रने माझ्या मनावर जबरदस्त परिणाम केला. तो परिणाम कोणता ?

अर्धपोटी राहून चौकस बुद्धीने चौरस अभ्यास करणारा परिश्रमी विद्यार्थी, बावळा वेष असला तरी अंतरीच्या उमाळ्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर संस्मरणीय संस्कार करणारा शिक्षक, झंझावाताप्रमाणे कॉंग्रेसच्या मतप्रणालीचा प्रचार करणारा कट्टा कर्मयोगी, चंद्रभागेच्या तीरावर अस्पृश्यांना मंदिरें खुलें करून देण्याकरिता आपले प्राण पणास लावणारा सत्याग्रही आणि बेचाळीसच्या क्रांतीमध्ये महाराष्ट्रीय भमिगतांना स्फूर्ति देणारा कीर्तनकार, आणि आपल्या प्रचंड लेखनाने आणि शेकडो अमृतमय व्याख्यानांनी जनसमुद्राच्या तळापर्यंत भारतीय संस्कृति पोहोचविणारा ' प्रांत-भारती 'चा भाष्यकार अशा अनेक दृष्टींनी साने गुरुजींच्या जीवनचा चित्रपट माझ्या मनश्चक्षूंसमोर फिरूं लागला.

सान्यांच्या व्यक्तिमत्त्वांतील कादंबरी हा एक लहानसा पैलू आहे. ही कादंबरी त्यांनी कोणत्या हेतूंनी लिहिली ? ह. ना. आपटे, ना. ह. आपटे, केतकर, वा. म. जोशी, य. गो. जोशी, या लेखकांनी ज्या हेतूने कादंबरी लिखाण केलें, तोच हेतु सान्यांच्या वाङ्मयांत प्रतिबिंबित झालेला दिसतो. ' क्रांति ' या कादंबरींतील प्रमुख पात्रांचा थोडा परिचय करून घेऊं.

मिनी, मुकुंदराव, रामदास, माया, शांता व मोहन, प्रद्योत आणि मृणालिनी यांच्याभोवती कथानकाचे धागे स्वैर संचार करीत असतात. प्रद्योत हा खलपुरुष आहे असा भास होतो; पण तो भासच. पुढे तो मायेला आपली बहीण मानतो आणि मृणालिनीबरोबर विवाह करतो. आधुनिक तंत्रविशारदांचें असें मत आहे कीं, परिस्थिति हाच खलपुरुष होय. एखाद्या व्यक्तीला खलपुरुष मानणें म्हणजे त्या परिस्थितीच्या कार्य-कारणसंबंधाचें अज्ञान दर्शविणें होय. हें मत सान्यांना मान्य असो किंवा नसो; पण त्यांच्या कुसुमकोमल हृदयाला खलपुरुषाची कल्पनाच सहन होत नाही. त्यांचे सर्व मानसपुत्र आपल्या जनकाप्रमाणे त्यागी, विरक्त आणि ध्येयवादी. अधिक त्याग कोण करतो, याबद्दल त्यांच्यांत चढाओढ लागलेली. मोहन काबाडकष्ट करून शरीराचें चिपाड झालें तरी शांताच्या शिक्षणाला मदत करतो. रामदासला प्रवासांत चैन करण्याकरिता म्हणून दत्तक वडिलांनी पांचशे रुपये दिले. रामदासने कोणती चैन केली ? कोणी घेत नव्हते अशी खादी पडून राहिली होती ती त्याने पांचशे रुपयांना खरेदी केली. त्यामुळे अनेक खेडुतांना दिवाळीच्या वेळेला आपल्या नातलगांना गोडधोड करून घालतां आलें. शांता साक्षरताप्रचार करते; मिनी आणि मुकुंदराव यांच्या त्यागाला सीमाच नाहीं. स्वतः साने गुरुजी मुकुंदरावांच्या रूपाने कादंबरींत वावरत आहेत, असें एका टीकाकाराचें मत आहे.

या सर्व व्यक्तिरेखांना क्रांतीचा संदेश द्यावयाचा आहे. गांधीवादाचा उलगडा करावयाचा आहे. ग्रामोद्योगाचें रहस्य आपल्या कृतीने उलगडून दाखवावयाचें आहे. याकरिताच या व्यक्तींचा जन्म आहे. तो संदेश देण्याचें काम संपलें कीं, या व्यक्ति वाचकांच्या मनांतून नाहीशा होतात. मानवी स्वभावाचें रेखाटन हा हेतु लेखकाच्या मनांत असावा असें वाटत नाही. ‘क्रांति’ ही बोलून चालून प्रचारात्मक कादंबरी. ती अक्षरवाङ्मयांत जमा होणार नाही, हें सांगायला टीकाकारांचे तांडे जमा करून काय करावयाचें आहे ? या कथेंतील रोमहर्षक प्रसंग आणि अद्‌भुत रम्यता नाथमाधवांच्या ‘वीरधवल’ या कादंबरीशीं चढाओढ करील. कुमारी मिनी, कुमारी शांता आणि कुमारी माया या सुशील कन्यका वडिलांच्या संमतीवाचून प्रथमदर्शनीं प्रगाढ प्रेम करितात ! सती पार्वती

मृत पतीचें रक्त मळवटासारखें कपाळीं लावून राष्ट्रीय सत्याग्रहांत भाग घेते. मुकुंदराव सारखीं प्रवचनें झोडतात. शांता म्हणते, "मी कष्टाळू क्रांतिकारक किसानाशींच लग्न करीन." आणि मिनी कोणता त्याग करीत नाही ? लहानपणींच तिला मोटार चालवितां येते. ती पुरुषवेष करते आणि मुकुंदरावांना घोड्यावर बसवून दौडत निघून जाते; पडत नाहीं. हा प्रवेश कोणत्यांहि अद्‌भुत चलच्चित्रपटाला (Stunt Picture) मागें सारील. मिनाचें प्रथमदर्शनी प्रेम सुद्धा अद्‌भुत, अतर्क्य व अलौकिक.

ही कादंबरी प्रचारप्रधान आहे. प्रचार हें साध्य. साहित्य हें साधन. या कथेमध्ये जो क्रांतीचा संदेश सांगितला आहे, त्या क्रांतीचा अर्थ तरी काय ? क्रांति म्हणजे मूल्यपरिवर्तन. "आज माणुसकीला महत्त्व नाही. बांडगुळाची पूजा चालली आहे. ज्याच्या श्रमावर सारी दुनिया जगते त्याला समाजांत मान नाही आणि स्थान नाही. व्यापारी, सावकार आणि कारखानदार यांना मान आहे. किसानाला मान नाही, हें सर्व बदललें पाहिजे. श्रम करणाराला उच्च मानलें पाहिजे. यालाच मूल्यपरिवर्तन असें म्हणतात. जातीची प्रतिष्ठा जाऊन कृतीची प्रतिष्ठा स्थापन झाली पाहिजे. आत्म्याची निष्पाप शक्ति जगाच्या सार्‍या बाह्य शक्तींशीं उभी करणें म्हणजे 'क्रांति." कादंबरीची अखेरी साधतांना साने गुरुजी भाष्यकाराच्या भविष्यवाणीने सांगतात, " सर्व देशांतून क्रांति होईल. जगांतील पिळले जाणारे सारे एक होतील. जगांतील श्रमजीवी जनता एक होईल. सर्व जगाचा एक झेंडा होईल. महान् स्वप्न सत्यसृष्टींत येईल. सारा संसार सुखाचा होईल. जगड्व्याळ क्रांति खरीखुरी शांति आणील."

आता या कादंबरींत टीकाकारांना कोणते दोष टिपून घेतां येतील तें पाहूं. सान्यांच्या सर्व लिखाणांत ज्या उणिवा दिसतात त्या तेथेंहि आहेत. एक टीकाकार आदराने म्हणतात की, गुरुजींच्या जवळ मंत्र आहे, पण तंत्र नाही, मधुरता आहे, पण विविधता नाही. अश्रु आहेत, पण विनोद नाही. कांहींच्या दृष्टीने सान्यांच्या कादंबर्‍यांत चमत्कृति, विस्मय आणि कुतूहल हीं अभावानें उपस्थित असतात. त्यांच्या कांही व्यक्तिरेखा आवळ्याजावळ्या मुलांप्रमाणे तोंडावळयानें, विचाराने व कृतीने एकसारख्या दिसतात. सान्यांना स्वभाव-

रेखाटन जमत नाही. व्यक्तीचें पृथगात्म व्यक्तित्व लक्षांत घेऊन त्या व्यक्तीचा विकास ते आपल्या कादंबरींत दाखवीत नाहीत. सान्यांचीं अमूर्त ध्येयें नायक-नायिकांच्या रूपाने मूर्त होऊन चालतात, बोलतात, कृति करतात. तसेंच कांही काटेकोर चिकित्सकांना असें वाटतें की, सान्यांच्या वाङ्मयांत दुबळेपणा, पुराण–पूजन, पाल्हाळ, भोळसरपणा, रडवेपणा, पुन–रुक्ति इत्यादि दोष सहज वाचणाऱ्यालाहि दिसतील. त्यांच्या विपुल लेखना-मध्ये विविधतेचा प्रत्यय येत नाही. अतिरिक्त साधेपणा व उपदेशपरता यामुळें व्यंजनेवर बहिष्कार पडला आहे. साक्षात्, प्रतिबिंब, अनुलोम आणि विलोम अशा निवेदनाच्या चार पद्धति आहेत. त्यांपैकी क्रांतीमध्ये सहज-साध्य अशा साक्षात् पद्धतीचा अंगीकार केला आहे. जसें सुचलें तसें लिहिलें; तसेंच छापायला दिलें. पुन्हा मागणी आल्यावर पुन्हा लिहिलें. यामुळे परि-ष्काराच्या प्रभावाने येणारा तजेला सान्यांच्या लेखनांत दिसत नाही. सान्यांची लेखणी आणि टकळी अखंड काम करीत असतात. गुंतागुंत, निरगाठ, पेचप्रसंग, उकल, अखेरी, प्रकरणांची मांडणी, प्रमाणबद्धता इत्यादि लेखन-तंत्रांची सान्यांना जाणीव नाही. पण जाणिवेची मदिरा प्यालेले इतर कलावादी काय करीत आहेत ? 'कलेकरिता कला' असा कलकलाट करून कलेचीं कैलासलेणीं उभारण्याचा यांत्रिक प्रयत्न करतात. पण त्या लेण्यांमध्ये जीवनाची देवता आढळत नाही. विनायक करंदीकर या कवीला आपण विचारलें की, जिवंत वाङ्मयाचा सुगंध कसा असतो तर तो आपल्याला सांगेल—

स्वानुभूत वासाचें दान। जोवरी कविला करितां ये न।
तोवरि कवितालतिकेवरती । कर्णिकार सुमनांची भरती ।।

निव्वळ लेखनाच्या तंत्राकडे दृष्टि ठेवून लिहिणाऱ्या लेखकांना 'वाङ्मयां-तील शूद्र' अशी पदवी ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांनी दिली आहे. अनु-भवांतून जें वाङ्मय निर्माण होत नाही तें वाङ्मय तंत्रशुद्धतेमुळे कलेच्या कले-वराप्रमाणे आकर्षक दिसतें. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रांत या निष्क्रिय कलावाद्यांचे संघ निर्माण झाले. यांतील कांहीं कलावादी आणि साने यांच्या वाङ्मयाची तुलना केल्यास काय दिसेल ? सान्यांच्या लेखनांत त्याच कल्पना पुनरुक्त झाल्या आहेत; त्यांचीं बरींच पुस्तकें भाषांतरित आहेत; बहुतेक लिखाणांतून रडवेपणा तुडुंब भरला आहे, त्यांनी कांही दिवस आपल्या

लेखणीला विसावा दिला तर बरें होईल. साने यांच्या वाङ्मयांतील या सर्व उणिवा लक्षांत घेऊनहि तंत्रवाद्यांच्या लेखनाकडे पाहिलें तर सामान्य वाचकाला कोणती तुलना करावीशी वाटेल ? सान्यांचें गुरुत्व विद्यार्थ्यांच्या हृदयांत प्रत्यहीं वाढत जातें; तर कलावाद्यांचें गुरुत्व ग्रंथवाचनाचा तास संपल्यावर त्रास न होतां लघुत्वांत विलीन होतें. सान्यांचें चारित्र्य समाजाच्या सेवेंत चंद्राच्या कलांप्रमाणे विकास पावत आहे; कलावाद्यांचें चरित्र नीति-तत्त्वांच्या बंधनापलीकडे जाऊन भकास बनत आहे. एक साहित्यांतील करुण-कोमल सत्त्वधीरांचा निर्माता, तर दुसरे कादंबऱ्यांतील कुमारिकांचे कंचुकी; एक नितांत निर्मल अशा प्रेमकथा लिहितो, स्त्रियांच्या बाह्य स्वरूपाचें तपशीलवार–तप व शील लेखकाजवळ आहे म्हणून–वर्णन करीत नाही; पण या कलावाद्यांच्या प्रेमकथा म्हणजे कामकथा. असंस्कृत वास्तववाद (Crude Realism) या विषयांवर लिहितांना ‘ रागिणी ’-कार जोशी म्हणतात, “ विकृत जिज्ञासेच्या तृप्तीकरिता अमंगल, ग्राम्य आणि हिडीस गोष्टींचें वर्णन तें केवळ यथार्थ आहे एवढ्याने समर्थनीय ठरत नाही, तर त्या वर्णनाच्या पाठीमागे कांही तरी ज्ञानदानात्मक, सुसंस्कारात्मक भाग असला पाहिजे. ” साने गुरुजींच्या वाङ्मयांत अनुभवाचा गोग्रास मिळेल तर कलावाद्यांचा वाग्जल्प म्हणजे हिडीस विचारांचें वमन ! एकाचें वाङ्मय वाचावेंसें वाटतें आणि वाचवितें; तर दुसऱ्यांचें वाङ्मय नाचवितें. एक आपल्या लेखाहून थोर आहे, तर दुसऱ्यांचें लेखन त्यांच्याहून थोर आहे. साने म्हणजे कारुण्य आणि वत्सलता, तर कलावादी म्हणजे शृंगार आणि रसिकता. सान्यांचें सुसंस्कृत साहित्य वाचतांना आत्म्याचे सुखसोहोळे अनुभवावयास मिळतात, तर कलावाद्यांच्या भुकेकंगाल ललित-लेखनांतील अस्थि आणि मांस यांचीं विवस्त्र आणि भकास अशीं रेखीव शब्दचित्रें वाचून तरुणतरुणींचें मर्कटामध्यें रूपांतर होणार, अशी साधार भीति वाटूं लागते. साने आपल्याला पटलेलीं मतें सारस्वतांत सांगतात तर कलावादी इतरांना पटलेल्या मतांचे नायक निर्माण करून सद्विचारांचा विक्रय (Exploitation) करतात. सान्यांचें वाङ्मय ‘ शिवम् ’ म्हणजे कल्याण–कारक, तर कलावाद्यांचें वाङ्मय ‘ सुंदरम् ’ म्हणजे नुसतें आकर्षक. थोडक्यांत वाचकांना असें म्हणावेंसें वाटेल की, साने गुरुजी वास्तवांतून आदर्शांचें

दर्शन करवितात. तर कलावादी आदर्शांना वास्तवाच्या धकाधकींत खेचून आणतात. या वीस वर्षांत वाङ्मयांतील ध्येयवादित्व संपून नकली कलाविलास—विकास नव्हे—फैलावला आहे, त्याचे हे परिणाम होत.

आता शैलीकार या दृष्टीनेही साने गुरुजींच्या लिखाणाचा विचार करून पाहूं. भाषेच्या नीटसपणाकडे साने मुद्दाम लक्ष देत नाहीत. ते जसें बोलतात, तसें लिहितात. पण कळकळ आणि मन:पूर्वकता यांमुळे त्यांची भाषाशैली हृदयाची पकड घेते. त्यांच्या भाषेंत साधेपणा असला तरी कोणत्याहि साध्या लेखकाला त्या साधेपणाचें सहज अनुकरण करतां येणार नाही. हरिभाऊ आपटे, राजवाडे, माडखोलकर, माटे यांच्याप्रमाणे साने गुरुजी यांनीसुद्धां शैलीकार म्हणून नांव मिळविलें आहे. त्यांच्या शब्दांमध्यें अर्थ लपविण्याचा प्रयत्न कोठेंच नाही. सगळा साधा, शुद्ध सुटसुटीत आणि सात्त्विक असा कारभार. मुकुंदरावांचें महाराष्ट्राचें वैशिष्टच दर्शविणारें असें भाषण ओघवती भाषेचा नमुना आहे. 'कामगारांचा संप' या भागांतील तेजस्वी विचारांनी भरलेली वाक्यांची रचना वाचकांनी पाहावी. महापुराच्या वर्णनांत अनेक शब्दचित्रें निर्माण झालीं आहेत. 'येईल, एक दिवस ती येईल' हा भाग वत्सल रसांत भिजून चिंब झाला आहे. सान्यांची भाषा सामान्य वाचकांना कोणताहि संदेश पोहोचविण्यासाठी उत्कृष्ट माध्यम होय. त्यांची भाषा ओघवती आहे, याचें कारण ते असें लिहितात की, आपण जणू कांही बहुजनांच्यासमोर भाषण करीत आहोंत. एक टीकाकार म्हणतो, "प्रचारवाङ्मय किती लालित्यपूर्ण होऊं शकतें किंवा ललित वाङ्मय कितपत प्रचारकार्य करूं शकतें, याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे गुरुजींचें साहित्य."

श्रेष्ठ भाषाशैलीच्या कांही कसोट्या आहेत; त्यांपैकी एक अशी आहे की, पुस्तकांवर लेखकाचें नांव नसलें तरी शैलीवरून तें आपणांस ओळखतां येतें. लेखकानें आपलें नांव लपविलें असेल, पण त्याची भाषाशैली तें लपवीत नाही. हें प्रतिपक्षाच्या जिव्हारीं लागणारें जोरकस वाग्युद्ध मराठी भाषेच्या शिवाजीचेंच असलें पाहिजे. ही समाजहिताची तळमळ आणि निर्भीड विचारसरणी त्या देव न मानणाऱ्या देवमाणसाची नव्हे का? "पुनश्च हरि : ॐ" हा सडेतोड पण अनलंकृत लेख 'हिंदुस्थानांतील अशांततेच्या जनका' शिवाय कोण लिहिणार? ही यथातथ्य वर्णनशैली व स्वयंपाकघरां-

तील बोलभाषा हरिभाऊ आपटयांचीच नव्हे का? ही सरळ आणि रसाळ लेखणी महाराष्ट्रांत भक्तिमार्गाचा प्रदीप तेवत ठेवणाऱ्या हरिभक्तिपरायणाची होय. शून्यांतून सृष्टि उत्पन्न करणारी व उपरोधाची धार लावलेली ही लेखणी 'काळ'-कर्त्यांचीच असली पाहिजे. ही पल्लेदार वाक्यरचना आणि प्रतिभेची स्वैरभरारी त्या आद्य इतिहाससंशोधकांची असेल का? भारतांत पसरलेल्या गांधीवादाशीं गेंड्याप्रमाणें एकाकी टक्कर देणारा आणि हिंदुत्वाचा संदेश आसेतुहिमाचल पोहोचविणारा गावठी शब्दांचा तर्ककठोर रानटी हल्ला करण्याची धडाडी वीर सावरकरांशिवाय कोणांत असणार? शाक्तपंथी भक्ताप्रमाणे अनुप्रासाच्या देवतेला सुबोधतेचा बळी देणारी ही भाषेची आतषबाजी भाषाप्रभु गडकऱ्यांची नव्हे काय? ही नाजुक, लुसलुशीत, लाघवी आणि उन्मादक अशी शैली दौलत मिळविणाऱ्या जादूगाराचीच असेल! उत्तुग कल्पनाशक्तीमुळे विलोभनीय सुभाषितांनी, नटलेली ही भाषा कोटयाधीश खांडेकरांशिवाय कोण पेलूं शकणार? करुणरसांत भिजून चिंब झालेली आणि आटपाट नगरांतील कहाणीशीं साम्य दर्शविणारी ही पारदर्शक भाषाशैली भारतीय संस्कृतीच्या आधुनिक भाष्यकाराचीच असली पाहिजे, असे उद्गार आपण लेख वाचतांना काढतों.

वाङ्मयांतील कोणकोणत्या प्रांतांत साऱ्यांनी प्रवेश केला आहे? काव्य, नाटक, लघुकथा, कादंबरी, निबंध इत्यादि विषयांवर त्यांनी आपली लेखणी चालविली आहे. पहिल्या चार विभागांत त्यांना महत्त्वाचें स्थान मिळेल असें वाटत नाही. त्यांच्या सबंध लिखाणाचा थाट प्रचारकी आहे. सर्व ठिकाणीं भाषणें, प्रवचनें व निबंध इत्यादि प्रकार विपुलतेने आढळतात. त्यांना निबंधकार म्हणून महत्त्वाचें स्थान वाङ्मयाच्या भावी इतिहासकाराला द्यावें लागेल. टिळक, आगरकर, चिपळूणकर, परांजपे, केतकर, केळकर आणि सावरकर हे निबंधवाङ्मयांतील सप्तर्षि आहेत. निबंधकार म्हणून या सात तेजस्वी लेखकांच्या पंक्तीला बसण्याची गुरुजींची योग्यता आहे.

शेवटी साने गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाचें रहस्य काय त्याचा विचार करूं. गबाळा वेष, बावळी मुद्रा, देवळीं निद्रा, लाजाळू स्वभाव, पराकोटीचा नम्र-पणा यामुळें, प्रथमदर्शनी त्यांच्याबद्दल अनुकूल मत होत नाही. पण त्यांनी बोलायला आरंभ केल्यानंतर श्रोत्यांची स्थिति कशी होते? बळावलेली उपहास-

प्रवृत्ति मागे परतते, हळूहळू आपलेपणा निर्माण होतो, आणि कांही वेळाने हा दहा हजारांत एक वक्ता आहे अशी मनोमन खात्री पटते. त्यांचें भाषण बुद्धीपेक्षा हृदयाकडे धाव घेतें. ते चर्चापराङ्मुख आहेत, पण मननपराङ्मुख नाहीत. भाई गोरे म्हणतात, "आपला बहर धरणीवर सांडून आपण मोकळें व्हावें ही पारिजातकवृत्ति गुरुजींच्या स्वभावांत दिसते. सहानुकंपा, निःस्वार्थ बुद्धि, समदृष्टि आणि युयुत्सुभाव या गुरुजींच्या अंतरौघांतील चार प्रमुख धारा आहेत. अशा दैवी संपत्तीच्या पुरुषांना आपल्या नित्याच्या फूटपट्टीने मोजण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या गुणांचें मूल्यमापन हुकतें."

लोकांचें जीवन सुखी, समृद्ध आणि सामर्थ्यसपन्न व्हावें, अशी गुरुजींना तळमळ लागली आहे. घरगुतीपणा, भावनेचा गोडवा, भाषेचा साधेपणा, सर्वस्पर्शी प्रेम यांमुळे त्यांचें लेखन हृदयाची पकड घेतें. एका थोर परंतु करुणगंभीर मूर्तीच्या आंतरिक संवेदनांतून बाहेर पडलेले सात्त्विक विचार म्हणजे गुरुजींचें साहित्य. त्यागवृत्ति, सहनशीलता आणि शालीनता या गुणांमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला संतपणाचा निर्मल रंग चढला आहे. मानवतेची सेवा करण्याकरितां गुरुजींनी साहित्याला साधन म्हणून राबविलें. त्यांच्या कवितेंत फारसें काव्य नाही, पण जीवनांत काव्य आहे. या राष्ट्रीय कीर्तनकाराचें जीवन ही जनताजनार्दनाच्या चरणीं वाहिलेली पवित्र 'पत्री' होय. ते कृषीवलांच्या जीवनांत शिरले, मजुरांशीं तद्रूप झाले, विद्यार्थ्यांत मिसळले, म्हणून दरिद्री नारायणाच्या हृदयांतील भावनांना वाचा फोडण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत निर्माण झालें. भिन्न भिन्न संस्कृतीचे प्रवाह हिंदुस्थानांत यावे आणि तेथें त्यांचें मधुर मीलन व्हावें हें साने यांचें सुखस्वप्न आहे. विचार उच्चार, आचार आणि प्रचार या चारहि घटकांमध्यें सान्यांच्या वागण्यांत संगतिच दिसते. त्यांचें वाङ्मय जागृति देईल, प्रकाश देईल, जीवन समृद्ध करील, जीवनांत प्रकाशाचा आणि मुक्तीचा मार्ग दाखविल. त्यांचा आत्मा विशाल सहानुभूतीमुळे जनतेच्या महान् आत्म्याला भेटण्याचा यत्न करतो. थोर ग्रंथांच्या अभ्यासाबरोबर त्यांनी जीवनग्रंथांचा अभ्यास केला आहे. विश्वशांतीच्या उपासकाचें सुसंस्कृत जीवन गुरुजी जगत आहेत. त्यांचें मुमुक्षु जीवन सेवा, श्रद्धा आणि तपस्या या तीन गुणांमुळे साक्षात्कारी संतांच्या भूमिकेला पोहोचलें आहे. समाजाच्या वरच्या थरांतील मूठभर सुखी लोकांचे

लुसलुशीत संसार रंगविण्यांत त्यांना कृतार्थता वाटत नाही. समोर जो दु:खी, कष्टी आणि पिचलेला असा बहुजनसमाज आहे त्याला पाहून गुरुजींचें संस्कारक्षम आणि संवेदनाक्षम अंत:करण कंपायमान होतें. भारतीय भक्ति आणि युरोपीय शक्ति यांचा समन्वय गुरुजींच्या समाजवादी लेखनांत दिसतो. आचार्य भागवतांच्या दृष्टीने साने हे एक अलौकिक पुरुष आहेत. मानवतेचें प्रेम त्यांच्या हृदयांत तुडुंब भरलें आहे. ही प्रेमाची अद्‌भुत किमया हें साने गुरुजींच्या अलौकिकतेचें एकमेव रहस्य आहे. त्यांना सत्तेचा, संपत्तीचा किंवा क्षुद्र स्वार्थाचा कधीहि स्पर्श झालेला नाही. त्यांची प्रेमशक्ति ही कोठल्याहि विषमतेचा अथवा अन्यायाचा स्वीकार करूं शकत नसल्याने तिला सर्वांगीण क्रांतिवादाचें स्वरूप लाभलें आहे. इतकें ज्ञानपूर्ण, इतकें सेवा-मधुर जीवन आज महाराष्ट्रीय लेखकांत अत्यंत विरल आहे.

१९४२ सालीं अनेक भूमिगत वीर निर्माण झाले. त्यांनी क्रांतीच्या मशाली प्रज्वलित केल्या. त्यांच्या प्रभावळींत गुरुजींचें स्थान कोणतें ? भाई एस्. एम्. जोशी म्हणतात, " महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें झाल्यास असें म्हणावें लागेल की, गुरुजींच्या हृदयांत तेवत असलेला ध्येयाचा अखंड नंदादीप नसता तर क्रांतिवीरांच्या मशाली कधीच कोळपून गेल्या असत्या. गुरुजींचें जीवन म्हणजे महाराष्ट्रालाच काय पण भारतवर्षाला मिळालेली एक अमूल्य ठेव आहे. हजारोंच्या अंत:करणांतील सात्त्विक भावना जागृत करून त्यांच्या जीवनाला आकार देण्याचें महान् कार्य गुरुजी अव्याहतपणें करीत आहेत "

गुरुजींनी पुष्कळ पुस्तकें लिहिलीं आहेत. पण त्याहूनहि महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या परिचयांत आलेल्या तरुणांच्या जीवनामध्ये आमूलाग्र फरक घडवून आणून गुरुजींनी चालतेबोलते ग्रंथ निर्माण केले आहेत, असें श्री. देसाई म्हणतात. त्यांचें जीवन खरोखरच गूढ आहे. ज्या सामान्य मृत्तिकेनें आपलें मन घडविलें आहे, त्याहून निराळ्या द्रव्याचा उपयोग करूनच गुरुजींचें मन घडविलें असावें, असें कित्येक वेळीं वाटल्यावांचून राहात नाही. म्हणूनच आपल्याला त्यांच्या गुणधर्मांचें समग्र आकलन होऊं शकत नाही.

१९८ शुक्रवार, बापट वाडा, पुणें २.<br>
तारीख २८ जुलै १९४९

त्र्यंबक गणेश बापट

# क्रांति

## कोठे गेले ते बाबा ? : १

तिला कोणी मिना म्हणत, मिनी म्हणत.

श्रीमंत बापाची एकुलती एक ती मुलगी. पुन्हा आई लहानपणींच निवर्तलेली. श्रीनिवासरावांनीं पुन्हा लग्न केलें नाहीं. गडगंज संपत्ति होती. आजूबाजूचे टोळभैरव सांगावयाचे, " तुम्ही पुन्हा लग्न करा. एवढचा इस्टेटीला मालक कोण ?" परंतु श्रीनिवासराव गंभीरच राहत.

" लग्न एकदाच लागत असतें. पुनः पुन्हा लग्नें करणारांना लग्नाचा गंभीरपणा, पवित्रपणा समजत नाहीं, असें मला वाटतें. " ते म्हणत.

" ज्या मुलांमुलींचीं लहानपणींच लग्नें लागलीं, ज्यांनी संसार काय तें अनुभवलें नाही, लग्न काय हें ज्यांना कळलें नाही, त्यांच्यांतील जर कोणी लहानपणींच मेलें तर त्यांनी काय करावयाचें ?" असा एकदा एकानें श्रीनिवासरावांना प्रश्न केला होता. त्या वेळीं ते म्हणाले, " आता अशीं लग्नें फार होत नाहीत. परंतु समजा, नवरा लहान असतांना त्याची वधू वारली किंवा वधू लहान असतांना तिचा पति वारला, तर त्यांची निःशंकपणें पुन्हा लग्नें लावावीं.

" वेडेंवाकडें पाऊल पडण्यापेक्षां संरक्षण म्हणून पुन्हा लग्न करून संयमी जीवनाचा मार्ग पत्करणें श्रेयस्कर नाही का ? अति उच्च ध्येय डोळ्यासमोर ठेवून पतित होण्यापेक्षां–दरींत पडण्यापेक्षां–मर्यादित ध्येय डोळ्यासमोर ठेवून थोडचाशा तरी उंचीवर भक्कम पावलें रोवीत जाऊन उभें राहणें योग्य नाही का ?"

अशा प्रश्नाला श्रीनिवासराव उत्तर देत, " तुमचें म्हणणें मला मान्य आहे. ज्यांना तसें राहणें अशक्य वाटत असेल त्यांनीं पुन्हा विवाह करावेत. परंतु प्रथम पत्नीच्या प्रेमाचा या जन्मींच नाही तर जन्मोजन्मीं पुरेल इतका सुगंध ज्याच्या जीवनांत भरून राहिला आहे, तो त्या सुगंधाच्या सामर्थ्यानें तरून जाईल. जिवंतपणीं आमच्या प्रेमैक्यांत थोडा तरी पार्थिवतेचा

अंश होता. परंतु आज केवळ चिन्मय अभंग निर्मळ नातें जोडलेलें आहे. माझें हृदय फाडून दाखवितां आलें असतें, तर तेथे मिनीची आई प्रेमवीणा वाजवीत बसलेली तुम्हांला दिसली असती."

श्रीनिवासराव असें बोलत व शेवटीं त्यांचा गळा भरून येई. डोळे भरून येत. ती चर्चा त्यांना असह्य होई. ते पटकन उठून जात व शयनमंदिरांतील मिनीच्या आईच्या तसबिरीसमोर थरथरत उभे राहात. क्षणभर तेथे बसत. रडवेला चेहरा पुन्हा प्रफुल्लित होई. जणू अमृतरस त्यांना मिळे.

श्रीनिवासरावांच्या हृदयाचा थांग लागणें कठिण. त्यांना मिनीचें बंधन नसतें तर ते केव्हाच हिमालयांत जाते. लाकडें पोखरणाऱ्या भ्रमराला एक कोमल कमळ गुंतवून ठेवतें, पकडून ठेवतें, कोंडून ठेवतें. मिनीची ती जीवनकळी. त्या कलिकेसाठीं श्रीनिवासराव जगत होते. ते मिनीचें सारें करावयाचे. मिनीची सेवा करतांना त्यांना धन्य वाटे. मातृप्रेम व पितृप्रेम या दोहोंचा आनंद ते मिनीला देत. "मिने, मी तुझे केस विंचरतों. त्यांत फूल खोवतों," ते म्हणावयाचे. मिना गोड हसे. "मिने, तुला भरवूं ? मोठी झालीस म्हणून काय झालं ? देऊं तुझा भात कालवून ?" असें म्हणावयाचे. मिनी गोड हसे.

मिनीसाठी किती खेळ, किती प्रकार ! सारें जग आपल्या मिनीसाठी आहे, असें श्रीनिवासरावांना वाटे. मिना घोड्यावर बसायला शिकली होती. तिच्यासाठी एक सुंदर घोडा घेण्यांत आला होता. तिची सायकल होती. मोटार हाकायलासुद्धा ती शिकली होती. श्रीनिवासराव मिनीबरोबर कॅरम खेळत, सागरगोटे खेळत, बॅडमिंटन खेळत. मिनीबरोबर फिरायला जात, सिनेमाला जात. ते तेथे झोपीं जात, व मिनी त्यांना शेवटीं "उठा ना बाबा, संपला सिनेमा !" असें म्हणून जागें करायची.

मिनी घरांत शिके. तिला शिकविण्यासाठी एक वृद्ध पेन्शनर येत असत. घरांत नाना मतांचीं वर्तमानपत्रें येत. नाना मासिकें येत. सुंदर ग्रंथालय होतें. नवीन नवीन पुस्तकें घरीं येत. मिनी हें सर्व चाखी. सारें प्राशी. ती आपल्या शिक्षकाजवळ वाद करी, पित्याजवळ वाद करी, परंतु श्रीनिवासराव नुसते हसत.

एके दिवशीं श्रीनिवासराव व मिनी मोटारींतून दूर फिरावयास गेली

होती. कधी कधी मिनीला अशी हुक्की येत असे. ती म्हणायची, " बाबा, मोटारींत बसावं व सारखं हिंडत राहावं असं मला वाटतं. सारं जग बघावं. "

त्या दिवशीं एकदम पहाटे ती उठली. तिनें वडिलांस उठविलें. बाहेर गार वारा वहात होता. आकाशांत तारे थरथरत होते. परंतु मिनीला थंडी नाही, कांही नाही.

" बाबा, तुम्ही हें पांघरूण घ्या हं. तुम्हांला थंडी लागेल." मिनी म्हणाली.

" आणि तुला ग ? " ते म्हणाले.

" मला आज थंडी नाही वाजत. आज माझ्या अंगांत ऊब आहे. जणुं उकडतं आहे. " ती म्हणाली.

मोटार जात होती. आणि पुढे दाट धुकें. रस्ता दिसेना. किती दाट धुकें ! असें कोणीं पाहिलें नसेल.

" मिने, गाडी थांबव. धुक्याचा जणु पाऊस पडत आहे. " पिता म्हणाला.

" धुक्यांतून मला दिसत आहे. खरंच दिसत आहे. " ती म्हणाली.

" मिने, थट्टा नको. खळग्यांत जाईल. झाडावर आपटेल. " ते म्हणाले.

" देवाची इच्छा असेल तसें होईल. तो बघा आकाशांत एकच तारा दिसत आहे. बाकी कांही दिसत नाही. तो बघा बाबा, दिसला ? हें काय ? दिसत नाहीसा झाला. हा पुन्हा दिसला. तो, तो बघा आता ठळक दिसूं लागला. खरें ना ? " मिना आस्ते गाडी चालवीत म्हणाली.

मिनेने शेवटीं गाडी थांबविली. ती खाली उतरली. धुक्यानें तिचें तोंड ओलें झालें. केस ओले झाले. आपल्या पदराने ती पुशीत होती, परंतु बाहेरच उभी होती. ती एकदम धावूं लागली, पळत सुटली.

" मिने, मिने, मला टाकून कोठे पळतेस ? " पित्याने हाक मारली.

" मी कांही कोठे जात नाहीं बाबा. " ती दुरून उत्तरली.

" फीर मागं. धुकं वाईट हो. तें बाधतं. " पिता सांगत होता.

" तो बघा ठळक तारा, पुन्हा दिसूं लागला. मारूं उडी आकाशांत ? आणूं तो तारा ? " असें म्हणत मिनी धावत होती, उड्या मारीत होती. धुक्याच्या सागरांतून ती माशाप्रमाणें नाचत होती.

परंतु धावत पळत जाणाऱ्या मिनीच्या पायाला कांही लागलें. मिनी एकदम अडखळून पडली. तिच्या हातांना कांहीतरी लागलें. का हात खरचटले ? खडी बोचली ? तिच्या हातांना निराळीच वस्तु लागली. निराळाच स्पर्श झाला. ते पाय होते. ते माणसाचे पाय होते. त्या पायांवर ती पडली, परंतु ते पाय थंडगार होते. मिनीचे गरम हात लागूनहि ते गरम झाले नाहीत. मिनी बावरून उभी राहिली. प्रथम ती घाबरली. परंतु ती धीट झाली. धुक्यांतून तिला दिसत होतें. एक मनुष्य रस्त्यावर पडला होता, थंडगार होऊन पडला होता. त्या धुक्यांतहि त्याच्या अंगावरचीं वस्त्रें झळकत होतीं.

संन्यासी ! परंतु मिनीने त्याला हात लावला. निःशंकपणें लावला. त्याचें तोंड तिने आपल्या पदराने पुसलें. तें निर्मळ प्रशांत मुख मिटलेल्या कमळाप्रमाणे दिसत होतें. तिने पाय चोळले. त्याचे हात आपल्या हातांत घेऊन तिने चोळले. ती त्या शरीरांत उष्णता आणूं पाहात होती. परंतु प्रयत्नाला यश येईना. ती जवळ बसून बघत राहिली. पित्याला विसरली, मोटार विसरली, आकाशांतील तारा पकडण्यासाठी उडी मारायला विसरली. तिची गति पांगुळली, उल्लूपणा उडाला. ती एकदम निराळी झाली. मिनी मुकी होऊन तेथें बसली.

मिनी त्या संन्याशाच्या मुखाजवळ डोळे नेई व त्याचे डोळे उघडतात का पुनः पुन्हा पाही. तिने आपल्या कोमल करांनी त्याचे डोळे पुसले. तिने आपलीं बोटें हळुवारपणे त्या डोळ्यांवरून फिरवलीं. त्या सुंदर नासिकेंतून श्वासोच्छ्वास येतो का पाहायला ती खाली वाकली. परंतु तिचा श्वासोच्छ्वास मात्र अधिक कढत झाला. अधिक जलद होऊं लागला.

तिने एकदम त्या भगव्या वस्त्रांतील संन्याशाला धरून ठेवलें. परंतु ती एकदम उठली. तिने त्याला प्रणाम केला व ती धावत निघाली. न थांबतां ती मोटारीशी आली.

" मिने, किती ग अल्लड तूं ? किती घामाघूम झालीस ? अशी काय दिसतेस ? मिने, अशी का घाबरल्यासारखी उभी ?" पिता विचारूं लागला.

" बाबा, थंडींत कोणीतरी गारठून रस्त्यांत पडलें आहे. चला आपली मोटार तेथे नेऊं. त्यांना आपल्या घरीं नेऊं. कोणी तरी संन्यासी दिसतो. –

भगवीं वस्त्रें अंगावर आहेत. ते थंडीने गारठले की कांही त्यांना चावलें? चला बाबा." असें म्हणून मिनी मोटारींत बसली. ती मोटारीचें शिंग सारखें वाजवीत होती. तो संन्यासी जागा व्हावा, असा तिचा हेतु.

परंतु संन्यासी समाधींतच होता. मोटार येऊन थबकली. श्रीनिवासरावांनी त्या संन्याशाला जागें करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला जागृति येईना. त्याला उचलून मोटारींत ठेवलें पाहिजे होतें. परंतु त्या दोघांना उचलतां येईल का ?

"बाबा, आपण त्यांना उचलून गाडींत ठेवूं या." मिनी म्हणाली.

असें म्हणून मिनीने पाय धरले. आपल्या छातीशीं ते धुळीचे पाय तिने लावले. पित्याने सर्व शक्ति लावली. संकटांत सामर्थ्य येतें, भावनेची एक शक्ति असते. जडापेक्षा चैतन्याची शक्ति अनंत आहे. दोघांनी तो देह उचलून मोटारींत ठेवला. मोटारींत सरळ देह मावला नसता. पाय जरा दुमडून तो ठेवण्यांत आला. ते धुळीने मळलेले भगवे कपडे मिनीने झाडले. संन्याशाचा दंड, कमंडलू व एक भगवी पिशवी गाडींत ठेवण्यांत आली. मिनीने बाबांचें पांघरूण संन्याशाच्या अंगावर घातलें.

"बाबा, तुम्ही चालवा गाडी. मी येथे जरा अशी यांना धरून बसतें. नाही तर पडायचे खाली. तुम्हांला तर तेथे बसून यांना धरतां येणार नाही. मी अशी येथे खाली बसून धरून ठेवतें. बाबा, लौकर न्या हं गाडी." मिनी म्हणाली.

श्रीनिवासराव गाडी चालवूं लागले. बाणासारखी गाडी निघाली. मिना संन्याशाचा हात हातांत धरून बसली होती.

गाडी आली. श्रीनिवासराव गड्यांना हाका मारणार होते. परंतु मिनी म्हणाली, "आपणच यांना उचलून नेऊं. संन्याशाच्या अंगाला दुसऱ्याचे कशाला हात ?"

त्या दोघांनी त्या संन्याशाला उचलून आणलें व एका खाटेवर निजवलें.

"बाबा, यांचीं भगवीं वस्त्रें आपण काढून ठेवूं या. तुमचें एक धोतर यांना नेसवूं. तुमचा सदरा अंगांत घालूं. हीं भगवीं वस्त्रें जाडीं आहेत. भरभरीत आहेत. मळलीं आहेत. यांना शुद्धहि नाही. शुद्धीवर आल्यावर जर म्हणतील तर पुन्हा देऊं तीं वस्त्रें." मिनी म्हणाली.

श्रीनिवासराव कांही बोलले नाहींत. मिनीने संन्याशाला सांसारिक बनविलें. स्वच्छ सदऱ्यावर तिने बाबांसाठी केलेली लोकरीची बंडी घातली. भगवीं वस्त्रें तिने आपल्या ट्रंकेंत लपवून ठेवलीं. त्या संन्याशाच्या अंगावर तिने आपली शाल घातली व त्याच्यावर जाडसें पांघरूण घातलें.

" बाबा, तुम्ही डॉक्टरला बोलवा, जा. संन्यासी वगैरे सांगूं नका. मनुष्य पडलेला उचलून आणला आहे एवढेंच सांगा. जा बाबा. मोटारच घेऊन जा. " मिनीने सांगितलें.

श्रीनिवासराव मोटार घेऊन गेले. आता गडीमाणसें जागीं झालीं. मिनीने गड्याला स्टोव्ह पेटवायला सांगितलें. पाणी तापविण्यांत आलें. रबराची पिशवी गरम पाण्याने भरण्यांत आली. मिनी त्या संन्याशाची छाती शेकीत बसली.

मध्येच ती पिशवी खाली ठेवून त्या तोंडावरून हात फिरवी, त्या डोळ्यांवरून हात फिरवी. सूर्याच्या किरणांचा स्पर्श होतांच मिटलेली कमळें उघडतात. मिनी मनांत म्हणे, ' माझ्या गोड गोड बोटांचा स्पर्श होऊन हीं नेत्रकमळें नाही का उघडणार ? '

ती मधून मधून तो हात हातांत घेई. मध्येच अंगाला हात लावून पाही. हळूहळू तें अंग कढत लागूं लागलें. अंगांत उष्णता आली. मिनीला आशा वाटूं लागली. थंडगार शरीर गरम होऊं लागलें. डॉक्टर आले. त्यांनी तपासलें. ते म्हणाले, " यांना ताप आता चढेल, हें बरें लक्षण आहे. परंतु ताप लौकर उतरेलच असें नाही. मनुष्याला दोन प्रकारचा धोका असतो. टेंपरेचर अगदी खाली गेलें तरी धोका. एका धोक्यांतून हे वाचले. आता दुसऱ्या धोक्यांतून वाचतात का पाहावें. सारखें जवळ कोणी तरी बसलें पाहिजे. ताप वाढूं द्यायचा नाही. फार वाढूं लागला की लगेच बर्फाची पिशवी धरायची. "

डॉक्टरचें औषध सुरू झालें. मिनीची शुश्रूषा सुरू झाली. कोणी तिला शुश्रूषा करण्याचें शिकविलें ? तिच्या हृदयाने. मिनी आजाऱ्याला क्षणभर विसंबत नसे. निजली तर एकदम दचकून जागी होई व रोग्याजवळ येऊन उभी राही. मग बाप म्हणायचा, " मिने, नीज जा शांतपणें. अशाने तूं आजारी पडशील. "

“ मी आजारी पडून हे बरे होणार असतील तर पडूं दे मला आजारी.”

“ मग तुझी कोण शुश्रूषा करील? मी तर म्हातारा, अशक्त होत चाललों.”

“ हे मग माझी शुश्रूषा करतील.” मिनी हसून म्हणे.

त्यांना एके दिवशीं मिना कोठे सापडेना. मिना कोठे आहे, मिनी कोठें आहे, पिता म्हणूं लागला. मिना कोठे गेली कोणालाच माहित नव्हतें. एवढ्या उजाडत कोठे गेली होती मिनी ? आजाऱ्याजवळ ठेवण्यासारखी फुलें आणायला का ती गेली होती ? परंतु इतक्या लौकर जात नसे. मग कोठे गेली ? श्रीनिवासराव कावरेबावरे झाले. तोच मिनी हळूच आली.

“ मिने, कोठे गेली होतीस ? ” पित्याने विचारलें.

“ डोंगरावरील देवीला. ” ती म्हणाली.

“ आजपर्यंत कधीच गेली नाहीस. आजच कुठलें हें वेड ? ” पित्यानें उत्सुकतेने विचारलें.

“ वेड लागायची एक वेळ असते बाबा. ती वेळ आली की साऱ्यांना वेड लागतें. ” ती म्हणाली.

कधी प्रार्थना न करणारी मिनी देवाची प्रार्थना करूं लागली. आईच्या तसबिरीसमोर उभी राहून तिचे आशीर्वाद मागूं लागली.

रोगी बरा होईल का, ही मिनीला चिंता होती. ती चिंता तिच्या तोंडावर दिसे. ती फार खातपीत नसे. नेहमी जागरण. मिनी अशक्त दिसूं लागली. पिता दुःखी झाला.

परंतु एके दिवशीं संन्याशाने डोळे उघडले. त्या वेळीं तेथे सारीं निज–लेलीं होतीं. संन्याशाला काय दिसलें ? समोर जवळच एका आरामखुर्चीत मिनी निजली होती. तिच्या हातांत संन्याशाचा हात होता. संन्याशी डोळे मिटी, पुन्हा उघडी. आपला हात कोणाच्या हातांत आहे, याची त्याला अद्याप जाणीव नव्हती. संपूर्ण जाणीव अद्याप यावयाची होती. परंतु त्याने आपला हात पाहिला. तो हात मोकळा नव्हता. संन्यासी अडकला होता. आपला हात हळूच सोडवून घ्यावा, असें त्याला वाटलें. परंतु झोप-लेली सेविका जागी होईल म्हणून त्याने आपला हात तेथेच राहूं दिला.

तो सभोवती पाहूं लागला. अंगाभोवती पाहूं लागला. कोठे होती तीं भगवीं वस्त्रे ? कोठे गेला तो संन्यास ? कोठे गेला तो संयम राख असें

सांगणारा दंड ? कोठे गेला कमंडलू ? संन्यासी सारें आठवीत होता. मध्येच डोळे मिटी. मध्येच उघडी. मिनीकडे पाही.

मिनी उठली. तिने आपल्या दोन्ही हातांनी त्याचे ते गोड डोळे पुसले. शांत व गोड वाणीने ती म्हणाली, "पडून राहा हं."

संन्याशाला शुद्धि आली. सर्वांना आनंद झाला. मिनीने साखर वाटली. हळूहळू संन्यासी बोलूं लागला. सारी विचारपूस करूं लागला. परंतु त्याने भगव्या कपड्यांबद्दल एक ब्रहि काढला नाही.

एके दिवशीं दुपारीं मिनी त्याला मोसंब्याचा रस देत होती. रस दिल्यावर ती तेथे बसली.

"माझ्या अंगावरचीं वस्त्रें कोठे आहेत ?" संन्याशाने विचारले.

"तीं पाहिजेत का ? तीं माझ्या ट्रंकेंत मीं ठेविलीं आहेत," मिनी म्हणाली.

"नकोत तीं. मी त्यांचा त्यागच करणार होतों. अशा वस्त्रांनी दंभ माजतो. हृदय वैराग्याने रंगलेलें असलें म्हणजे झालें. बाह्य रंग काय चाटायचे ?" तो म्हणाला.

"तुम्ही कुठुन येत होतां ?" तिने विचारिलें.

"मी गेलों होतों देव मिळावा म्हणून. परंतु देव मिळेना. एका गुरूजवळून दीक्षा घेतली, जपतप सारें केलें, देव मिळेना. परंतु एक अधिकारी पुरुष मला म्हणाला, 'तुला देव का पाहिजे ? हरिजनांची सेवाचाकरी कर. तुला देव मिळेल. निरहंकार झाल्याशिवाय कोठला देव ?' त्या शब्दांनी मी जागा झालों. मी निघालों. विचार करीत करीत निघालों. उंच पहाडावरून खाली आलों."

त्या संन्याशाचे शब्द मिनेला अमृतासारखे लागत होते.

"माझी पिशवी कोठे आहे ?" त्याने विचारिलें.

मिनीने पिशवी काढून दिली. त्यांत एक टकळी होती. कापूस होता.

"हें काय ?" तिने विचारिलें.

"हा नवीन सेवेचा मंत्र." तो म्हणाला.

"तुम्ही खादीचे का उपासक आहांत ?" तिने विचारिलें.

"जो जो माणुसकी असलेला हिंदी मनुष्य असेल तो तो तिचा उपासक

होईल. माझ्या अंगावर भगवीं वस्त्रें नकोत. परंतु खादीचीं हवींत. नाही तर मी मरेन." तो उत्कटतेने म्हणाला.

मिना तेथून उठून गेली.

"बाबा, मी विलासपूरला जाऊन खादी घेऊन येतें. मला द्या ना पैसे. मोटार घेऊन जातें." ती म्हणाली.

"खादी ? ती तर तुला आवडत नसे." पिता म्हणाला.

"मी वेडी होतें तेव्हा. आता मी शहाणी झालें आहें." ती म्हणाली.

मिना गेली व भरपूर खादी घेऊन आली. खादीचें धोतर, खादीचे सदरे, खादीची बंडी, पांघरायला घोंगडी घेऊन आली. खादीची चादर, खादीचा अभ्रा घेऊन आली. तिनें संन्याशाची खाट खादीमय केली.

"माझ्यासाठीं खादी आणलीत; परंतु तुम्हांला नको का ?" संन्यासी म्हणाला.

मिना उठून गेली. ती खादीचें पातळ नेसली. तिने खादीचें पोलकें घातलें. पवित्र व प्रशांत मिना संन्याशासमोर उभी राहिली.

"तुम्ही आता भारतमातेसारख्या दिसत आहांत. पवित्र पावन भारतमाता जणु माझ्यासमोर उभी आहे. मला तुमच्या पायां पडूं दे." संन्यासी म्हणाला.

"मलाच तुमच्या चरणांवर डोकें ठेवून कृतार्थ होऊं दे." असें म्हणून मिनीने त्या तरुणाच्या पायांवर डोकें ठेवलें. त्या पायांवर डोळ्यांतील अश्रूंचे अर्घ्य दिले गेले; अश्रूंच्या फुलांनी चरणांची पूजा झाली.

संन्यासी आता हिंडू फिरूं लागला. तो बगिच्यांत जाई. त्याच्याबरोबर मिनीहि असे. एकदा मिनाने विचारिलें,

"तुम्हांला घोड्यावर बसतां येतें ?"

तो तरुण म्हणाला, "नाही."

"माझ्या घोड्यावर बसून तर पाहा, तो पाडणार नाही." तिने आग्रह केला.

तो तरुण घोड्यावर बसला. मिनी म्हणाली, "आता हाकला घोडा. हे घ्या दोर हातांत." "मला नाही येत हाकतां" तो म्हणाला. "मग मी हाकलूं ?" असें म्हणून मिनी एकदम घोड्यावर बसली. संन्याशाच्य

पाठीमागे ती बसली. एका हाताने त्याला धरून एका हाताने तिने दोरी धरून घोडा पिटाळला.

" मिने, आपण पडूं. पडूं. " तो तरुण म्हणाला.

" त्या टेकडीवर चढूं. " ती म्हणाली.

इतक्या दिवसांत आज त्या तरुणाने एकदम 'मिने' अशी हाक मारली. त्या शब्दाने मिनीला स्फुरण चढलें. शेवटीं तिने घोडा माघारा आणला. दोघें खाली उतरलीं.

" मिने, तू वेडी आहेस. लोक काय म्हणतील ? " बाप म्हणाला.

" मला वेडीच होऊं दे. शहाणपणा–व्यवहारी शहाणपणा–चुलींत जाऊं दे. " ती म्हणाली.

मिनीच्या वडिलांजवळ संन्यासी बोलत होता. बोलतां बोलतां तो म्हणाला, " आता मला जाऊं दे. "

" येथून तुम्ही जाऊं नका. तुम्ही आमचे व्हा." मिनीचे वडील म्हणाले.

" मी तुमचाच आहें, कोठेंहि गेलों तरी तुमचाच आहें. तुम्ही मला मरणांतून वाचविलें. तुमचे उपकार मी विसरणार नाहीं. " तो म्हणाला.

" तुम्ही जाऊं नका. तुम्ही मिनीचे व्हा. माझी चिंता दूर करा. तुम्ही गेलां तर मिनी क्षणभरहि जिवंत राहणार नाही. " ते म्हणाले.

" अशक्य आहें मी राहणें. क्षमा करा. मला गेलंच पाहिजे. मी व्रतबद्ध आहें. " असें म्हणून तो तरुण संन्यासी उठून गेला.

" हें पाहा माझें सूत सारखें तुटतें. अद्याप नीट जमत नाही. " मिना त्या तरुणाला म्हणाली.

" फार पीळ दिला म्हणजे तुटतें. फार मोकळें नको, फार पीळ नको. " तो म्हणाला.

" अखंड सूत माझ्या हातून कधी निघेल ? " तिने विचारिलें.

" हृदय शांत राहील तेव्हां. " तो म्हणाला.

" हृदय कशाने शांत होतें ? " तिने प्रश्न केला.

" निरहंकार होऊन, दुःखितांची सेवा करण्याने. " तो म्हणाला.

" मी दुःखी आहें. मला करणार का तुम्ही सुखी ? " तिने विचारिलें.

" मिने, मीहि कष्टी आहें. आपण आपापलीं दुःखें गरिबांची सेवा करण्यांत विसरूं या. "

" गरिबांची सेवा कशी करावी, तें दाखवावयासहि सोबती हवा." ती म्हणाली.

" हृदयस्थ परमेश्वर हा अचूक सोबती. बाकी सारे चुकणारे, पडणारे व पाडणारे. " तो म्हणाला.

मिनी सूत कातीत होती. परंतु तिचे नेत्र एकदम भरून आले. भरलेल्या नेत्रांनी तिने वर पाहिलें, तो तेथेंहि भरलेले सप्तसागर दिसले. भावनांचा चरखा वेगाने फिरत होता. अश्रूंचें अखंड सूत निघत होतें. त्यांतून हृदयैक्याचें मंगल व सुंदर वस्त्र विणलें जात होतें.

बाहेर बरीच रात्र अद्याप होती. तरीहि उमलूं पाहणाऱ्या फुलांचा गोड वास येत होता. तो वास उन्मादकारी नव्हता. प्रशांत करणारा होता. तो तरुण उठला. शांतपणें बाहेर पडला. आज समोर धुकें नव्हतें. पहाटेचे प्रशांत तारे वर होते. झपझप पावलें टाकीत तो तरुण निघून गेला. विशाल भारताचा सेवेकरी विशाल दृष्टीनें, विशाल हृदयाने निघून गेला.

मिनी जागी झाली. नित्याप्रमाणे हृदयदेवाचें दर्शन घेण्यासाठी ती गेली

तो तेथें कोण होतें ? अंथरूण नीट गुंडाळून ठेवलेलें होतें. मिनी चमकली. ती स्तब्ध उभी राहिली. येथे एक चिठी होती.

" मिने, मी जातों. मला जाऊं दे. क्षमा कर. " तुझा...

मिनीने तें अंथरून उलगडलें. त्यांत सर्व कांही होतें, परंतु तिची शाल नव्हती. तो तरुण ती शाल पांघरून निघून गेला. मिनीला त्याने सोडलें, परंतु तिची शाल घेऊन गेला. काय त्याचा अर्थ ? त्याचा अनंत अर्थ होता व मिनी तो अर्थ समजली.

मिनी तेथे खाटेवर अश्रुसिंचन करीत बसली. ती स्तब्ध होती. पिता आला. तो सारें उमगला.

" मिने !" त्याने सद्गदितपणें हाक मारली.

" कोठे गेले ते बाबा ?" तिनें विचारलें.

" देवाला माहीत. बाळ, उगी. " तो म्हणाला.

✦ ✦ ✦

## दत्तविधान : २

गोविंदराव चव्हाणांचें मोठें खानदानी सरदार घराणें. मोठ्या थाटा-माटांत ते रहायचे. परंतु त्यांना औरस संतति नव्हती. तें एक दुःख होतें. त्यामुळे ते कोणाला तरी दत्तक घेण्याचें मनांत योजीत होते. त्यांचे एक जवळचे नातलग रामराव खेड्यांत राहात असत. रामरावांना दोन मुलें होतीं. एक रामदास मुलगा व दुसरी शांता नांवाची मुलगी. दोन्ही मुलें शिकण्यासाठी गोविंदरावांकडेच राहात असत.

रामदास व शांता सुटी आली की, आपल्या खेडेगावांत जात. तेथे त्यांच्या ओळखी होत्या. तेथील मुलांत खेळत. शेताभातांत भटकत. मोट चालवीत असत.

" रामदास, तूं इंग्रजी शिकतोस. मग शेतांत कशाला जातोस ?" बापाने विचारिलें.

" शिकणें म्हणजे का काम न करणें ? जो शिकेल त्याने तर अधिक प्रेमाने काम केलें पाहिजे. " रामदास म्हणाला.

" मला मोट हाकायला येते. बारी धरायला येते. मी शिकेन व शेतांत काम करीन. " शांता बोलली.

" शिकून सुखाची नोकरी मिळवावी. रामदासला तर बाळासाहेब दत्तक घेणार आहेत. सारी इस्टेट मिळणार. शीक, साहेब हो. मोठी नोकरी लावून देतील. शांता पण शिकेल. कोणा बॅरिस्टरला मग देऊन टाकूं." रामराव मनांतील मनोरथ सांगूं लागले.

" मला नको बॅरिस्टर. आमचे ते एक मास्तर परवा म्हणाले, बॅरिस्टर म्हणजे बालिशतर. " शांता म्हणाली.

" म्हणजे काय ?" पित्याने विचारिलें.

" म्हणजे मूर्ख. " शांता म्हणाली.

" वेडी आहांत तुम्ही पोरें. रामदास, स्वच्छ कपडे घालावे. नीट राहावें. गोविंदरावांना आवडेल असें करीत जा."

" दत्तक जाणें म्हणजे लक्षाधीश होणें ?" बाप म्हणाला.

शेवटीं रामदासला दत्तक घेण्याचें निश्चित ठरलें. मुहूर्त ठरला. मोठा सोहळा झाला. शेकडो लोकांस आमंत्रणें गेलीं. सरकारी साहेब आले. सरदार–जहागिरदार आले. शेट–सावकार आले. वकील–डॉक्टर आले. गाणीं, नाच, तमाशे, पंगती–कशाला सीमा नव्हती. जणु इंद्रपुरीच चार दिवस खाली उतरली होती.

त्या दिवशीं रामदासाच्या अंगावर भरजरी पोशाख होता. डोक्याला भरजरी टोपी होती. गळ्यांत सोन्याची कंठी होती. मोत्यांचा हार होता. बोटांतून हिऱ्याच्या आंगठ्या होत्या. पायांत मऊ जोडा होता. कानांत अत्तरांचे फाये होते. रामदास एखाद्या राजपुत्रासारखा शोभत होता.

रामदास सजला होता. परंतु शांती ? ती साधीच होती. तिला कोण देणार दागदागिने ? ती हिंडत रामदास बसला होता तेथे आली.

"तिकडे जा ग पोरी." कोणी तरी म्हटलें.

"माझा दादा मला पाह्यचा आहे." असें म्हणत शांता आंत आली. शांती भावाजवळ जाऊन बसली.

"ही का तुमची बहीण ?" कोणा पाहुण्याने विचारलें.

"हा, हिचें नांव शांता. मोठी हुशार आहे." रामदास म्हणाला.

"परंतु तुझ्यासारखी मी श्रीमंत थोडीच आहे ? तुझ्या अंगावर भरजरी कपडे. तुझ्याजवळ बसायला मला भीति वाटते भाऊ. हे बघ तुझ्या अंगावर किती दागिने. भाऊ, बोटें जड नाही झालीं ? गळा या हारांनीं दुखूं नाही लागला ?" शांतीने विचारिलें.

"भाऊ, मी जाऊं ? तूं बोलत का नाहीस ? एवढ्यांतच परक्यांचा झालास ? दागदागिन्यांनी दूर गेलास ?" शांतीने विचारिलें.

"शांते, तूं येथे कां आलीस ?" भाऊने प्रश्न केला.

"मला आज कोणी विचारीना म्हणून." ती म्हणाली.

"तुझ्या अंगावर नाही घातले दागिने कोणीं ?" त्याने विचारिलें.

"नाही भाऊ. तूं दत्तक गेलास. मी नाही कांही !" शांता म्हणाली.

"शांता, तुला विसरून मीं दागिने घातले. हे काढून ठेवतों मी." भाऊ म्हणाला.

"छे: छे: ! असें नका करूं साहेब. किती पाहुणे आलेले, गोविंदरावांना काय वाटेल ? राहूं देत ते दागिने." जवळची मंडळी सांगूं लागली.

इतक्यांत गोविंदराव तेथे आले.

"काय रामदास, आनंद आहे ना ? असा खिन्न कां ? काय झालें रे ?" त्यांनी विचारिलें.

"शांतीच्या अंगावर कांहीं नाही म्हणून त्यांना वाईट वाटत आहे. स्वत:चे दागिने ते काढीत आहेत." कोणीं सांगितलें.

"शांते, तुला हवेत होय दागिने ? चल खाली." गोविंदराव म्हणाले.

"मला नकोत. मला नाही आवडत. भाऊलाच सजूं दे नंदीबैल." शांता म्हणाली.

"असें म्हणूं नये, शांते. पाहुणे आलेले आहेत. हट्ट करूं नये. चल, मी तुला नटवितों." असें म्हणून शांतीचा हात धरून त्यांनी तिला खाली नेलें.

"भाऊसाहेब, शिरा आणूं का थोडा ? आणि कॉफी घ्याल की कोको ?" एक गृहस्थ लघळपणा करीत विचारूं लागला.

परंतु रामदास शांत होता. तो विचार करीत होता. इतक्यांत त्याच्या कानावर गाणें आलें. रस्त्यांत कोणीतरी गाणें म्हणत होतें.

हृदय जणू कोणा तें नसे
बंधु उपाशी लाखो मरती
सुचति विलास कसे—

हाहा:कार ध्वनि शत उठती
येथ उडत जलसे—

निज भगिनींच्या अंगावरती
चिंधिहि एक नसे—

कष्ट करुनिहि गरिब उपाशी
तुमचे भरति खिसे—

नाच तमाशे करण्याचा हा
अवसर काय असे—

**देव ओळखा, धर्म ओळखा,**
**सकलां विनवितसें–**
**खादी घेउनी खादी घाला**
**इतुकें मागतसें–**

रामदास गॅलरींत येऊन उभा राहिला. तो तें गाणें ऐकत होता. गाणें म्हणणाऱ्याची व त्याची दृष्टादृष्ट झाली.

रामदास गंभीर होऊन आंत आला. तो कोणाशीं बोलेना, हंसेना, खेळेना. सर्वत्र वार्ता गेली. गोविंदराव धावत आले. रामराव दूर उभे राहिले. डॉक्टर नळ्या घेऊन आले.

" रामदास, काय होतें बाळ ? " गोविंदरावांनी विचारलें.

" माझ्या साऱ्या अंगाची आग होत आहे. " तो रडत म्हणाला.

" डॉक्टर, काय असेल हो ? " रामरावांनी विचारलें.

" मी वांतीचें औषध देतों. पोटांत कांही गेलें असेल तर कळून येईल. " डॉक्टर धीर देत म्हणाले.

रामदासाची सख्खी आई त्याच्याजवळ बसली. बाकी मंडळी जरा दूर गेली. कोणी म्हणूं लागले, दृष्ट पडली. कोणी म्हणाले, जागरण झालें असेल. नाना तर्क चालले होते. परंतु एकाने सांगितलें कीं, खाली कोणी गाणें म्हणत होता. तें ऐकून भाऊसाहेब खिन्न झाले व आंत येऊन रडूं लागले.

" हाकलून लावा त्या भिकाऱ्याला. या रस्त्यावर येऊं देऊं नका. गांधींच्या लोकांना कांही काळवेळहि नाही. समारंभाचे वेळींहि सुतक्यासारखे येतात व रडकीं गाणीं गाऊन लोकांना रडवतात. " एक देशी साहेब म्हणाला.

त्या गाणें म्हणणाऱ्या मुलास हाकलून लावण्यासाठी भुतावळ धावली.

परंतु दरवाजांत शांता होती.

" नका रे त्याला हाकलूं. कसं गोड म्हणत आहे गाणं ! " ती म्हणाली.

" तुला गाणं गोड लागत आहे; पण तिकडे भावाचा जातो आहे प्राण. " एक जण गरजला.

" भाऊचा हा मित्र आहे. हा भिकारी नाही. हा त्या सोनखेडीच्या आश्रमांतील दयाराम. भाऊजवळ त्याला न्याल तर भाऊला बरें वाटेल. भाऊचे जाणारे प्राण परत येतील. " शांता शांतपणें म्हणाली.

परंतु त्या पोरीचें कोण ऐकतो ? दयाराम निघून गेला. शांता वर गेली. भाऊच्या भोवती गर्दी होती. डॉक्टरांचें औषध आलें. भाऊनें तें फेकून दिलें. सारे लोक सचिंत झाले. पाहुणेमंडळी हळूहळू जाऊं लागली. कारण गाणें-बजावणें आता बंद करावें लागलें. फोनोच्या प्लेटी बंद झाल्या.

" रामदास, काय होतें तुला तें सांग. " गोविंदराव म्हणाले.

" आग नाही का कमी होत ? " नव्या आईने विचारिलें.

" किती काळवंडला चेहरा ! दृष्ट पडली. " सख्खी आई म्हणाली.

" आई, त्या गाणें म्हणणाऱ्याला येथे आणाल तरच भाऊच्या अंगाची आग थांबेल. " शांतेने सुचविलें.

" त्यामुळे तर आग पेटली. " लोक म्हणाले.

" तोच विझवील. " शांता म्हणाली.

" बोलवा रे त्या भिकाऱ्याला. " गोविंदरावांनी सांगितलें.

पूर्वी जे नोकरचाकर त्याला हाकलण्यासाठी धावले होते, तेच आता त्याला शोधून आणण्यासाठी धावले.

" मी कशाला येऊं ? " दयाराम म्हणाला.

" अरे, चल बाबा. " नोकर म्हणाले.

" त्या बंगल्यांत माझ्याहि अंगाची आग होईल. कशाला मी येऊं ? " दयाराम पुन्हा म्हणाला.

" भाऊसाहेबांचे प्राण पेटवलेस. पाप्या, आता शांत करायला चल. " कोणी काकुळतेने बोलला.

" चला, माझ्या खांद्यावर खादी आहेच. खादीचें रामनाम मजजवळ आहे. त्या बंगल्यांतील ज्वाळा मला लागणार नाहीत. " तो म्हणाला.

त्या दिवाणखान्यांत दयाराम आला.

" भाऊ, हा बघ कोण आला आहे. " शांतीने सांगितलें. रामदासाने डोळे उघडले. तो एकदम उठला व त्याने दयारामला मिठी मारली. परंतु पुन्हा एकदम तो दूर झाला.

" दयाराम, फाड हे माझे कपडे व तुझ्या खांद्यावरील लाखो जीवांना शांति देणारी खादी माझ्या अंगावर घाल. मी जळत आहें. " रामदास रडत म्हणाला. दयारामने त्याला खादीचें धोतर दिलें. खादीचा सदरा

दिला. रामदासाने खादी परिधान केली. तो शांत झाला. त्याचा काळवंड-लेला मुखचंद्र हसला. ढग गेले.

"तुम्ही सर्व येथून जा. आम्हांला बसूं दे." रामदास म्हणाला.

"भाऊ, मीसुद्धा जाऊं?" शांतीने विचारिलें.

"तूं थांब." रामदासने सांगितलें.

सारी मंडळी जीव खाली पडून गेली. पुन्हा उरलेले पाहुणे पली–कडे फोनो वाजवूं लागले. पुन्हा कपबशांचे आवाज खळखळूं लागले.

"दयाराम, नेमका आज तूं कसा आलास?" रामदासने विचारिलें.

"अर्जुनासाठी गोपालकृष्णाने गीता सांगितली. भाऊसाठी गीत म्हटलें दयारामने." शांता म्हणाली.

"रामदास, तूं संपत्तीचा मालक होत आहेस. परंतु दरिद्री-नारायणाची ही गोष्ट विसरूं नकोस." दयाराम म्हणाला.

"नाही, विसरणार नाही." रामदासाने सांगितलें.

"दयाराम, तुला कांही खायला आणूं?" शांताने विचारिलें,

"आण, मला भूक लागली आहे." दयाराम म्हणाला. त्याने फराळ केला. त्या भावंडांचा निरोप घेऊन तो निघून गेला.

"शांते, आपण दोघांनी गरिबांची सेवा करायचें ठरवूं. माझें आज दत्तविधान झालें. बाबांनी आज मला देऊन टाकलें. कोणाला दिलें? गोविंदरावांना? या इस्टेटीला? नाही. आज माझें देशदेवाला त्यांनी दान दिलें; आणि शांते, तुझेंहि दान होऊं दे. गरिबांचे संसार सुखी व सुंदर करण्यासाठी आपण आपली जीवनें अर्पायचीं. ठरलें ना?" राम–दासाने विचारिलें.

"ठरलें. परंतु आपण कचरलों तर? घसरलों तर?" तिने विचारिलें.

"सद्धेतूला परमेश्वर मरूं देत नाही." रामदास डोळे मिटून म्हणाला.

✦ ✦ ✦

## मुकुंदराव : : ३

रामदास इंग्रजी सातवींत होता. शांता सहावींत होती. दोघें पूर्वीप्रमाणेच साधेपणें राहात. रामदास अंगावर खादी घाली. शांताहि खादी वापरी. त्यांनी आपापल्या वर्गांत खादीचें वेड वाढविलें.

परंतु एक नवीन घटना झाली. त्या शाळेंतून दरवर्षी कांही जुने शिक्षक जात आणि कांही नवीन येत. यंदाहि एक नवीन शिक्षक आले होते. तेजस्वी होती ती मूर्ति. कर्तव्यकठोर असूनहि कारुण्यमयी होती. त्या मूर्तीने मुलांना वेड लावलें. त्यांचा तास केव्हा येतो, मुलें वाट बघत. ते गौर वर्णाचे होते. त्या गौरवर्णावर पुन्हा शुभ्र खादी.

वर्गांत शेकडो प्रश्नांची ते चर्चा करीत. आजकालच्या सर्व प्रश्नांशीं मुलांचा परिचय करून देणें म्हणजेच शिक्षण, असें ते म्हणत. मुलेंहि त्यांना निःशंकपणें शंका विचारीत.

एके दिवशीं शांतीने प्रश्न केला, " अहिंसेने का क्रांति होईल ? "

ते म्हणाले, " क्रांतीचा व हिंसा–अहिंसेचा काय संबंध ? क्रांति म्हणजे काय ? क्रांति म्हणजे बदल. परंतु नुसता बदल नव्हे. परकें राज्य जाऊन तेथे आपलें राज्य झालें, एवढ्याने क्रांति होत नाही. क्रांति म्हणजे मूल्यपरिवर्तन.

" प्रतिष्ठा पैशाची नाही, पोपटपंचीची नाही, धोक्या विद्येची नाहीं. प्रतिष्ठा कुळाची नको, प्रतिष्ठा बाह्य बळाची नको. मी म्हणे चंद्रवंशांतला, सूर्यवंशांतला. मी म्हणे आर्य. मी म्हणे कपिगोत्रोत्पन्न. बाकीचे का मातींतून जन्मले ? आणि तूं सोन्याचा जन्मलास ? तुझी स्वतःची काय किंमत तें सांग. तूं कोणाचा कोण, तें नको सांगूं. तुझ्या नसांतून कोणचेंहि रक्त वाहात असलें तरी त्याचा रंग लालच असणार. तुझ्या रक्ताचा रंग तुझ्या कृतींतून प्रकट होऊं दे. तुझी किंमत तुझ्या कृतीवरून ठरूं दे. याला म्हणतात क्रांति.

" अशी क्रांति आज हिंदुस्थानांतच होत आहे. साम्यवादी बंधूंनी धनाची प्रतिष्ठा, पोपटपंचीची प्रतिष्ठा, बुवाशाहीची प्रतिष्ठा, खोटा जात्यभिमान व कुलाभिमानाची प्रतिष्ठा दूर केली. "

मुलांचा एखादा प्रश्न यावा व त्याच्यावरच तास संपून जावा, असें कितीदा तरी होई. मुकुंदरावांच्या घरीं जायचें. त्यांना प्रश्न विचारून ज्ञान मिळवायचें.

मुकुंदराव दयारामच्या आश्रमांत जात. रविवार आला कीं ते सोनखेडीस जायचे. बरोबर मुलें असायचीं. तेथे बरीच खादी शिल्लक पडलेली होती. ती पाहून मुकुंदरावांना वाईट वाटे; परंतु ते एकटे काय करणार? वर्गांत मुलांना नेहमी खादी घेण्यास सांगत असत.

त्या दिवशीं ललितमोहन नवें विलायती धोतर नेसून आला होता. मुकुंदरावांनीं तें पाहिलें. त्यांना ती गोष्ट सहन झाली नाही. ते म्हणाले, " ललितमोहन, मी इतकें सांगतों तरी तूं आज नवीन विलायती धोतर घेतलेंसच. तूं स्वतःची बुद्धि वीक असं नाही मी म्हणत. तूं माझा गुलाम नको होऊं. परंतु त्या सोनखेडीला जाऊन बघशील तर तुझा भ्रम नष्ट होईल. तेथें बायकामाणसें सूत घेऊन येतात; आणा दोन आणे मिळतात त्या वेळेस त्यांना केवढा आधार वाटतो! या देशांत चार कोट लोक बेकार आहेत. कोणता देणार त्यांना धंदा ? "

" माझे वडील मामलेदार आहेत. मी खादी वापरीन तर त्यांच्या नोकरीला धोका येईल. " ललितमोहन म्हणाला.

" तुमचा मुलगा कोणता कपडा वापरतो हें कांहीं कलेक्टर मामलेदाराला विचारीत नाही. पुष्कळ सरकारी नोकरहि आता खादी वापरतात, खादी खपवितात. " मुकुंदराव म्हणाले.

शाळेंत ही गोष्ट झाली. परंतु त्याचे परिणाम निराळेच झाले. मामलेदार साहेबांकडून शाळाचालकांस बोलावणें आलें. गणपतराव तेथे गेले. शिपायाने आंत जाऊन सांगितलें कीं, शाळेचे चालक आले आहेत.

" आंत घेऊन ये त्यांना. " साहेब म्हणाले.

गणपतराव नम्रपणें आंत आले व उभे राहिले.

" बसा ना हो, या असे. " साहेबांनी सांगितलें.

" आज सकाळींच कां बोलावलं? कांही विशेष काम? " गणपतरावांनी प्रश्नकेला.

" तुम्हांला दोन हिताच्या गोष्टी मी सांगणार आहें. तुमच्या शाळेंत यंदा एक नवीन शिक्षक आले आहेत." मामलेदार म्हणाले.

" हो, मोठे चांगले आहेत शिक्षक. मुलांत मुलांसारखे, थोरांत थोरासारखे. कळकळ आहे, वाचन आहे. विद्वत्ता आहे. पुन्हा साधे. मुलांना त्यांचं वेड लागलं आहे. शाळेला चांगलीच जोड मिळाली." गणपतरावांनी सांगितलें.

" तसे ते चांगले असतील. परंतु कांही कांही शिक्षक फाजील उत्साही असतात. पुस्तकांतलं शिकवायचेऐवजी भलत्याच गोष्टी सांगू लागतात. अहो, काल त्यांनी आमच्या ललितच्या धोतरावर टीका केली. म्हणे खादी कां नाही नेसत ? आता यांचा कांही संबंध आहे का ? अहो, आम्ही सरकारी नोकर. सर्व बाजूंनी पाहावें लागतें. आमच्यावरहि गुप्त पोलिस असतात. ललितला ते बोलले. मुलं त्याला हसलीं. त्याला हसलीं म्हणजे मलाच हसलीं. असले शिक्षक शाळेला धोका देतील. शाळेची ग्रँट वाढत नाही म्हणतां, आणि असलीं विषं पुन्हा जवळ बाळगतां !" मामलेदार आवाज चढवीत म्हणाले.

" बरं, मी विचार करतों. आपला आभारी आहें. येतों मी." असें म्हणून गणपतराव उठले.

ते घरीं आले. त्यांना अत्यंत वाईट वाटत होतें. संस्थेचें खरें हित कशांत? नांवाची दगडी संस्था टिकविण्यांत काय अर्थ ? मुकुंदरावांना कोणत्या तोंडाने सांगायचें ? शेवटीं तें त्यांना कांहीच बोलले नाहींत.

परंतु कांहीं दिवसांनी शिक्षणाधिकाऱ्यांकडून एक लिफाफा आला. त्यांत स्वच्छ हुकूमच होता की, मुकुंदरावांना ताबडतोब काढून टाका. गणपतरावांच्या हातांतून तें पाकीट खाली गळलें. काय करावें त्यांना सुचेना. शेवटीं त्यांनी मुकुंदरावांना बोलावणें पाठविलें. मुकुंदराव आले. गणपतरावांनी तो लिफाफा त्यांच्या हातीं दिला.

मुकुंदराव शांतपणें म्हणाले, " तुम्ही वाईट वाटून नका घेऊं. मला याचीं स्वप्नें पडूं लागलींच होतीं. दोन देवतांची सेवा करतां येत नसते. तुम्ही मला उदारपणाने वागवलंत, प्रेम दिलंत, याबद्दल मी आपला आभारी आहें."

मुकुंदराव वर्गावर गेले. शाळेंतील आजचा शेवटचा तास होता. परंतु नित्याप्रमाणे ते बोलत होते. त्यांनी कांही सांगितलें नाही. भरलेलें

हृदय ते आंतल्या आंत दाबून ठेवीत होते. परंतु मुलांत कुणकुण पसरली होती.

शांतीने विचारलें, "तुम्ही शाळा सोडून जाणार ?"

"कोणीं सांगितलें तुला ? कोण म्हणतो मी जाणार म्हणून ?" मुकुंदरावांनी हसत विचारलें.

"साऱ्या शाळेंत वार्ता पसरली आहे." मुलें एकदम म्हणालीं.

"होय, मी जाणार आहें. आजचा शेवटचा दिवस."

"तुम्ही गेल्यावर आम्हांला ?"

"देवाची आज्ञा होतांच हजारो धावून येतील. कोणासहि अहंकार नको. कोणासहि निराशा नको."

"आमचे देव तुम्ही होतां. दुसरा देव आम्हांला माहीत नाही. तुम्ही शाळेंतून जाणार असलां तरी या गांवीं राहा. रामपूर सोडून जाऊं नका. नाही तर सोनखेडीस राहा. सुटीच्या दिवशीं आम्ही येत जाऊं."

"आतां कधी भेटलां तर खादी घालून मला भेटा तुम्ही. सारे खादी-धारी असतां तर मला आज जावें लागलें नसतें !" मुकुंदराव म्हणाले.

"आम्हांला शेवटचे दोन शब्द सांगा." शांता म्हणाली.

"विचाराने वागा. विचाराप्रमाणे वागण्याचें धैर्य दाखवा. नेभळेपणा नको. त्याप्रमाणेच जाति व धर्म यांच्या नांवें द्वेष फैलावूं नका. जो जो गरीब असेल, जो जो छळला जाणार असेल, तो आपला माना. छळणारा जो जो असेल, तो परका माना. हिंदु, मुसलमान, गोरे, काळे असे भेद खरे नाहीत. खरे भेद प्राचीनकाळापासून दोनच सांगितलेले आहेत. दुसऱ्याच्या संसाराची धूळदाण करणारे व ही धूळदाण बंद करण्यासाठी खटपट करणारे. असा अनंतकाळापासून झगडा आहे. तुम्ही न्यायाच्या बाजूने उद्या उभे राहा. जें कांही शिकाल तें घेऊन या झगड्यांत मनःपूर्वक सामील व्हा.

"क्रांतीसाठी वातावरण तयार केलें पाहिजे. तुम्ही सुखाचे संसार सोडून गरिबांत जा. शिकून हमाल व्हा; मजूर व्हा. सुशिक्षित मुलींनी शेतकऱ्यांच्या मुलांजवळ लग्नें लावावीं. शेतांत कामें करावी. डोक्यावर भारे घ्यावे. शेतांतील गवत काढतां काढतां समाजांतील विषमता दूर करण्याचे विचार

त्यांना द्या. कामें करतां करतां क्रांतीचीं नवीन गाणीं, क्रांतीचे नवीन अभंग, क्रांतीचे नवीन वेद पसरवा दशदिशांत.

" आणखी काय सांगूं ? सध्या निदान खादी वापरण्याचें तरी व्रत घ्या.'"

मुकुंदराव सांगत होते. मुलें शब्दन् शब्द पीत होतीं. शेवटीं ते सद्‌गदित होऊन म्हणाले, " माझें वाईट सारें विसरून जा. निर्दोष कोण आहे ? मी तुम्हांला बोललों असेन, कोणाला रडविलें असेल, कोणाचा उपहास केला असेल. ललित, तुला मी त्या दिवशीं बोललों. राग नको मानूं. माझ्या लहान भावाला नसतें का मीं सांगितलें ?"

ललितच्या डोळ्यांतून पाणी आलें, मुलेंहि गहिवरलीं.

" ललित, उगी. आपण अंत:करणांत सद्‌भाव ठेवून एकमेकांचा निरोप घेऊं या. एक वाक्य लक्ष्यांत ठेवा. जगांत अनंत दु:ख आधीच आहे. तें दूर न करतां आलें तर निदान त्यांत भर घालूं नका. तुमच्या संगतींत माझा ब्रह्मानंद होता."

घंटा झाली. मुकुंदराव निघून गेले. सर्व शिक्षकांचा त्यांनी निरोप घेतला. शाळेंतील कारकून, ग्रंथालयाचे चिटणीस, सर्वांना भेटले. शाळेच्या शिपायांसहि त्यांनी नमस्कार केला. मैदानावर मुलांशीं शेवटचे खेळले, व मुकुंदराव घरीं गेले.

✦ ✦ ✦

## दिवाळी : : ४

दिवाळीची सुट्टी लागली होती. शांता आपल्या खेडेगांवांतील घरीं गेली. तिच्या गावाचें नांव शिवतर. शिवतर गावाला मराठी शाळाहि नव्हती. गावांत लिहिणारा, वाचणारा क्वचितच असे. गावांत अज्ञान होतें तसें दारिद्र्यहि होतें. गावची जमीन सावकारांची, जमीनदारांची. गोविंदराव चव्हाणांची तेथे बरीच जमीन होती. कांही गुजराथी व मारवाडी सावकारांची होती. इतरहि सावकार छोटेमोठे होते. गावांत सारे भित्रे. तसे ते समोर वाघ येता तर त्याला काठीनें मारते, परंतु साधा पोलीस आला तर ते घाबरत.

शांतीला वाटलें, आपल्या गावांतील बहिणींना शिकवावें. ती घरोघर जाई व प्रेमाने बोले. तुम्ही लिहायला-वाचायला शिका, असें सांगे.

" शांते, आम्हांला शिकून का मडमीण व्हायचं आहे ? " एक भगिनी म्हणाली.

" आम्हांला का नोकरी करायची आहे ?" दुसरीने विचारलें.

" नोकरीसाठी नाही शिकायचं. मडमीण होण्यासाठी नाही. परंतु मडमीण सात समुद्रांपलीकडून एकटी येते. कशाच्या जोरावर ? ज्ञानाच्या. ज्ञानामुळे ती निर्भय असते. तुम्हांला रेल्वेने कोठे जायचं झालं तर बरोबर कोणी हवं. आधीच गरीब, परंतु दुप्पट खर्च असा होतो. तिकीट कोठलं तें वाचतां येत नाही. स्टेशन कोणतं तें कळत नाही. तिकिटाची किंमत किती ती समजत नाही. यासाठी शिका. " शांता म्हणाली.

" खरंच की शांता! आम्हांला जायचं होतं नगरदेवळ्याला, तर उतरून पडलों कजगावला. कोण फजिती !" पार्वती म्हणाली.

" आणि आम्हांला पंढरपूरला जातांना तिकिटाची किंमत जास्त घेतलीन् त्या मास्तरानं. म्हणे कसा, एकादशीला तिकिटें महाग होतात !" अनसूया म्हणाली.

" एकादशीला का तिकिट महाग होतं ? शेंगाचे दाणे महाग होतात, खजूर महाग होतो. " आनंदी म्हणाली.

" शेतकऱ्याला पत्र लिहितां येत नाही; अर्ज लिहितां येत नाहीं.साक्षीदाराशिवाय आलेली मनीऑर्डर मिळत नाही. सर्वत्र त्याला दक्षिणा ठेवावी लागते. हें सारें अज्ञान नको का दवडायला ? मागील वर्षी पीक आलें नव्हतें. कलेक्टर कसा म्हणे, ' जमाखर्च दाखवा. ' कोठून दाखविणार जमाखर्च ? " शांता म्हणाली.

" घरांतील मडकीं रिकामीं आहेत हें का कलेक्टराला माहीत नव्हतं ? येऊन बघायचीं होतीं त्याने. गाडग्या-मडक्यांचेहि लिलाव केले !" पार्वती म्हणाली.

" परंतु आपणांजवळ ज्ञान असतें, निर्भयता असती, तर आपण लढा केला असता. तुम्ही शिका. मी शिकवीन. तुमच्याबरोबर मी कापूस वेचायला

येईन. तुम्हांला गाणीं सांगेन. आपलें दुर्दैव आपण दूर केलें पाहिजे. " शांतेने सांगितलें.

"पण शांते, तूं कांही म्हण, आपलें दैवच खोटें." एक म्हातारी बाई म्हणाली.

" नाही आजी. हें दैवबिव लबाडांनी निर्माण केलं आहे. म्हणे तुला शनीची साडेसाती आहे. आजी, जसे चंद्र-सूर्य आहेत, तसा एक आकाशांत शनि असतो. त्याचा ग काय संबंध ? खरी साडेसाती या सावकारांची. " शांता म्हणाली.

"मग येणार ना शिकायला ?" शांतेनें विचारलें.

" हो, येऊं. " साऱ्या म्हणाल्या.

" मी म्हातारीहि येईन. " ती वृद्धा म्हणाली.

शांतेचा वर्ग सुरू झाला. मुकुंदरावांपासून तिने एक प्रार्थना करून घेतली होती. ती आरंभीं म्हटली जाई.

ती सोपी तेजस्वी प्रार्थना शिवतरांतील लहानथोर भगिनी म्हणूं लागल्या. वर्गांत मोठा आनंद असे. म्हाताऱ्या बायांबरोबर लहान मुलीहि येत. मोठी गंमत होई. तेथे अक्षरें शिकतां शिकतां किती तरी दुसऱ्या गोष्टी ऐकायला मिळत.

गावांतील तरुण म्हणूं लागले, आपण का मागे राहावें ? बायांचा वर्ग सुरू झाला की बाहेर येऊन ते ऐकत. बाहेरून बघत. त्यांचीहि ज्ञानपिपासा जागृत झाली. एके दिवशीं कांही किसान युवक शांतेकडे आले व म्हणाले, " आमचाहि वर्ग घेत जा ना ताई. "

" काय मोहन, तूंसुद्धां शिकणार वाटतं ?" शांतेने विचारलें.

"मी का माणूस नको होऊं ? आमच्या गावांतील आयाबहिणी पुढे चालल्या. आम्ही मागं का राहूं ? " तेजस्वी मोहनने उत्तर दिलें.

" हें चित्र बघ मोहन. हें चीन देशांतील आहे. हे शेतकरी शेतांत भाकर खायला झाडाखाली बसले आहेत व खातां खातां वर्तमानपत्र वाचीत आहेत. एका हातांत नांगर व दुसऱ्या हातांत 'क्रांति ' वर्तमानपत्र, असं होईल तेव्हा स्वराज्य जवळ येईल." शांता म्हणाली.

ते तरुण तें चित्र पाहूं लागले. कांही दुसरेहि शेतकरी भोवती जमले. चित्र पाहूं लागले. माना डोलावूं लागले.

" ताई, धान्य दिवाणखान्यांत का कोणी पेरतो ? गालिचे, जाजमें यांवर का कोणी पेरतो ? धान्य बाहेर शेतांत पेरावं लागतं. तेव्हा तें फोफावतं. स्वराज्याचे विचार शेतकऱ्यांच्या नांगराशीं येऊन मिळतील तेव्हाच फोफावतील. दिवाणखान्यांतील राजकारण का स्वराज्य आणून देईल ? " मोहनने प्रश्न केला.

" मोहन, किती महत्त्वाची गोष्ट सांगितलीस तूं ! संपत्ति निर्माण करणारे तुम्ही जेव्हा जागृत व्हाल, आजूबाजूला काय चाललें आहे तें पाहाल, तेव्हाच खरें स्वातंत्र्य येईल. " शांता म्हणाली.

" त्यापलीकडे कंडारी गावीं कोणीं शिकवायचा वर्ग काढला तर, जमीनदार म्हणूं लागले, ' शिकायला जाल तर कामावर ठेवणार नाहीं. ' रात्रीं दहा–दहा वाजेपर्यंत घरीं राबवूं लागले, म्हणजे शिकायला जातां येऊं नये. " गणपतने इतिहास सांगितला.

" मग आमचा घ्याल ना वर्ग ताई ?" शंकरनें विचारलें.

" होय. बायकांचा संपला की मग तुमचा. " शांता म्हणाली.

" बायका पुढे व आम्ही मागे ! शांताबाई बायकांचीच बाजू घेणार ! " मोहन हसून म्हणाला.

" आपण बायकांना कमी मानतों हीच चूक. " शांता हसून म्हणाली.

" पण ताई, तुमची सुटी संपली म्हणजे मग काय ? " पांडूने विचारलें.

" मग मोहन शिकवील. मोहन, तूं येत जा ना जरा दिवसाहि माझ्याकडे शिकायला. " शांताने सांगितलें.

" जात जा रे. एकटा तर. बायको तर मिळत नाही ! " पांडू म्हणाला.

" बाप होता तर मोहनचीं त्याने पुन्हा पुन्हा तीन लग्नें केलीं. परंतु नवी नवरी मरायची. मोहनला मुलगी देणें म्हणजे मरणाला देणें असें म्हणतात. " गणपत बोलला.

" मोहन, तूं हो आपला संन्यासी. " शांता म्हणाली.

" तो का बामण आहे !" शंकर हसून म्हणाला.

' जो केवळ जगाची सेवा करील तो संन्यासी. " ती गंभीरपणें म्हणाली

" मोहन, जाईजवळ शीक. मग आमचा मास्तर हो. परंतु मारूंबिरूं नको हो छडी आम्हां म्हाताऱ्यांना !" पांडू म्हणाला.

" येऊं का मग शिकायला वेळ मिळतांच ? "

" ये. " शांता म्हणाली.

आता पुरुषांचा वर्गहि सुरू झाला. उत्साहाने लोक शिकूं लागले. गावांतील भिकू सुताराने फळे करून दिले. वर्गांत शांताने चित्रें लावलीं. मोठ्या अक्षरांतील म्हणी लावल्या. तेथे तिने दोन नकाशे टांगले. शांतेच्या उत्साहाला सीमा नव्हती. पहाटे उठून गावांत प्रभातफेरी ती काढी, साक्षरतेचीं गाणीं म्हणे. मुलेंमुली त्यांत सामील होत. गावांत नवजीवन आलें. शांता आपली सुट्टी अशी दवडीत होती. परंतु रामदास काय करीत होता ?

रामदासने गोविंदरावाजवळ मुंबई-मद्रासकडे जाण्याचा हट्ट धरला. हो ना करतां करतां त्यांनी परवानगी दिली.

" बाबा, भरपूर पैसे द्या बरोबर. " तो म्हणाला.

" किती हवेत ?" गोविंदरावांनी विचारिलें.

" द्या पांचशे. " रामदास म्हणाला.

" पांचशे ?" पित्याने आश्चर्याने विचारलें.

" बाबा, मी एक सायकल आणीन. एक सोन्याचें घड्याळ हवें मला. द्या ना बाबा. " रामदास लडिवाळपणाने म्हणाला.

" असा जरा नीट वागूं लाग. खादी घालून भिकाऱ्यासारखा नको राहूं. राजासारखा राहा. साहेबासारखा राहा. हॅट वगैरे घेऊन ये की. तुला दत्तक घेतला, पण भीति वाटूं लागली होती. आता ठीक . ते मुकुंदराव येथून गेले, बरं झालं. सारीं पोरें बिघडवीत होते. मामलेदाराचे मोठे उपकार झाले मुलांच्या आईबापांवर. " गोविंदराव म्हणाले.

" परंतु त्यांचा मुलगा वर्गांत रडला. " रामदास म्हणाला.

" मग पैसे हवेत ना? घे.नीट जपून जा,नाही तर खिसा कातरतील मुंबईचे भामटे. रस्त्यांत रात्रीं गर्दी. भेटेल कोणी व म्हणेल, 'ती बघ कशी वर चांदणी, तो बघ काय छान तारा !' आणि आपण वर पाहूं लागलों कीं इकडे खिसा कातरून पसार होतो. समजलास ना ?" गोविंदराव समजावून सांगत होते. पैसे घेऊन रामदास पहिल्या प्रवासास निघाला. श्रीमंताची दिवाळी.

परंतु गरिबांना काय ? सोनखेडीच्या आयाबहिणी दिवाळीला घरीं दोन पणत्या लावतां याव्यात म्हणून रात्रंदिवस सूत कातीत होत्या. आसपासच्या गावांच्या पण कातीत होत्या, परंतु हें सूत विकत घेऊन दयाराम काय करणार?

दयाराम, हिरालाल, माणक, पार्थ व चुडामण आश्रमांत बसले होते. आश्रमाचे ते पंचप्राण. दयाराम व माणक आसपासच्या गावांतून नेहमी हिंडत, कातायला शिकवीत, पिंजायला शिकवीत, सूत काढा म्हणून सांगत. पार्थ व चुडामण विणकाम करीत. गावांतीलहि दोन विणकर त्यांच्याबरोबर काम करायला येत. हिरालाल जमाखर्चाची व्यवस्था पाही. खादीचीं ठाणें पडलीं होतीं. पैसे तर जवळ नव्हते. रात्रीं प्रार्थनेनंतर ते पांच मित्र आपसांत बोलत होते.

हिरालाल——आता सूत घेणें बंद करा. पैसे कोठून द्यायचे ?

पार्थ–दिवाळीसाठी आशेने सूत आणतील त्यांची का निराशा करायची?

दयाराम – लेकी माहेरीं येतील. त्यांना गोडधोड करून घातलें पाहिजे ! म्हणून बायका रात्रंदिवस कातीत आहेत. सूत न घेऊं तर त्या हाय हाय म्हणतील.

हिरालाल——उद्या बाया येतील, त्यांना मी नको सांगेन. मी कठोर होईन; मला झालेंच पाहिजे.

ते मित्र सचिंतपणें अंथरुणावर पडले. दयारामला झोप येईना. त्याचे डोळे सारखे भरभरून येत होते.

दुसरा दिवस उजाडला. दयाराम व माणक आज गाणीं म्हणत हिंडायला गेले नाहीत. आश्रमांत काम करीत होते. पार्थ व चुडामण मागावर होते. हिरा खादीचीं ठाणें नीट ठेवीत होता. तों बायका आल्या. सुताच्या राशी घेऊन आल्या.

"आता सूत सध्या नको आई." हिरालाल म्हणाला.

"असं नको रे भाऊ !" जानकी म्हणाली.

"आज हिरादादा हसत नाही, बोलत नाही." तुळशी म्हणाली.

"हिरादादा, पाणी रे का डोळ्याला तुझ्या ? आमच्या डोळ्यांचं पाणी तुम्ही पुसतां. तुमच्या कोण पुशील ?" यमनी म्हणाली.

"आश्रमांत खादी पडून आहे. श्रीमंत लोक घेत नाहीत." हिरा दुःखाने म्हणाला.

" हिरा, कांही कर. परंतु आजच्या दिवस घे. मग महिना पंधरा दिवस नाही येणार. पोरी दिवाळीला घरीं येणार. दोन दिडक्या घरांत असूं देत." यशोदा म्हणाली.

" हिरा, माझ्या घरांत दिवा कधीच नसतो. म्हटलं यंदा दिवाळींत लावूं दोन. घे रे राजा सूत." सुंदरा रडत म्हणाली.

" हिरा, पोरें आज उपाशी आहेत माझीं. नाही का रे दया येत तुला ?" अन्नपूर्णेने विचारलें.

" मला कोणी विकत घेतलं असतं तर स्वतःला विकून मीं दिले असते पैसे. परंतु आम्हांला कोण घेणार विकत ?" हिरा म्हणाला.

दयाराम बाहेर आला.

" दयाराम, तूं तरी दया कर." साऱ्या हात पसरून म्हणाल्या.

" उद्या या. उद्या पैसे देऊं." दयाराम म्हणाला.

" कोठून आणणार पैसा दया ?" हिरालालने विचारलें.

" दरोडा घालून, चोरी करून. संतांना जेवण घालतां यावें म्हणून कबीराने चोरी केली." दयाराम गंभीरपणें म्हणाला.

" चला, उद्या येऊं. दयाराम कोठून तरी आणील पैसे. देव देईल." जानकी म्हणाली.

बाया उठल्या. सुताच्या गठड्या घेऊन गेल्या. आश्रमांत सारेच खिन्न बसले होते.

" आश्रमच बंद करूं या. खोटी आशा लोकांची वाढवण्यांत काय अर्थ ?" पार्थ म्हणाला.

" मुकुंदरावहि गेले. ते आपला पगार पाठवून देत. त्यांचा आधार होता."

" मुलेंहि थोडी अधिक खादी घेत. परंतु देवाने त्यांना हाकललें." चुडामण म्हणाला.

" कसला देव नि काय ! सारें झूट आहे. देव म्हणजे एक भ्रांत कल्पना आहे."

" कर तुझ्या देवाची आळवणी !" हिरा उपहासाने म्हणाला.

" मी आळवणी करीन. माझ्या इच्छेप्रमाणे झालें नाही म्हणून मी लगेच

देवाला फैलावर नाही घेणार, आई मुलांचें कधी कधी मान्य करीत नाही, म्हणून का आईला आपण शिव्या देऊं ?" दयाराम म्हणाला.

" चला, आपण कातीत बसूं. " पार्थ म्हणाला.

सारे मित्र आज कातीतच बसले. जणु ओंकाराचें भजनच तेथें चाललें होतें. गुंगुंगुंगुं सुरू होतें.

इतक्यांत कोण आले तेथे ? रामदास आला.

" रामदास, इकडे कोठे ?" दयाराम मिठी मारून म्हणाला.

" तूं म्हणाला होतास ना ! श्रीमंत झालास दरिद्री नारायणाला विसरूं नकोस. म्हणून आलों. दिवाळीच्या सणाचे वेळेस खेडयांतील दरिद्री नारायणाचें नाही स्मरण करावयाचें तर कधी ?" रामदास म्हणाला.

" ये बस. आमच्याबरोबर कात. " हिरा म्हणाला.

रामदासहि चरख्यावर बसून कातूं लागला.

सायंकाळ झाली. पार्थ स्वयंपाक करूं लागला.

मंडळी जेवली. प्रार्थना झाली. कोणी वाचीत बसले; कोणी बोलत बसले. परंतु दयाराम कोठे होता ? दयाराम गच्चींत बसून अश्रुसिंचन करीत होता.

" दया, काय झालें ?" एकदम रामदासने येऊन विचारलें.

दयाने आपलें हृदय रिकामें केलें.

" किती आहे खादी शिल्लक ?" रामदासने प्रश्न केला.

" असेल पांचशे रुपयांची." दयाने उत्तर दिलें.

" मीं सारी विकत घेतली. उद्या बाया येतील त्यांना पैसे दे. दरिद्री नारायणाची दिवाळी होऊं दे " रामदास म्हणाला.

" रामदास, ही काय थट्टा आहे ?" दयानें प्रश्न केला.

" दया, थट्टेच्या वेळीं थट्टा. मी सत्य सांगतों आहें. खादी घेतली. हें तुझ्या हातावर पैसे ठेवतों. " असें म्हणून नोटांचें पुडकें रामदासानें त्याच्या हातीं दिलें.

दयारामाच्या डोळयांतील पाणी त्या नोटांवर पडून त्या पवित्र झाल्या. मित्राचा हात हातांत घेऊन दया मुकेपणाने बसला होता. दोघे उठून खाली गेले.

" हिरा. हे घे पैसे. उद्या सूत घे. " दयाने सांगितलें.

"कोणीं दिलें ?" त्याने विचारलें.

"या शेटजींनी आपली सारी खादी खरेदी केली." दया म्हणाला.

"मला शेटजी म्हणू नका. साहेब म्हणू नका. मला भाऊ म्हणा." रामदासाने सांगितलें.

दुसरे दिवशीं रामदास मुंबईकडे गेला. पंधरावीस रुपये त्याच्याजवळ होते. रामपूरला मी कळवीन तेव्हां खादी बांधून पाठवा, असें त्याने सांगून ठेवलें होतें. हिराने मायबहिणींचें सूत घेतलें. सर्वांची आनंदी दिवाळी झाली.

आश्रमाला, खादीला, चरख्या भगवानाला घरांतून दुवा मिळाला. रामदास घरीं परत आला, परंतु बरोबर कांही नव्हतें.

"मुंबईहून रिकामासा आला ? पैसे चोरीला नाही ना गेले ?" गोविंदरावांनी विचारिलें.

"मागून माल येत आहे." रामदासने सांगितलें.

बैलगाडी आली. खादीचा गठ्ठा उतरविण्यांत आला. गाडी परत गेली.

"काय आहे यांत भाऊ ?" शांतेने विचारलें.

"यांत मजाच मजा आहे." रामदास म्हणाला.

"सायकलसुद्धा का यांत आहे ?" पित्याने विचारलें.

"सारें यांत आहे." रामदासने सांगितलें.

गाठ सोडण्यांत आली, त्यांतून शुभ्र खादी बाहेर पडली.

"हें रे काय भाऊ ?" शांतेने विचारलें.

"हीं गरिबांचीं हृदयें." तो म्हणाला.

"पांचशे रुपयांच्या का या चिंध्या आणल्यास ? गाढव आहेस. आपाला फसविलेस." गोविंदराव रागाने म्हणाले.

"बाबा, या चिंध्या नाहींत. ज्यांच्या अंगावर चिंधी नाही अशा मायबहिणींची अब्रू आहे ही. ही खादी त्यांची अब्रू सांभाळते." रामदासाने सांगितलें.

"भाऊ, सोनखेडीची ही खादी, होय ना ?" शांताने विचारिलें.

"हो बाबा. हृदयाची किंमत अमोल असते. शेकडो हृदयें या खादीने मीं जोडलीं. ५०० रुपड्या देऊन जर अशीं हृदयें मिळालीं तर चांगला नाही सौदा ?" रामदासने हसत विचारिलें.

" रामदास, इस्टेट सांभाळण्यासाठी तुला दत्तक घेतलें. तूं सारी इस्टेट घालविणार. " गोविंदराव म्हणाले.

" गरिबांचे शिव्याशाप मिळण्याऐवजी त्यांचे मंगल आशीर्वाद मिळणें हीच खरी संपत्ति. मी कदाचित् ही निर्जीव जड संपत्ति गमावून बसेन; परंतु जिवंत संपत्ति जोडीन. गरिबांच्या हृदयांचा सम्राट् होईन. हे बंगले राहणार नाहीत; परंतु गरिबांचीं हृदयमंदिरें मिळतील. " रामदास म्हणाला.

" माझे डोळे मिटो. माझ्या पाठीमागे कांही होवो. " गोविंदराव खिन्नतेने म्हणाले.

" बाबा, मीं काय वाईट केलें ? मी जाऊं घरांतून ? " रामदासाने दुःखाने विचारिलें.

" रामदास, एक तरी माझें ऐक. खादीचा नाद तुला लागला आहे. पण खादीच्या पलीकडे जाऊं नकोस " गोविंदराव म्हणाले.

" म्हणजे काय ? " शांतिनें विचारलें.

" क्रांतिकारक होऊं नकोस. "

" बाबा, क्रांति म्हणजे दुसरें काय ? क्रांति म्हणजे रक्तपात नव्हे. श्रमणाऱ्याला सुखी करणें म्हणजेच क्रांति. त्यांची मान उंच करणें म्हणजे क्रांति. " रामदास म्हणाला.

✦ ✦ ✦

## प्रयाण : : ५

रामदासाची सातवी इयत्ता संपली; पुढे काय करावयाचें ? एके दिवशीं मुकुंदराव व तो रामपूरच्या नदीतीरीं बोलत बसले होते. बहुळा नदीचा प्रवाह मोठा सुंदर होता. एके ठिकाणीं लहानसा धबधबा पडत होता. ध्येयाला मिळण्यासाठी नदी निःशंकपणें उडी घेत होती. स्वच्छ पाण्याचा फेस तेथे उसळत होता. नदींतील दिव्यता तेथे प्रकट होत होती.

"दगडधोंड्यांशीं टक्कर घेतल्याशिवाय ही दिव्यता दिसली असती का? नदीचें हें निर्मळ यश बाहेर उसळत आहे. तिच्या त्यागांतून हें वैभव

प्रकट होत आहे. तिच्या मरणांतून तिला अमर जीवन मिळत आहे." मुकुंदराव म्हणाले.

"ध्येयप्राप्तीसाठी मार्गातील सर्व विरोधावर निकराचा हल्ला चढवला पाहिजे." रामदास म्हणाले.

"मग तूं तुझ्या ध्येयप्राप्तीचें काय ठरविलेंस? हिंदुस्थानांतील सर्व मोठे मोठे आश्रम पाहून येणार ना? निरनिराळ्या महान् संस्थांतून थोडेथोडे दिवस राहून येणार ना? महात्माजींच्या तत्त्वाप्रमाणे चालणारे आश्रम पाहा. गुरुकुलें पाहा. रामकृष्ण परमहंसांच्या शिष्यांनी चालवलेल्या संस्था पाहा. गुरुदेव रवींद्रनाथांच्या विश्वभारतींत जाऊन तेथील वास घेऊन ये. जा. विशाल दृष्टीचा, मोठ्या मनाचा होऊन ये. विशाल भारताचा परिचय करून घे." मुकुंदराव सांगत होते.

"मी आधी विश्वभारतींत जाईन. तेथे कांहीं वर्षें राहून मग हिंडेन, फिरेन म्हणतों. संगीत-वादनाचा कांहीं अभ्यास करावा असेंहि मनांत आहे. बंगालमधील अभयाश्रम, खादीप्रतिष्ठान वगैरेहि सुटींत पाहीन. परंतु मुख्य केंद्र विश्वभारती. तुम्ही याल का माझ्याबरोबर? तुम्ही चला. येथे तरी तुम्ही कोठे राहणार?"

"रामदास, शेतकऱ्यांत व कामगारांत वणवा पेटवून द्यावा असें माझ्या मनांत येत आहे. त्यांची हलाखी पाहून हृदयाचें पाणी होतें. मी आता विश्वभारतींत येणें म्हणजे तो माझा बौद्धिक विलास होईल." मुकुंदराव म्हणाले.

"थोडे दिवस या. मी एकदा तेथे रुळेपर्यंत या. मला नाही म्हणूं नका. तुम्ही मग निघून या; मी आग्रह करणार नाही." रामदासाने प्रार्थना केली.

"बरें तर, येईन. थोडे दिवस त्या पवित्र स्थानीं राहून परत येईन." मुकुंदराव म्हणाले.

नदीतीरावरील शिवालयांत घंटा वाजली.

"घंटा वाजली. देवाने संमति दिली." रामदास म्हणाला.

"तुझे गोविंदराव फार आढेवेढे नाही ना घेणार?" मुकुंदरावांनी विचारलें.

"त्यांना एकच भीति वाटते की, मी बंगालमध्ये गेलों तर क्रांतिकारक

होईन. तुम्ही बरोबर असला म्हणजे त्यांनाहि बरें वाटेल. खादीच्या बाहेर फारसा मी जाणार नाही, असा त्यांना भरवसा वाटेल, जाण्याला संमति देतील. " रामदास म्हणाला.

इतक्यांत पाठीमागून येऊन कोणीं तरी रामदासाचे डोळे धरले. मुकुंदराव हसूं लागले.

" शांता आहे. दुसरें कोण असणार ? " रामदास म्हणाला.

" कसें रे ओळखतोस भाऊ ? " शांतेने विचारलें.

" मला सारें समजतें. तूं देवळांत कां आली होतीस, तेंहि समजतें. " रामदास हसत म्हणाला.

" घंटा तूंच वाजविलीस ? " मुकुंदरावांनीं विचारलें.

" अहो, या मंदिरांत कोणी येत नाही. सोमवारीं क्वचित् कोणी येतो. " रामदास म्हणाला.

" मग शांता कां आली होती ? " मुकुंदरावांनी प्रश्न केला.

" लग्न लवकर व्हावें म्हणून, बॅरिस्टर नवरा मिळावा म्हणून. " रामदास म्हणाला.

" होय का ग शांते ? तूं शिकणार ना होतीस ? " मुकुंदराव आश्चर्याने म्हणाले.

" भाऊचें तुम्ही काय ऐकतां ! ज्याला त्याला आपणासारखेच इतर असें वाटत असतें. भाऊ, तूं जातो आहेस बंगालमध्ये. बंगाली जादूगारीण भेटेल हो एखादी. जपून राहा. " शांता त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हणाली.

" माझी नको काळजी. मुकुंदराव आहेत माझ्याबरोबर. तुला येणार आहेत मागणी घालायला; त्या वेळेस नीट जा. नीट उभी राहा. श्रीमंत सरदारांचे चिरंजीव आहेत बरें ते. शांतीचा काय मग थाट ? " रामदास थट्टा करूं लागला.

" खरेंच का कोणी मागणी घालायला येणार आहेत ? " मुकुंदरावांनी प्रश्न केला.

" होय. " रामदास म्हणाला

" शांते, मग काय करणार तूं ? " मुकुंदरावांनी विचारलें.



2ee०
ग्रा का
२७१६
आ. दि. ३।७।

" जो शेतांत काम करील, मोट हाकील, लाकडें फोडील, शेण भरील, चिखल असो, थंडी असो, जुमानणार नाहीं; डोक्यावरून भारे आणील, बायकोबरोबर दळूं लागेल, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी भांडेल, किसानांचे मोर्चे काढील, क्रांतींत सामील होईल, अशाशीं मी लग्न लावीन. आहेत का हे माझे पति होऊं पाहणारे तयार ? असा मी प्रश्न विचारीन." शांता म्हणाली.

" शांते, तूं इतके विचार करायला कशी शिकलीस ? " मुकुंद-रावांनी विचारलें.

" ही तुमच्याच वर्गांतील शिकवण. तुम्हींच पेरलेलें हें उगवत आहे." शांता नम्रपणें म्हणाली,

" वास्तविक शांतेने आता लग्न करावें. लग्नापुरतें शिक्षण झालें आहे." रामदास म्हणाला.

" लग्नापुरतें शिक्षण ? लग्नासाठी शिकायचें की आपण माणसें आहोंत म्हणून शिकायचें ? पुरुषाप्रमाणे स्त्रीलाहि बुद्धि, हृदय, मन आहे. त्यांच्या विकासासाठी तिनें शिकावयाचें." शांता म्हणाली.

" शांते, शीक, शीक. तुझें नांव शांता. परंतु तूं अशान्तच आहेस. ज्ञानाशिवाय तूं कशी शांत होणार ? " रामदास म्हणाला.

" केवळ ज्ञानाने माझें समाधान नाही. गरिबांचे संसार सुंदर, सुखाचे होणार नाहीत, तोपर्यंत मी अशान्तच राहणार." शांता म्हणाली.

" शांता, तें सोपें काम नाही. पोलिस स्त्रियांवरहि लाठी चालवितात, गोळीबार करतात. क्रांति म्हणजे मरण ! " रामदास गंभीरपणें म्हणाला.

" तें मरणच मी वरणार आहें. त्या मरणासाठी माझे नवस आहेत. चिनी युद्धांत तरुणी कशा मरत आहेत ! भारतांत कां न मराव्या ? " शांता म्हणाली.

" शांते, मी विश्वभारतींत जात आहें. मी परत येईपर्यंत नको पडूं फंदांत, आपण दोघें चळवळींत पडूं. मुकुंदराव मार्ग दाखवतील. " रामदास म्हणाला.

" भाऊ, तूं जा. तिकडील त्याग, मरणाची बेपर्वाई इकडे घेऊन ये. बंगाली वीर ! हसत हसत ते शेकडो फाशी गेले. शेकडो अंदमानीं खितपत

पडले. शेकडो कारागृहांत झिजून क्षयी झाले. वंगभूमि, तुला कोटी कोटी प्रणाम." शांतेने भक्तिमय प्रणाम केला.

"चला, आपण जाऊं. बाहेर अंधार पडूं लागला." मुकुंदराव म्हणाले.

"अंधारांतून प्रकाश दिसत आहे." शांता म्हणाली.

"ध्येयाचा दिव्य प्रकाश" रामदास म्हणाला.

तिघें उठून चालूं लागलीं. अंधारांतहि धबधब्याचें स्वच्छ पाणी-फेसाळ पाणी-चमकत होतें.

मंडळी बोलत घरीं आली. तों दयाराम तेथे आला होता.

"केव्हा आलास दयाराम ?" रामदासने विचारलें.

"आताच आलों." तो म्हणाला.

"माझें जायचें बहुतेक ठरलें."

"तुला निरोप द्यावयालाच मी आलों आहें."

"दयाराम, तुझ्या अडचणी कळवीत जा. प्रकृतीला जप. आपण पुढे सारं रान उठवूं."

"तूं ये शिकून. ये सारें पाहून. आम्ही जमीन नांगरून ठेवतों."

रात्रीं गोविंदराव, मुकुंदराव व रामदास बराच वेळ बोलत होते. शेवटीं गोविंदरावांची परवानगी मिळाली. रामदास शिवतरला रामराव व आई यांना भेटण्यासाठी म्हणून गेला.

"बाबा, शांतीला शिकूं दे हां; गोविंदराव पैसे देतील. तुम्हांला चिंता नाही. तिच्या लग्नाची घाई करूं नका." रामदास म्हणाला.

"पोरगी मोठी झाली. केव्हाच लगीन केलं पाहिजे होतं. दोन मुलांची आई झाली असती." आई म्हणाली.

"शांती क्रांतीची आई होणार आहे." रामदास म्हणाला.

"आमच्या वर्गांत शांताबाईचा एखादा फोटो लावायला द्या ना पाठवून. त्यांनी तेथे प्रकाश आणला." मोहन म्हणाला.

"मोहन, फोटो लावायचाच तर या मृत राष्ट्राला जिवंत करणाऱ्या लोकमान्यांचा; महात्माजींचा लाव. जगांतील श्रमणाऱ्यांना नववेद देणाऱ्या कार्ल मार्क्सचा लाव. तो वेद रशियांत कृतींत आणणाऱ्या महात्मा लेनिनचा लाव." रामदास म्हणाला.

"आमच्या गावाला नववेद शांताबाईंनी दिला. बायामाणसें, मुलें, मुली शांतेचेंच स्मरण करतात." मोहन म्हणाला.

"बरें, पाहूं पुढे. आजूबाजूच्याहि गावांना जात जा. तूं विचार पेरणारा किसान युवक हो." रामदासाने सांगितलें.

"आमचें तरुण–दल सुरू झालें आहे. त्यांतून कांही जण शेजारच्या गावीं वर्ग चालविण्यासाठी जाणार आहेत. शांताबाईंनी चित्रांचे संग्रह पाठविले आहेत. तेहि दाखवीत जाऊं. जगांतील किसान–कामगार कसे लढत आहेत, तें त्यावरून पटकन् ठसतें." मोहनने सांगितलें.

रामदास रामपूरला परत आला. जाण्याची तयारी झाली. अनेक मित्र जमले होते. गोविंदरावांच्या व नव्या आईच्या पायां पडून तो गेला. शांता स्टेशनवर गेली होती. मित्र स्टेशनवर गेले होते. मुकुंदराव व रामदास तेथे उभे होते.

"भाऊ, मोठमोठीं पत्रें पाठव. तिकडचे फोटो पाठव." शांता म्हणाली.

"तुझा फोटो मोहनने शाळेंत लावण्यासाठी मागितला आहे तो आधी पाठव. तेथली तूं क्रांति करणारी ना ?" रामदास म्हणाला.

"भाऊ, क्रांति शब्दाचा उपहास नको करूं." शांता म्हणाली.

"क्रांतीचा उपहास करणारा आपला भाऊ आहे असें नको समजूं." रामदास गंभीर होऊन बोलला.

"रागावलास होय भाऊ ?" तिने कातर स्वरांत विचारलें.

"नाही ताई, गंमत झाली. मी पाठवीन फोटो. गुरुदेवांचा नवीन फोटो घेऊन पाठवीन." रामदास म्हणाला.

"तुम्ही मुकुंदराव लौकर या. फार दिवस आम्हांला इकडे उपाशी ठेवूं नका. पोरकें राखूं नका." शांतेने सांगितलें.

"मुकुंदराव लौकरच येणार आहेत." दयाराम म्हणाला.

गाडीची वेळ झाली. शिट्टी झाली. निघाली गाडी. गाडी एकदां निघाली म्हणजे मुक्कामावर पोचल्याशिवाय थोडीच राहील? निघायचाच अवकाश असतो.

✦ ✦ ✦

## विश्वभारती : : ६

रामदास व मुकुंदराव आगगाडींत होते. रामदास पडला होता. मुकुंदराव विचारतंद्रींत होते. सारा बंगाल त्यांच्या डोळ्यांसमोर उभा होता.

विश्वभारतींत ही गुरुशिष्यांची जोडी आली. तेथील साधें व कलामय वातावरण पाहून त्यांचें मन प्रसन्न झालें. भारतीय लेण्यांतील दिव्य कलाच तेथे सर्वत्र अवतरली आहे की काय, असें वाटत होतें. भारतीय कलेचा आत्मा जणु गुरुदेवांसमोर, श्रीनंदलालांसमोर, येऊन तेथे नाचत होता की काय असें वाटे. पावित्र्य व प्रसन्नता यांचा रमणीय संगम तेथे होता.

शांतिनिकेतन ! तेथे निसर्ग हा मुख्य आचार्य होता. आणि निसर्गाचा संदेश त्याच्याशीं एकरूप होऊन आपलासा करून घेणारे गुरुदेव रवीन्द्रनाथ तेथील अधिष्ठात्री देवता होते. ते म्हणावयाचे, "मुलांमुलींभोवती स्वच्छ व सुंदर वातावरण असलें म्हणजे मग निराळीं कृत्रिम बंधनें लागत नाहीत." सुंदर सडा घातलेला, सुरेख रांगोळी घातलेली, तेथे थुंकावेंसें वाटत नाही. खरें पावित्र्य दुसऱ्यासहि पवित्र करतें."

विशाल आकाश व अनंत धरित्री यांच्या सान्निध्यांत शांतिनिकेतनांतील मुलें शिकतात. वृक्षांच्या शीतल छायेखाली गुरु बसतो, समोर शिष्य बसतो. कोंडवाडे तेथे नाहीत. चार भिंतींत मनाला व बुद्धीला कोंडून त्याचें कबरस्थान केलें जात नाही.

कवि रवीन्द्रनाथ हे भारतमातेचीं फुलें फुलविणारे कुशल व प्रेममय माळी तेथे बनले होते.

कल्पनासृष्टींतील कवि तेथे प्रत्यक्षांत वावरत होता. कल्पनेंतील सत्याचे प्रयोग पृथ्वीवर करीत होता. भारतीय संस्कृतीवर पाश्चिमात्य संस्कृतीचें कलम व पाश्चिमात्य संस्कृतीवर भारतीय संस्कृतीचें कलम करून एक अभिनव पूर्वपश्चिमेच्या संगमाची संस्कृति ते निर्मीत होते. ज्ञानविज्ञानाची ते पूजा करीत होते.

प्रार्थनेच्या वेळेस स्वतः गुरुदेव येऊन बसले म्हणजे वातावरण कसें विजेनें भारल्यासारखें वाटे. आणि एखादे वेळेस स्वतःचेंच एखादें प्रार्थना-

गीत ते म्हणत तेव्हाचा आनंद तर अमर असा असे. व्यक्तिमाहात्म्य म्हणजे काय जादू आहे, हें अशा वेळीं कळे.

रामदास तेथे रंगला. मुकुंदरावहि रंगले. तेथील विशाल ग्रंथालयांत मुकुंदराव वाचीत बसत.

रामदासने श्रीनिकेतनचा ग्रामीण वर्ग जोडला. कधी जवळच्या खेड्यां-तून त्यांना जावें लागे. कधी मॅजिक लॅंटर्न घेऊन जावयाचें. कधी स्वच्छता करावयास जावयाचें. कधी हिवतापासाठी क्वोयनेलच्या गोळ्या देण्यासाठी जावयाचें. बंगाली किसान किती कष्टी ! किती दरिद्री ! तो किती खंगलेला-रंजला—गांजलेला दिसे.

" या आपल्या तात्पुरत्या मलमपट्टीने का या दरिद्री नारायणाचे प्रश्न सुटणार आहेत ? " त्याने शिक्षकांस प्रश्न केला.

" आपण दुसरें काय करणार ?" कालीचरण बाबू म्हणाले.

" हे दरिद्री लोक दाखवून क्रांति करा असें नाही कां आम्हांला शिक-वीत ? या श्रमणाऱ्यांना आधी खायला मिळेल अशी समाजरचना निर्माण करा, असें कां नाही आम्हांला सांगत ?" त्याने विचारलें.

"तुम्हांला क्रांति करायची असली तरीहि यांच्यांत सेवाभावाने मिसळाल तेव्हांच करतां येईल.तुमच्याबद्दल त्यांना विश्वास वाटूं लागला म्हणजेच उद्या तुम्ही काय सांगाल त्याप्रमाणे ते वागतील. " शांतपणें कालीबाबू म्हणाले.

रामदास दिलरुबाहि शिकायला जाई. त्याला आजपर्यंत माहीत नव्हतें की, आपणांस ही देणगी आहे. मनुष्याच्या जीवनाचा कोणता कप्पा कधी उघडेल याचा नेम नसतो. रात्रीं हातांत दिलरुबा घेऊन तो दूर जाऊन बसे व त्याचा अभ्यास करी. हळूहळू त्याचीं बोटें पडद्यावर बिजलीसारखीं नाचूं लागलीं व ती धनुकली कुशलतेनें तारांवर फिरूं लागली. हृदय उचं-बळविणारे सूर निघूं लागले.

मुकुंदरावांनी एके दिवशीं 'भारताची आशा' या विषयावर तेथे इंग्रजींत व्याख्यान दिलें. तेथील भावनाप्रधान मंडळी तें व्याख्यान ऐकून मुग्ध झाली.भाषणाचा समारोप तर फारच विलक्षण परिणाम करणारा झाला.

" बंधूंनो, मी काय सांगूं, किती सांगूं ? मला निराशा शिवत नाही. भारताचें भविष्यउज्ज्वल आहे हें तुमच्या डोळ्यांतील तेजावरून, तोंडावरील

भावावरून मला दिसत आहे. परमेश्वर तीन रूपांनी अवतरतो म्हणतात. कधी भिकाऱ्याच्या, कधी कवीच्या, कधी योग्याच्या. महात्माजींसारखा महापुरुष, ती यज्ञमूर्ति जेव्हां 'दरिद्री नारायणके वास्ते' असें म्हणून हात पुढे करते, तेव्हा प्रत्यक्ष परमेश्वरच समोर हात पसरीत आहे असें वाटतें. आजच्या तोफाबंदुकांच्या रणधुमाळींत विश्वैक्याची मुरली वाजविणारे रवींद्रनाथ म्हणजे गोकुळांतील सुखाला अंतपार नाही असें करणाऱ्या गोपालकृष्णाची आठवण अजून देतात आणि आज अंडीच तपें पाँदिचेरीस सर्व इंद्रियें संयन करून बसलेला तो महात्मा अरविंद, त्यांच्या रूपाने योग्यांचा राणा शिवशंकरच अवतरला आहे की काय वाटतें. गांधीजी, गुरुदेव व श्रीअरविंद यांच्या रूपाने आज परमेश्वरच भारतांत वावरत आहे व अणुरेणूला चैतन्यमय करीत आहे असें वाटतें. अशा या भारताला का आशा नाही?"

"तुम्ही बंगालमध्ये जन्मायचे, तिकडे महाराष्ट्रांत कशाला जन्मलेत?" कालीबाबूंनीं विचारलें.

"बंगाल व महाराष्ट्र एकच आहे हें सिद्ध करण्यासाठीं–बंगाली हृदय महाराष्ट्राला देण्यासाठी." मुकुंदराव म्हणाले.

"भारताच्या ऐक्यावर तुम्ही जोर दिलांत तें मला आवडलें. प्रांतिक अभिमान वाढत आहे हें बरें लक्षण नव्हे." ते म्हणाले.

"एखादा परप्रांतीय नोकरीसाठी आपल्या प्रांतांत आला तर आपणांस मत्सर वाटूं लागतो. उलट आपणांस वाटावें दूरचा भाऊ जवळ राहायला आला." मुकुंदराव म्हणाले.

"किती छान सांगतां तुम्ही. मुकुंदराव, महाराष्ट्र संस्कृतीवर एक तुमची व्याख्यानमाला करावी असें मला वाटतें. महाराष्ट्राची आम्हांला ओळख करून द्या." कालीचरण म्हणाले.

"बघूं." मुकुंदराव म्हणाले.

परंतु पुढे खरेंच ती व्याख्यानमाला झाली. अपूर्व झाली ती व्याख्यानमाला. महाराष्ट्र संस्कृति म्हणजे मोक्षसंस्कृति, अंतर्बाह्य मोक्ष देणारी संस्कृति. महाराष्ट्रीय संस्कृति म्हणजे झगडा, बंड, क्रांति.

रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग
अंतर्बाह्य जग आणि मन

आंत मनांतील वासनाविकारांशीं झगडा. आत्म्याला देहांत कोंडणाऱ्या

संकुचित वृत्तीबरोबर झगडा; आणि बाहेर नाना रूढींशीं, नाना प्रकारच्या गुलामगिरीशीं झगडा. महाराष्ट्रीय संत संस्कृतांतील ज्ञान लोकांच्या भाषेंत ओतूं, असें म्हणून बंड पुकारते झाले. जनतेची भाषा तीच खरी जिवंत भाषा. तिच्यांतून मृत जनतेला अमृत देतां येतें, असें त्या वयाने लहान परंतु ज्ञानवैराग्याने महान् ज्ञानदेवाने सांगितलें.

महाराष्ट्रीय संस्कृति म्हणजे प्रयत्नवाद; दैववाद नव्हे. निमूटपणें परिस्थितीला शरण जाणें हा महाराष्ट्र-धर्म नाहीं.

ओलें मूळ भेदी खडकांचें अंग
प्रयत्नांसीं सांग कार्यसिद्धी ॥

हा महाराष्ट्रीय संस्कृतीचा मंत्र. प्रयत्न हा देव, असें समर्थांनी सांगितलें. महाराष्ट्राचें राजकारणहि जनतेचें. श्रीशिवछपति कशासाठी जन्मले? गढीवाल्यांच्या गढ्या जमीनदोस्त करण्यासाठी. गावोगाव सरदार असत, गढीवाले असत. ते शेतकऱ्यांस छळीत, लुटीत. 'न मिळे खावया खावया खावया' असें समर्थांस म्हणावें लागलें. प्रजेच्या गवताच्या काडीसहि कोणी स्पर्श करतां कामा नये, त्यांनी पोटच्या पोराप्रमाणें वाढविलेलीं झाडें, त्यांची फळें, कोणीं लुबाडतां कामा नये, असें त्यांनी हुकूम सोडले. शिवाजीमहाराजांना सवंगडी मिळाले ते जनतेंतून मिळाले. कोणी सरंजामी सरदार नाही मिळाले. चंद्रराव मोरे व अफझुलखान दोघेहि त्यांना साफ करावे लागले. त्यांच्या राज्याची खूण भगवा झेंडा. राज्य जनतेचें आहे; राजा संन्यासी आहे, हा त्याचा अर्थ. शिवाजीमहाराजांना आजूबाजूस पांच पातशहा असतांहि स्वराज्य स्थापतां आलें. शून्यांतून विश्व निर्मितां आलें. कशाच्या जोरावर? ते जनतेचा आत्मा बनले. जनतेच्या—दरिद्री नारायणाच्या मूर्त आशाआकांक्षा बनले. ज्या वेळेस जनतेचे प्रश्न, बहुजनसमाजाच्या जगण्यामरण्याचे प्रश्न पोटतिडिकेने आपण हातीं घेतों, त्या वेळेस क्रांति करतां येते. मावळ्यांचे छत्रपति असे होते. तेल्यातांबोळ्याचे लोकमान्य असें होते. महाराष्ट्र बुद्धीला देवता मानतो व भावनेच्या सिंहासनावर ती बसवितो. परंतु ही खरी महाराष्ट्रीय बुद्धि म्हणजे क्षुद्र बुद्धि नव्हे. समर्थांनी सांगितलें की,

घालून अकलेचा पवाड । व्हावें ब्रह्मांडाहुनि जाड ।
येथे कैचें आणलें द्वाड । करंटेपण ॥

आम्ही विशाल बुद्धीने ब्रह्मांडाला मिठी मारूं. वंगभंगाच्या वेळीं लोकमान्य टिळकांनीच बंगालचें दुःख तें साऱ्या भारताचें आहे हा मंत्र दिला व बंगालसाठी सारा महाराष्ट्र पेटविला. कधी कधी आम्ही महाराष्ट्रीय ही थोर बुद्धि विसरतों. परंतु महापुरुष येऊन पुन्हा जागृति देतात.

महाराष्ट्राजवळ कुऱ्याचा लघळपणा नाही, महाराष्ट्र जरा कठोर वाटतो, परंतु हा नारळाचा कठोरपणा आहे. आंत गोड पाणी आहे. ओबडधोबड महाराष्ट्राच्या अंतरंगीं प्रखर उन्हाळ्यांतहि न सुकणारे अखंड झरे वाहत असतात. ओबडधोबड डोंगराच्या आंत शीतल शांत शिवालयें असतात. लपलेलीं अमर रमणीय लेणीं असतात. महाराष्ट्र आधी दूर दूर राहील. परंतु एकदा जवळ आला म्हणजे मग कधीं सोडणार नाही.

महाराष्ट्र मर्यादा ओळखतो, महाराष्ट्रांतील नद्या अफाट नाहीत, पर्वत नगाधिराजाप्रमाणे नाहीत. महाराष्ट्रांतील पर्वत उंच आहेत, पुष्कळ उंच आहेत. परंतु हिमालयाप्रमाणे आकाशाला हात लावूं पाहण्याच्या भानगडींत ते पडणार नाहीत. महाराष्ट्रांतील भावना व विचार यांना संयम असतो. डोकें कितीहि उंच नेलें तरी पृथ्वीला आमचे पाय चिकटलेले असतात. आमच्या हृदयाशीं सह्याद्रि आहे. आमचें हृदय सह्याद्रीप्रमाणे आहे. तें हृदय ओलें असेल परंतु वाटेल तसें वाहणार नाहीं. महाराष्ट्रांतील संतहि मर्यादा सांभाळतात.

'ही हरिजनाची मुलगी मी कडेवर घेतों व अस्पृश्यता नष्ट करतों' असे सांगणारे शांतिसागर एकनाथ, 'मस्तानीपासून मुलगा झाला म्हणून काय झालें, त्याची मुंज झाली पाहिजे' असा आग्रह धरणारे पहिले बाजीराव, 'साऱ्या स्मृति पुरुषांनी लिहिल्या म्हणून त्यांनी स्त्रियांची सोय पाहिली नाही' असें सांगणारे, 'बालविधवेचा पुनर्विवाह करा' असें सांगणारे, 'स्नानसंध्या करावयाची असेल तर गंगातटाकीं चला, राज्यकारभार करावयाचा असेल तर प्रजेच्या हिताच्या गोष्टी हीच स्नानसंध्या माना,' असें सांगणारे ते निःस्पृह रामशास्त्री, 'मुलांचा हुंडा घेणें म्हणजे महापाप' असे म्हणणारे थोर सत्कवि मोरोपंत! असा हा स्वतंत्र विचाराचा व स्वतंत्र आचाराचा महाराष्ट्र आहे.

महाराष्ट्राने पडद्यांतील पावित्र्य राखलें नाही. सरंजामी सरदारांनी मुसलमानापासून पडदा घेतला; परंतु तो खरा महाराष्ट्र-धर्म नाही.

पावित्र्य अंधारांत पिकत नाही. प्रकाशांत पिकतें. महाराष्ट्राला बुरखे नाही आवडत. वस्तूवरील बुरखे दूर करून सत्यस्वरूप प्रकट करणें हेंच तर महाराष्ट्राचें महान् कार्य. तें कार्य कुशलतेने करण्याऐवजी कधी ओबडधोबडपणें केलें जातें, तेथे चुकतें. महाराष्ट्रीय स्त्रिया सर्वत्र निर्भयपणें संचार करतील, शेतांत कामें करतील, रानांतून मोळ्या आणतील, अंगणांत वाघ आला तर त्याला मुसळाने मारतील, चुलीजवळ साप आला तर फुंकणीने ठेचतील, त्या पिंजऱ्यांतील पोपट होणार नाहीत. खांद्यावर पताका घेऊन पंढरपूरच्या वारीला पायीं जातील; पदर बांधून लढायला निघतील, मुक्ताबाई संन्यासिनी-प्रमाणे तेजाने वावरेल. जनाबाई निर्भयपणें नामदेवाकडे रात्रंदिवस दळील. सखूबाई पंढरपूरची वाट धरील. वेणाबाई, अक्काबाई समर्थांच्या शिष्या होऊन आश्रम चालवतील, कीर्तनें करतील.

" माझ्या महान् महाराष्ट्राला, मर्यादशील महाराष्ट्राला एक स्वातंत्र्य असलें म्हणजे बस्स आहे. मग तो हुरडा हातावर चोळून खाईल व देवांच्या अमृताला तुच्छ मानील. कोंडयाची भाकर खाईल व पहाडांत सिंहाप्रमाणे हिंडेल. अंगावर चिंधी घालून सम्राटाला हंसेल. फाटकी झोपडी मयूरा-सनाहून मोलाची मानील. "

अशा आशयाचीं पंधरा दिवस तीं पंधरा व्याख्यानें झालीं. शुक्लपक्षांतील चंद्राची एकेक कला वाढत पंधराव्या दिवशीं पूर्ण चंद्र फुलतो, तसें तें शेवटचें समारोपाचें व्याख्यान झालें. महाराष्ट्रीय संस्कृतीच्या पूर्ण चंद्राचें निष्कलंक रूप पाहून भावनाप्रधान बंगाली हृत्सिंधु हेलावला, उचंबळला, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी फुलांचे, सुताचे सुन्दर हार मुकुंदरावांना घातले. तें दृश्य अपूर्व होतें. प्रांताची प्रांताला ओळख होत होती. महाराष्ट्रीय आत्मा वंगीय आत्म्याला भेटत होता. ती जिवाशिवाची भेट होती. चैतन्य चैतन्याला भेटत होतें.

ती कोण मुलगी ? उंच व सडपातळ अशी ती हातांत हार घेऊन तेथे येऊन उभी राहिली. जणुं थरथरणारी भावनामय ज्वाला ती दिसत होती. तिचे डोळे उत्कंठेने, एक प्रकारच्या अनुपम तेजाने नाचत होते, तळमळत होते. ती उभी राहिली. परंतु शब्द बाहेर फुटेना. तिच्या तोंडावरचे भावच जणु शतजिभांनी बोलत होते.

परंतु शेवटीं वाणी बाहेर पडली.

" मला बंगालचा फार अभिमान वाटे. आपल्या प्रांताचा सदभिमान असावा; परंतु त्याचा अर्थ दुसऱ्यास तुच्छ मानणें नव्हे. सहानुभूतीची किल्ली घेऊन परप्रांताचीं हृदयकपाटें आपण खोलून पाहूं तर तेथें अवीट अक्षय अशी संपत्ति मिळेल. महाराष्ट्राच्या आत्म्याशीं भेट घडवणाऱ्या या आचार्यांचे कसे आभार मानावे ? त्यांचीं भाषणें ऐकतांना वाटे की, आपले चिमुकले हात पसरावे व त्या दूरच्या महाराष्ट्राला मिठी मारावी. आपले हात पसरावे व महाराष्ट्राचे खंबीर पाय गंभीर भक्तिभावाने धरून ठेवावे. विश्वभारती आज कृतार्थ झाली. महाराष्ट्राच्या मंगलमय आत्म्याची भेट घडवणाऱ्या हे सद्गुरो, हा घ्या बंगाली फुलांचा हार. बंगालच्या या कोमल भावना महाराष्ट्रीय आत्म्याच्या गळयांत नेऊन घाला. "

सभा संपली.

" तुम्ही किती सुंदर बोललांत ! जणु बंगालचा आत्मा तुमच्या रूपानें बोलत होता. " रामदास त्या मुलीजवळ जाऊन म्हणाला.

" तुमचे आचार्य जाणार आहेत. तुम्ही आहांत येथे. महाराष्ट्रीय आत्म्याची अधिक ओळख तुम्ही करून द्या. महाराष्ट्रीय आत्म्याचें अमर संगीत तुमच्या दिलरुब्यांतून ऐकवा. " माया म्हणाली.

" मी दिलरुबा वाजवतों, तुम्हास काय माहीत? " रामदासनें विचारलें.

" मला कान आहेत व डोळे आहेत." माया म्हणाली.

" तुमचें नांव काय ?" रामदासने विचारलें.

" माया. " ती म्हणाली.

" तुमचें नांव काय ? " तिने विचारलें.

" रामदास. " तो म्हणाला.

" मायेला जिंकून घेणारे रामदास. " ती म्हणाली.

" मायेला जिंकून घेणारा मी समर्थ रामदास नाही. मायेमुळे रडणारा मी दुबळा रामदास आहें. " तो म्हणाला.

" दुबळा व रडका महाराष्ट्र मला नको." असें म्हणून माया वेगानें निघून गेली.

✦ ✦ ✦

## मुकुंदरावांची तीर्थयात्रा : : ७

"मग काय, नाही राहात येथे ? महाराष्ट्रीय संस्कृतीचे भाष्यकार म्हणून आमच्या संस्थेंत राहा. तुमच्यासारखीं चारित्र्यवान् व विचारवान् माणसें, मोठ्या दृष्टीचीं, वस्तूच्या अंतरंगांत दृष्टि पोचविणारीं माणसें संस्थेंत असणें म्हणजेच संस्थेची कृतार्थता." कालीचरण म्हणाले.

"आता येथील वास्तव्य पुरें. संन्याशाने एके ठिकाणीं फार राहूं नये." मुकुंदराव म्हणाले.

"विश्वभारतीला तुमची सदैव आठवण राहील. विश्वभारतीची स्मृति म्हणून गुरुदेवांचा हा एक भावनामय फोटो तुम्हांला भक्तिपुरस्सर देतों, तो घ्या." असें म्हणून कालीबाबूंनी तो सुंदर फोटो दिला. मुकुंदरावांनी त्या फोटोवर मस्तक ठेवलें. क्षणभर त्यांनी तो हृदयाशीं धरला.

"बरें मी जातों. येथील पावित्र्य व सुगंध जीवनांत भरून घेऊन जातों." मुकुंदराव म्हणाले.

मुकुंदराव आपल्या खोलींत गेले. बांधाबांध करूं लागले. इतक्यांत त्यांच्या खोलींत एक मुलगा आला.

आज रामदास कोठे आहे, कोठे गुंतला आहे ? मुकुंदराव त्याला पाहात होते. शेवटीं दूर एका झाडाखाली तो दिसला. तेथे मायाहि होती. रामदास एका शिलाखंडावर बसला होता. समोर बसून माया त्याचें चित्र काढीत होतीं.

"काय चाललें आहे रामदास ?" मुकुंदरावांनी एकदम येऊन विचारलें.

"मायेचा पसारा." तो म्हणाला.

"पसारा म्हणजे काय ?" मायेने विचारिलें.

"तूं का मराठी शिकतेस ?" मुकुंदरावांनी प्रश्न केला.

"हो. हे शिकवतात. महाराष्ट्राचें हृदय आपलेंसें करायचें असेल, तर भाषा नको शिकायला ?" तिने विचारिलें.

"तूं त्याच्याजवळ शिकतेस. परंतु तूं याला कांही शिकवतेस का ? का याला वेडा करणार ?" मुकुंदराव म्हणाले.

" पुष्कळ शिकवणार आहें यांना. आताच जरा नीट बसा, सारखे हालूं नका. थोडें हसरें तोंड ठेवावें. किती तरी शिकवीत होतें. " माया म्हणाली.

" बघूं दे चित्र. " मुकुंदराव म्हणाले.

" पहिलेंवहिलें चित्र पाहूं नये हो. दृष्ट पडते. " ती म्हणाली.

" आज का चित्रकलेचा श्रीगणेशा ? " त्यांनी विचारलें.

" तसें नाही. मी काढलेलें यांचें हें पहिलें चित्र. " ती म्हणाली.

" परंतु दाखवायला काय हरकत आहे ? खऱ्या रामदासाचें आहे की कामदास माकडाचे आहे तें पाहूं दे. " ते म्हणाले.

" माये, तूं जा. फाडून टाक तें चित्र. " रामदास म्हणाला.

" जाणार नाही व चित्रहि फाडणार नाही. " ती म्हणाली.

रामदास चित्र ओढूं लागला; माया संतापली.

" खबरदार धिंगामस्ती कराल तर. मी तेजस्वी वंगकन्या आहें. फाडूं नका माझें हृदय. कुस्करूं नका माझ्या भावना. महाराष्ट्रीय दगडाला बंगालचा ओलावा लागूं दे. " ती म्हणाली.

रामदास स्तब्ध राहिला. कोणीच बोलेना. पुन्हा माया उसळली.

" एखाद्या तरुणाचें चित्र काढणें म्हणजे का पाप ? आपल्या आवडत्या वस्तूचें चित्र काढणें का पाप ? पवित्र गुरुदेव येथे आहेत. त्यांच्या हृदयाला धक्का लागेल असें आम्ही कधी कांही करणार नाही ही खात्री बाळगा. पावित्र्याची मर्यादा आम्ही पाळतों. "

शेवटीं मुकुंदराव म्हणाले, " रामदास, आज मीं जाण्याचें निश्चित केलें आहे. जपून राहा. सावध राहा. दरिद्री नारायणाची सेवा करावयाची आहे हें भुलूं नकोस. ती आठवण असली म्हणजे सारें सुन्दर होईल. "

" मी तुम्हांला बोललें. मला क्षमा करा. " स्फुंदत स्फुंदत मायां म्हणाली.

" माझा तुम्हांस आशीर्वाद आहे माये. माझ्या हृदयाच्या दिवाणखान्यांतहि तसबिरी होत्या. तसबिरी लावण्याचे कोणीं पवित्र प्रेमाने प्रयत्नहि केले. परंतु त्या सर्व तसबिरींवर, माये, मीं पडदे सोडले. माझ्या हृदयांत आता एकच तसबीर आहे. ती माझ्या उपाशी भारतमातेची. माये, गुलामगिरीची, अन्नान्नदशेची घटोत्कची माया दूर करायची आहे हें तूंहि

विसरूं नकोस, दुसऱ्याला विसरूं देऊं नकोस." तिच्या मस्तकावर हात ठेवीत मुकुंदराव म्हणाले.

माया मंदमधुर हंसली. अश्रूंतून हास्य बाहेर आलें.

"रडलीस, लगेच हसलीस. खरी बंगाली आहेस." रामदास म्हणाला.

"रडवलेंत, लगेच हसवलेंत. खरे कठोर महाराष्ट्रीय आहांत." माया म्हणाली.

"माया आपल्या पंजांनीं रामदासला पकडून ठवणार व रामदासहि मायेचें हृदय चोरून लुटणार. एक वाघीण तर दुसरा लुटारू चोर." मुकुंदराव हसून म्हणाले.

"आता आज एवढें चित्र पुरे. मात्र पुन्हा मी सांगेन तेव्हा व सांगेन तसें बसलें पाहिजे; सांगेन तशी मान ठेवली पाहिजे, सांगेन तितकेंच हसलें पाहिजे. आहे कबूल?" मायेने विचारिलें.

"कबूल. एकदम कबूल." रामदास म्हणाला.

"चला, आपण यांचें सामान बांधूं" ती म्हणाली.

"माझी अडगळ एकदा लवकर फेकून द्या." मुकुंदराव म्हणाले.

"आता पुन्हा रडवूं नका हं." माया म्हणाली.

"कोणी रडवूं लागला तरी रडायचें नाहीं, ही महाराष्ट्रीय कला थोडी शीक." मुकुंदराव म्हणाले.

"हळूहळू शिकेन." माया म्हणाली.

"चित्रकार एकूण बरेच बोलतात." रामदास म्हणाला.

मुकुंदराव कलकत्त्यास आले. तेथे लाखो कामगार पोलादी संघटना निर्मीत होते. कामगारांच्या संघाची त्यांनी चौकशी केली. संघाच्या कचेरींत ते गेले. जगांतील कष्टाळू जनतेला हाक मारणारा व धीर देणारा लाल बावटा कचेरीवर फडकत होता. कचेरींत कामगार कार्यकर्ते जमले होते. दिवसभर ते काम करीत व पुन्हा कचेरींत येत, नवीन ज्ञान मिळवीत. मुकुंदराव तेथील सर्व गोष्टी पाहात होते. एका तसबिरीने त्यांचें लक्ष वेधलें.

"कोणाची ही तसबीर?" त्यांनी विचारिलें.

"हुतात्मा यूसफची." हलधरने सांगितलें.

"कोठला हा? काय आहे कथा ?" मुकुंदरावांनी प्रश्न केला.

"ती एक दिव्यकथा आहे. करुण कथा आहे. स्फूर्ति देणारी कथा आहे." चंद्रशेखर म्हणाला.

"मला सांगा."

"ऐका. येथें बसा." हलधर म्हणाला.

हलधरने तो इतिहास सांगण्यास आरंभ केला.

कामगारांचीं तो अभ्यासमंडळें चालवी. त्यांना लिहायला वाचायला शिकवी. त्यांच्यांत सारखा हिंडे फिरे. रिकामा तो कधीच नसावयाचा. कामगारांच्या संपाचे वेळेस त्याला पकडण्यांत आलें. तुरुंगांत त्याची प्रकृति बिघडली. अति श्रमानें तो आधीच थकला होता. तुरुंगांतून तो क्षयी होऊन बाहेर पडला.

आम्ही त्याला एका मोफत दवाखान्यांत ठेविलें. परंतु तेथेंहि त्याचें काम सुरू.

मरणारा यूसफ तो संजीवनी मंत्र जगणाऱ्यांना शिकवीत होता. शरपंजरीं पडलेल्या भीष्मांनी धर्माला शेवटचें ज्ञान देऊन प्राण सोडला. गळ्यांत फोड झाले होते, व डॉक्टर बोलूं नका सांगत होते, तरी श्रीरामकृष्णपरमहंस होते तोपर्यंत दर्शनास येणाऱ्यांजवळ बोलत होते. तसाच हा ऋषि यूसफ चार शब्द बोलला कीं दमे. जीव घाबरे. जरा थांबून पुन्हा बोले, "ज्ञान मिळवा. विचार-प्रसार, संघटना. किसान-कामगारांचें राज्य. इन्किलाब झिंदाबाद." हे त्याच्या ओठांवरचे शेवटचे शब्द, हें त्याचें रामनाम.

मुकुंदरावांनी युसफच्या तसबिरीला वंदन केलें. "कामगारांच्या मोक्षाची दिशा दाखवणारा जगाला अज्ञात असा हा रामकृष्णांचा 'झोपडींतील नवा अवतार,'" ते पूज्य भावनेने म्हणाले.

"असा हा अज्ञात त्याग, अशीं मुकीं बलिदानें ध्येयार्थी कामगार करीत आहेत." अबदुल म्हणाला.

"तुमच्याकडे हिंदु-मुसलमान प्रश्न नाहीत का?" मुकुंदरावांनी विचारिलें.

"किसान व कामगार, मुस्लिम लीग व हिंदु महासभा यांचीं ढोंगें ओळखूं लागले आहेत. मध्ये काहीं गुंड एका भगिनीला पळवीत होते, परंतु आम्ही कामगारांनीच ती सोडवून आणिली. मागे एक अनाथ

हिंदु मूल सापडलें. तें शेवटी आमच्या शशीनें पाळलें आहे. गुंड लोक बायका पळवतात व जमीनदारांच्या, नबाबांच्या जनानखान्यांत त्या जातात. बेकार गुंडांचा हा उद्योग असतो. पोटार्थी गुंड हीं कामें करतात. या गुंडांत हिंदु–मुसलमान दोघे असतात. परंतु याला कारण बेकारी व दारिद्रय. ही बेकारी व हें दारिद्रय दूर झाल्याशिवाय हे प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी समाजरचना बदलली पाहिजे. एक लक्षाधीश, एक भिक्षाधीश हें उपयोगी नाही." तो इतिहास सांगतांना अबदुलचे डोळे मधून मधून पेटत होते. भावनांनी त्याचें सारें अंग थरथरत होतें.

"मी जातों. तुमच्या संघटनेंतून स्फूर्ति घेऊन मी जातों. महाराष्ट्रांतील किसान–कामगारांस ती देतों." मुकुंदराव म्हणाले.

"हा लाल हातरुमाल आमची आठवण घ्या." नाटू म्हणाला.

"खिशांतील हातरुमालहि लाल?" मुकुंदरावांनी आश्चर्यानें विचारलें.

"लाल बावटा सतत जवळ हवा, ओठांत हवा. पोटांत हवा. हृदयाशीं हवा, डोक्यांत हवा." हलधर म्हणाला.

मुकुंदरावांनी त्या लाल रुमालाचें चुंबन घेतलें. त्यांनी तो खिशांत ठेवला.

"इन्किलाब झिंदाबाद." सारे गर्जले. मुकुंदराव निघून गेले.

ते बिहार व ओरिसा प्रांतांत फिरले. जागृत किसानांच्या प्रचंड सभा त्यांनी पाहिल्या. सभेंत आले म्हणजे किसान–संघटनेस मदत देत, हाच त्यांचा दानधर्म, हीं त्यांचीं कीर्तनें, हे त्यांचे सप्ताह.

"हें काय फाटकें पत्र वाचतां." एका खेडेगांवांत मुकुंदरावांनी विचारलें.

"हा आमच्या किसानांचा वेद. हें वर्तमानपत्र आहे. त्यांतील अक्षर कळत आहे तोपर्यंत आम्ही वाचूं. उरेल तुकडा तो दुसऱ्यास देऊं. एकेक पत्र हजारोंच्या हातून जातें." शेतकरी म्हणाला.

"तुमच्या येथे किसान संघ आहे का?" मुकुंदरावांनी विचारलें.

"हो. हे पहा आमच्या किसानसंघाचे चिटणीस. हे हरिजन आहेत, परंतु ते शिकलेले आहेत. तेच केले चिटणीस." एकानें सांगितलें.

"तुम्ही स्पृश्यास्पृश्य नाही मानीत?" मुकुंदरावांनी विचारलें.

"श्रीमंत गरिबाला अस्पृश्य मानतो. ती एक अस्पृश्यता आम्हांला

माहीत आहे. इतर शिवाशिवीची अस्पृश्यता गाडून टाकली. सारी दुःखी व पिडलेली जनता एक." एका तरुण शेतकऱ्यानें सांगितलें.

" आमच्या महाराष्ट्रांतील शेतकरी तर हरिजनांना दूर ठेवतात." मुकुंदराव म्हणाले.

" मग तेथील किसानांचें दुःख कसे दूर होणार ? जो दुसऱ्याचा अपमान करतो, दुसऱ्याचें दुःख दूर करीत नाहीं, त्याचा कसा उद्धार होणार ? महाराष्ट्रांतील किसानांना आमचा संदेश सांगा कीं, त्या खोटया धर्माला तिलांजलि द्या. श्रमणारे सारे एक व्हा. हृदयापाशी हृदय जोडा." कळकळीनें एक किसान म्हणाला.

"तुमच्या महाराष्ट्रांत किसानांची सुस्थिति आहे ना?" एकाने प्रश्न केला.

" नाही. तेथेहि सावकारांचे साप किसानाला विळखे देऊन बसले आहेत. शेतकरी पिकवील तें सारें जात आहे. त्याची दैना आहे." मुकुंदराव म्हणाले.

" मग ते उठत का नाहीत ?"

" त्यांना कोणी उठवीत नाही. "

" तुम्ही उठवा. पेटवा त्यांना. "

" होय. तेच आता काम. त्यासाठीच ही यात्रा मी करीत आहें. आज तुमच्या गावची यात्रा झाली. स्फूर्ती मिळाली. जातों मी. " मुकुंदराव म्हणाले.

इतक्यांत तेथे पार्वती आली. तिने मुकुंदरावांना फुलांचा हार घातला.

" मागे आम्ही किसानांनी सत्याग्रह केला. या पार्वतीचा पति गोळीबारांत मेला. परंतु ती रडत बसली नाही. शेकडो किसान स्त्रिया तिने उठवल्या. पतीचें रक्त तिने कपाळीं लाविलें. शूर आहे ही भगिनी. तिने किसान नारीमंडळ चालविलें आहे. " एका बंधूनें ओळख करून दिली.

मुकुंदरावांनीं लवून त्या भगिनीला प्रणाम केला. महाराष्ट्रांतील किसान नारीस जागृत होण्यास सांगा. ही घ्या कुंकवाची डबी. या कुंकवांत पतीचें लाल रक्त मीं मिसळलें आहे. मी तें रोज कपाळीं लावतें. मी विधवा नाहीं. माझें सौभाग्य अमर आहे. ही डबी महाराष्ट्रांत न्या. तेथील किसान-

नारींच्या कपाळीं यांतील लाल कुंकू लावा. सांगा कीं, बिहारमधील सतीची ही भेट आहे" पार्वती म्हणाली.

मुकुंदरावांनी ती डबी नीट ठेवली. निरोप घेऊन ते निघाले. किती तरी जणांचे हात त्यांनी हातीं घेतले.जणु भारतांतील प्रांताप्रांतांतील किसान एकमेकांचे हात हातीं घेत होते.

मुकुंदराव गंगायमुनांच्या प्रदेशांत आले. खेड्यांतून ते हिंडले. किसानांना कसलाच हक्क नाही, कुळांना घर बांधायचा हक्क नाही. वाटेल तेव्हां जमीनदाराने त्यांना देशोधडीस लावावें, परंतु किसान आता जागृत होत होते.

असा हा नवभारताचा यात्रेकरू फिरत होता, पहात होता, ऐकत होता, भेटत होता, जागृत भारताचा परिचय करून घेत होता. पूर्वी काशींतील कावड रामेश्वरास नेत, आता कानपूरची कावड कलकत्त्यास नेली पाहिजे. कलकत्त्याची महाराष्ट्रांत आणली पाहिजे, विशाल भारतांत सर्वत्र एकच चैतन्य संचारलें पाहिजे. सर्वांच्या हृदयाचे ठोके एकसाथ पडले पाहिजेत. तरच क्रांति होईल.

✦ ✦ ✦

## शांता, तूं शीक : ८

गोविंदरावांनीं रामदासला सुटींत बोलाविलें, परंतु तो आला नाही. मी इकडेच हिंडणार आहें; अभयाश्रम, खादीप्रतिष्ठान, वगैरे संस्था पाहणार आहें, असें वडिलांस त्यानें कळविलें. आपण घरीं गेलों तर आपल्या लग्नाचेहि प्रश्न निघतील, उगीच घोटाळे नकोत, हाहि एक विचार घरीं न जाण्यांत होता. भाऊ येणार नाही, म्हणून शांतेला वाईट वाटलें. मधून मधून त्याचें पत्र येत असे. परंतु अलीकडे बरेच दिवसांत शांतेला पत्र आलें नव्हतें. भाऊ विसरला का गरीब बहिणीला ? भाऊला भुलविलें का कोणी बंगाली जादुगारणीनें ?

शांता शिवतरला गेली. मॅट्रिकची परिक्षा देऊन ती आली होती. मोहन आता पुरुषांचा वर्ग घेई. शांता बायकांचा वर्ग घेई. मोहन वेळ होतांच शांतेजवळ येई, नवीन नवीन कांही शिके.

प्रा. क्र... ८२६ ओ. दि
(५१)
वि. ....

एके दिवशीं रात्रीं रामराव, शांता व तिची आई बोलत होतीं. शांतेच्या लग्नाची ती चर्चा होती.

" बाबा, मला शिकूं दे, पुष्कळ शिकूं दे. जगांतील ज्ञान मिळवूं दे. शांतीचे पंख तोडूं नका. तिचे पाय बांधूं नका." ती दुःखाने म्हणाली.

" पुष्कळ शिकलीस. गोविंदराव म्हणतात तर कां न ऐकावें ? चांगला सरदाराचा मुलगा, घरंदाज; दिसतो रुबाबदार. त्याच्याशीं लग्न लावायला काय हरकत आहे ? आणि पुढे शिकूं म्हणतेस तर कोण देणार मदत ? गोविंदराव का मग मदत करतील ? " रामराव म्हणाले.

" भाऊ पाठवील मदत. मी त्याला लिहीन." शांता म्हणाली.

" भाऊ तरी कोठून देणार ? गोविंदरावांचेच पैसे ना ? श्रीमंतांचा तुम्हांला इतका तिटकारा तर त्यांचे पैसे तरी कशाला ? " पिता म्हणाला.

" पैसे श्रीमंताचे नाहीतच. त्या पैशावर देवाघरीं गरिबांचा शिक्का असेल. " शांता रागानें म्हणाली.

" देवाघरीं काय असेल ते देव जाणे. येथील जगांत तर ते त्यांचे पैसे आहेत. " ते म्हणाले.

" हें जग आम्ही बदलूं. उलथापालथ करूं. " शांता म्हणाली.

" काय दिवे लावाल तें दिसेल, सरकार देईल अंदमानांत पाठवून, मग बसाल रडत. सुखाचा संसार करावयाचा सोडून अवदसा आठवते तुम्हाला. " बाप चिडून म्हणाला.

" मी कांहीहि करीन. परंतु हें लग्न नको. रुबाबदार म्हणे आहेत ! भाऊच्या दत्तकाचे वेळेस पाहिलें आहे मीं त्यांना. एवढा सरदाराचा लेक; परंतु तेथे एक अधिकारी आले होते, तर किती सारखा गोंडा घोळी. तिळभर स्वाभिमान नाही यांना. यापेक्षा एखाद्या मजुराजवळ लग्न लावणें काय वाईट ? " शांता म्हणाली.

" लाव बाई मजुराजवळ लग्न व बांध झाडाला पाळणा. ठेव खांधावर मूल आणि कर शेतांत काम. " आई म्हणाली.

" त्यांत काय वाईट आहे ? हजारो, लाखो जगतात, तशी मी जगेन. या हजारांत वावरून त्यांना क्रांतीला तयार करीन. मग क्रांति

होईल. लहान मुलांची काळजी घेणारीं बालसंगोपनगृहें मग काढलीं जातील, कामाचे तास कमी होतील, शेती श्रमणाऱ्यांची होईल." शांता म्हणाली.

"तूं येथें राहूं नकोस. येथे राहायचें असेल तर आता लग्न कर. शिकायचे असेल तर तुझी तूं व्यवस्था बघ." रामरावांनी निक्षून सांगितलें.

"बरें बाबा" असे म्हणून शांता उठून गेली.

त्या दिवशीं शांता फिरत फिरत दूर गेली. गावाबाहेर एक विशाल वटवृक्ष होता. त्याच्याखाली ती बसली, विचार करीत बसली. विचार करतां करतां तिचे डोळे घळघळूं लागले. शांता आजपर्यंत रडली नव्हती. आज ती कां रडत होती? कोणासाठी, कशासाठी रडत होती?

जवळ मोहन येऊन उभा राहिला होता. तिचे अश्रु पुसावे असें त्यांच्या मनांत आले. परंतु त्या ओबडधोबड राठ हातांनी का तो अश्रु पुसणार? खेड्यांतील मजुराजवळ कोठला हातरुमाल? जवळ हातरुमाल नाही म्हणून मोहनला अश्रु पुसतां येत ना. का त्याला संकोच वाटत होता? मोहनला काय करावें कळेना.

शांतेनें स्वतःच शेवटीं डोळे पुसले.

"शांता, कां रडत होतीस?" मोहननें विचारलें.

"कोण म्हणतें मी रडत होतें?" तिनें विचारलें.

"मी पाहिलें. समोर उभा तर होतों" तो म्हणाला.

"उभा होतास, मग अश्रु का पुसले नाहीस? जगांत अश्रु पाहणारे लोक आहेत. अश्रु पुसणाऱ्यांची वाण आहे." ती म्हणाली.

"कशाने पुसणार?" त्याने विचारिलें.

"ज्याला मनापासून दुसऱ्याचे अश्रु पुसावयाचे आहेत त्याला कशाने पुसावे असा प्रश्न पडत नाही मोहन!" ती म्हणाली.

"शांता, माझ्या या ताठर–दाठर हाताने का तुझे डोळे पुसूं?" तो थोडा हसून परंतु गांभीर्य राखून म्हणाला.

"मोहन, तुझे हे खरखरीत हात लागून माझे डोळे अधिक सुंदर झाले असते. डोळे कोणासमोर रडले नाहीत. तूं माझ्या अश्रूंतून समोर मला दिसत होतास तरी मीं ते आवरले नाहीत, म्हटलें मनांत की अश्रु पुसणार

समोर आहे, मग कशाला ते आवरूं ? मोहन, तूंहि माझा नाहीस; तूंहि दूरचा." शांतेचे डोळे पुन्हा भरून आले.

मोहनने ते पुसले.

"आता नाही ना दूरचा ?" तो हळूच म्हणाला.

"असं दुसऱ्याने सांगून शिकवून काय उपयोग ?" ती म्हणाली.

"तूंच तर म्हणत असतेस, वेळ असला म्हणजे माझ्याकडे येत जा, तुला शिकवीन. मी अडाणी आहें. शिकवशील तसें करीन." तो म्हणाला.

"मोहन, शांता तुला काय शिकवणार ? तिचें शिकणें बंद झालें." ती म्हणाली.

"कां बरें ?" त्याने विचारलें.

"शिकायला पैसे लागतात. गोविंदराव अतःपर पैसे देण्यास तयार नाहीत. वडील म्हणतात, त्या एका श्रीमंत कुत्र्याजवळ लग्न कर. भाऊजवळ पैसे मागेन, तर त्याचें अलीकडे पत्रहि नाही. मग मनांत म्हणत असें डॉक्टर होऊन येईन. खेड्यांतून सेवा करीत हिंडेन. सारें मनांतल्या मनांत--" ती म्हणाली.

"शांता, तूं शीक. मी देईन पैसे. माझे पैसे नाही चालणार ?" त्याने विचारलें.

"तूं कोठून देणार पैसे ?" ती म्हणाली.

"शांता, पुन्हा लग्न करायचें या विचाराने मी पैसे साठवीत असें ते आहेत थोडे मजजवळ." तो म्हणाला.

"लग्नासाठी पैसे तुला कशाला ?" तिने विचारलें.

"मला कोणी मुलगी आतां देत नाहीत. मुलगी दिली की मरणार असें मुलीच्या आईबापांस वाटतें. तरीहि एखादा गरजू बाप भेटला तर द्यावे त्याला पैसे व करावें लग्न असें मनांत येई." तो म्हणाला.

"ती मुलगी मरेल याचें तुला कांही वाटत नसे ?" तिने विचारिलें.

"माझ्याजवळ लग्न न करणाऱ्या साऱ्या अमरच होतील का ?' त्याने विचारलें.

"मग आज मिळाली वाटते गरजू मुलगी? घेणार तिला विकत? " शांता हसून म्हणाली.

" काय हें बोलतेस ? शिकणाऱ्या लोकांना हृदय नसतें." तो म्हणाला.

" माझ्याजवळ शिकून तुझें हृदय मेलें का फुललें!" तिने विचारलें.

" मग घेशील ना माझे पैसे ? निढळाच्या घामाचे पवित्र पैसे." तो म्हणाला.

" ते पैसे किती दिवस पुरणार ? " ती म्हणाली.

" मी मिलमध्यें नोकरी करायला जाऊं ? मला मिळणार होती मिलमध्यें नोकरी, परंतु तूं गावांत शिकवण्याचें काम दिलेंस. गुरूचे ऐकलें पाहिजे." तो म्हणाला.

" तूं मिलमध्यें नोकरी करून मला पैसे देणार ? " तिने विचारलें.

" मी परका नसेन तर ते घ्यायला काय हरकत ? शिकून घे. खेडीपाडी मग पेटव. किसान-कामगार पेटव " तो म्हणाला.

" तूं जा मोहन. तुला मोट चालवावयाची असेल." ती म्हणाली.

" जातो, पण शेवटचें सांगतों. तूं शीक, शीक. रडूं नको. मी मोट सुरू करावयास जातों. परंतु तूं तुझी मोट सुरू करूं नको." तो म्हणाला.

" जीवनाचा मळा पिकविण्यासाठी या मोटेचीहि जरुरी आहे. हृदयाच्या आडांतील खोल खोल पाणी. तेथे रोज मोट चालवूं तर थकून-मरून जाऊं. परंतु सटीसामासीं ती मोट चालवावी लागते. त्यामुळे आडांतील पाणीहि निर्मळ राहतें. जीवनहि हिरवें हिरवें दिसतें." ती म्हणाली.

" जाऊं मी ? "

" जा, तुझ्या शेताचा मालक रागीट आहे."

" माझ्या शेताचा मालक प्रेमळ आहे, गोड आहे "

" जा लौकर. शेताचा मालक येथे येईल व शिव्या देईल.

" मालक येथेच आहे, जवळच आहे."

" कोठे रे आहे लबाडा ? "

" हा माझ्यासमोर! "

" वेडा आहेस मोहन ! "

" परंतु तूं शीक व शहाणी हो. शांता, तूं शीक."

✦ ✦ ✦

प्रद्योत : : ९

"माया, सूत काय कातीत बसलीस? सुटीमध्ये मौज करावी. चल, आपण कॅरम खेळूं." प्रद्योत म्हणाला.

"सूत कातण्यांतच माला मौज वाटते." ती म्हणाली.

"हें कोठून घेतलेंस तूं वेड? पूर्वी तर सूत पाहून पळत होतीस, खादी नको म्हणत होतीस." त्याने विचारलें.

"प्रद्योत, आपण रोज बदलत असतों. लहानपणीं बाहुलाबाहुलींचीं मी लग्नें लावीत असें. आज लावीन का? माणूस पूर्वीचें कांही टाकतो, नवीन कांही घेतो. नाही का?" तिने विचारलें.

"माया, तुला आठवतो का तो दिवस? लुटुपुटीच्या लग्नांत तूं झाली होतीस नवरी व मी झालो होतो नवरा. नवरा म्हणून तुला मी मारलें. तूं रडत बसलीस." प्रद्योत आठवण करून देत होता.

"प्रद्योत, लहानपणीं लुटुपुटींतल्या बायकोला रडवलेंस. मोठेपणी खऱ्याखुऱ्या बायकोला नको हो रडवूं." माया म्हणाली.

"मोठेपणीच्या बायकोचा अद्याप पत्ता कोठे आहे? मिळेल तेव्हां खरी." तो म्हणाला,

"न मिळायला काय झालें? आता तूं डॉक्टर होणार, श्रीमंत होणार. किती आईबापांना वाटत असेल कीं, प्रद्योतसारखा मुलगा आपल्या मुलीला मिळावा म्हणून." ती हसून म्हणाली.

"आईबाप ढीग म्हणतील. परंतु हल्ली आईबापांचें ऐकतो कोण? तुझे आईबाप जर तुला म्हणतील की, प्रद्योतशीं लाव लग्न, तर तूं होशील तयार?" त्याने विचारलें.

"इश्श! असे रे काय विचारतोस? परंतु तुला देऊं का मुलगी पाहून? बोल, शांतिनिकेतनांतून देत्यें एखादी आणून. कशी पाहिजे ती सांग. नृत्यकला जाणणारी, का गायन जाणणारी, का काव्य करणारी?" तिने विचारलें.

"चित्रकला जाणणारी पाहिजे मला." तो म्हणाला.

"बोलतांना सूत कातणें जमत नाही. तुटतें बघ." ती म्हणाली.

" फक तो चरका. माये, मी बसतों या खाटेवर व तूं माझें चित्र काढ. तूं चित्रकला विसरलीस वाटतें ? चरका आला म्हणजे कला पळणारच." तो म्हणाला.

" चरका कलेचा शत्रु नाही. खादी प्रदर्शनांत किती सुंदर वस्तु असतात. चरका जीवनाची कला देतो." माया म्हणाली.

" यंत्रयुगांत चरका टिकणार कसा ?" त्याने विचारलें.

" बंगालमध्यें आचार्य प्रफुलचंद्राहून शास्त्रांची महती कोणता शास्त्रज्ञ अधिक जाणतो ? परंतु यंत्राची व विज्ञानशास्त्राची महती जाणणारा हा आचार्य आज म्हातारपणीं खेड्यांतील किसानांना चरख्याचा संदेश देत फिरतो. तो का मूर्ख ? गरिबांनी विणलेली खादी घ्या म्हणून ते सारखे सांगतात, ते का वेडे ? प्रद्योत, तूं खादी वापर." मायेने सांगितलें.

" मी खादी वापरली तर काय होईल ?" त्याने विचारलें.

" दरिद्री बंधूला घास मिळेल !" ती म्हणाली.

" आणखी काय होईल ?" पुन्हा त्याचा प्रश्न.

" प्रश्न विचारणारा असा वेडा न राहतां शहणा होईल." ती म्हणाली.

" माये, तुझ्या त्या चित्रांच्या वहीत कोणाचें आहे ग तें चित्र ?" त्याने विचारलें.

" तूं रे केव्हा पाहिलेंस ?" तिने विचारलें.

" काल मी माझें पुस्तक मागायला आलों होतों, तूं नव्हतीस घरीं. तुझी आई म्हणाली, 'बघ तिच्या बॅगेंत.' पुस्तक सापडलें नाहीं. परंतु तुझी कला मला सापडली. कोणाचें ग तें चित्र ? खऱ्या माणसाचें का खोट्या माणसाचें ?" त्याने विचारलें.

" खोट्या माणसाचें चित्र मीं अद्याप काढलें नाहीं." ती म्हणाली.

" म्हणजे माझे ना ?" त्याने विचारलें.

" असें दुसऱ्याच्या बॅगेंतलें पाहणें म्हणजे खोटेपणा नाहीं का ?" प्रश्न केला.

" परंतु मला तूं दुसरी वाटत नाहीस." तो म्हणाला.

" प्रद्योत, जा रे आता. कातूं दे. सारखी तुझी कटकट नि वटवट." त्रासून ती म्हणाली.

"माझी कटकट तुझ्या पाठीमागे मी मरेपर्यंत राहील." तो म्हणाला

इतक्यांत प्रद्योतचे वडील अक्षयकुमार येथे आले.

" किती रे तुझी वाट पाहयची ? येतोस ना विटा पाह्यला ? " त्यांनी विचारलें.

"ही माया येथे हुज्जत घालीत बसली." तो म्हणाला.

"उद्या लग्न लागल्यावर हुज्जत घाला, आज नको." ते म्हणाले.

"विटा कशाला अक्षयबाबू ?" मायेने विचारलें.

"तुला राह्यला चांगला हवा ना बंगला ? चांगला हवा ना दिवाणखाना ? लाव मग तेथे सुंदर तसबिरी. का तूं स्वतःच तेथे चित्र काढशील ?" त्यांनी विचारलें.

"ती सूत कातीत बसेल तेथे भुतासारखी." प्रद्योत म्हणाला.

"परंतु सूत कातणारें भूत तेथे येतें कशाला ? ते चाललें पळून." माया म्हणाली.

"चल प्रद्योत, तिला कातूं दे." अक्षयबाबू म्हणाले.

पितापुत्र बाहेर पडले. तों रमेशबाबू आले

"चाललेत अक्षयबाबू ? केव्हां आलेत ?" त्यांनी प्रश्न केला.

"आताच आलों व निघालों." ते म्हणाले.

"पान घ्या ना, बसा." रमेशबाबूंनी आग्रह केला. दोघे मित्र तेथे पलंगावर बसले.

"माये, तांबूलतबक आण बघूं." रमेशबाबूंनी हाक मारून सांगितलें

मायेने तबक आणून ठेवलें. उभय मित्रांनीं तांबूल करून खाल्ले. प्रद्योतानेहि विडा खाल्ला व त्याने एक विडा करून मायेपुढे नेला. तो तिला म्हणाला, "माया. हा विडा खा, जर तुझं तोंड रंगलें तर तुझें माझ्यावर प्रेम आहे, असें सिद्ध होईल." माया म्हणाली, "असें नाहीं. तुझ्या हातच्या विड्याने जर माझें तोंड रंगलें तर तुझें माझ्यावर प्रेम आहे हें, फार तर सिद्ध होईल; माझें तुझ्यावर प्रेम आहे हें नाही सिद्ध होणार." प्रद्योत लगेच म्हणाला, "तर मग तूहि मला दे करून. जर माझे तोंड रंगलें तर तुझेंहि मजवर प्रेम आहे हें सिद्ध होईल."

मायेने विडा करून आणून दिला. प्रद्योतने खाल्ला. त्याने जीभ बाहेर काढून पाहिली. कांही नाहीं रंगली. तो खट्टू झाला.

" माये, तूं लबाडी केलीस. विड्यांत कात, चुना, सारे पदार्थ घातले होतेस का ?" त्याने विचारलें.

" सारे पदार्थ घातल्यावर प्रेमाची परीक्षा रे कोठे राहिली ? प्रेमाचा अभंग, अनंत रंग अंतरंगांत असेल तर सारे पदार्थ न घालतां विडा रंगला पाहिजे. विश्वभारतींत एक महाराष्ट्रीय तरुण आहे. त्याने एक मराठी स्त्री-गीत सांगितलें.

अतिप्रीत बहु प्रीतीची दोघें जण ।
विडा रंगे कातावीण वैनीबाईचा ॥

कात न घालतां विडा दिला तरी उभयतांचा तो रंगत असे, हें खरें प्रेम." ती म्हणाली.

" तुम्ही दोघांनी असा एकमेकांस दिला होता वाटतें ?" त्याने विचारलें

" आमचें परस्परांवर प्रेम आहे कीं नाही हें शोधण्याची अद्याप आम्हांस आवश्यकता भासली नाही." ती म्हणाली.

" मराठी गाणींहि तूं पाठ करूं लागलीस ? " त्याने विचारलें.

" 'वंदे मातरम् चा' अर्थच हा. हिंदुस्थानांतील आपल्या सर्व भावांच्या भाषा आपणांस थोडथोड्या आल्या पाहिजेत. प्रद्योत, मराठी शिकलें तर तें वाईट नाही." माया म्हणाली.

"तोच महाराष्ट्रीय तरुण तुला शिकवितो ना ? " त्याने विचारलें.

" हो. मीहि त्याला बंगाली शिकवितें " ती म्हणाली.

" त्याचेंच ना हें चित्र तूं काढलें आहेस ? " त्याने विचारलें.

इतक्यांत अक्षयकुमारांनी मोठ्याने हाक मारली व प्रद्योत बाहेर गेला. पित्याबरोबर विटा पाहण्यासाठी तो गेला. रमेशबाबू आंत आले. माया सूत कातीत होती.

" इतकें कशाला सूत माये ? " त्यांनी विचारलें.

" मला त्याचें कापड विणून न्यायचें आहे. सुट्टी तर थोडी राहिली." ती म्हणाली.

" माये, अक्षयबाबू सारखे पाठीस लागले आहेत. काय करायचें सांग. " त्यांनी प्रश्न काढला.

" कशाचे बाबतींत ? " तिने विचारलें.

" जसें माहीतच नाही. मोठीं लबाड मुलें तुम्ही. इतका वेळ प्रद्योत येथे होता. तूं त्याला विडा करून दिलास, त्याने तुला दिला. माये, आम्ही आतां म्हातारीं झालों. तुमचें दोघांचें लग्न एकदा लागलें म्हणजे आम्ही मोकळे झालों. अक्षयबाबू व मी मित्र. कधींचें आमचें दोघांचें ठरलेलें आहे कीं, तुमचे दोघांचे हात एकत्र करायचे. सांग, लाजू नको. " पिता म्हणाला.

" नको मला लग्न " ती म्हणाली.

" वेडी आहेस. विडे देतां व लग्न नको म्हणता ?" ते हसून म्हणाले.

" बाबा, विडा देणें म्हणजे का कांही अधिक अर्थ आहे ? बहीण भावाला नाही देत कधी विडा करून ? भटजी जेवायला आले म्हणजे त्यांना नाहीं देत कधीं विडा करून ? भटजी जेवायला आले म्हणजे त्यांना नाहीं देत का मी विडा करून ? आमच्या निरर्थक विड्यांत अनर्थ पाहूं नका. " माया म्हणाली.

" मी अर्थच पाहतों आहें. " पिता म्हणाला.

" तें व्यर्थ आहे. " ती म्हणाली.

" प्रद्योतचें तुझ्यावर प्रेम आहे. " पिता म्हणाला.

" मला लग्न नको. " ती पुन्हा म्हणाली.

" आशेने प्रद्योत पागल बनेल, वेडापिसा बनेल. माझ्या मित्राचा तो एकुलता एक मुलगा. म्हातारपणीं माझ्या मित्राला दुःख झालें तर मीहि दुःखी होईन " पिता म्हणाला.

" बाबा, प्रेम नसतांहि मीं प्रद्योतशीं विवाह करावा असें अक्षयबाबू म्हणतील का ? तुम्हीहि म्हणाल का ? " मायेने विचारलें.

" माये, प्रेम पुढे उत्पन्न होतें. परिचयाने प्रेम वाढतें. कात व चुना दूर आहेत. तो रंग नाही. जवळ आले कीं, चढला रंग. " पिता म्हणाला.

" परंतु दोन दगड जवळ आणले तर ? बंदुकीची दारू व ठिणगी जवळ आणूं तर ? " ती म्हणाली.

" मी समजत होतों तुझें त्याच्यावर प्रेम आहे. " पिता म्हणाला.

" बाबा, मला भाऊ नाही. प्रद्योत माझा भाऊ असें मला वाटे. 'परंतु हें काय तिसरेंच ? ती खिन्न होऊन म्हणाली.

" मग का तूं अशीच राहणार ? " पित्यानें विचारलें.

" जशी देवाची इच्छा तसें होईल. " ती म्हणाली.

हळूहळू प्रद्योतकडून रमेशबाबूंस कळलें की, मायेचें कोणातरी महाराष्ट्रीय तरुणावर प्रेम आहे. रमेशबाबू सचिंत दिसूं लागले. मायेच्या तें लक्षांत आल्याशिवाय राहिलें नाही. एके दिवशीं ती पित्याजवळ गेली व म्हणाली,

" बाबा सचिंत कां दिसतां ? "

" माये, आम्हांला सारें कळलें. तुझें एका महाराष्ट्रीय युवकावर प्रेम आहे; खरें ना ? " त्यांनी विचारलें.

" बाबा, त्यांत कांही वाईट आहे ? " तिने हळूच विचारलें.

" वाईट नाही. परंतु माये, इतर गोष्टी पाहाव्या लागतात. आम्ही आजारी पडलों तर तूं कशी पटकन् येणार ? " वडील म्हणाले.

" बाबा, आता कांही प्राचीन काळ नाही. तारेने, टेलिफोनने एका क्षणांत हजारों मैलांवर बोलतां येतें. आगगाडीने दुसऱ्या दिवशीं येता येतें. " माया म्हणाली.

" विमानाने एक तासांतहि येतां येतें. नुसतें बोलण्यांत अर्थ नाही. तुला तुझ्या आई-बापांचें हृदय समजत नाहीं. " ते खिन्नपणें म्हणाले.

" बाबा, मुलगी म्हणजे दुसऱ्याची ना ठेव ? ती ज्याची त्याने नेणें हेंच नाही का योग्य ? माझ्या जीवनावर ज्याचा शिक्का त्याचें हें जीवन. " मायेने वडिलांचा हात हातांत घेऊन विचारलें.

" माये, तूं म्हणतेस तें खरें. परंतु आम्हांला वाईट नाही वाटणार तुला इतकें दूर जातांना पाहून ?" पिता म्हणाला.

" ज्याच्यावर माझें प्रेम नाही त्याच्या घरांत मी जात आहें, हे पाहून तुम्हांला आनंद वाटेल का ? माझें हसणें संपावें, सुख नष्ट व्हावें, माझी सारी अंतर्बाह्य कला मरावी असें वाटतें कां तुम्हांला ?" मायेने विचारलें.

" माये, जा. कोठेहि जा. सुखी ऐस म्हणजे झालें. देव तुझें कल्याण करो. " असें म्हणून रमेशबाबू उठून बाहेर गेले.

तो तेथे कोण उभें होतें ?

"प्रद्योत, केव्हा आलास? पाहिल्यास का विटा?" त्यांनी विचारलें.

"कशासाठी आता विटा? प्रद्योतच्या कबरेसाठी!" असें म्हणून तो निघून गेला.

✦ ✦ ✦

## येईल, एक दिवस ती येईल : : १०

श्रीनिवासराव रडत बसत. मिनीचें स्मरण होतांच त्यांना मुलासारखें रडूं येई. मिनीचें त्यांना वेड होतें. मिनी त्यांच्या जीवनाचें जीवन होती. त्यांच्या कर्मपसाऱ्याचा ती आधार होती. मिनी निघून गेली व त्यांचा आनंद गेला. मिनी निघून गेली व त्यांची सारी करमणूक गेली. मिनी गेली असें त्यांना वाटेच ना. बाजारांतून मिनीसाठी ते मिठाई घेऊन येत व घरीं येऊन सर्वत्र हाका मारीत. या खोलींतून त्या खोलींत, त्या खोलींतून या खोलींत सर्वत्र हिंडत. "मिने, रडू नको, रुसू नको. ये पटकन्, हा घे खाऊ" ते हाका मारून म्हणत.

बगीच्यांतून ते सुंदर सुंदर फुलें घेऊन येत. फुलांचा गजरा करीत बसत. "कोणाला गजरा?" असें कोणाला विचारलें तर म्हणत, "अहो, मिनीला. फार आवडतात तिला फुलें."

जेवायला बसतांना मिनीसाठी ते पाट मांडायचे. तिचें ताट वाढायचे. पाण्याची चांदीची झारी तेथे भरून ठेवायचे. "मिने, चल ग लवकर, भुकेली असशील. तुझ्या आवडीची आहे हो केलेली भाजी." असें म्हणून वाट पाह्यचे.

एके दिवशीं कापडाचे दुकानांत ते गेले व रेशमी साडी मागूं लागले. "कोणाला हो साडी?" दुकानदाराने विचारलें. "अहो मिनी नाही का माझी? रेशमी साडी तिला छान दिसते. पण खरेंच, नको हो, माझी मिनी कीं नाही, आता खादी वापरते. विसरलोंच मी. माझ्या हाताच्या सुताचीच आता मिनीला खादी देईन."

मिनीच्या घोड्याजवळ जाऊन ते म्हणायचे, "मोत्या, किती

वाईट झालास? मिनी नाही म्हणून तूंहि रडतोस? मिनीच्या हातची चंदी हवी? येईल हो लवकरच. उभा राहून अशीच तपश्चर्या कर."

मिनीच्या बाजाच्या पेटीजवळ जाऊन ते बसत व म्हणत, "गोड सुरांनो, रडत असाल तुम्ही, मिनीची कोवळी सुंदर बोटें किती तरी दिवसांत तुमच्या अंगावरून फिरलीं नाहीत. मिनीची बोटें लागतांच तुमचीं हृदयें नाचूं लागतात. गोड संगीत जगाला देतात."

ते मिनीचें आंथरूण घालून ठेवायचे. मिनी दमून आली तर निजेल. आयत्या वेळेला धांदल नको.

गावांत कोणी गोपिचंदाचीं गाणीं म्हणणारे भिकारी आले किंवा पेटी-वर गाणीं म्हणणारीं तीं भिकारी जोडपीं आलीं तर श्रीनिवासराव त्यांना सांगत, "मिनी कोठे भेटली तर सांगा कीं, मी वाट पहात आहें. रात्रंदिवस डोळ्यांत प्राण घेऊन बसले आहेत तिला पाह्यला. हा पाहा तिचा फोटो. साधी होती मिनी. दिसली कोठे तर सांगा. तुम्ही हिंदुस्थानभर हिंडतां. तुम्हाला आढळेल कोठे तरी. पित्याचा निरोप सांगा. हा घ्या रुपया. सांगाल ना निरोप?"

एखादे वेळेस मिनीच्या साऱ्या वस्तू ते एकत्र करावयाचे व त्यांच्याकडे बघत बसायचे व म्हणायचे, "मिने, ह्या साऱ्या वस्तू सोडून एका वस्तूसाठी गेलीस? या वस्तु का फुकट? आणि मीहि का फुकट? कांही राम नाही आमच्यांत? आम्ही का निर्माल्य? टाकण्याच्या लायकीचीं?"

सायंकाळ झाली म्हणजे रोज गावाबाहेरच्या टेकडीवर ते जाऊन बसत चारी दिशांकडे बघत. येते का मिनी कोठून तें पाहात. देव मावळे, अंधार पडू लागे. गांवांतील दिवे चमकूं लागत आणि श्रीनिवासरावांचे डोळेहि चमकू लागत. अश्रु येत, कष्टाने ते उठत व म्हणत, "आज नाही मिनी आली. एक दिवस गेला. येईल, उद्या येईल, एक दिवस ती येईल. पित्याला भेटल्याशिवाय राहणार नाहीं. पित्याच्या प्रेमाला का कांहीच किंमत नाहीं?"

त्या दिवशीं रात्रीं श्रीनिवासराव उठले. त्यांनी तिजोरी उघडली. ते नोटा मोजीत बसले. हजाराहजारांचीं पुडकीं होतीं. "मिने, हें सारें तुझ्या-साठी. ये व घेऊन जा. तुला वाटेल त्याला दे. हे कपटे मला काय करायचे! हे कागद तुझ्यासाठी गोळा केले आणि तूं निघून गेलीस. ही

सारी संपत्ति गरिबांना वाटावी असें मनांत येतें. परंतु मिने, तुझ्या हातानें दिलें जावें, अशी माझी इच्छा आहे."

गावांतील लहानथोरांस श्रीनिवासरावांची करुणा येई. त्यांची दशा पाहून माता सद्गदित होत. पिते डोळे पुशीत. झाडेंमाडें, पशुपक्षी खिन्न होत. सारी सजीव निर्जीव सृष्टि म्हणे, "प्रेमळ पित्या, येईल, एक दिवस तुझी मिनी येईल. पित्याची इच्छा पुरी होईल !"

✦ ✦ ✦

## मोहनाशक मोहन : ११

मोहनला शिवतर गावांत राहणें अशक्य होऊं लागलें. मोहनचें शांतेवर प्रेम आहे व शांतेचें मोहनवर प्रेम आहे अशी कुणकुण रामरावांच्या कानांपर्यंत गेली.

" मोहन, कशाला पडतोस या फंदांत? शांता अशाने देवाकडे जाईल." त्याचे मित्र म्हणत.

"मी कोणत्याच फंदांत पडलों नाहीं." मोहन उत्तर देई.

"त्या दिवशीं तूं शांतेचे डोळे पुशीत होतास, तिच्या अगदी जवळ वडाच्या झाडाखाली बसला होतास, असा सारा गाव बोलत आहे." गंभीर म्हणाला.

"मग त्यांत काय वाईट आहे? शेतांत मोट धरायला जात होतों. शांता एकटी बसलेली दिसली. का अशी रानांत येऊन बसली, असें मनांत आलें. जवळ गेलों तों गंगा–जमुना वाहात आहेत. दु:खितांचे अश्रु पुसणे का पाप आहे ? हें पाप असेल तर साऱ्या संतांनी तें केलें आहे." मोहन म्हणाला

" मोहन, संतांचें हृदय निरिच्छ असतें, नि:स्वार्थ असतें. त्यांच्या प्रेमाला आसक्तीचा वास नसतो. तूं शांतेचे डोळे पुसलेस ते एकदम हृदय भरून येऊन पुसलेस का ? जरा लाजलास कीं नाही ? जरा संकोच वाटला कीं नाही ? हात कापले कीं नाही ? ओठ हालले कीं नाही ? तुझे डोळे उघडमीट करीत होते कीं नाही ? सांग. " शंकर म्हणाला.

" पण यांत पाप काय तें समजत नाही. " मोहन म्हणाला.

" तुम्ही पतिपत्नी म्हणून व्हा; मग पाप नाही. " गणपत म्हणाला.

" परंतु मोहनची पत्नी देवाघरीं जायची तें ठरलेलें. मोहन, शांते-सारख्या देवतेचा बळी घेऊं नकोस. " गंभीर गंभीरपणे म्हणाला.

मित्रांची अशी चर्चा होई. गावांतील बायकामाणसेंहि बोलत. मोहन बायांचा वर्ग घेत असे. परंतु बाया कमी येऊं लागल्या. "शांताबाई आल्या तर त्यांच्या वर्गाला जाऊं. मोहनच्या नको " असा सूर त्यांच्यांत निघूं लागला. म्हाताऱ्या बायका म्हणूं लागल्या, " ती शांताहि तशीच आहे, शिकण्याचे हे परिणाम."

रामरावांनी एके दिवशीं मोहनला घरीं बोलावलें. तो गेला. रामराव कांहीं बोलतना. त्याच्याकडे तिरस्काराने व क्रोधाने ते पाहात होते.

" कां बोलावलेंत तुम्हीं ?" त्याने विचारलें.

" तुझ्या थोबाडींत मारायला." ते म्हणाले.

" अपराध असेल तर खेटरें मारा. " तो म्हणाला.

" पुन्हा बेशरमपणें बोलतो आहे. तूं शांताचे डोळे पुसलेस की नाही?" त्यांनी विचारले.

" हो. " तो म्हणाला.

" हें बरें केलेंस का ? शांताचें अद्याप लग्न व्हायचें आहे. अशा कंड्या सर्वत्र गेल्या तर होईल का तिचें लग्न ?" त्यांनी विचारलें.

" मी काय सांगूं?" तो शांतपणें म्हणाला.

" तूं शांताला चाळवीत आहेस. चांगला सरदाराचा मुलगा मागणी घालीत होता परंतु वेड्या पोरीने नाकारलें त्याला. म्हणे त्याच्यापेक्षा मजूर मुलगा पत्करला. तूंच वाटतें तो मजूर मुलगा ? शांताकडे यासाठी शिकायला येत होतास होय ? माकडचेष्टा करूं पाहतोस ?" रामराव अंगावर धावून म्हणाले.

" रामराव, जरा विचाराने बोला. मी सरदार नाहीं. मी मजूर आहें. माकडचेष्टा आणि पशुचेष्टा या गोष्टींवर सरदारांचा हक्क आहे. मी शांतेकडे एक थोर मनाची मुलगी या नात्याने बघतों. एका खानदानी घराण्यांतील

या नात्याने बघत नसतों. शांतेशीं मीं लग्न करण्याचें मनांत आणलें तर तें पाप नाहीं. आम्ही दोघें निष्कलंक आहोंत." मोहन म्हणाला.

"ठीक. या गावांत तुला राहणें अशक्य करतों." रामराव म्हणाले.

"दुनिया ओस नाही पडली रामराव." मोहन म्हणाला.

"नीघ येथून. पुन्हा तोंड दाखवूं नको." ते म्हणाले.

"मी कधी आलों होतों दाखवायला ? आपणच बोलावणें पाठवलेंत सरदारसाहेब." मोहनने उत्तर दिलें.

मोहन निघून गेला. गांवांत त्याच्याविरुद्ध चक्रें सुरू झालीं. ज्याच्या मळ्यांत मोहन कामावर होता, त्यानें मोहनला कामावरून काढून टाकलें.

मोहनला एक चिंता होती. शांतेला पैसे पाठवावयाचे. त्याने आपली सारी पुंजी तिला दिली होती. परंतु शांतेला मोठ्या शहरांत ती कितीशी पुरणार? गावांत कोणी कामाला बोलवीना. पाटलाची भीति, सावकारांची तंबी.

मोहनच्या ऐवजी दुसरे तरुण आता वर्ग चालवीत. आपल्यामुळे वर्ग बंद पडूं नयेत, अशी त्याची इच्छा होती. त्याला मोठेपणा नको होता. कोठूनहि जनता साक्षर व्हावी, शहाणी व्हावी, स्वावलंबी व्हावी, जगांतील हालचाली जाणणारी व्हावी, एवढीच त्याला इच्छा. बायकांचा वर्ग आता बायकाच चालवीत. शांतीची एक मैत्रीण गीता पुढे आली व काम चालवूं लागली. मोहनबद्दल तिला आदर वाटत होता. वर्गांत शिकवतांना अप्रत्यक्षपणें मोहनच्या निष्कलंक शीलाबद्दल ती बोले.

मोहनचें एक तरुण मंडळ होतें. त्याचा सल्ला घेऊन एके दिवशीं मोहनने शिवतर सोडलें. तो धनगावला नोकरीसाठी गेला. धनगाव मोठें शहर होतें. तेथे चार गिरण्या होत्या. कोठे तरी नोकरी मिळेल असें त्याला वाटत होतें. परंतु कांही जमेना.

धनगावला मोठी इंग्रजी शाळा होती. शाळेचें एक वसतिगृह होतें. तेथे भांडीं घासण्याचें काम मोहनला मिळालें. त्याने तें आनंदानें घेतलें. त्याला तेथे वसतिगृहांत राहायला एक झोपडी मिळाली. रात्रीं भांडीं, खरकटीं, फरशी पुणें वगैरे झाल्यावर तो झोपडींत येई. जेवण आटोपी. नंतर वसतिगृहांतील बाहेरच्या विजेच्या दिव्याखाली तो वाचीत बसे.

" मोहन, दिवसभर दमतोस. रात्रीं काय वाचतोस? " वसतिगृहांतील एका विद्यार्थ्यानें विचारलें.

" ज्ञानाशिवाय बुद्धीचें समाधान होत नाही. दिवसभर ती बिचारी उपाशी असते. तिला नको का थोडें खायला ? " तो म्हणाला.

" पाहूं दे पुस्तक. " विद्यार्थी म्हणाला.

मोहनने पुस्तक दाखवलें. विद्यार्थी आश्चर्यानें म्हणाला, " हिंदुस्थान व समाजसत्तावाद !, मोहन, समजतें रे तुला ? "

" बरेंचसें समजतें. " तो म्हणाला.

विद्यार्थ्यांत मोहनबद्दल कुतूहल निर्माण झालें. आपल्या खोलींतच हा वाचायला बसला म्हणून काय झालें, असें कांहीच्या मनांत आलें. मुलें चालकांना विचारावयास गेलीं. चालकांनी परवानगी दिली नाही. नोकर शिरजोर होतील. ज्याने त्याने आपल्या पायरीनेच राहिलें पाहिजे, वगैरे सनातनधर्म त्यांनी सांगितला.

मोहन मिळत ते पैसे शांतेला पाठवी. विद्यार्थी सुट्टींत घरीं निघाले की मोहन त्यांचें सामान स्टेशनवर घेऊन जाई. ते त्याला दोन आणे अधिक देत. भांडीं घासणारा मोहन विद्यार्थ्यांचा देव बनत चालला होता. मोहन रस्त्यांत भेटला तर मुलें त्याला वंदन करीत. एके दिवशीं चालकांनी हें पाहिलें.

" तुम्ही त्या भांडींघाश्याला रस्त्यांत नमस्कार काय करतां ? हसतात तुम्हांला सारे. वसतिगृहांत हे शिकवतात की काय लोक म्हणतात." चालक मुलांना म्हणाले.

" खर्डेघाश्यापेक्षां भांडीघाश्या पूज्य आहे. शिक्षकहि वाचीत नसतील अशीं पुस्तकें मोहन वाचतो. इतिहास कसा वाचावा, मराठ्यांच्या इतिहासांत कोणती दृष्टि आहे, हें मोहनने आम्हांला त्या दिवशीं शिकविलें. एकनाथाच्या घरीं देव कावडीने पाणी भरी. आम्हां मुलांचीं धुणीं धुवायला मोहनच्या रूपाने देवच आला आहे की काय न कळे. " मुलें म्हणालीं.

मोहन पैसे पाठवी. त्यांची पावती घेई. पावतीवर स्त्रीचें नांव असे. हें काय कोडें आहे ? शाळेचे चालक कुजबूज करूं लागले. कांही तरी भानगड असावी, असें त्यांना वाटलें.

मोहनचें दुर्दैव. अतिशय श्रम करून तो आजारी पडला. ताप अंगांत असतांनाहि तो भांडीं घाशीत होता. तेथे तो घेरी येऊन पडला. मुलांना कळल्यावर त्यांनी त्याला उचलून नेलें. मोहनला थंडीताप येऊं लागला. काम वेळेवर होईना. चालकांनीं सांगितलें, "आम्ही दुसरा माणूस ठेवतों. संस्थेचें अशाने कसें चालणार ?"

मोहन संस्था सोडून गेला. गावांत एक रुपया भाड्याच्या खोलींत तो राहायला गेला. खोलींत ओल असे. सोबतीला डास होते. मोहन कामाला जाई. शाळेंतील काम सुटलें. गावांत अधिक काम करी. परंतु तो थकत चालला. त्याचा एकच आनंद होता की, शांता शिकत आहे.

शांतेचा एक सुंदर फोटो त्याच्याजवळ होता. ती त्याची इस्टेट. रात्रीं तो फोटो पाही व प्रेमाने हृदयापाशीं धरी.

मोहन शांतेला पैसे पाठवी. परंतु शांतेचें पत्र कधी येत नसे. प्रथम एकदोन पत्रें आलीं. पुढे बंद. "शांतेला अभ्यास असेल, लठ्ठ पुस्तकें वाचायचीं असतील. कोठून होणार तिला वेळ ?" असें तो म्हणे.

शांतेला खरेंच वेळ नसे का ?

शांता मोठ्या शहरांत गेली व निराळी झाली. तिच्यांत क्रांति झाली. शांता कोणाला ओळखूं आली नसती. तिची खादी गेली. तिचा साधे-पणा गेला. ती आता सुंदर तलम पातळें नेसे. सुंदर सुंदर पोषाख करी. मोहनच्या पैशावर शांता चैन करीत होती. तिला एक नवीन मित्र मिळाला. त्याच्याशीं गप्पाविनोद करण्यांत तिचा वेळ जाई.

शांतेच्या जीवनाचा नाश होणार का ?

"शांता, येतेस ना त्या बोलपटाला ?" तिचा सोबती विचारता झाला.

"चांगला आहे का ?" तिने विचारलें.

"तूं बरोबर आलीस म्हणजे सारे बोलपट गोडच वाटतात. तुझा हात हातांत घेऊन बोलपटाकडे पाहणें किती सुखाचें वाटतें." तो म्हणाला.

"माझा हात हातांत धरतां येतो म्हणून बोलपटाला जायचें होय ?" तिने विचारलें.

"तुझे चिमटेहि सहन करण्यासाठी." तो म्हणाला.

दोघें गेलीं. बोलपट पाहण्यांत रंगलीं. एका स्त्रीला तिचा प्रियकर गरज सरो वैद्य मरो या नात्याने एका क्षणांत सोडून कसा जातो तें त्या बोलपटांतच होतें. असहाय स्त्री आत्महत्या करते.

शांतेचा हात त्याच्या हातून दूर झाला,

" काय ग शांता ? " त्याने विचारलें.

" होय, मला थंडी वाजते आहे. घरीं जाऊं दे मला. " ती म्हणाली.

" एकटी जाशील ? " त्याने विचारलें.

" होय. " ती म्हणाली.

शांता निघून घरीं आली. आपल्या खाटेवर बसली. रडली. पोटभर रडली. बाहेर एकाएकीं प्रचंड वादळ सुरू झालें. धो धो वारा वाहत होता. आकाशांत अकस्मात् ढगावर ढग आले. एका क्षणापूर्वी तेथे अनंत तारे चमचम करीत होते. आता एकहि दिसेना. प्रसन्न आकाश शतधारांनी रडूं लागलें. पोटांत साठवलेलें दुःख असह्य होऊन बाहेर पडूं लागलें.

रात्रीचे बारा वाजले असतील, अशा वेळेसच वेणू वाजवणारा श्रीकृष्ण जन्माला आला; असुर संहारणारा गोपाळकृष्ण जन्माला आला. शांता शांतपणे उठली. बाहेर पावसांत उभी राहिली. हात जोडून उभी राहिली.

शांता, जा ना बाळ, आता खोलींत. कोरडें नेस. गारठशील. जा हो. हें बघ बाहेरचें वादळ शांत होत आहे. तूहि शांत हो. तुझ्या हृदयाकाशांतील ढग जाऊं देत. तेथे प्रसन्नता व पवित्रता फुलूं देत. शांता आंत गेली. ती ओलेती होती. तिने आपल्या ट्रंकेंतून ऊबदार खादी काढली. पुन्हा तिने खादी परिधान केली. जणु नवविद्युत्संचार झाला. शांतेने केस पुसले. ती देवपूजेला बसली. मध्यरात्रीं शांता देवाला ओवाळूं लागली—आळवूं लागली.

शांतेने ती तसबीर काढली. ट्रंकेंतील एक सुताचा हार त्या तसबिरीला तिने घातला. नवीन तलम वस्त्रें सारीं तेथे आणून तिने त्यांना काडी लावली.

मोहन तिकडे कृश व जर्जर झालेला. शांतेच्या फोटोला हृदयाशीं धरून अमृतरस मिळवीत होता. शांताहि त्या तसबिरीला हृदयाशीं धरून अपूर्व शांति अनुभवीत होती.

शांता झोपली. सकाळीं लौकर उठली नाही. तिच्याने उठवेना. खरोखरच तिला ताप भरला. ती त्या तापांत शांतपणें पडून राहिली.

"काय शांते, कसें काय ?" मित्राने येऊन विचारिलें.

"ताप आहे. डॉक्टर म्हणतात देवीचा असावा." ती म्हणाली.

"देवींचा !" त्याने आश्चर्याने म्हटलें.

"हो, तुम्ही जवळ येऊं नका. आठ दिवसांनी या. देवींचा रोग स्पर्शजन्य." ती म्हणाली.

"वरें. तूं बरी झालीस म्हणजे येईन. दोन–तीन दिवस तुला ताप येतच होता. तुझा हात कढत असे." तो म्हणाला.

"परंतु त्या स्पर्शाची भीति नको. देवी तेव्हा उगवल्या नव्हत्या. आतां मात्र उगवतील." ती म्हणाली.

"कोणाला धरून बोलव ना." त्याने सांगितलें.

"बोलावलें आहे." ती म्हणाली.

"अच्छा. जातों हो शांता." असें म्हणून तो गेला.

आठ दिवस शांता पडूनच होती. दार लावून ती पडून राही. शेजारी भांडीं घासणारी येई. ती शांतेला भाकर भाजून देई. शांता थोडी खाई, ताप हळूहळू आपोआप गेला. शांतेला प्रसन्न वाटूं लागलें. थोडें अन्न जाऊं लागलें.

ती पुन्हा शिकायला जाऊं लागली. सारीं मुलें तिच्याकडे पाहूं लागलीं. शांता निराळी दिसत होती. तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें परम पवित्र प्रसन्न तेज दिसत होतें.

"शांता, हें काय ?" तिचा सोबती म्हणाला.

"जीवनांत क्रांति" ती म्हणाली.

"अशी वरचेवर क्रांति होऊं लागली तर क्रांतीला अर्थच राहणार नाही." तो म्हणाला.

"क्रांति सारखी चालू असते." ती म्हणाली.

"तोंडावर देवी दिसत नाहीत त्या ?" तो म्हणाला.

"देवी आल्याच नाहीत. तो शेवटीं साधा ताप होता." ती म्हणाली.

"घरचें कोणी आलें आहे का ?" त्याने विचारलें.

"हो." ती म्हणाली.

"किती दिवस राहणार ?" त्याने प्रश्न केला.

"कायमच." ती म्हणाली.

"बरें झालें." तो म्हणाला.

"देवाला दया." ती म्हणाली.

शांता आता अभ्यास करी. मन अशांत झालें तर तें शांत करण्यासाठीं चरखा चालवी. तिने मोहनला एक सुंदर पत्र लिहिलें. तें पत्र लिहितांना ती समाधिस्थ झाली होती. त्या पत्रांतील तारीख व पत्ता आपणांस नको: परंतु हृदय आपणास हवें. हें घ्या तें.

प्रिय मोहनराया,

तुझ्या शांतीने तुला किती तरी दिवसांत पत्र लिहिलें नाही. राग नको मानूं. मोहन, माझ्यासाठीं तूं तिकडे काबाडकष्ट करीत आहेस. ते तुझे हात अधिकच ताठरदाठर झाले असतील. मला ते अधिकच गोड वाटतील. माझ्यासाठी तूं गावाचा त्याग केलास, घरादाराचा केलास, आईबापांचा केलास, मित्रमंडळींचा केलास. माझ्यासाठी तूं सुखाचा, स्वास्थ्याचा, सर्वस्वाचा त्याग केलास. मोहन, माझ्यासाठी तूं कशाचा त्याग करण्याचें ठेवलें आहे? माझ्यासाठीं तूं अपमान सोसलेस, नीतीवर उडवलेले शितोडे सहन केलेस, तुझ्या सत्त्व–शीलतेला कोटी कोटी प्रणाम.

मोहन, अलीकडे कितीतरी पत्रें मी तुला रात्रीं लिहीत बसतें. परंतु ती बाहेरच्या पोस्टांत टाकतां येत नाहीत. अश्रूंच्या शाईने तीं मी लिहितें. हृदयाच्या पेटींतच तीं मी टाकतें. तूं नाही तरी माझ्या हृदयांतच आहेस! तूं धनगावाला का आहेस? नाही. तूं माझ्या हृदयाच्या शांतिनिकेतनांतच आहेस. तेथेंच मी पत्रें टाकतें. तुला तीं मिळत असतील.

मध्ये येथे केवढें वादळ! मोहन त्या वादळांत तुझी दुबळी शांता सापडली होती. वाट दिसेना. सारा अंधार. डोळे धुळीने भरले. मी पडलें, परंतु शेवटीं रस्ता सापडला. तुझी शांता तुझ्या स्मरणाने सुखरूप परत आली.

मोहन, क्रांतीचा पंथ बिकट आहे. शांतेचा हात घट्ट धरून ठेव. मोहन, तूं एका शेतकऱ्याचा कष्टाळू मुलगा! परंतु किती तुला समजूत, कशी धारणाशक्ति, किती उदार स्वभाव, किती दिलदार हृदय, कसें गोड अकपट हसणें, कसें सहजसुंदर पाहणें, किती त्याग, किती ध्येयनिष्ठा, किती सहनशक्ति, किती आशा! शिकलेलीं किती मुलें मीं पाहिलीं; परंतु तुझी सर एकाला नाही, देवाच्या शाळेंत तूं शिकलेला!

पुरे आता. मोहनाशना प्रेममया मोहना,

तुझीच शांता.

✦ ✦ ✦

## रडूं नका, उठा : : १२

मुकुंदराव यात्रेवरून परत आले. ते रामपूरला आले व तेथून सोनखेडीला गेले. दयाराम, चुडामण, हिरालाल, पार्थ, माणक सर्वांचें काम चाललें होतें. आश्रमांत निघणारी खादी सारी खपत असे. रामदास आल्यावर व्याप वाढवावयाचा, असें त्यांनी ठरविलें होतें. त्या आश्रमांत सोनखेडीचे किसान, सोनखेडीच्या आयाबाया वेळ मिळे तेव्हा येत. सूत कातीत वा चर्चा करीत.

पुष्कळ वेळा शेतकरी विचारीत, " हें सूतबीत ठीक आहे, परंतु आम्हांला मुख्य दोन घुशी आहेत: सरकार व सावकार. शेतांत पिको न पिको, शेतसारा भरावाच लागतो. म्हातारे शेतकरी सांगतात की, तहशील तिपटीने वाढलं. सूत किती आधार देणार? आमचे कर्ज रद्द झालें पाहिजे. एरव्ही आम्ही जगणार नाही, तगणार नाही. "

किसानांच्या कहाण्या ऐकून दयाराम दुःखी होई, पार्थ संतापाने पेटे, चुडामण चवताळे, हिरालाल हात कपाळाला लावी, माणिक मान खाली घाली. ते सेवक काय सांगणार? त्यांनीं एक काम अंगावर घेतलें होतें. सर्वत्र लुडबुड करून कसें चालणार?

" तुम्ही किसानांनी संघटना केली पाहिजे. एकावर जप्ती आली तर दुसरे त्याची मजा बघायला जमतां. किसान सारा एक झाला पाहिजे. कर्जाचा हिशोब नीट झाला पाहिजे, तहशील कमी झाले पाहिजेत. खंड कमी झाला पाहिजे. म्हणून तुम्हीं उठलें पाहिजे. येथे आश्रमांत रडून काय होणार ? " दयाराम सांगे.

" वास्तविक कर्ज रद्दच झालें पाहिजे. मागे मुकुंदराव म्हणाले होते की, सरकारच्या एका आर्थिक चौकशी समितीनेच असें स्वच्छ लिहिलें आहे कीं, हिंदी शेतकरी कर्ज कधी फेडूं शकणार नाही; तें एक दिवस सारें रद्द केलें पाहिजे." हिरालाल म्हणाला.

" समजा, रद्द नका करूं; परंतु किती व्याज पोचलें त्याचा हिशोब तर हवा करायला ? आणि तो हिशेब करतांना शेंकडा ३ पेक्षां अधिक व्याजाचा दर धरणें पाप वाटलें पाहिजे. " पार्थ म्हणाला.

" आम्हां शेतकऱ्यांना कुणीं तरी मार्ग दाखविला पाहिजे. मग आम्ही उठूं. " शेतकरी म्हणत.

" मुकुंदराव येतील, रामदास येईल, दाखवतील मार्ग. " दयाराम म्हणे. आणि मुकुंदराव आले म्हणून त्या भ्रातृमंडळाला किती आनंद झाला ! जणु पंचप्राणांतील एक प्राण आला असें सर्वांस वाटलें. सर्वांना प्रकाश आला, नवजीवन मिळालें, असें वाटलें. दयारामने रामदासाची प्रेमाने चौकशी केली. तिकडील अनुभव ते मित्र विचारीत होते.

शेतकरीहि जमूं लागले. आसावलेले शेतकरी येऊं-जाऊं लागले. आपापलीं दुःखें ते सांगूं लागले. मुकुंदराव मुकाट्याने ऐकून घेत होते.

" सावकारांनीं यंदा लिलाव भराभरा चालविले आहेत. हे लिलाव तहकूब केले पाहिजे होते. दरवर्षी अशी जप्ती. वारंटाची गर्दी नसते. परंतु पुढेमागे कर्ज-कायदा वगैरे होईल म्हणून आधीच सावकार उठले आहेत. " राघो म्हणाला.

" लिलाव थांबवा म्हणून लाखो किसानांनी ओरड केली पाहिजे. विराट् सभा भरविल्या पाहिजेत. घरांत रडून कसें होणार ! भयभीति सोडा, एरवीतेवी मरायचेंच, तर झगडा तरी करूं या. पाटलाचें भय, तलाठ्याचें

भय, पोलिसाचें भय, मामलेदाराचें भय या सर्वांचा त्याग केला पाहिजे. हे आपले नोकर आहेत, आपण धनी आहोंत, या भावनेने राहिलें पाहिजे. करूं या आपण चळवळ. लिलाव थांबवा, कर्ज रद्द करा, खंड कमी करा, शेतसारा कमी करा, अशा आपल्या मागण्या. या मागण्यांवर इकडे तिकडे खळबळ करूं या. पेटवूं या सारा देश. उठाल का तुम्ही?" मुकुंदरावांनी विचारलें.

"हो, उठूं. तुम्ही उभे राहा. आम्ही तुमच्यामागे आहोत. हजारो शेतकरी जमतील." नारायण म्हणाला.

मुकुंदराव प्रचार करूं लागले. आसपास हिंडूं-फिरूं लागले. आणि त्यांना निसर्गाचीहि मदत मिळाली. ते आले तेव्हां पीक जरा बरा बरें होतें. शेतकरी सुखी होता. परंतु एकाएकी प्रचंड पाऊस सुरू झाला. कांही केल्या थांबेना.

ओला दुष्काळ पडला. गुराढोरांना पाणी मुबलक झालें. चाराहि त्यांना होता. परंतु माणसाला दाणा उरला नाही. असें होतें तरी सरकारला दाद नव्हती. त्याचे जे एकदा वर पूर्वी अहवाल गेले, पीक बारा आणे, दहा आणे, तेच कायम.

सरकारी अधिकाऱ्यांना वरून हुकूम सुटला की, वर्ष कठिण आहे. ताबडतोब तगादा लावा. दरसाल तहशील डिसेंबर-जानेवारींत घेत तर यंदा ऑक्टोबरपासून तगादे! कारण दुष्काळ होता म्हणून. शेतकऱ्यांचीं गाईगुरें जप्त होऊं लागलीं. घरांतील खाटा, पाटेवरवंटे, पोळपाटलाटणीं, चावडीवर लिलावाला जाऊं लागलीं. गाड्या जप्त झाल्या. घरांतील झोऱ्ये, सुताडे जप्त झाले.

"तूं आधी तहशील भर म्हणजे बाकीचे भरतील." मामलेदार पाटलास म्हणाला.

"कोठून भरूं रावसाहेब?" तो हात जोडून म्हणाला.

"ढोरें वीक, कांही कर." साहेब संतापून बोलले. ठिकठिकाणच्या पाटलांनी गुरेंढोरें विकून, कर्ज काढून आधी शेतसारे भरले. मग ते शेतकऱ्यांना तगादे लावूं लागले. सर्वत्र हाहा:कार झाला.

"नको नेऊं दादा गाय. ती गाभण आहे. कोठून भरूं शेतसारा ? घरांत मूठभर दाणे नाहीत बघ." तो शेतकरी हात जोडून म्हणाला.

"सरकारी कामांत अडथळा नको करूं, हो दूर, सोडा रे ती गाय. न्या हाकलीत." अधिकारी म्हणाले. गाईवर प्रेम करणारा तो शेतकरी गाईचें दावें सोडून देईना. सरकारी कामांत व्यत्यय म्हणून त्याला पकडण्यांत आलें. गाय नेण्यांत आली. ती गाय पाऊल टाकीना. धन्याची बेअब्रू तिला सहन होईना. तिने शिंग मारलें. मग काय विचारतां ? त्या गाईला हाणीत त्यांनी नेली. गाभण गाय वाटेंत विऊन मरून पडली. मेलेलें वासरूं व मेलेली गाय तेथे पडलीं होतीं.

गाय नेली. धन्यावर सरकारी कामांत अडथळा म्हणून खटला झाला. त्याला ५० रु. दंड व ४ महिने शिक्षा ठोठावण्यांत आली. घरीं बायकोनें डोकें आपटलें. मुलें स्फुंदत स्फुंदत आईला बिलगली. अरेरे !

सर्वत्र हेच प्रकार. जिकडे जाल तिकडे या करुण कथा कानीं येऊं लागल्या. एका शेतकऱ्याने बाजारांत जाऊन आठ आण्यांचे दाणे आणले, तर दुसऱ्या दिवशीं त्याच्या घरावर तहशिलासाठी जप्ती.

"नाही दादा जवळ पैसे. आजपर्यंत सरकारचे दिले नाहीत का ? पिकत नव्हतें, पिकलेलें नीट विकत नव्हतें तरी भरले तहशील. यंदा उपाय हरला." तो म्हणाला.

"साहेब, याला घरीं खाण्यासाठी दाणे आणायला आठ आहेत आणि तहशील भरायला पैसे नाहीत म्हणतो. लवाड आहे हा." पाटील म्हणाला.

"गुरें न्या जप्त करून." साहेब म्हणाले.

दुष्काळ आहे हें सरकारला पटेना. कशाने पटवावें ?

मुकुंदराव सरकारी अधिकाऱ्यांना जाऊन भेटले. परंतु तुम्ही खोटे लोक आहांत, तुम्हांला दुसरे उद्योग नाहीत, अशा रीतीने त्यांची संभावना करण्यांत आली. मुकुंदराव शांतपणें माघारे आले. सारा पेटवायचा हा आता भाग, असें त्यांनी ठरविलें. त्यांचें हृदय पेटलें, भावना भडकली. त्यांचे डोळे निश्चयाने तळपूं लागले. "रडूं नका, उठा, पेटा, निघा, गर्जना करा, झेंडे घ्या." ते सांगूं लागले, आणि पडलेला किसान उठूं लागला.

✦ ✦ ✦

# स्वातंत्र्य-दिन : १३

स्वातंत्र्य–दिन जवळ येत होता. हिंदुस्थानने स्वतंत्र होण्याचा निश्चय कधीच जगजाहीर केला होता. दरवर्षी तो दिवस आला म्हणजे ,साजरा होई. परंतु त्या उत्सवांत खरा अर्थ ओतला जात नसे. स्वातंत्र्य म्हणजे काय तें जनतेला कळलें पाहिजे. स्वातंत्र्य म्हणजे बेकाराला काम, पोटभर अन्न; स्वातंत्र्य म्हणजे प्रत्येकाला रहायला घरदार; स्वातंत्र्य म्हणजे सर्वांना शिक्षण; स्वातंत्र्य म्हणजे सर्वांच्या अब्रूचें रक्षण; स्वातंत्र्य म्हणजे कर्जातून किसानाची मुक्तता; त्याची शेती त्याला परत मिळणें; डोईजड शेतसारे भरपूर प्रमाणांत कमीं होणें; स्वातंत्र्य म्हणजे कामगाराला पगारी रजा, म्हातारपणीं पेन्शन, कामाची शाश्वती, त्याला राहायला चाळी, कामाचे कमी तास.

मुकुंदरावांनी स्वातंत्र्य-दिनाचे दिवशीं हजारो किसान कामगार एकत्र आणण्याचें ठरविलें. विजेसारखा प्रचार त्यांनी सुरू केला. अनेक तरुण त्यांना या कामीं मिळाले. दिवस ना रात्र, सकाळ ना दुपार; सारखा प्रचार सुरू.

ते शिवतरला गेले. शांता व मोहन यांचें तें गांव. गावांत जागृति होती, विचार आला होता, मोहन तेथे नव्हता. तरी त्याचे मित्र आतून पेटवीत होते. गीता तेथे ज्ञान देत होती. मुकुंदरावांचें रात्रीं व्याख्यान होतें. बायांनी फेरी काढली. मुलांनीं फेरी काढली. आसपासच्या गावींहि दवंडी देण्यांत आली. रात्रीं प्रचंड सभा भरली, शेकडो बाया आल्या होत्या. हजारो किसान जमले होते.

मुकुंदराव म्हणाले, “ जगाच्या पोशिंद्यांनो, तुम्ही आज मरत आहांत. सारे तुम्हांला लुटीत आहेत, कुटीत आहेत. आता मान वर करा. म्हणा की, श्रमणारे जे आम्ही त्या आमचा आधी हक्क. आधी आम्हांला पोटभर खायला पाहिजे. ज्याचा प्रथम हक्क असावयास पाहिजे, त्यालाच आंज गचांडी मिळाली आहे.

“ नाही. हें सारें बदललें पाहिजे गाईचें दूधहि पिळून पिळून काढूं लागूं तर तीं सात्त्विक गायहि लाथ मारते. म्हणते, पाप्या ! आतां नाही रे

कासेंत कांही. परंतु आपण शेतकरी गाईहून गाई झालों. आतां माणसें होऊं या. सांगूं या सर्वांना बजावून की, 'आधी मला व माझ्या मुलाबाळांना पोटभर खाऊं दे. उरलें तर तुम्हांला देऊं. आम्ही शेतकरी मरूं तर मराल तुम्ही. तुम्ही जगावें म्हणून आम्हांला आधी नीट जगूं दे.'

" तुम्ही भीति सोडा. जर कोणी म्हणेल सरकार तुरुंगांत घालील, म्हणा की घालूं दे. गोळी घालील, म्हणा की घालूं दे. नाही तरी मरतच आहोंत.

" जगांतील श्रमजीवी जागे होत आहेत. हिंदुस्थानांतील किसान जागे होत आहेत. तुम्हीहि जागे व्हा. बिहार व ओरिसा प्रांतांत किती जागृति मीं पाहिली. तेथे शेतकऱ्यांचे जमीनदारांशीं सारखे सत्याग्रह चालले आहेत. एकदा एके ठिकाणीं गोळीबार झाला, एक शेतकरी गोळी लागून मेला. त्याच्या अंगांतून रक्त वाहलें. परंतु त्याची शूर पत्नी. तिने आपल्या कुंकवांत तें रक्त मिसळलें. कुंकू अधिकच लाल व तेजस्वी झालें. ती तें कुंकू कपाळीं लावते व म्हणते, 'माझा पति अमर झाला. माझें सौभाग्य अमर आहे. कोणती बंदूक माझें सौभाग्य हिरावून घेईल ?'

" ही पाहा. ही पाहा, ती लाल कुंकवाची डबी. ही डबी त्या सतीने दिली. तिचें नांव पार्वती. त्या डबींतील कुंकवांत त्या शेतकऱ्याच्या पवित्र रक्ताचा अंश आहे. महाराष्ट्रांतील किसान-भगिनींस ही देणगी तिने पाठवली आहे. लावा यांतील कुंकूं व झगडा करायला उभ्या राहा. पतीच्याबरोबर कडेवर मूल घेऊन उभ्या राहा. तेजस्वी व्हा. निश्चयी व्हा. सावित्रीने यमापासून आपला पति परत मिळविला. आपण साम्राज्य सरकारपासून, जमीनदारापासून व सावकारापासून आपलें सुख व स्वातंत्र्य घेऊं या. अतःपर पडणें नको, रडणें नको. आता एकच. क्रांतीची गर्जना करा. वरचे खाली ओढा, खालचे वर चढा. तेथील स्त्रीपुरुषांनी आसपासचें रान उठवावें. आता स्वस्थ नका राहूं. स्वातंत्र्यदिन जवळ येत आहे. त्या स्वातंत्र्याचे दिवशीं आपण हजारो-लाखो शेतकरी एकत्र जमूं या. त्या दिवशीं कामगार कामें सोडून येतील. विद्यार्थी शाळा-कॉलेजें सोडून येतील. एकत्र येऊं. अशी हाक फोडूं की, साम्राज्यसरकार थरथर कांपेल. आपणांला लुटणारे नरमतील—शरमतील. आपलें भाग्य जवळ येईल.

" लावा; भगिनींनो, यांतील कुंकू लावा.

" कुंकू लावून झालें. निश्चय करा. पाताळांत शेष आहे व त्याच्या डोक्यावर पृथ्वी आहे, असें आपण समजतों. तो फणा हालवतो, भूकंप होतो असें म्हणतात. हा कोणता शेष ? सात लाख खेड्यांत खाली दडपलेला शेतकरी म्हणजे हा शेष. हा खालच्या पाताळांत दडपलेला किसानांचा कोट्यावधि फणांचा शेष जर जागा होईल व जरा फूत्कार करील तर प्रचंड भूकंप होतील. सार्‍या साम्राज्यशाह्या नष्ट होतील.सारे जुलूम जमीनदोस्त होतील. जागे व्हा. स्त्रीपुरुष, मुलेंमुली जागीं व्हा. इतरांस जागे करा. स्वातंत्र्यदिनाचे दिवशीं गाणीं गात, झेंडे फडकावीत, दिंड्या काढीत एकत्र जमा व स्वतःच्या सामर्थ्याचा प्रत्यय घ्या. "

मुकुंदराव थांबले. गीता येऊन उभी राहिली. ती म्हणाली, " आम्ही बायका मागे नाही राहणार. पोलिस आला तर सांगू, तूं आमचा भाऊ. मारूं नको दंडा. आम्ही भिणार नाहीं. पदर बांधून उभ्या राहूं. फार वाईट दशा शेतकर्‍यांची. आमच्या शेजारीं रुक्मिणी आहे. तिच्या घरीं खायला नाही. पोरगा थंडीतापाने आजारी आहे. त्याला दवा नाही. वाईट दिवस आले. आता रडून उपयोग नाही. शांताला आपण बोलावूं. ती होईल आपली पुढारी. निघूं तिच्या पाठीमागे आपण. पेटवूं सारें रान. उठवूं आयाबहिणी. आपण पुरुषांच्या पुढे होऊं. सरकारला सांगू, यंदा सारासूट दे. तहशील कमी कर. दारचे सावकार बंद कर. नाही तर फोडतों तुझ्या दारांत आम्ही आमचीं डोकीं. "

गीतेचें लहानसें भाषण. परंतु खेड्यांतील आत्मा त्यांत होता. शिवतर गांव उत्साहाने उचंबळलें, स्फूर्तीने नाचूं लागलें.

शांतेने वर्तमानपत्रांतून हकीगत वाचली. तिला राहवेना. या प्रचंड मोर्चांत सामील होण्यासाठी ती आली. ती आधी धनगावला आली. मोहनचा पत्ता काढीत ती त्याच्या झोपडींत गेली. कृश व आजारी मोहन घोंगडीवर पडलेला होता. त्याने शांतेचा फोटो हृदयाशीं धरला होता. तापाने तळपणार्‍या मोहनची ती एक शांति होती.

" मोहन, मोहन. " शांतेने हांक मारली.

" आली, शांता आली. तुझेंच मी स्मरण करीत होतों. शांता, ये. बस, आग होते अंगाची. तुझा हात ठेव ग डोक्यावर. " मोहन म्हणाला.

शांतेनें मोहनचें अंथरूण नीट केलें. त्याला पांघरूण घातलें. त्याच्या कपाळावर हात ठेवून ती बसली. तिने थोडचा वेळाने त्याच्या कपाळावर गार पाण्याची पट्टी ठेवली, मोहनचे चरण चुरीत ती बसली. त्याचे पाय आपल्या मांडीवर घेऊन ती हळूहळू चेपीत होती, डोळे भरून येत होते. किती कृश झाला तिचा मोहन! पूर्वी कसा हाडापेराने बळकट दिसे. कसा डोळचांत भरे. परंतु आज केवळ हाडें उरलीं, माझ्यासाठी मोहन झिजला, श्रमला,

" मोहन, तूं किती वाळलास ! किती दिवसांपासून आजारी आहेस ? मला कळवलें नाहीस ?" तिने विचारलें,

" शांता,कळवून काय करावयाचें ?तुला दोन महिन्यांत पैसे पाठवले नाहीत, वचनाप्रमाणे वागलों नाही, वचनभ्रष्ट, पापी मोहन आजारी पडला. कोणालाहि माझा उपयोग नाही.ना तुला, ना देशाला, फुकट फुकट जीवन." मोहन म्हणाला.

"मोहन, तुझें जीवन जर फुकट तर सफळ तरी कोणाचें ? तुझें हें मुकें बलिदान आहे. पैसे पाठवतां नाही आले म्हणून का इतकें मनाला लावून घ्यावें ? मी का परकी आहें ?" तिने त्याचे डोळे पुसून म्हटलें

" त्या दिवशीं मीं तुझे डोळे पुसले; आज तूं माझे पुशीत आहेस," मोहन म्हणाला,

" मोहन,रडूं नकोस,शांत रहा, तू लौकर बरा होशील." ती म्हणाली.

" शांता, तूं एकदम कशी आलीस ? माझी हाक ऐकूं आली ?" त्याने विचारलें.

" देशाची हाक मला ऐकूं आली.मुकंदराव पेटवीत आहेत सारें रान. स्वातंत्र्यदिनीं लाखो शेतकरी, स्त्री-पुरुष, मुलेंबाळें एकत्र जमणार. आर्थिक स्वातंत्र्याची घोषणा करणार. कामगार, विद्यार्थी त्यांत सामील होणार हें वर्तमानपत्रांतून वाचलें व नाचलें, शिवतरच्या भगिनीस बरोबर घेऊन मी झेंडा घेऊन पुढे होईन असें मनांत म्हटलें.आलें धावून. म्हटलें, मोहनला बरोबर घेऊन जावें. "

" शांता शिवतरला आपल्याला शिव्याशाप आहेत. मीं तुझे डोळे पुसले म्हणून गावानें मला रडवलें व एक प्रकारें हाकलून दिलें." मोहन म्हणाला.

" माझ्यामुळे तुला त्रास ? तुला वनवास ?" ती म्हणाली.

" असे नको म्हणूं. तुझ्यासाठी होणारा वनवास मला स्वर्गाहून सुख देणारा आहे. शांता, दुजाभावानें बोलूं नकोस. बाकी दुःखें मी सहन करीन; हें दुःख मात्र सहन करणार नाही. मधे तुझें पत्र येत नसे. माझें हृदय फाटे. झोपडींत येऊन आधी पत्र पडलेलें आहे का पाहावें. नाही पाहून खिन्न व्हावें. तुझा फोटो मजजवळ होता. तेंच अखंड पत्र, अनंत पत्र. तें बघत असें. हृदयाशीं धरीत असें. हें बघ माझ्याजवळ आहे तें मुकें पत्र."

मोहनने तो फोटो दाखवला, शांतेला गहिंवरून आलें. ती रडूं लागली.

" मोहन, मला क्षमा कर." ती म्हणाली.

" शांता, दुजाभाव जेथे मेला तेथे क्षमेची भाषा कोणीं बोलावी? कोणीं ऐकावी ? मला पडूं दे; भेटलीस, चांगलें झालें. मला औषध मिळालें. तूं डॉक्टरीण होणार आहेस. तुझें गोड दर्शन म्हणजे अमृत. दुसरें औषध नको. माझी शांता रोग्याजवळ गोड बोलेल आणि रोग बरा होईल. देवाघरचें मोफत औषध. हृदयांतील दिव्य दिवा." मोहन म्हणाला.

शांतेने भाकर केली. मोहनच्या घरांत तिने भाकर भाजली. मोहनने कढत कढत भाकर खाल्ली.

" किती गोड भाकर ! शांता, तुझ्या हातांत अमृत आहे, जसें तुझ्या दृष्टींत आहे." मोहन म्हणाला.

" आता लवकर बरा हो, मोहन "

" तूं जवळ असलीस -म्हणजे मला आनंद वाटणार का नाही ? परंतु आज तो आनंद दूर राहूं दे. माझी शांता किसानांत चैतन्य निर्मीत आहे, मेलेल्यांना उठवीत आहे, हें ऐकून जो मला आनंद होईल त्याच्यासमोर हा झोपडींतील आनंद तुच्छ आहे. मला उच्च आनंद दे." मोहन म्हणाला.

" मोहन, तूं कठोर आहेस" ती म्हणाली.

" मीं म्हटलेंच होतें की माझे हात राठ आहेत, ताठरदाठर आहेत." तो म्हणाला.

" हातासारखेंच हृदयहि आहे वाटतें ?" तिने विचारलें.

" शेतकऱ्याला आंतबाहेर नाही." तो म्हणाला.

" आलें नाही तों जा म्हणतोस ? " ती म्हणाली.

" तूं माझ्या हृदयांत कायमची आहेस. नवीन काय यायचें ? " तो म्हणाला.

" खरेंच का जाऊं ? तुला आजारी टाकून जाऊं ? " तिने विचारलें.

" खरेंच जा. देशाचा आजार बरा कर. माझा आजार आता गेला. तुझें बोलणें ऐकलें, तुझा हात हातीं घेतला. औषध मिळालें. जा, नाचव झेंडे, गा गाणीं. " तो म्हणाला.

शांता उठून गेली. परंतु पुन्हा जवळ येऊन बसली.

" जातेस ना ? " त्याने प्रश्न केला.

" उठूं की तुला लुटूं ?" ती म्हणाली.

" शांता, गरिबाची लूट थांबवावयाची आहे. विसरूं नकोस. "

" मोहन श्रीमंत आहे. प्रेम श्रीमंत आहे. त्याला आधी लुटुन मला प्रेमश्रीमंत होऊं दे. ". ती म्हणाली.

मोहन कांही बोलला नाही.

" जातें हो मोहन. " शांता म्हणाली.

" शांता शहाणी आहे. गरिबांच्या सेवेला वाहून घेण्याचें रामदासनें व तिने ठरविलें आहे. " तो म्हणाला.

" दत्तविधानाचे दिवशीं. " ती म्हणाली.

" जा आता. उशीर होईल. मुकुंदरावास भेट. " तो म्हणाला.

शांता गेली. मुकुंदरावांना ती भेटली. ती हिंडूं लागली. रामपूरला विद्यार्थ्यांची सभा झाली. शांता तेथे बोलली. आज तिचा पहिलाच प्रसंग सभेंत बोलण्याचा. परंतु भावनेचें तेज कांही और असतें. ती शिवतरलाहि गेली. ती आपल्या वडिलांचे घरीं गेली. वडील बोलले नाहीत. घरीं जेवली. गीता वगैरे भगिनी तिला भेटल्या. शांतेला पाहून त्यांना अधिकच स्फुरण चढलें.

मुकुंदरावांनी एक मोटार लॉरी भाड्याने घेतली. हजारो हस्तपत्रकें त्यांनीं छापून घेतलीं. " पिकलें नसेल तर शेतसारे भरूं नका. किसानांनो, उठा. तहशील कमी झाले पाहिजेत. खंड कमी झाले पाहिजेत. कर्जाचे प्रश्न सुटले पाहिजेत. शेतकऱ्यांची ज़मीन राहिली पाहिजे, परंतु यासाठी

सर्व शेतकऱ्यांनी भय सोडून जागृत झालें पाहिजे." अशा अर्थाचीं तीं पत्रकें होतीं. मोटारींत स्वयंसेवक व इतर मित्र असत. मोटारीला तिरंगी व लाल झेंडे झळकत. गाणीं गात खेडींपाडीं जागृत करीत ती मोटार जाई.

"एकच का आणलेंस ? आणखी कां नाही आणलीस ?" लोक त्याला विचारीत.

"एकच मिळालें." तो म्हणे.

मुकुंदरावांनी किसान-गीतें रचून तीं छोटीं पुस्तकें जिल्हाभर वाटलीं.

किसानांचीं उपनिषदें, किसानांचे वेद, किसानांच्या भगवद्गीता जन्मूं लागल्या. शनिमाहात्म्याचीं पुस्तकें पळूं लागलीं. क्रांतीचीं पुस्तकें घरींदारीं शिरूं लागलीं. नवचैतन्य येऊं लागलें.

धनगावला मुकुंदराव आले. कामगारांची प्रचंड सभा झाली.

"किसान स्वातंत्र्याचे दिवशीं उठावणार, एकत्र येणार, तुम्ही का गिरणींत साचा चालवीत बसणार ? किसान व कामगार म्हणजे राष्ट्राचीं फुप्फुसें. हीं फुप्फुसें बरोबर चाललीं पाहिजेत. एकच हवा दोघांतून खेळत राहिली पाहिजे. स्वातंत्र्यदिनीं तुम्ही हजारोंच्या संख्येने किसानांच्या मेळाव्यांत येऊन मिळा. गंगा व यमुना एकत्र येऊं देत. खऱ्या स्वातंत्र्याच्या सागरास जाऊन मिळूं देत."

अशक्त व आजारी मोहन तेथे आला होता.

तो भावनांनी थरथरत मुकुंदरावांजवळ आला.

"मी एक गाणें म्हणूं का ?" त्याने विचारिलें.

"म्हण." मुकुंदराव म्हणाले.

मोहन उभा राहिला. त्याच्या क्षीण दृष्टींत चमक आली. सारी शक्ति कंठांत आली. त्याने गाणें म्हटलें.

'इन्किलाब झिन्दाबाद' अशी गाणें संपतांच प्रचंड गर्जना झाली. कामगारांनी स्वातंत्र्याचे दिवशीं सुटी न मिळाली तर हरताळ पाडण्याचें जाहीर केलें. त्याच सभेंत विद्यार्थ्यांनींहि तीच घोषणा केली. गावोगाव लहानलहान मुलें प्रचार करूं लागली. एका मराठी शाळेंतील पांचवी-सहावींतील हिंदु-मुसलमान मुलें रोज सायंकाळ झाली म्हणजे आसपासच्या खेड्यांतून जात व स्वातंत्र्याचे दिवशीं घरीं बसूं नका असें सांगत. एके ठिकाणीं प्रांतसाहेबांचा

मुक्काम होता. वानरसेना तेथे गेली. खेड्यापाड्यांतील शेतकरी तेथें जमले होते. " पिकलें नसेल तर तहशील भरूं नका. अधिकाऱ्यांना भिऊं नका. ते आपले नोकर आहेत. आपण त्यांना पगार देतों. त्यांची भीति धरूं नका." असे मंत्र म्हणत वानरसेना तंबूवरून गेली. प्रांतसाहेब आ पसरून उभे राहिले.

असा हा पेटता प्रचार अहोरात्र चालला होता आणि तो स्वातंत्र्याचा दिवस आला. गावोगावांहून किसानांच्या दिड्या निघाल्या. शिंगें बरोबर होतीं, झेंडे फडकत होते. गाणीं दुमदुमत होतीं. अनेक ठिकाणांहून किसान बाया पायीं निघाल्या. शिवतरहून शांता निघाली. शांतेच्या हातांत लाल झेंडा, गीतेच्या हातीं तिरंगी झेंडा. शेकडो स्त्रिया निघाल्या. विद्यार्थ्यांचीं पथकें बँड घेऊन निघालीं. कामगार शिस्तीने गाणीं गात निघाले. करमपूर गावीं जमण्याचें ठरलें होतें. तेथील प्रचंड वटवृक्षाच्या सावलींत सभा झाली.

सभेंत अनेक किसान व कामगार कार्यकर्त्यांचीं भाषणें झालीं. बहुजन-समाजांतील तरुण कार्यकर्ते या चळवळीमुळें पुढे आले. त्यांची संघटना झाली. स्त्रियांचा आत्मा जागा झाला. किसान, कामगार व विद्यार्थी असा त्रिवेणीसंगम झाला.

समारोपांत मुकुंदराव म्हणाले, "आपणांस उद्याच कांही मिळेल असें नाही; परंतु आपण निर्भय झालों. अमोल अशी निर्भयता प्राप्त करून घेतली. हे पाहा वटवृक्ष ! कसे खंबीरपणें उभे आहेत ! कोण त्यांना उपटील ? हे पाहा, हजारो त्यांचे तणावे ! आपली संघटना अशीच बळकट होऊं दे तरच सुखाची छाया मिळेल. सारे एक व्हा. गावोगावचीं क्षुद्र भांडणें विसरा. त्याचा बैल माझ्या बांधावर आला, ने कोंडवाड्यांत, असे प्रकार नका करूं. साम्राज्यशाहीचा व भांडवलशाहीचा मुख्य बैल आपणांस शिंगें मारीत आहे. त्याला वेसण घालूं या. त्या बैलाला शरण आणूं या."

सभा संपल्यावर बरोबर आणलेल्या भाकऱ्या लोकांनी खाल्ल्या. रात्रीं पोवाडे झाले; संवाद, मेळे, नाटचप्रवेश, वगैरे कार्यक्रम झाले. सर्वांना आनंद झाला. स्वातंत्र्य दारीं आलें असें वाटलें. स्वातंत्र्याचा सूर्य दिसत नसला तरी तांबडें फुटत आहे, अंधार पळत आहे, याविषयी कोणासहि शंका राहिली नाही. यथार्थतेने स्वातंत्र्यदिन साजरा झाला.

## महापूर : १४

महाराष्ट्रांत अतिवृष्टि होऊन पिकें नष्ट झालीं. त्या वेळेस बंगालमध्येहि महापूर आले होते. महाराष्ट्रांत पूरच आले, परंतु तिकडे महापूर आले होते. मुकुंदराव व त्यांचे मित्र यांनी इकडे किसानांत त्या निमित्ताने प्रचंड संघटना केली, जागृति केली. शेतांतील पिकें मेलीं. परंतु दुसरें संघटनेचें, निर्भयतेचें कायम टिकणारें पीक मुकुंदराव घेऊं पाहात होते. कांहींसें यश प्राप्त झालें होतें.

परंतु बंगालमध्यें काय ? तेथे तर हाहाःकार होता. अशा वेळेस संघटना कोणाला सुचणार ? आधी जगलों तर संघटना. मढ्यांची संघटना कशी होणार ? जिकडे तिकडे मरण पसरलें होतें. तिकडील त्या अफाट नद्या. कधी आलें नव्हतें इतकें पाणी. बंगालमधील जनतेस महापुरांची सवय झाली आहे. रेल्वे होण्यापूर्वी तिकडे असा त्रास होत नसे. पाणी पूर्वी एकत्र फार तुंबत नसे. सर्वत्र सपाट मैदानावर पसरे. परंतु आता रेल्वे उंच रस्ता करून सर्वत्र नेली आहे. त्यामुळे इकडचें पाणी इकडे तुंबतें. तिकडचें तिकडे तुंबतें; मधून जाणारी रेल्वे खेड्यांचा सर्वनाश बघते. पाणी भराभर वर चढतें व गावेंच्या गावें नष्ट होतात. तेथे वस्ती होती की नाही असें होतें. कशाचा मागमूससुद्धां राहात नाही. पद्मा नदीला सर्वनाशी असें बंगाली नांव आहे. पद्मेला प्रचंड पूर येतात आणि तिच्या दोन्ही तीरांवर ते अनंत पाणी सपाट्याने पसरतें. पद्मेला कधी कधी अशी सपाटून भूक लागते की, गावेच्या गावें ती पोटांत साठवते. हजारों हातांनी गावांना ओढते. माणसें, पशुपक्षी, झाडेंमाडें सारें खात सुटते, सर्वनाशा पद्मा सर्वभक्षा होते.

पद्मा, ती लोकमाता इतकी कशी कठोर होते ? गर्जना करीत येते, पिशाच्चाप्रमाणें केसांच्या झिज्या सोडून ती किंकाळ्या मारीत येते, कडकलक्ष्मीप्रमाणे आसूड ताडताड मारीत येते. सर्वांना झोडपीत सुटते. प्रेमळ माता लाल लाल होते. खवळते. भेसूर दिसते. दयामय स्वरूप नष्ट होऊन नारसिंह रूप प्राप्त होतें.

गावें वहात होतीं, लोक बुडत होते, गाईगुरें वाहून चाललीं होतीं, एवढें

खरें. अस्पृश्यांना दूर ठेवीत होतेत का ? भद्र लोक त्या गरिबांना तुच्छ मानीत होते का ? ते पाहा पद्मेने सारे आपल्या विशाल हृदयापाशीं एकत्र धरलें. आपल्या लाल पदराखाली तिने सर्वांना झाकलें. आपली लाल शाल तिने सर्वांवर घातली. सर्वांना एक रस पाजला. "दूर दूर राहून भांडत बसतां का कारट्यांनो ! या, तुम्हांला ऐक्य शिकवितें !" ती म्हणाली. लांबवर हात पसरून तिने सर्वांना जवळ ओढलें. दाढी व शेंडी एकत्र आली. स्पृश्यास्पृश्य एकत्र आले.श्रीमंत-गरीब एकत्र आले. ते सनातनी लंबोदरशास्त्री अस्पृश्य राखालबरोबर मातेच्या विशाल पाळण्यांत शांतपणें एकत्र झोपत होते. सारे एका पाळण्यांत आंदुळले जात होते. माता रागारागाने गाणीं म्हणत होती. जिवंतपणीं ऐक्य नसेल शिकायचें तर मरणाने शिका.

जिकडे तिकडे पाणीच पाणी. लाल लाल नाचणारें भीषण पाणी. फेस उसळत आहे, लाटा नाचत आहेत. झाडेंमाडें मधूनच माशाप्रमाणें वर डोकीं काढून जात आहेत. जणु नद्यांनी हिरव्या पाचेचे दागिनेच घातले होते. हिऱ्याचीं हिरवीं कुडीं घातलीं होतीं. पाणी इतकें चढलें होतें कीं मोठमोठीं उंच झाडें तींहि बुडून गेलीं होतीं. जीं फारच उंच झाडें, त्यांचा कांही भाग बुडालेला नव्हता. तीं उंच झाडें रक्तांबर नेसून तपश्चर्या करीत होतीं. त्या झाडांच्या अंगावर बघा मजा. तपश्चर्येंत रममाण झालेल्या त्या तरूंना कशाचेंहि भान नाही. सर्वत्र पाणीच पाणी झाल्यामुळे आज सारे साप बाहेर पडले. त्यांचीं बिळें पाण्यानें भरलीं. पाण्यावर साप सळसळ करूं लागले. ते सारे साप झाडांवर चढले. आसपासच्या शेकडो मैल टापूतील तमाम साप—साऱ्या प्रकारचे, साऱ्या रंगाचे—पाण्यांतून सळसळत येत व झाड दिसतांच त्यावर चढत. भयंकर देखावा ! किती रंगांचे हे साप! काळे, लाल, पिवळे, हिरवे, पांढरे, निळे, पट्ट्यांचे, अनेक रंगांचे, हजारो हजार भुजंग झाडांवर लटकले होते, झाडांना वेढून बसले होते. एका सापाच्या अंगावर दुसरा, दुसऱ्याच्या अंगावर तिसरा, हिरव्याच्या अंगावर पिवळा, पिवळ्याच्या अंगावर काळा. जणु नाना रंगांचे प्रचंड दोरखंड वळले जात होते. खाली पसरलेला लाल पाण्याचा समुद्र, त्यांचें का मंथन करावयाचें होतें ? तीं झाडें म्हणजे जणु घुसळण्याची रवी व ते साप म्हणजे दोरी; कोण करणार रे घुसळण ?

ते पाहा गारुडी, साप पकडणारे निर्भय लोक. त्यांनी अशा महापुरांत नौका घातल्या आहेत. पाण्यांत सुंदर सुंदर रंगांचे साप पकडतां येतील म्हणून त्यांना आनंद झाला आहे. मरणाशीं खेळणारे लोक ! सापांना पकडूं पाहणारे हे लोक साधा पोलीस आला तर मात्र पळून जातात. माणसें सापापेक्षां भयंकर असतात का ?

साप पकडणें सोपें नाही. ती पाहा त्यांनी नाव झाडाजवळ नेली. ओढला त्यांनी साप, तोंड धरून ओढला. अरे, सुटलें तोंड, केलान् दंश त्या सापानें. परंतु दुसऱ्यानें पुन्हां धरलें तें तोंड. पहिल्यानें बोट झटकलें काढलीन् कांही मुळी व त्यानें खाल्ली. पेटाऱ्यांत घातला त्यांनी साप. अरे मराल की, पुरे हा खेळ. ते हसून म्हणतात, " मरायचे तर आहेच. सापाशीं खेळ करून मरूं. सापाला माणसाळवण्याच्या उद्योगांत मरूं. "

पूर ओसरले. नद्या शांत झाल्या. सर्वत्र पडापड झालेली. सर्वत्र रडारड चालली. ठायीं ठायीं माणसें पुंजके करून बसलीं होतीं. कोणाचीं मुलें गेलीं, कोणा मुलांचे आईबाप गेले. पत्नीचा पति गेला. भावांच्या बहिणी गेल्या. बहिणीचे भाऊ गेले. प्रत्येकाचें कोणी तरी गेलें होतें, कांही तरी हरवलें होतें. अंगावर वस्त्र नाही, पोटांत घास नाही, राहायला घर ना दार. आणि थंडी पडूं लागली पुन्हा. पाण्यांतून वाचलेलीं थंडींत मरूं लागलीं. ठिकठिकाणीं गाईगुरें मरून पडलीं होतीं. माणसें मरून पडलीं होतीं. प्रेतांची घाण सुटली. मरीआई सुरू झाली. रोग उठूं लागले. ते ओलें मरण, आता कोरडें मरण !

बंगालमध्ये मरणाची मेजवानी चालली होती. मृत्यूचा खेळ रंगांत आला होता. परंतु जगलेल्यांना जगवायला सेवक उभे राहिले. मायमाउली कॉंग्रेस धावली. ते शास्त्रज्ञ प्रफुल्लचंद्र राय. त्यांची ती वृद्ध मूर्ति उभी राहिली. त्यांनी स्वयंसेवक मंडळें स्थापिलीं. त्यांनी अनेकांच्या सह्यांचें पत्रक काढलें. बंगालभर मदत गोळा होऊं लागली. इतर प्रांतांतून येऊं लागली. एकच हृदय सर्व हिंदुस्थानचें आहे, हें अशा वेळेस समजून येतें. मोठा प्रसंग असला म्हणजे मोठी दृष्टि येते. महान् आनंद वा महान् संकट. त्या वेळेस केवळ हिंदुस्थानचें एक हृदय होतें असें नाही; तर सर्व मानव-जातीचें हृदय एकच आहे, असा अनुभव येतो. तुर्कस्थानांत भूकंप झाला तर

साऱ्या जगांतून तारा येतात. विहारमध्ये भूकंप झाला तर सर्व जगाच्या हृदयाला धक्का बसतो.

महापुरांतील टापूंत दहा—दहा मैलांवर आधारगृहें उघडलीं गेलीं. तेथून मदत मिळूं लागली. धान्य, कपडे सारें एके ठिकाणीं प्रथम जमवण्यांत येई. तेथून पाठवलें जाई. एके ठिकाणीं मुख्य साठा, तेथून पुरवठा. स्वयंसेवकांची फार जरूरी होती व त्याप्रमाणें मिळालें.

विश्वभारतींतूनहि स्वयंसेवक गेले. रामदास त्या वेळेस घरीं जाणार होता. मुकुंदरावांच्या किसान मोर्चांत सामील होणार होता. दयारामनें त्याला मुद्दाम बोलावलें होतें. परंतु मायेमुळे त्याचा बेत बदलावा लागला.

" महाराष्ट्रापेक्षां येथे आज महान् विपत्ति आहे. समोर दुःख आहे, जवळच रडारड आहे. येथे धावून जाण्याऐवजी लांब कोठे चाललेत ? चला. बंगालची सेवा करा. प्रेममय सेवेचा बंगाली मातांना आस्वाद द्या. बंगाली मातांचीं मुलें तुमच्या पूर्वजांनी रडवलीं. तुम्ही येऊन हसवा. माझ्याबरोबर चला. मी तुम्हांला सेवा शिकवतें, " असें माया म्हणाली व रामदासला नाही म्हणवेना.

जेथे मुख्य साठा होता तेथेच रामदास व माया यांना इतरांबरोबर काम मिळालें. स्वयंसेविकांना तेथे एक मोठें काम देण्यांत आलें होतें. हजारो कपडे तेथे येऊन पडले होते, परंतु ते कपडे सारे घड होते असें नाही. फाटलेले जरा शिवायला हवे होते. गुंड्या लावायला हव्या होत्या. ठिगळें जोडायला हवीं होतीं. स्वयंसेविका हें काम करूं लागल्या. तेथे शिवण्याचीं दोन-तीन यंत्रें आणण्यांत आलीं होतीं. त्यांवर कांही भगिनी काम करीत होत्या. मृणालिनी, हेमलता, माया हातांनींच भराभर टाके घालीत होत्या. शिवलेले कपडे व इतर कपडे यांचे वर्गीकरण करून अलग अलग गठ्ठे बांधून ठेवण्याचें काम रामदास व इतर स्वयंसेवक करीत होते. स्त्रियांचे कपडे, लहान मुलांचे कपडे, पुरुषांचे कपडे, साधारण मोठ्या मुलांचे कपडे असे प्रकार केले जात होते. काम करतां करतां गप्पागोष्टीहि चालल्या होत्या.

" मृणालिनी, जरा नीट घाल की टाके ! " हेमलता म्हणाली.

" पुरे बाई तुझें ! कपड्यांचे ढीग किती पडले आहेत. असें नीट अगदीं काम करूं म्हटलें तर आटपेल तरी का ? " मृणालिनी म्हणाली.

" अग, त्या गरिबांच्या अंगावर चार दिवस तरी ते राहायला हवेत ना ? " माया बोलली.

" कोणतेंहि काम असो, त्यांत हृदय ओतलें पाहिजे. तें मन:पूर्वक केलें पाहिजे. एक टाका घालण्याचें असो किंवा महान् ग्रंथ लिहिण्याचें असो, पावलोपावलीं परिपूर्णतेचें स्मरण माणसानें ठेवलें पाहिजे." हेमलता म्हणाली.

" मोठें व्याख्यान देतेस की तूं. " मृणालिनी म्हणाली.

" कां ग माये, तूं नुसती चित्रकलाच का शिकतेस ?" हेमलतेनें विचारलें.

" दुसरेंहि थोडथोडें शिकतें. मी मराठी भाषा शिकत आहें. " माया म्हणाली.

" बंगालीसारखी गोड आहे का ग ती ?" मृणालिनीनें विचारलें.

" त्यांच्यांतील एका महान् कवीनें म्हटलें आहे कीं, अमृतालाहि जिंकील अशी माझी भाषा आहे. " माया म्हणाली.

" तेलगू भाषा अधिक नादमधुर असें प्रसिद्ध पंडित मॅक्समुल्लर म्हणत असे. " हेमलता म्हणाली.

" बंगाली भाषेला असा अहंकार जडेल तर ती पडेल. " माया म्हणाली.

" माया, तूं बरोबर आणलीं आहेत कांहीं चित्रें ? " हेमलतेने प्रश्न केला.

" येथे कशाला आणूं? परंतु मीं कॅमेरा आणला आहे." ती म्हणाली.

" फोटोग्राफीसुद्धां शिकली आहेस वाटतें?" मृणालिनीने विचारलें.

" अजून तशी तरबेज नाही झालें; परंतु अभ्यास करतें. " माया म्हणाली.

इतक्यांत रामदास, हलधर शिवावयाचे कपडे तेथे घेऊन आले व शिवलेले नेऊं लागले.

" माया, गप्पा नको मारूं. तोंड चाललें आहे तितक्या वेगाने हात चालेल तर बरें होईल. " रामदास म्हणाला.

" जरा शिवून पाहा तुम्ही. आमच्या बोटांना भोकें पडलीं. " माया म्हणाली.

" आम्हांला का शिवतां येणार नाही ?" त्याने विचारलें.

" शिवाल वेडेंविद्रें. सुई कपडयांत जाण्याऐवजीं बोटांत जायची, आणि मग तुमचीच सेवा करण्याची पाळी यायची. " माया म्हणाली.

" तुला सेवेचें पुण्य मिळेल. " रामदास म्हणाला.

" तुम्ही जा तिकडे–ते शिवलेले कपडे घेऊन जा." मृणालिनी जरा रागानें म्हणाली.

रामदास गेला.

" अग, तो महाराष्ट्रीय तरुग आहे.त्याला असें रागानें का बोलावें ? परप्रांतीयाजवळ तर अधिक आस्थेनें वागलें पाहिजे.आपल्या प्रत्येक शब्दावरून, प्रत्येक कृतीवरून, तो आपल्या प्रांताची परीक्षा करीत असतो." माया म्हणाली.

" महाराष्ट्रांतून कांही आली का मदत ?" मृणालिनी म्हणाली.

"आली असेल. महाराष्ट्र गरीब असला तरी कर्तव्याला चुकत नाही." माया म्हणाली.

इतक्यांत रामदास तिकडून आला.

"माया, ही पाहा महाराष्ट्राची मदत, माझ्या गावची मदत. मीं शांतेला लिहिलें होतें, दयाराम वगैरे मित्रांसहि लिहिलें होतें. हें पाहा त्यांचें उत्तर. लिहितात की, कपडे पाठवले आहेत. आणि आश्रमांतील मित्रांनी फाटके कपडे शिवून पाठवले आहेत." रामदास आनंदाने सांगत होता.

" तुमच्या जिल्हयांत अतिवृष्टीने दुष्काळ पडला आहे ना ?" मायेने विचारलें.

" तरीहि बंगालच्या दुःखाची आठवण त्यांनी ठेवली आहे. गरीब महाराष्ट्राने आपलें निर्मळ हृदय पाठवलें आहे. येतेस का पाहयला ती गाठ ?" त्याने विचारलें.

" आली असेल का पण ?" तिनें विचारलें.

" बरेच दिवसांपूर्वी पाठवली आहे, असें या पत्रांत आहे. तेव्हा गाठ आलीच असेल. " तो म्हणाला.

" मग कोठारांत पडली असेल ती." माया म्हणाली.

" चल ती आपण शोधून काढूं. " रामदास म्हणाला.

कोठारांत गावोगावच्या गाठी येऊन पडल्या होत्या. माया व रामदास रामपूरची गाठ शोधीत होते. शेवटी सापडली एकदाची.

"ही पाहा. महाराष्ट्राची गाठ सापडली हो." ती म्हणाली.

त्या दोघांनी ती गाठ सोडली. हेमलता, मृणालिनी त्याहि तेथें आल्या. गाठ सोडताच वास आला. गोड गोड वास.

"कसला रे वास ?" मृणालिनी म्हणाली.

"महाराष्ट्रीय आत्म्याचा." माया म्हणाली.

त्या कापडयांच्या राशींत एक लहानशी अत्तराची शिशी होती. कपडे काढतां काढतां ती सापडली.

"हें बघा काय सापडलें !" माया म्हणाली.

"काय ग माये ?" हेमलतेनें विचारिलें.

"अत्तराची बाटली." माया म्हणाली.

"येथे का कोणाचें लग्न आहे ? दुष्काळांत, महापुरांत सापडलेले दु:खीकष्टी लोक. त्यांना का अत्तर-गुलावपाणी या वेळेला सुचेल ? त्यांच्या पोटांत नाही घास. या महाराष्ट्रीय लोकांस कांही काळवेळ कळतच नाही. मरणाचा प्रसंग आणि त्यांना गंमत वाटते आहे. जणु नवरदेवालाच कपडे पाठवायचे आहेत." मृणालिनी म्हणाली.

"मृणालिनी, तुला कांही कळत नाही.. या लहानशा बाटलींत महाराष्ट्राने आपला गोड आत्मा पाठवला आहे. आमचे कपडे थोड आहेत, ही लहानशी गासडी आहे, परंतु त्यांत हृदय ओतलेलें आहे, असा या बाटलीचा अर्थ आहे." हेमलता म्हणाली.

"तुमच्या डोळयांना चष्मे आहेत. मला तरी एक द्या. म्हणजे मलाहि असे अर्थ वाचतां येतील." मृणालिनी म्हणाली.

"असे चष्मे बाजारांत मिळत नाहीत. बाजारांत जवळच्या दृष्टीचे, लांबच्या दृष्टीचे चष्मे मिळतात. परंतु अंतरदृष्टीचे चष्मे मिळत नाहीत. क्ष-किरणांनी शरीराच्या आंतील फोटो मिळतात; परंतु अंतरंगाचे फोटो कोण कसे काढणार ?" हेमलता म्हणाली.

"हा एक कपडा निराळाच कां बरें बांधलेला आहे ?" मायेने विचारलें

"थांब मी, सोडतों." रामदास म्हणाला.

त्यांत एक लहान चिठ्ठी मिळाली.

" एका गिरणी कामगाराजवळ दोनच सदरे होते. त्यांतील एक त्यानें दिला आहे. जो अधिक चांगला होता तो त्याने दिला आहे. बंगाल उघडा पडला असतां आपण दोन सदरे ठेवणें पाप आहे, असें तो म्हणाला. त्यानें आपलें नांव सांगितलें नाही. मी एक मजूर आहें, एवढेंच तो म्हणाला. "

मायेने तो सदरा मस्तकीं धरला. हेमलतेच्या डोळयांत पाणी आलें. मृणालिनी गंभीर झाली. हलधर, शशांक, हेमंतकुमार सारे तेथे आले. ती चिठ्ठी वाचून सारे सद्गदित होत.

" बंगाल उघडा पडला आहे म्हणून किती बंगाली लोकांनी एकच सदरा ठेवून बाकीचे पाठवले असतील बरें ! " हेमलता म्हणाली.

महापुराच्या निमित्ताने या भारतवर्षाचीं लेकरें परस्परांच्या जवळ येत होतीं. अहंकार गळत होते. समभाव, प्रेमभाव जन्मत होता. स्वयं-सेवकांचें काम चाललें होतें. परंतु बंगालमधील मोठा सण म्हणजे पूजा-दिवस; ते जवळ आले होते. नवरात्र हा बंगालचा राष्ट्रीय महोत्सव. त्या वेळेस आप्तेष्ट एकमेकांस देणग्या देतात. सर्वत्र समारंभ असतात. घरोघर उत्सव असतात. स्वयंसेवक व सेविका यांना घरीं जाण्याची उत्सुकता होती.

" येतां का माझ्या घरीं ! जाऊन येऊं चार दिवस " माया म्हणाली.

" तुझ्या घरीं कोण आहे माझ्या ओळखीचें ? " रामदास म्हणाला.

" एकाची ओळख असली म्हणजे सर्वांची होते. माझ्या घरीं तुम्हांला सारीं ओळखतात. माझ्या गावांतील लोकहि ओळखतात. तुमच्या किती तरी गोष्टी मी सांगत असतें. " माया म्हणाली.

" माझीं कोणतीं कारस्थानें सांगत असतेस ? " त्याने विचारलें.

" एक बंगाली रत्न महाराष्ट्रांत चोरून नेण्याचें कृष्णकारस्थान. " ती म्हणाली.

" कृष्णकारस्थान म्हणजे रुक्मिणीच्या बाबतींत कृष्णाने केलें तेंच की नाही ? आणि तूं कां रत्न ? स्वतःलाच दिवे ओवाळून घ्यावे ! " रामदास म्हणाला.

" परंतु मीं माझें नांव उच्चारलें का ? मी माती आहें. रत्न कोणतें तें

तुम्हांला माहीत. मला काय त्याचें नांवगाव माहीत ? कानावर मात्र आली आहे कुणकुण म्हणून म्हटलें. " माया म्हणाली.

" माया, तुमच्या महोत्सवाचे दिवस ही गोष्ट खरी. परंतु या दुःखी-कष्टी लोकांना आज कोणता आनंद ? आपण सारींच चार दिवस जाऊं तर येथे कोण काम करील ? उघडीं अनाथ माणसें सारखीं येत असतात. एखादी माता उघडें बाळ घेऊन येईल व म्हणेल, द्या याला आंगडें. परंतु येथे कोणीच नसेल तर ?" रामदास म्हणाला.

" मी एकटी घरीं जात नाहीं. तुमचेंहि म्हणणें बरोबर आहे. प्रेमाने कधी कर्तव्याची जाणीव होते, तर प्रेमानेच कधी विस्मृति पटते." ती म्हणाली.

" प्रेम वाढवलें म्हणजे असें होत नाही. मोठ्या प्रेमामुळे मोठें कर्तव्य कोणतें तें कळतें. " रामदासने सांगितलें.

तेथील कचेरीचे मुख्य व्यवस्थापक हेरंबचरण घरीं गेले नाहीत. माया घरीं गेली नाही. रामदासहि तेथे होता. आणखीहि कांही स्वयंसेवक राहिले.

" माझ्याजवळ शिवायला शिका. " माया म्हणाली.

" मला येतें शिवायला. शिवून दाखवूं ?" रामदासने विचारलें.

" दाखवा बरें. " ती म्हणाली.

" तेथे बाहेर चल. " तो म्हणाला.

" चला. " ती म्हणाली. दोघें बाहेर आलीं.

" ही घ्या सुई, शिवा. " ती हसून म्हणाली.

" तूं पळ. " तो म्हणाला.

" कां ? जवळ असलें म्हणजे लाज वाटेल वाटतें ? टाका नीट न पडतां बोटांत गेला तर मी हसणार नाही; बोटांतील सुई काढायला येईन. " ती म्हणाली.

" त्या दिवशीं स्वतःच्या पायांत बोचलेला काटा काढवेना, मला हाक मारलीस. आणि आता दुसऱ्याच्या बोटांतील सुई काढणार होय. ? बरें, तें जाऊं दे. तूं पळ बघूं. " तो म्हणाला.

" खरंच का जाऊं ?" ती म्हणाली.

माया खरेच पळत सुटली. रामदास एकदम हळूच पाठोपाठ पळत

गेला. त्याने एकदम मायेच्या पाठीला हात लावला. तिने घाबरून मागे पाहिलें तों रामदास.

"काय, गेली ना बोटांत सुई?" तिने विचारलें.

"पण शिवून दाखवलें ना? कांही असो." तो म्हणाला.

"इतक्यांत झालें शिवून?" तिने हसून प्रश्न केला.

"हो." तो म्हणाला.

"दाखवा बरें." ती म्हणाली.

त्याने पुन्हा पाठीला हात लावला.

"दाखवा ना." ती म्हणाली.

त्याने तिच्या हाताला स्पर्श केला.

"दाखवायला लाजतां ना?" तिने विचारलें.

"मी सारखा शिवतों आहें. तुला दिसत नाही, समजत नाही, मी काय करूं?" असें म्हणून तो हसला.

"हसून फजिती लपत नसते." ती म्हणाली.

"अग वेडे, महाराष्ट्रांत खेळामध्ये एखादा पळत असला व आपण त्याला धरलें म्हणजे तो त्याला शिवला असें म्हणतात. शिवाशिवीचा खेळ असतो हो तो. तो तुला शिकवला व एक शब्दहि शिकविला." रामदास म्हणाला,

"शिकविण्याची ही प्रत्यक्ष पद्धत वाटते?" तिने हसून विचारलें.

एके दिवशीं एक माता आपलीं दोन मुलें घेऊन तेथे आली. तीं मुलें उघडीं होतीं. ती कपडे मागत होती.

"येथून कपडे देत नाहीत. येथे नुसता साठा असतो. वाटण्याच्या त्या केंद्रांतून घेऊन जा हं." माया म्हणाली.

"परंतु कोठे जाऊं या लहानग्यांना घेऊन? तुम्हीच द्या ना."ती म्हणाली

"मीं विचारून येतें हं." माया म्हणाली.

माया हेरंबकुमारांना विचारायला गेली. रामदास व ते हिशेब करीत होते.

"पूजादिवसांमुळें इतर केंद्रेंहि बंद आहेत. येथेच द्या तिला कपडे." हेरंबकुमार म्हणाले.

सुशिक्षित व शहरांतील लोकांच्या मुलांचे ते कपडे. त्या किसानमातेला आपल्या लहानग्याला ते नीट घालतां येईनात. रामदास इतक्यांत तेथे आला.

"थांबा, मी घालून देतों हं त्यांचे अंगांत." तो म्हणाला.

"बायकांचें काम तुम्ही कशाला करतां ?" माया म्हणाली.

"बायका गंमत पाहात उभ्या राहिल्या तर पुरुषांनी नको का करायला?" तो म्हणाला.

"रोज थोडेच तुम्ही जाणार आहांत त्या मुलांच्या अंगांत घालायला ? तिच्या आईलाच शिकूं दे." माया म्हणाली.

"परंतु शिकवायला तरी हवें ना ? का हसत उभें राहायचें ?" तो म्हणाला.

"रागावलेत वाटतें ? पुरुषांचा राग नाकावर असतो.मी जातेंच मुळी." असें म्हणून ती गेली. लगेच परत आली.

"आमचा राग नाकावर, आणि तुमचा नाही का ?" त्याने विचारलें.

"आता त्या दुसऱ्याहि मुलाच्या अंगांत घाला." ती म्हणाली.

"चिडवू नकोस मला. मला कांही लाज वाटत नाही. हा बघ घालतों." असें म्हणून रामदास त्या दुसऱ्या मुलाच्या अंगांत कपडा घालूं लागला.

"स्टेडी प्लीज !" माया म्हणाली.

"धसमुसळेपणा थोडाच करतों आहें ?"तो म्हणाला. त्याने वर पाहिलें.

"माये, असा चोरून फोटो घेणें बरें का ?" तो म्हणाला.

"पुढेमागे कधीकाळी जर कोणीं तुम्हांला मुलांना आंगडें-टोपडें घालायला सांगितलें व बायकांचें काम म्हणून तुम्हीं तुच्छतेने नाकारलें तर हा आपला, फोटो घेतलेला असावा." माया म्हणाली.

"पुढे काय होणार आहे कोणास माहीत ?" तो म्हणाला.

"संन्यासी होणार की काय ?" तिने विचारलें.

"येतें असें मनांत." तो म्हणाला.

"तुम्ही संसारांतहि संन्यासी व्हाल.गरीब मातांच्या मुलांना जो प्रेमाने नटवतो, तो संसारांत राहूनहि मुक्त होईल." माया भक्तिप्रेमाने म्हणाली.

"माया तरून जायला कठिण असते. माया जिंकणें कठिण." तो म्हणाला.

" जनीं जनार्दन पाहणारा तेव्हाच तरून जातो. " ती म्हणाली.

" ज्ञानेश्वरींत असाच एक चरण आहे. " तो म्हणाला.

" सांगा ना मला माया तरून जाण्याचा चरण. " ती म्हणाली.

**तेथ एकचि लीला तरले । जे सर्वभावे मज भजले ।**
**तया ऐलीचिकडे सरलें । मायाजळ ॥**

ही ओवी त्याने म्हणून दाखविली. मायेला पाठ होईपर्यंत त्याने म्हटली.

" कितीदा म्हणूं ग ? एकपाठी कां नाहीस ?" तो म्हणाला.

" एकपाठीच आहें. दुसरी दाखवा बरें पाठ ?" ती हसून म्हणाली.

कांही दिवसांनी परत माया व रामदास पुढे शांतिनिकेतनांत आलीं. महापूर आला व गेला. परंतु मायेच्या व रामदासाच्या हृदयांत आलेला प्रेममहापूर गेला नाही. तो आणखी वाढतच गेला. महापुराच्या निमित्ताने देवाने त्यांना अधिकच जवळ आणलें. देवाचे हेतु अतर्क्य आहेत.

✦ ✦ ✦

## घरची तार : १५

त्या दिवशीं मकर-संक्रांत होती. रामदास सर्वांना हलवा देत होता. " तिळ घ्या, गूळ घ्या, गोड बोला. " असें सर्वांना सांगत होता. माया अलीकडे त्याच्याजवळ बोलत नसे. एखादे वेळेस एकमेकांकडे पाहून दोघें मंद हास्य करीत. परंतु फुलणारें हास्य लगेच मावळे. बाहेर येऊं पाहणारें हसूं उभयतां आंत लपवीत. हृदयांतील हास्य हृदयांत गुदमरे. त्या हास्याला ओठांवर येऊन हास्य करण्याची परवानगी नव्हती.

रामदासनें सर्वांना तिळगूळ दिला. एकटी माया राहिली. तिला त्यानें तिळगूळ दिला नाही. त्याच्या मनांत मायेकडे जाण्याचें पुनः पुन्हा येई, परंतु तो शेवटीं गेला नाही. आपल्या खोलींत तो दिलरुबा वाजवीत बसला, परंतु तार तुटली. संगीत बंद झालें. तार बांधण्यांत रामदास दंग झाला.

" तुटली ना तार ? बरें झालें. " माया येऊन म्हणाली.

" तुला दुसऱ्याच्या दुःखांत आनंदच वाटतो." रामदास म्हणाला.

" तुला दुसऱ्याचा अपमान करण्यांत आनंद वाटतो." ती म्हणाली.

" कोणाचा केला अपमान ?" त्याने विचारलें.

" मायेचा." ती म्हणाली.

" मायेचा मान करणारा फसतो. मायेला हाकलून दिलें पाहिजे. मायेंत गुरफटतां कामा नये." तो म्हणाला.

" हें तुमचें चित्र, हा तुमचा मीं काढलेला फोटो, हें सारें घ्या. तुमचें मजजवळ कांही नको." ती म्हणाली.

" तूंच त्याला काडी लाव." तो म्हणाला.

" काडीसुद्धां तोच लावतो ज्याचा कांही संबंध असतो. प्रेम करील तोच अग्निसंहार करील." ती म्हणाली.

" माया, मी काय करूं ?" त्यानें विचारलें.

" मला विसरा." ती म्हणाली.

" अशक्य आहे." त्याने उत्तर दिलें.

" आजच विसरलेत. साऱ्या जगाला गोड बोला सांगितलेंत, परंतु माझ्याकडे आलेत नाही. साऱ्या जगाला तिळगूळ दिलात; मला मात्र अपमानाचें–उपेक्षेचें विष." ती म्हणाली.

" माया, तूं का निराळी आहेस ? तूं व मी अक्षरशः एकरूप आहोंत. माये हा घे हलवा, गोड बोल हं, असें मीं स्वतःलाच म्हटलें व स्वतः खाल्ला. तुला नाही पोचला तो !" त्याने विचारलें.

" ही कांही तरी बतावणी आहे. तुम्ही माझ्या दाराजवळ आले होतेत परंतु परत गेलेत. तुम्ही आत याल असें वाटून मीं खोटेंच झोपेचें सोंगहि घेतलें. परंतु पावलें माघारीं गेलीं. तुमच्या अहंकाराने तुम्हांला येऊं दिलें नाहीं."

" हा घे तिळगूळ. झालें ना गोड ?" त्याने विचारलें.

" माझ्या हृदयाची तार तोडलीत म्हणून तुमच्या दिलरुब्याची तार तुटली." ती म्हणाली.

" माझ्या जीवनांतील तूं संगीत." तो म्हणाला.

" माझ्या जीवनांतील तुम्ही कलामूर्ति." ती म्हणाली.

" संमतीशिवाय संगीत नाही. फुंकणींतूत सूर निघत नाही. परंतु संयमी बासरींतून निघतात." रामदास म्हणाला.

" प्रमाणाशिवाय कला नाही." माया म्हणाली.

" माया, बांध ग ही तार हलक्या हाताने. परंतु घट्ट बांधायला हवी." तो म्हणाला.

" आमचे हात हलके असतात, सुकुमार असतात, परंतु आम्ही पुरुषांना घट्ट बांधून ठेवतों." माया म्हणाली.

" माये, तूं गरिबींत आनंद मानशील !" एकदम त्याने नवीन प्रश्न केला.

" तुमच्या हृदयासारखें श्रीमंत हृदय जर मिळेल, तर कुबेराची संपत्तिहि मी तुच्छ मानीन." माया म्हणाली.

" कधी कधी माझ्या मनांत येतें की, बाबांच्या पश्चात् जी इस्टेट मला मिळणार ती सारी देऊन टाकावी. गरिबांचें गरिबाला मिळूं दे. आमचा मोठा वाडा आहे. त्याचें सुंदर आरोग्यधाम बनवूं. तेथे रोग्यांसाठी खाटा ठेवूं. प्रसूतिसदन ठेवूं. डॉक्टर व दाया राहतील. बाबांची सारी धनदौलत या कामीं लावून द्यावी. स्वतः एखाद्या झोपडींत राहावें व जीवनांतील त्यागाचें संगीत अनुभवावें." रामदास पुढील बेत सांगत होता.

" मायेला जिंकणारा रामदास बंगल्यांत नसेच राहत. तो घळींत राहात असे." माया म्हणाली.

" तुला काय वाटत असतें ?" त्याने विचारलें.

" मी साध्या कागदावर सुंदर रंग भरायला शिकलें आहें. साधा एक कोळशाचा तुकडा व त्याने नयनमनोहर मूर्ति रेखाटण्यास मी शिकलें आहें." माया म्हणाली.

" माये, मला जावयाचें आहे. फणीबाबूंनी आज रसगुल्ले खायला त्यांच्या खोलींत बोलावलें आहे." रामदास म्हणाला.

" खा हं एकटे एकटे !" ती हसत म्हणाली.

" तुझी आठवण करून खाईन." तो म्हणाला.

" माझें पोट भरेल." ती म्हणाली.

रामदास गेला. माया गेली. त्यांचा अबोला संपला. तिळगूळ घेऊन गोड झालें सारें. रुसव्याफुगव्याशिवाय गंमत नसते.

दोन-चार दिवस झाले; आणि अकस्मात् रामदासला तार आली, त्याचे नवीन वडील गोविंदराव आजारी होते. खोटी तर तार नसेल ना? लग्नाचा तर नसेल ना घाट घातलेला? अशी शंका त्याच्या मनांत आली, परंतु ती क्षणभरच राहिली. घरीं ताबडतोब बोलाविलेलें होतें.

तो जरा भांबावला. घाबरला. त्याच्या तारेची वार्ता सर्वत्र गेली. मित्र येऊन चौकशी करून गेले. मायाहि आली.

"तुम्हीं गेलेंच पाहिजे." ती म्हणाली.

"हो. परंतु जरा घाबरल्यासारखें वाटतें." तो म्हणाला.

"कां बरें?" तिने विचारलें.

"कांही कमीजास्त झालें तर? मग मला इकडे परत येतां येईल की नाही देव जाणे, घरचें सर्व पाहावें लागेल. आतापर्यंत मी मोकळा होतों. परंतु मग सारा संसार शिरावर पडेल. सारी जबाबदारी येईल. देणींघेणीं, खतेंपत्रें, सतराशे प्रकार. मी या गोष्टींत केवळ अनभ्यस्त. काय होईल तें खरें." तो म्हणाला.

"चार दिवसांपूर्वीच तुम्ही म्हणालात की पुढेमागे जेव्हा ही इस्टेट माझ्या ताब्यांत येईल तेव्हा ती दरिद्री जनतेस देऊन टाकीन. देवाने जणु तुमचा निश्चय ऐकला." ती म्हणाली.

"मी इस्टेटीचा भुकेला नाही. बाबा बरे होऊं देत. मी त्यांची सेवा करीन. ती इस्टेट वाटून टाकण्याचें श्रेय मला मिळावें म्हणून का बाबांच्या मरणाची इच्छा करूं? छे: छे:! असें कधीहि माझ्या मनांत आलें नाही." रामदास म्हणाला.

"माझ्या म्हणण्याचा तसा हेतु नव्हता. परंतु परवाचे शब्द सहज आठवले." ती म्हणाली.

रामदास बांधाबांध करूं लागला. मायेने त्याची वळकटी बांधली.

रामदासच्या मित्रांनी त्याला अल्पोपाहाराला बोलावलें होतें. गिरीश म्हणाला, "रामदास, ही कांही आनंदाची वेळ नाही. तूं चिंतेंत आहेस, परंतु न जाणो काय होईल तें. कांही वेडेंवाकडें झालें व तूं पुन्हा येऊं न शकलास तर? म्हणून हा प्रसंग योजला आहे."

अल्पोपाहार झाला. रामदासने सर्वांचा निरोप घेतला. तो मायेच्या खोलींत गेला. माया रडत होती.

"रामदास, कधी भेटशील तूं परत ?" तिने विचारलें.

"देवाची इच्छा असेल तेव्हा." तो म्हणाला.

"मी तुला काय देऊं ?" तिने विचारलें.

"माये !" त्याने हाक मारली.

"काय ?" तिने विचारलें.

"मी बंगालचा आत्मा घेऊन जात आहें. कुडी येईल मागून." तो म्हणाला.

"आत्म्याला जरूरी पडली तर ? आत्मा अनंतांत बुडाला तर कुडीची काय पर्वा ?" ती म्हणाली.

✦ ✦ ✦

## पित्याची इच्छा पूर्ण केली : : १६

रामदास वडिलांचे जवळ बसला होता. गोविंदराव अत्यंत क्षीण झाले होते. त्यांच्याने फार बोलवतहि नसे. परंतु जेव्हा कांही बोलत, तेव्हा तें सारें देण्याघेण्याविषयींच असे. मरणाकडे जातांनाहि पैशाचेंच स्मरण होत होतें. जन्मभर ज्या देवतेची उपासना त्यांनी केली तिचेंच स्मरण ते करीत होते. रात्रंदिवस कमरेला किल्ल्या असावयाच्या.

"बाबा, त्या किल्ल्या बोचत असतील कमरेला. दूर जरा ठेवा ना त्या आता." रामदास म्हणाला.

"मी कांही मरणार नाही इतक्यांत. डॉक्टर काय म्हणाले ? अद्याप तीन-चार महिने काढतील असें कांही तरी म्हणाले नाही का ? ती प्रॉमिसरी मुदतीबाहेर जाईल हो. त्या मुनीमजीचें नसतें लक्ष. जा त्यांना आठवण दे. येथे माझ्याजवळ कशाला बसला आहेस ? मी जिवंत आहें तोपर्यंत सारें नीट समजावून घे. नीट कारभार करूं लाग, म्हणजे मी सुखाने मरेन." गोविंदराव म्हणाले.

ग्रा. वा. २११६ ३/८१

"बाबा, आता राम राम म्हणा ना, जरा देवाला आठवा ना. संसाराचा विसर पडू दे." रामदासने प्रेमाने सांगितलें.

"रामदास, तुझें लक्षण कांही ठीक नाही." गोविंदराव म्हणाले.

"काय करूं बाबा ?" त्याने विचारलें.

"तूं त्या मुकुंदरावांची संगत सोडून दे. ते शेतकऱ्यांना चिथावीत आहेत. शेतकरी माजोरे होत आहेत." ते म्हणाले.

"मुकुंदराव शेतकऱ्यांस खरा धर्म शिकवीत आहेत. बांडगुळांना पोसणें अधर्म आहे." रामदास म्हणाला.

"आम्ही का बांडगुळें ? पित्याने विचारलें.

"नाही तर काय ? वृक्षाच्या रसावर तीं बांडगुळें पोसतात व वृक्षाला नष्ट करतात. परंतु वृक्ष मेला तर आपणहि मरूं हें त्यांच्या लक्षांत येत नाही. गरिबांच्या श्रमांवर आपण जगतों. आपण परपुष्ट आहोंत." रामदास म्हणाला.

इतक्यांत बाहेर ओटीवर बाचाबाची चाललेली ऐकूं आली. रामदास उठून बाहेर आला.

"आंत वडील आजारी. काय आरडाओरड ? तुम्हांला जरा हळू नाही का बोलतां येत !" रामदासाने मुनीमजींना विचारलें.

"अहो, हळू बोलून का हे लोक ऐकणार आहेत ? येथे दिलरुबा नाही वाजवावयाचा ! येथे ढोल वाजवायचा. यांच्याजवळ हळू बोलेन, गोड बोलेन, तर हे डोक्यावर बसतील. हळू बोलण्याला ते दुबळेपणा मानतात. जो सावकार मोठ्याने बोलेल त्याचा वसूल येतो. हळू बोलणारा रडत बसतो." मुनीमजी म्हणाले.

"पण काय आहे यांचें म्हणणें ?" रामदासने विचारलें.

"म्हणतो की, यंदा कोठून देऊं व्याजाचे पैसे ? यंदा मुळीच कांही पिकलें नाही. घरांत भरून ठेवतात, सावकाराला नाही म्हणतात. तें कांही नाही. यांच्यावर फिर्याद केलीच पाहिजे. मालक तसें म्हणत होते." मुनीमजींनी सांगितलें.

"यंदा अतिवृष्टिमुळे पिकें गेलीं. लाखो शेतकरी एकत्र जमून त्यांनी

सांगितलें तें का खोटें? तुम्ही स्वतः डोळ्यांनी नसेल का पाहिलें? काय तुमचें नांव?" त्याने त्या शेतकऱ्याला विचारलें.

"सोनखेडीचाच मी. माझें नांव गणबा. यंदा कठिण आहे बघा राजांनो दशा. घरीं पोरांच्या जीवाला गोड नाही वाटत. बायको घोंगडीवर पडलेली. शेतकऱ्यांचें कोणी नाही जगांत." तो म्हणाला.

"कशाने आजारी आहेत?" त्याने विचारलें.

"उपासमारीने. शेतकऱ्याला दुसरा आजार नाही. ते ग्रामोद्धारवाले येतात गप्पा मारायला. सरकारी अधिकारी येतात. परंतु शेतकऱ्याच्या मुख्य रोगावर कोणी बोलत नाही. शेतकऱ्याला पोटभर खायला मिळेल तर इतर गोष्टी करण्याकडे त्याचें लक्ष लागेल." गणबा म्हणाला.

इतक्यांत फळांच्या करंडचा घेऊन स्टेशनवरून माणूस आला.

"द्राक्षं नाही का रे आलीं?" मुनीमजींनी विचारलें.

"मोसंबीं व डाळिंबेंच आलीं." तो माणूस म्हणाला.

"घरांत ठेव नेऊन." मुनीम म्हणाले.

"थांब, येथेच फोडूं. गणबाच्या मुलांना देऊं दोन डाळिंबें, देऊं चार मोसंबीं" रामदास म्हणाला.

"एक दिवस द्याल, रोज का देतां येतील?" मुनीमजींनी प्रश्न केला.

"देतां येतील तोंपर्यंत देऊं. क्रांति झाली म्हणजे सर्वांना रोज मिळेल." रामदास शांतपणें म्हणाला.

करंडींतून फळें काढून रामदासने दिलीं. गणबाने पदरांत बांधून घेतलीं.

"गणबा, तूं जा. कांही काळजी करूं नको. कोठे आहे याचा कागद?" त्याने मुनीमजींस विचारलें.

"हा पाहा. मुदतहि भरत आली आहे. नवीन प्रॉमिसरी करून घेतली पाहिजे." मुनीमजी म्हणाले.

"गणबा, आजपर्यंत किती दिलेंस व्याज?" रामदासने विचारलं.

"माझ्या हिशेबाने दोनशेंच्यावर दिलें गेलें. हे कापूस आमचा आणतात व भाव कमी लावतात. शेंगा आणतात, भाव कमी लावतात. असा चालतो हिशेब. पैसे घेतले त्याच्यापेक्षा अधिक यांना मिळाले. परंतु मुद्दल कायम तें कायम." गणबा म्हणाला.

रामदासने त्या प्रॉमिसरीचे टरकन् तुकडे तुकडे केले व बाहेर फेकले.

" हें काय देवा, आम्ही तुमचे पैसे देऊं. नरकांत थोडेंच जायचें आहे ?" गणबा रडत म्हणाला.

" तूं आणखी पैसे दिलेस तर मात्र नरकांत जाशील. जा गणबा, तूं मुक्त आहेस. तुझ्या आजारी बायकोला सांग, मुलांना सांग की, आता आपण पिकवूं तें आपणांस खाण्याचा अधिकार आहे. हें ऐकून त्यांचा आजार जाईल. जा." रामदास म्हणाला.

" तुम्ही का आजच मालक झालेत ?" मुनीमजींनी विचारलें.

" बाबा आजारी आहेत. मग मला नको का पाहृचला व्यवहार ? त्यांना नका ऐकवूं या कटकटी. त्यांना राम राम म्हणूं दे." रामदास म्हणाला.

" पित्याने राम म्हणावें अशी इच्छा करणारा स्वर्गांतच जाईल वाटतें ?" मुनीमजी म्हणाले.

" पिता राम म्हणणार आहे हें निश्चित. तें माझ्या इच्छेवर नाही. तुमच्या नाही. आता मरतांना गरिबांचे त्यांना आशीर्वाद मिळूं देत. म्हणजे ते आशीर्वाद त्यांना देवाजवळ घेऊन जातील. मरणोन्मुख वडिलांना कष्टाळू बंधु-भगिनींचे आशीर्वाद मिळवून देणारा तोच खरा सत्पुत्र." रामदास म्हणाला.

" हाच का व्यवहार ? असाच का पुढे कारभार चालणार ?" मुनीमजींनी विचारलें.

" असाच सचोटीचा कारभार." रामदास म्हणाला.

" मग कारभार लौकरच संपेल. अशा कारभाराला नको मुनीमजी, नको कोर्टकचेरी." मुनीमजी म्हणाले.

" मालक घाबरले आहेत. चला लौकर." गड्याने येऊन सांगितलें.

मुनीमजी निघून गेले. रामदास घरांत आला तो पुन्हा पित्याच्या उशाशीं बसला. त्याने हळूहळू वारा घातला. छातीवर हात फिरविला. पिता जरा शांत झाला. डोळे मिटलेले होते. ओठ जरा हालत. गोविंदरावांची पत्नीहि जवळ होती. ती सचिंत दिसत होती.

" आई, तूं काळजी नको करूं. मी आहें." रामदास हळुवारपणें म्हणाला.

"तूं असून नसल्यासारखा. सख्खा मुलगा थोडाच आहेस तूं? पोटचा गोळाहि हल्ली विचारीत नाही. परका किती विचारणार?" ती म्हणाली.

"मी परक्यासारखा वागतों का? बाबांची तार मिळतांच नाही का आलों?" त्याने विचारलें.

"इस्टेटीसाठी आलास धावून." ती म्हणाली.

"आई, मी शपथ घेऊन सांगतों, या इस्टेटीची मला इच्छा नाही." तो म्हणाला.

"पाहीन पुढे." ती म्हणाली.

पित्याने डोळे उघडले. त्याला कांही तरी बोलायचें होतें.

"' रामदास, हिला महिन्याला २५ रुपये देत जा. हो म्हण." गोविंदराव म्हणाले.

"तुमची इच्छा प्रमाण." तो म्हणाला.

"शब्दाचा काय भरंवसा?" ती म्हणाली.

"मग काय करूं आई?" रामदासने विचारलें.

"लेखी असलें तर थोडी शाश्वती." ती म्हणाली.

"आसन्नमरण पित्याच्याजवळ दिलेला शब्द का मी पाळणार नाही?" त्याने दुःखाने विचारलें.

"सारी इस्टेट तूं घालवणार; मला कोठून देणार २५ रुपये? मघा तो गणबा आला होता तर त्याची प्रॉमिसरी फाडून टाकलीस." आई म्हणाली.

"काय? प्रॉमिसरी फाडलीस?" एकदम उठून गोविंदरावांनी विचारलें.

"बाबा, शांत पडून रहा." रामदासने त्यांना निजविलें.

"कसा शांत पडूं? तें प्रॉमिसरीचें पुडकें येथे आण. माझ्या उशाशीं ठेव. तूं तें फाडून टाकशील. वाटोळें करणार साऱ्या इस्टेटीचें." बाप म्हणाला.

गोविंदरावांचा क्षण जवळ आला. रामदास तेथे गीता म्हणत होता.

गोविंदरावांनी प्राण सोडला. प्रेतयात्रेस किती तरी मंडळी.

"नीट रचा रे लाकडें. चिता कोसळली तर स्वर्ग मिळणार नाही" लाकडें रचणारे म्हणत होते.

सरण रचून झालें. डोक्याखाली मजबूत लाकूड घातलें गेलें. रामदास तेथे कांही करीत होता.

" आता हालवूं नका, कोसळेल." सर्वांनी सल्ला दिला.

" कोसळणार नाही, मजबूत करतों." रामदास म्हणाला. प्रॉमिसरी नोटा, खतपत्रें यांचें तें पुडकें होतें. तें त्यानें येतांना आणलें होतें. खादीच्या कपडयांत गुंडाळलेलें होतें. रामदासने तें पित्याच्या उशाशीं ठेवलें.

" खादीची उशी वाटते ?" कोणीं विचारलें.

" काय रे आहे त्यांत ?" आणखी एकाने प्रश्न केला.

" बापाचें पाप. " एकाने उत्तर दिलें.

रामदास बोलला नाही. अग्नि देण्यांत आला. चिता भडकली. चंदन, कापूर, तुळशीचीं काष्ठें पेटलीं. चंदनासारखा देह झिजला नसला तरी शेवटीं तरी चंदन आलें. कापुरासारखें निर्मळ यश जोडलें नसलें तरी शेवटीं कापूर मिळाला. संसारावर जिवंतपणीं तुळशीपत्र नसेल ठेवतां आलें, मरतांना तुळशीकाष्ठ मिळालें.

" खरेच, ते कागद होते. ते पाहा जळत आहेत." पाहणारे म्हणाले.

" रामदास, काय हें केलेंस ?" लोकांनी विचारलें.

" पित्याची इच्छा पूर्ण केली. प्रॉमिसरींचीं पुडकीं त्यांना सारखीं दिसत. तीं त्यांच्याबरोबर पाठवलीं." रामदास शांतपणें म्हणाला.

✦ ✦ ✦

## दीनबंधु : : १७

रामदासची दत्तकसंबंधाची आई स्वतंत्र राहूं लागली. तिला २५ रुपये दरमहा तो देणार होता. रामदासने ज्या प्रॉमिसरी, जीं खतपत्रें जाळलीं, त्यांची त्याच्याजवळ नीट नोंद होती. त्याने सर्व कागदपत्रें नीट तपासून ठेवलीं होतीं. गरीब शेतकऱ्यांना त्यानें मुक्त केलें होतें. श्रीमंतांकडचीं कर्जें–तीं नव्हतीं जाळलीं गेलीं. त्यांच्याजवळ तडजोडी करून वा एकंदर देवघेवप्रकरणांतून तो मुक्त होणार होता. सोनखेडी, शिवतर, वगैरे अनेक गावचे शेतकरी रामदासनें मुक्त केले. ते त्याला देव मानूं लागले. किसानांनी त्याला दीनबंधु हें नांव दिलें.

रामदास एके दिवशीं सोनखेडीला गेला होता. दयारामाच्या आश्रमांत तो उतरला होता. पुढील आयुष्यासंबंधी बोलणें चाललें होतें. रामदासच्या मनांत सोनखेडीला कोठे तरी एखादें लहानसें घर बांधून राहावें असें येत होतें.

"दयाराम, येथे येऊन मी राहणार आहें. तुमच्या आश्रमाच्या पावित्र्याच्या शेजारीं येऊन राहणार आहें. येथे लहानशी झोपडी बांधावी म्हणतों." रामदास म्हणाला.

"आश्रमांतच का नाही राहात?" दयारामने विचारलें.

"मी आज एकटाच आहें. उद्या एकटाच राहीन असें नाही. समजलास ना? मी लग्न करणार आहें. संसारांत पडणार आहें." रामदास म्हणाला

"राहा येथे. आम्हांला आधार होईल. दीनबंधु जवळ असल्यावर आणखी काय पाहिजे?" दयाराम म्हणाला.

"मीं विश्वभारतींत ग्रामीणविकासवर्ग जोडला होता. खेड्यांच्या पुनर्रचनेचा अभ्यास केला. तो अभ्यास मला इतरत्र काय कामाचा? येथे खेड्यांतच राहून जें करतां येईल तें करावें." रामदास म्हणाला.

"आणि आता तूं म्हणशील तें लोक करतील. खरोखरच ते म्हणतात की, रामदास म्हणजे देव आहे. तूं त्यांना कातायला सांगितलेंस तर ते काततील. घाण करूं नका सांगितलेंस, तसें करतील. त्यांची संघटनाहि होईल. मुकुंदराव किसानांची संघटना करीत आहेत. तूं त्यांना आता जाऊन मीळ. झपाट्याने संघटना वाढेल. .शेतकऱ्यांची माउली जमीन त्याला परत मिळाली पाहिजे. शेतकऱ्यांची प्रचंड संघटना त्यासाठी हवी. हें महान् कार्य आहे. रामदास, तूं आता त्या कामांत पड. त्या कामांत पडणें कठिण आहे. हातावर शिर घेणें आहे. सरकारचा रोष होईल, परंतु तें सारें केलें पाहिजे. तूं नाही करणार तर कोण करणार?" दयाराम सांगत होता.

"मी करीन तें काम. एक नम्र सेवक म्हणून या कामांत पडेन. हें काम एकाचें नाही. जिल्ह्याजिल्ह्यांत हजारो तरुण जेव्हा या व्रताने काम करूं लागतील. तेव्हाच रंग चढेल. परंतु तोंपर्यंत ठिकठिकाणीं आरंभ झाला

पाहिजे. वाट पाहात थोडेंच बसावयाचें ? क्रांतीला अनुकूल काल येत आहे. या वेळेसच उठावणी केली पाहिजे." रामदास म्हणाला.

"तिकडे संयुक्तप्रांत, बिहारांत केवढी संघटना आहे. मुकुंदराव सारें पाहून आले. तिकडची हकीगत ते सांगू लागले की आपणांसहि ऐकून चेव येतो, स्फूर्ति येते. आपल्याकडेहि तसें व्हावें असें वाटतें. शहरांत कामगारांची संघटना; खेड्यांतून किसानांची संघटना. या दोन संघटना एकदा का खंबीर पायावर उभ्या राहिल्या म्हणजे झालें. मग ठिणगी पडायचा अवकाश ! " दरायाम म्हणाला.

"मोहन धनगावला कामगारांत संघटना करीत आहे. तो त्यांचे वर्ग चालवितो. तेथील कामगारांची त्याच्यावर भक्ति आहे. मोहन किती तरी काम करतो. त्याची सेवा पाहून मला लाज वाटली. मी त्याला प्रणाम करून आलों. मुनीप्रमाणे एखाद्या झोपडींत राहतो. दुपारीं कामगारांच्या बायकांना शिकवतो, त्यांच्या सुखदु:खांची चौकशी करतो. रात्रीं कामगारांना शिकवितो. सायंकाळीं युनिअनचे कचेरींत तक्रारी ऐकतो. सकाळीं तक्रारी घेऊन मिलमध्ये जातो. मॅनेजर वगैरेंशीं दाद लावण्याची खटपट करतो. दयाराम, मोहनचें काम मुकाट्याने चाललें आहे. तो वीं पेरीत आहे. " रामदासने सांगितलें.

"रामदास, मोहनला जपलें पाहिजे. सेवा करतां यावी म्हणून प्रकृतीची काळजी घेणें हाहि धर्म आहे. सेवकाने शरीराची हयगय करणें गुन्हा आहे. पापच तें. मोहन अतिश्रम करतो. तीहि एक प्रकारची आसक्तिच. त्याला सांग की, प्रकृतीला जप. तूं जगशील तर कामगारांची चळवळ जगेल. " दयाराम म्हणाला.

"मोहनची काळजी घेणारें माणूस हवें. तो लग्न कां करीत नाही ?" रामदासने विचारलें.

"तो लग्न लावणार नाही. आपण जिच्याजवळ लग्न लावूं ती मरेल, असें त्यालाहि वाटतें." दयाराम दु:खाने म्हणाला.

"माझ्या शांतेचें त्याच्यावर प्रेम आहे. शांता शिकत आहे. अद्याप दोन वर्षे ती शिकणार. परंतु मला तर वाटतें, तिने शिकणें संपवून मोहनची

काळजी घेण्यास यावें. मोहन एकटा राहिला तर दोन वर्षें जगणार नाही." रामदास म्हणाला.

"परंतु अर्धवट शिकणें सोडून यायचें का ? सहा महिन्यांचा सुइणीचा वर्ग तरी पुरा करून यावें. तूं दवाखाना घालणार आहेस तेथे शांता काम करील." दयारामनें सुचविलें.

" दवाखाना रामपूरला निघणार. रामपूरला वाडा आहे. मोहन धनगावला काम करणार." रामदास म्हणाला.

"समजा, येथे रामपूरला शांता न आली तरी धनगावला ती काम करील. सुइणीचें काम शिकून आली तर पोटापुरतें मिळवील. मोहनची काळजी घेईल." दयाराम म्हणाला.

"मी शांतेला पत्र लिहितों." रामदास म्हणाला.

मित्रांचे असे बेत चालले होते. सोनखेडीला रामदासची झोपडी तयार होऊं लागली. लहानशीच परंतु टुमदार अशी होती. दयाराम ती बांधवून घेत होता. हिरालाल सूचना देत होता. रामदास मुकुंदरावांबरोबर अनेक ठिकाणीं हिडूं-फिरूं लागला त्याचें ठिकठिकाणीं राजाप्रमाणें स्वागत झालें. त्यागाचें तेज कांही अपूर्व असतें. शिवतर तर त्याचें मूळचें गाव. तेथे त्याचे आईबाप होते. रामदास आपल्या घरींच उतरला होता. बायामाणसें सारखीं तेथे येत व त्याचें कौतुक करून जात.

" रामदास, श्रीमंताच्या मांडीवर बसलास व पुन्हा भिकारी झालास !" आई म्हणाली.

" आई, असें वैभव श्रीमंताला मिळतें का ? गरिबांची पिळवणूक करणारा रामदास येथे आला असता तर अशी माणसांची रीघ येथे लागली असती का ? मीं कांही कपटे जाळले. कांही कागद जाळले आणि हें वैभव जोडलें हीं अमोल हृदयें जोडलीं." रामदास म्हणाला.

"तूंहि शांतेसारखा एकटा राहणार का" आईने विचारलें.

"शांता एकटी नाही राहणार ! शांतेचें लग्न मीं ठरवून टाकलें आहे." तो म्हणाला.

"बंगालमध्ये पाठवणार की काय तिला ?" तिने विचारलें.

"आई, मोहनजवळ शांताचें लग्न ठरलें आहे." तो म्हणाला.

" मोहन ? तो माकड ? तो भिकारडा ?" आई म्हणाली.

" आई, मोहन म्हणजे मोलाचें मोतीं आहे. त्याच्यासमोर आम्हीं लोटांगण घालावें. मोहनचा महान् आत्मा आहे. तुम्हांला त्याची पारख नाही. " तो म्हणाला.

" एका मजुराशी का शांतेचें लग्न ?" ती म्हणाली.

" आई, श्रमाने जगणारा मजूर हा ऐतखाऊ कुबेराहून अधिक अब्रूदार आहे. श्रीकृष्ण भगवान् तर गाई चारी. परंतु राजेमहाराजे त्याच्या पायांवर डोई ठेवीत. मोहनच्या चरणांवर सर्वांनी डोकें ठेवावें, अशा योग्यतेचा तो आहे." रामदास म्हणाला.

" काय म्हणाल तें खरें. आणि तूं करणार की नाही लग्न ? संपलें का तिकडचें शिक्षण ?" आईने विचारलें.

" आई, एका बंगाली मुलीजवळ मीं लग्न लावलें तर चालेल की नाही ? बंगाली विद्या मिळवली, बंगाली मुलगी पण मिळवतों." रामदास हसून म्हणाला.

" कांही करा. नीट संसार करा म्हणजे झालें. वेडेंवाकडें वागूं नका, एवढेंच सांगणें." आई त्याच्या पाठीवर हात फिरवीत म्हणाली.

शिवतरला मुकुंदराव व रामदास यांची जंगी मिरवणूक काढण्यांत आली. सुंदर रथ सजविण्यांत आला. त्याला केळीचे खांब बांधण्यांत आले होते. तोरणें लावलीं होतीं. तिरंगी व लाल झेंडे झळकत होते. वाद्यें वाजत होतीं. लेजीम खुळखुळत होते, झणझणत होते. क्रांतीची गाणीं म्हटलीं जात होतीं,

मिरवणूक संपली. घनदाट सभा भरली. उत्कृष्ट व्यवस्था होती. एका बाजूला स्त्रिया बसल्या, एका बाजूला पुरुष बसले. क्रांति करणारे व्यवस्था ठेवावयास शिकत होते. किसान स्वयंसेवक-स्वयंसेविका यांचीं दलें सभोवती उभीं होतीं. सुंदर दृश्य होतें.

मुकुंदरावांनी रामदासविषयी दोन शब्द सांगितले. ते म्हणाले. " आज रामदास दीनबंधु होऊन तुमच्या सेवेस आला आहे. ज्याला क्रांतीचें कंकण हातीं बांधावयाचें आहे, त्याने स्वतःचा संसार आधी पेटवावा लागतो. क्रांति स्वतःपासूनच सुरू केलेली बरी. रामदास माझा विद्यार्थी होता. त्याची ही त्यागवृत्ति पाहून मला कृतार्थ वाटत आहे."

मग रामदास थोडेंसें बोलला. तो म्हणाला, "बोलण्याची कला मी शिकलों नाहीं. तुमची संघटना पाहून मला आनंद होत आहे. मायबहिणींचा उत्साह पाहून तर तुमच्या मोक्षाची वेळ जवळ आली, ग्रहण लवकरच सुटणार, असें मला वाटत आहे. आपण आणखी तयारी करूं या. तयारीबरोबर स्वावलंबी व्हावयास शिका. गावांतील पैसा बाहेर जाणार नाही असें करा. घरींच कपडा तयार करा. फावल्या वेळांत थोडें काता. घरची भाकर व घरचा कपडा, या दोन गोष्टींत आपण परावलंबी नाही राहता कामा. सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, औद्योगिक सर्व प्रकारची क्रांति, सर्व प्रकारची गुलामगिरी नष्ट करावयाची आहे हें विसरूं नका. तुम्हीं माझें स्वागत केलेंत, मी ऋणी आहें. मला ओळखलेंत. माझ्या कपाळीं कुंकूं लावलें. त्याचा अर्थ हा की, क्रांतीसाठी डोक्यावर लाठी बसून माझें डोकें लाल झालें पाहिजे. माझ्या पंचप्राणांनी मीं क्रांतीला ओवाळलें पाहिजे. मला तें धैर्य येवो; व सर्व श्रमणारी जनता एक दिवस सुखी होवो. दुसरें काय ?"

दीनबंधु रामदासचा असा हा सर्वत्र दौरा झाला. वातावरण चांगलें तयार झालें. खेड्यापाड्यांतील विरोध मावळले. आडमुठचे लोक जरा सरळ झाले. रामदासच्या त्यागाचें तें बळ होतें. ज्या चळवळींत संन्यास आहे, त्याग आहे, तीच चळवळ फलद्रूप होण्याचा संभव असतो.

✦ ✦ ✦

## शांतेचा संसार : : १८

रामदासचें पत्र मिळाल्यापासून शांता अस्वस्थ होती. विद्या की विवाह हा तिच्यासमोर प्रश्न होता. मोहन स्वतःच्या प्रकृतीची बिलकूल काळजी घेत नव्हता. प्रेमाचें माणूस जवळ आल्याशिवाय तो काळजी घेणें शक्यहि नव्हतें; मोहन नसेल तर मला शिकून काय करायचें ? मोहन नसेल तर कोठला आनंद ? कोठला उत्साह ? कोठली स्फूर्ति ? शांतेच्या जीवनाचें जीवन म्हणजे मोहन होता. तिने शेवटीं विद्येला रामराम करण्याचें ठरविलें. ती धनगावला निघून आली.

दुपारच्या वेळीं मोहन आपल्या झोपडींत वाचीत पडला होता, तों शांता तेथे आली. ती उभी राहिली. मोहनकडे पाहात उभी राहिली.

" शांता, किती हळू पायांनी आलीस ?" मोहन म्हणाला.

" तूं पडून राहा मोहन. किती रे खोल गेले डोळे तुझे ! तूं स्वतःची काळजी कां नाही घेत ?" तिने विचारलें.

" शांता, किती तरी कामगारांचे डोळे माझ्यापेक्षा खोल गेले आहेत. त्यांच्या मुलांचीं तोंडें सुकून गेलीं आहेत. कामगारांचे भयाण संसार पाहून माझे डोळे का वर येतील ? माझे डोळे का हसतील, आनंदाने नाचतील ? त्यांची दुर्दशा पाहून डोळे मिटावे असें वाटतें. " तो म्हणाला.

" परंतु अशाने का त्यांची स्थिति सुधारणार आहे ? डोळे उघडे ठेवून त्यांची संघटना करूं या. लढे लढवूं या. त्यांतूनच पुढे भले दिवस येतील. त्यासाठी जगलें पाहिजे. प्रकृतीची काळजी घेतली पाहिजे. मोहन, मी आता सांगेन तसें तूं ऐकलें पाहिजेस." ती म्हणाली.

" पुन्हा शिकायला नाही जाणार ?" त्याने विचारलें.

" नाही. माझें शिक्षण पुरें झालें. आता त्या शिक्षणाचा पहिला प्रयोग तुझ्यावर. महिन्या दोन महिन्यांत तुझें वजन वाढलें पाहिजे." ती म्हणाली.

" तुझ्या हातचें जेवण मिळेल तर दोन दिवसांत वाढेल वजन. तुझें दर्शन होत जाईल तर भराभर वाढेल वजन. शांते, मी केव्हांच मेलों असतों. परंतु कसा जगलों माहीत आहे ?" त्याने विचारलें.

" कसा बरें ?" तिने विचारलें.

त्याने शांतेचा फोटो उशाशीं होता तो बाहेर काढला.

" या फोटोने मला वांचविलें. मी तो उशाली ठेवतों, हृदयाशीं धरतों." तो म्हणाला.

" माझ्यापेक्षा माझा फोटोच तुला आवडतो ?" शांता म्हणाली.

" या जन्मीं तुझ्या फोटोवरच समाधान." तो म्हणाला.

" कां बरें ?" तिने विचारलें.

" मी काय सांगूं ?" तो खिन्नतेने म्हणाला.

" मोहन, तुझी पत्नी होण्यासाठी मी आलें आहें. रात्रंदिवस तुझ्या उशाशीं बसेन. मात्र कंटाळूं नको मला." ती म्हणाली.

" माझी पत्नी ? माझ्याशीं लग्न ?" त्याने विचारलें.

" हो. " ती म्हणाली.

इतक्यांत दारांत रामदास येऊन उभा.

" काय शांते, रोगी तपासतेस वाटतें ?" तो म्हणाला.

" भाऊ, यांना रोगी नाही म्हणायचें बरें का. रोगी रोगी म्हणूं तर रोगी व्हायचे. यांना रोग वगैरे कांही नाही. जरा नीट वागतील तर सारें छान होईल. वागाल ना हो ?" शांतेने विचारलें.

" मला अहो जाहो म्हणशील तर कसा काय रोग बरा होणार ?" त्याने म्हटलें.

" मोहन, ती आता तुझी पत्नी होणार आहे. नवऱ्याचा मान अधिक असतो. " रामदास म्हणाला.

" चुकून आलें हो तोंडांत. अहो, मी मोहनच म्हणेन. माझा मोहन. मोहन आता नीट वागशील ना ! देईन औषध तें घेशील ना ? " शांतेने विचारलें.

" शांता, एकदा चांगल्या डॉक्टरकडून यांना तपासून घ्यावें, असें मला वाटतें." रामदास म्हणाला.

" भाऊ, यांचें लग्न झालें का म्हणजे बघ कसे एकदम सुधारतील ते. तेंच एक यांना औषध." ती म्हणाली.

" तें तुझ्या हातीं आहे." रामदास म्हणाला.

" रामदास, शांतेने मजजवळ लग्न लावूं नये. पुढचा जन्म असला तर त्या वेळेस आम्ही लावूं लग्न. मला माझी भीति वाटते." मोहन म्हणाला.

" असल्या क्षुद्र गोष्टीवर तूंहि विश्वास ठेवतोस ? वेडा ! अरे, मरण यावयाचें झालें म्हणजे येतें. तूं काय करणार त्याला ?" रामदासने सांगितलें.

" भाऊ, दयारामाच्या आश्रमांत आमचें लग्न लावा. मुकुंदराव लग्न लावतील. आईला व बाबांनाहि बोलव. तूं बोलावलेंस तर तीं येतील. मजवर त्यांचा राग आहे. कधी लावतोस आमचें लग्न ? सांग, कोणता दिवस सोयीस्कर ?" तिने विचारलें.

" रंगपंचमी दोन दिवशीं आहे. त्या दिवशीं लावावें लग्न." रामदासने सुचविलें.

शेवटीं रामदास, शांता, मोहन सारीं सोनखेडीस गेलीं. मोहनचे व शांतेचेहि आईबाप आले. शांतेची मैत्रीण गीता आली. मुकुंदराव आले. सोनखेडी व शिवतर येथील बरीच मंडळी आली होती. साधा सुट-सुटीत समारंभ. मोहन व शांता सकाळपासून सूत कातीत होतीं. दोघें व्रतस्थ होतीं. दोघांचें मौन होतें. दोघांनी कांही खाल्लें नाही. चरख्याचें संगीत त्यांनी चालविलें होतें. सायंकाळ झाली. कातलेल्या सुताचे हार तयार झाले. मुकुंदरावांनी विवाहमंत्रांचा मराठी अर्थ सांगितला. नंतर वधूवरांनीं परस्परांस सुताचे हार घातले. आईबापांचे आशीर्वाद त्यांनी घेतले. नंतर मुकुंदराव थोडेंसें बोलले. ते म्हणाले, " लग्न हें विघ्न नसून संरक्षण आहे. लग्न म्हणजे आधार आहे. लग्न म्हणजे गलबत वाहून जाऊं नये म्हणून असलेला नांगर. विवाह झाला. गृहस्थाश्रम सुरू झाला. आता लहरीप्रमाणें वागून चालणार नाही. दुसऱ्याची काळजी आता सुरू होते. गृहस्थाश्रम म्हणजे महाकाव्य, गृहस्थाश्रम म्हणजे शाळा. या शाळेंत मनुष्य संयम शिकतो. समजा कोणी आजारी पडले, त्याची शांतपणें शुश्रूषा करावी लागते. मुलंबाळं झालीं, त्यांची काळजी घ्यावी लागते. रातंदिवस जागावें लागतें. केवढी सहनशीलता व शांति अंगीं हवी. शांता व मोहन आपला संसार सुखाचा करोत. तो संसार शेजाऱ्यांस सुखावह होवो. आपल्याजवळ असेल तें द्यावें, गोड बोलावें, वेळीं कामीं यावें. जेथे असाल तेथे चंदनाप्रमाणे झिजा व आसपासचा भाग सुगंधी करा. भांडणतंडण नको. आरडाओरडा नको. पेटीच्या निरनिराळ्या सुरांतून कुशलतेने संगीत काढतां येतें त्याप्रमाणे आपल्या निरनिराळ्या वृत्तींतून कमीअधिक दाबाने सुंदर संगीत निर्माण करा. प्रभु तुम्हांला आनंदांत ठेवो, सन्मार्गावर ठेवो, तुमचीं जीवनें कृतकृत्य करो. "

सर्वांना फुलें देण्यांत आलीं व गूळ देण्यांत आला. मोहनचा व शांतेचा संसार सुगंधी होईल, मधुर होईल, असें सर्व म्हणाले. शांता व मोहन यांनी भोजन केलें. पारणें झालें. रात्रीं प्रार्थनेनंतर रामदासने दिलरुबा वाजविला. विवाह म्हणजे दिव्य संगीत, स्वर्गीय एकतानता, दिलाला दिल मिळवणें, असा जणु संदेश त्या संगीतांतून मिळत होता.

शांता व मोहन धनगावला आलीं. पतिपत्नी म्हणून राहूं लागलीं. आंतरिक लग्न कधीच लागलें होतें. आता बाह्य औपचारिक लग्न लागलें. शांतेने मोहनची ती लहानशी खोली सजविली. सारें झाडून स्वच्छ केलें.

मोहनचें पुष्कळसें काम आता शांता करी. युनियनचे हिशेब ती ठेवी. पत्रव्यवहार करी. वर्तमानपत्रांतील महत्त्वाच्या वार्ता शांता युनियनच्या वार्ताफलकावर लिहून ठेवी. शांतेने कामगारांच्या चाळींत चैतन्य नेलें. एके दिवशीं दुपारीं शांता फिनेल घेऊन आली. म्युनिसिपालिटीकडे येथे आणखी एक पिपडें ठेवावें असा युनियनमार्फत अर्ज केला गेला. कामगार कामावरून आले तो त्यांना सर्वत्र प्रसन्न वातावरण दिसलें.

कामगार बाया शांतेजवळ आपल्या तक्रारी मोकळेपणाने सांगूं लागल्या. इतके दिवस त्या जरा दूर असत. परंतु आपल्या जातीचे माणूस भेटलें, त्यांना आनंद झाला. स्त्रियांना कसकसे कारखान्यांत त्रास होतात, तें शांतेला कळूं लागलें.

मोहनला भरपूर विश्रांति मिळूं लागली. त्याच्या तोंडावर तेज आलें. डोळे प्रसन्न दिसूं लागले. शिवतरच्या शेतांत जसा तो दिसे, तसा तो आता पुन्हा दिसूं लागला.

"तुमचा लग्नापूर्वीचा फोटो असता व आज घेतला असता तर जमीन-अस्मानाचें अंतर दिसलें असतें." शांता म्हणाली.

"तूं मला पुन्हा 'तुम्ही' म्हटलेंस." मोहनने म्हटलें.

"बाहेर तसें बोलावें लागतें. तुम्ही म्हटलें म्हणून प्रेम का कमी होतें?" शांतेने विचारलें.

"लग्न म्हणजे जादू. लग्न करा नि लठ्ठ व्हा, असें आता मी सांगत सुटेन." मोहन म्हणाला.

"तो कोण बरे नवीन इसम आला आहे? मी येथे युनियनमध्ये काम करीन, किसानांत काम करीन म्हणतो. दिसतो गोड. बोलतो गोड. एक खिन्नता व उदासीनता त्याच्या चर्येत आहे. परंतु आपल्या मधुर हसण्याने तो ती लपवीत असतो." शांता म्हणाली.

"त्याचें लग्न नसेल झालें. त्याचें लग्न दे लावून कोणाजवळ." मोहन म्हणाला.

" त्याला आपल्या कामांत गुंतवावें. रात्रींच्या शिक्षणाचे आणखी वर्ग काढायला हवे आहेत. तो चालवील एखादा वर्ग. विचारीन त्याला. " शांता म्हणाली.

इतक्यांत ते नवखे गृहस्थ तेथे आले.

" या बसा." शांता म्हणाली.

" तुमच्या या चिमुकल्या खोलींतील अनंत आनंदाचा संसार पाहिला की एक प्रकारचा गोड हेवा वाटतो." तो तरुण म्हणाला.

" तुमचें नांव काय ?" मोहनने विचारलें.

" माझें नांव ? कोणतें सांगू माझें नांव ? जेथे जाईन तेथे लोक नाना नांवांनी मला हाक मारतात. " तो हसून म्हणाला.

" तुम्ही नेहमी हिंडत असतां वाटतें ?" शांतेने विचारलें.

" हो. मला नित्य नवीन आवडतें. " तो म्हणाला.

" तुम्ही कोणतें काम कराल ?" मोहनने विचारलें.

" सांगाल तें." तो म्हणाला.

" तुम्ही साक्षरतेचे वर्ग घ्याल ?" शांतेने विचारलें.

" हो, मोठ्या आनंदाने. " तो म्हणाला.

" दिवसा गाणीं म्हणत खादी खपवा. धनगावामध्ये हिंडावें. जवळच्या खेड्यावर जावें. तुम्हाला सायकलवर बसतां येतें का ?" शांतेने विचारलें.

" हो. परंतु सायकलपेक्षा घोडा बरा. घोडा वाटेल तेथे जातो. एखादा घाल लहानसा घोडा मिळवून ? त्याच्या पाठीवर गादी घालीन, हातांत झेंडा घेईन व गावोगाव जाईन. रात्रीं येथे वर्ग चालवायला परत येईन. सुंदर काम." तो तरुण उत्साहाने म्हणाला.

" परंतु घोड्याला खर्च येईल. त्याला कोठे बांधणार, कोठे ठेवणार ? जागा हवी." मोहनने विचारलें.

" मी राहतों तेथे पुष्कळ जागा आहे. घोडा बांधतां येईल. पावसाळ्यांत पत्रा लावतां येईल. " तरुण म्हणाला.

" तुमचें जेवणखाण वगैरे ? तुम्हांला किती खर्च येईल ?" शांतेने विचारलें.

" माझा खर्च मी करीन. " तो म्हणाला.

" नाही तर आमच्याकडे येत जा जेवायला." शांता म्हणाली.

" मी सदैव हिंडणार, कसें जमणार जेवायचें ? एखादे वेळेस येत जाईन. तुमच्या पवित्र आनंदांत वाटेकरी होईन. ठरलें तर मग. आता एक घोडा आणा खरेदी करून." तरुणाने सांगितलें.

" भाऊला विचारूं. भाऊजवळ असेलहि घोडा. मुकुंदराव हिंडतात; फिरतात; त्यांनाहि विचारूं. " शांता म्हणाली.

तो तरुण गेला. रामदासाने खरोखरच एक घोडा पाठवून दिला. तो तरुण आनंदला. त्याचा कार्यक्रम सुरू झाला. दिवसभर तो हिंडे. गांवोगाव जाई, खादीचीं गोड गाणीं गाई. लोकांना खादी घ्या म्हणे. त्याच्याभोवती गर्दी जमे. त्याच्याबद्दल लोकांना एक प्रकारचें कुतूहल वाटे. तो पायजमा घाली. अंगांत एक जाडसर लांब कोट असे. त्याला गळपट्टीपासून बटणें असत. डोक्याला तो सुंदर रुमाल बांधी व त्याचा झेंडा पाठीवर सोडलेला असे.

" नाही मग कोणीच खादी घेत ? फुकट झाली माझी फेरी ? नाही कोणी या गावांत तत्त्वाचा, त्यागाचा, बंधुप्रेमाचा ? सारे गाव का फुकट ?" असें तो कळकळीने, प्रेमाने विचारी.

" नका निराश होऊं. द्या मला दोन वार शर्टापुरती." कोणी एकदम पुढे येऊन म्हणे.

" मला द्या एक टोपी." एखादा मुलगा पुढे येऊन म्हणे.

" तुम्हाला नाही म्हणणें वाईट वाटतें. द्या मला एक धोतराचें पान." एखादा पोक्त शेतकरी येऊन म्हणे.

निराश तरुण हसूं लागे. त्याच्या डोळयांत एक मंगल प्रेममय तेज फुले.

खादीवाला रात्रीं धनगावला असायचा. कामगारांचा वर्ग घ्यायचा. त्याचा वर्ग भरलेला असे. तो गोड गोष्टी सांगे, दमलेल्या कामगारांना हसवी. एखादी करुणकथा सांगे व त्यांना तो रडवी. एखादी अन्यायाची कथा सांगे व त्यांना तो पटवी. हसतखेळत ज्ञान देई. हसतखेळत शिकवी.

एखादे वेळेस शांतेकडे तो रात्री जाई. वर्ग संपल्यावर जाई व दारांत उभा राहून " भाकरी देतां का ताई ?" म्हणून म्हणे.

" भिकाऱ्याला भाकर बंद." शांता म्हणे.

" भिकारी नाही मी. मी भाऊ आहें ताई. भावालाहि का भाकरी बंद ?" तो म्हणे.

" भावाला आंत येऊं दे. चुलीजवळ बसून खाऊं दे. भाऊ बाहेर नाही उभा राहात." शांता म्हणे.

मग तो आंत जाई. शांतेकडे उरलेलें असेल तें आनंदाने खाई.

शांता व मोहन यांच्या संसारांत त्या खादीवाल्याने नकळत एक प्रकारची अधिकच गोडी आणली. दोघांना त्याचेबद्दल आस्था वाटे, प्रेम वाटे, ओढा वाटे. परंतु आणखी एक वस्तु त्यांच्या संसारांत येणार होती. शांता त्या वस्तूला वाढवीत होती. त्या वस्तूला तिने पोटांत लपवून ठेवलें होतें. एक दिवस ती वस्तु जगाला दिसणार होती. शांतेच्या जीवनांत ती वस्तु क्रांति करणार होती. शांतेला नवीन अनुभव, नवीन पावन ज्ञान मिळणार होतें. शांता माता होणार होती.

✦ ✦ ✦

## माया : : १९

माया रामदासची वाट पहात होती. उन्हाळ्याची सुटी झाली. माया घरीं गेली. वसंत ऋतु बहरला होता. कोकिळेला कंठ फुटला होता. परंतु माया मुकी होती. ती चरख्यावर कातीत बसे.

" माया, तुला काय होतें ?" आई विचारी.

" माया, तूं आजारी का आहेस ?" पिता विचारी.

" सारें तुम्हाला माहीत असून कां मला विचारतां ? माझा आनंद महाराष्ट्रांत गेला आहे. माझें संगीत तिकडे गेलें आहे. तो आनंद मला द्या. तें संगीत मला द्या." ती म्हणे.

एके दिवशीं अक्षयकुमार मायेकडे आले होते.

दारावर कोणीं तरी टिचकी मारली. मायेने निःशंकपणें दार उघडलें. अक्षयकुमार आंत आले. मायेने दार लोटून घेतलें.

" बसा ना अक्षयबाबू. " ती म्हणाली.

" तूं का हे सारे फोटो काढलेस ? चांगले काढतेस की ? आणि हें हाताचें आहे चित्र, सुंदर आलें आहे. " ते म्हणाले.

" तुम्हाला या फोटोंतील कोणता आवडतो फोटो ? " तिने विचारलें.

" हा डोळे मिटलेला. समाधि लागलेला." ते म्हणाले.

" मला नाही डोळे मिटलेला आवडत. डोळे काय म्हणून मिटायचे ? मला हा हसऱ्या डोळ्यांचा आवडतो. किती गोड आहे नाही ? " तिने विचारलें.

" सारे एकाचेच फोटो आहेत हे ?" ते म्हणाले.

" अजून मी दुसरे कोणाचे काढायला शिकलें नाही. सारी हृदयाची कला या एकावरच मी ओतीत आहें." माया म्हणाली.

" माये, प्रद्योतवर तुझें खरेंच नाही का प्रेम ? तो तर तुझा ध्यास घेऊन बसला आहे. काय सांगूं त्याला ? कसें समजवूं तरी ? तूं का तिकडे लांब महाराष्ट्रांत जाणार ?" त्यांनी विचारलें.

" प्रेम बरोबर असलें म्हणजे सर्वत्र आनंदच आहे. प्रेमाला जवळ ना लांब." ती म्हणाली.

" पतीचें प्रेम कितीहि मिळालें तरी माहेरच्या प्रेमाची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. तूं इतकी दूर गेलीस तर माहेरीं कधी येणार ? महाराष्ट्रांत मग रडशील. उगीच इतकी लांब आले असें वाटेल." अक्षय-कुमार म्हणाले.

" अक्षयबाबू, सावित्रीने पति अल्पायुषि आहे हें माहीत असूनहि वरला तो वरला. मी केवळ माहेरच्या आशेने मनांतील प्रेम का विसरूं ?" माया प्रेममीमांसा करीत म्हणाली.

" माये, तुझी निराशा मी करूं इच्छित नाही. प्रद्योतवर तुझें प्रेम नसेल, तर तो संसारहि सुखाचा होणार नाही. उगीच तुला आगींत उडी घे मी कसें सांगूं ? मला म्हाताऱ्याला मात्र दुःख आहे. प्रद्योतची निराशा त्याला जाळील. तो हल्ली खोलींत बसून राहतो. परंतु आपण तरी काय करणार ?" अक्षयबाबू म्हणाले.

" तुमचा मला आशीर्वाद द्या." माया म्हणाली.

"तूंहि माझ्या मित्राची मुलगी. तुझा संसार सुखाचा होवो. तुझें मी शुभच चिंतीन." ते म्हणाले.

अक्षयबाबू निघून गेले. मायेने ते सर्व फोटो, तीं चित्रें पुन्हा आवरून ठेवलीं. इतक्यांत तिच्या नांवाचें पत्र आलें. तें पत्र घेऊन ती धावत आली. आपल्या पलंगावर तें पत्र घेऊन ती बसली. तिला तें पत्र फोडवेना. महाराष्ट्रांतील तें पत्र होतें. कल्पनेंत आनंद असतो. पत्रांत काय काय असेल याच्या कल्पनेंतच ती तन्मय झाली. शेवटीं तिने हलक्या हाताने तें पत्र फोडलें, वाचलें.

प्रिय माया,

तूं माया नसून महामाया आहेस. तिकडे लांब राहून तेथून माझ्याभोवती जाळें गुंफीत आहेस. हलकेंच मला येथून तिकडे ओढीत आहेस. माये, तुझी ओढ मला लागली आहे. तुझ्या बाबांना मला पत्र लिहायला सांग, म्हणजे मी येईन, एरव्ही कसा येऊं?

तुझ्यासाठी एक चिमुकलें घर मी बांधलें आहे. तूं ये व सजव. घराभोंवती मी फुलझाडें लाविलीं आहेत. तूं आलीस म्हणजे तुझें स्वागत तीं करितील. तुला पाणी घालावे लागेल त्यांना. मीहि तुला त्यांत मदत करीन. दोघांनी मिळून फुलें फुलवूं. संसार सुखाचा करूं.

शांता विचारते, 'भाऊ, माझी वैनी कधी येणार?' मी हसतों व सांगतों, 'कांही येणार नाही वैनी. तुझा भाऊ आता संन्यासी होणार.' माये, होऊं का ग संन्यासी? नको पण. उगीच तूं रडत बसशील. मला आता लोक काय म्हणतात माहीत आहे का? तुझ्या रामदासाला 'दीनबंधु' हें नांव मिळालें आहे. माये, दीनबंधूची बायको व्हायला तयार आहेस का? मी आता लक्षाधीश नाही. मी गरीब झालों आहें. सारें देऊन टाकलें. बाबांची संपत्ति गरिबांना दिली. माझी संपत्ति तुला दिली. आता माझ्याजवळ काय आहे शिल्लक? म्हटलें तर सारें आहे, म्हटलें तर कांही नाही.

तूं दिलेली शाल प्रवासांत मळली होती. काल ती मी धूत होतों. आता स्वच्छ करून तिची घडी घालून ठेवली आहे. तुमच्या गावीं येईन तेव्हा ती अंगावर घेईन.

हल्ली उन्हाळा फारच होतो. परंतु त्यामुळेंच पावसाळा लौकर येईल हेंहि खरें. रखरखीत तापलेली भूमि पावसाची उत्कंठेने वाट पाहात आहे. आपले कढत सुस्कारे वर पाठवीत आहे. मधून मधून अभ्रें येऊं लागलीं आहेत. पृथ्वीला आशेचा संदेश देऊन तीं पांढरी अभ्रें पुन्हा निघून जातात, दूर दूर निघून जातात.

माये, तुझें घर तुझी वाट पाहात आहे. त्या घरांत मी एकटा कसा जाऊं ? त्या घरांत एकदम तूं व मी शिरूं. केव्हां येऊं तें कळव. लौकर कळव. सर्वांना सप्रेम प्रणाम.

—तुझा रामदास.

मायेने वडिलांजवळ बोलणें काढलें. रमेशबाबूंच्या मनांत तसेच विचार खेळत होते. मायेचें आता लग्न केलें पाहिजे हें त्यांनी ओळखलें. वेळींच सारें झालें म्हणजे गोड असतें. उगीच लांबण्यांत काय अर्थ ?

" माया, त्यांना इकडे बोलावण्याऐवजी आपणच तिकडे जाऊं. प्रद्योतच्या डोळ्यांआड बरें. आपण आधी कोणाला कळवूंहि नये. एके दिवशीं निघावें व जावें. त्यांच्या त्या आश्रमांतच तुझा विवाह करूं. चालेल का ?" रमेशबाबूंनी विचारलें.

" बाबा, तुम्ही सांगाल तें योग्यच असेल. कोठे तरी आमचे हात हातीं द्या व आशीर्वाद द्या. आमची गाडी रुळावर सोडा. आमची सहयात्रा सुरू होऊं दे. आता एकट्याने प्रवास करवत नाही. हातांत हात असला म्हणजे धीर येईल. पुढे प्रवास करण्यास हिंमत येईल. एकमेकांना आधार होईल." माया म्हणाली.

" तूं व मी दोघेच जाऊं. म्हणजे प्रद्योतला शंका येणार नाही. खर्चंहि फार नको." वडील म्हणाले.

माया कांही बोलली नाही. रमेशबाबूंनी रामदासाला पत्र लिहिलें. येत असल्याचें कळविलें. नक्की दिवस कळविला. मायेनेहि एक पत्र लिहिलें.

महामायेच्या महादेवा,

तूं तिकडे दीनबंधु झालास, परंतु या सखीला विसरलास असें वाटलें. परंतु तें पत्र आलें. संयमी पत्र, त्यांतून तुझे सुस्कारे ऐकूं

आले. तुझ्या हृदयाची धडपड ऐकूं आली. आता मी येत आहें तुला भेटायला, तुला कायमची मिळायला. ही बंगाली मुलगी येत आहे. आपलें घरदार, माहेर, मायबाप, सखे–सवंगडी सारें सोडून येत आहे. या सखीला सांभाळ. प्रेमाची भुकेली ती येत आहे. तिला भरपूर प्रेम दे. या मुलीला प्रेमसिंधूंत बुडव, प्रेमाकाशांत उडव. प्रेमाचे संगीत ऐकव व डोलव.

हृदयदेवा, भिऊं नको. आसक्तीच्या चिखलांत मी तुला डांबणार नाहीं. संपत्तीची मी भुकेलेली नाहीं. तुझ्या प्रेमाची भुकेलेली आहें. तूं जाशील तेथे मी येईन. तूं आगींत उडी टाकलीस तर तेथे मीहि उडी घेईन. तूं असशील तेथें माझा स्वर्ग, तेथे माझें परम सुख. आपण आपलीं जीवनाचीं फुलें गरिबांच्या सेवेस देऊं. त्यांची सेवा करतां यावी म्हणून फुलूं, किंबहुना त्यांची सेवा करीत राहिल्यानेच फुलूं.

माझें चिमुकलें घर मीं कधींच रंगविलें आहे, सजवलें आहे. माझ्या या हृदयमंदिरांत प्रेममूर्तीची प्राणप्रतिष्ठा कधीच मीं केली आहे. तेथे मी तासन् तास पूजाअर्चा करीत रमतें. माझ्या या चिमुकल्या घरांत गोड गोड प्रकाश भरलेला आहे, गोड गोड संगीत भरलेलें आहे, प्रसन्न परिमल दरवळलेला आहे. देवा, या चिमुकल्या घरांतील गाभाऱ्यांत तुला आणून बसविलें आहे हें तुलाहि नाही अद्याप माहीत ?

वेडी माया महाराष्ट्रांत येत आहे. बंगालची भक्तिभागीरथी महाराष्ट्रांतील चंद्रभागेला मिळण्यासाठीं येत आहे. ओथंबलेली भावना संयमी विचाराला मिठी मारण्यासाठी येत आहे. भारतीय भावनेचें भारतीय विचाराशीं हें लग्न आहे. विचारांचें भावनेशीं लग्न नाही तोवर क्रांति जन्माला येत नाही. खरें ना ? मंगल मंगल लग्न, त्रिवार मंगल लग्न.

दयारामाच्या आश्रमांत आपण गृहस्थाश्रमाची दीक्षा घेऊं. गृहस्थाश्रम खरा आश्रम करूं. पवित्र व प्रेममय करूं, सेवामय व आनंदमय करूं.

मी बाबांबरोबर येत आहें. आईचे अनंत आशीर्वाद. ही संसार-यात्रा सुखकर व्हावी म्हणून बरोबर घेतलेली ती शिदोरी घेऊन मी येत आहें. प्रद्योतच्या वडिलांचे मंगल आशीर्वाद घेऊन येत आहें. माझ्या मैत्रिणींच्या सदिच्छा घेऊन येत आहें. माझ्या गावांतील कळकीच्या बनांतील संगीत, वनदेवतांचे ते आशीर्वाद घेऊन येत आहें.

आता तुमच्या शांताबाई मी पाहीन. त्यांचा तर संसार सुरूहि झाला. लौकरच प्रसिद्ध होणाऱ्या मराठी स्त्री-जीवन पुस्तकाचा मन्वंतर मासिकांत आलेला भाग तुम्हीं मला दाखविला होतात. त्यांतील ओव्या माझ्या आईला, माझ्या मैत्रिणींना किती आवडल्या ! त्या ओव्यांत एक ओवी आहे :

पाऊस पडतो मृगाआधी रोहिणीचा<br>
पाळणा हालतो भावाआधी बहिणीचा

भावाच्या संसाराआधी बहिणीचा संसार. बहिणीचा संसार नीट मांडून देऊन भाऊ मग स्वतःचा संसार मांडतो. शांताताईंना ही ओवी म्हणून दाखवीन. माझ्या मराठी उच्चाराला त्या हसतील, गंमत होईल.

किती मी लिहीत बसलें ! पुरुषांचें सुटसुटीत पत्र; बायकांचा पसारा. तुम्ही नेहमीच म्हणत होतां मायेचा पसारा. आता आटोपतें हो या मायेचा पसारा व एका वाक्यांत साठवतें तो सारा. माझे तुम्ही व तुमची कोण ?

—वेडी माया

रामदासच्या लग्नाची वार्ता सर्वत्र गेली. सर्वांना आनंद झाला. दयाराम वधूवरांना स्वतःच्या हातच्या सुताचे कपडे देणार होता. तो जपून सूत कातीत होता. अखंड सूत. न तुटलेल्या सुतांचीं सणंगे तो विणणार होता.

माया निघाली. बरोबर वडील निघाले. "सांभाळ हो बेटी." आई अश्रूंतून बोलली.

मर्यादित बंगाल संपला व तिनें अश्रूपूर्ण प्रणाम केला. डोळे मिटून पुन्हा एकदा ती भूमि तिनें पाहिली. डोळे उघडून पुन्हा एकदा दूरवर पाहिली.

माया महाराष्ट्रांत आली. बंगाल महाराष्ट्रांत आला.

माया व रमेशबाबू सोनखेडीच्या सीमेवर आलीं. तेथे पुष्पहारांनी, लतापल्लवांनीं, सुतांच्या हारांनीं, राष्ट्रध्वजांनी सजवलेला सुंदर रथ होता. वधूची मिरवणूक निघाली. जणु बंगालच्या वलिदानाची महाराष्ट्र पूजा करीत होता. वाटेंत लोकांनी फुलें उधळिलीं. सुवासिनींनी ओवाळलें. रमेशबाबू मुकुंदरावांबरोबर चालत होते. त्यांचे डोळे प्रेमाने भरून आले.

सुंदर मंडप घातला होता. खादीचीं सुंदर तोरणें लावलीं होती. देशभक्तांचे फोटो होते. हजारो किसान स्त्रीपुरुष जमले होते. मुलामुलींचीं गर्दी होती. दयारामने वधूवरांस नववस्त्रें दिलीं.

"हा दयाराम हो. चरख्यावर मुळी न तोडतां काढलेल्या अखंड सुताचीं हीं वस्त्रें आहेत." रामदास म्हणाला.

"अखंड प्रेमबंधन राहील." माया म्हणाली.

मुकुंदरावांनी मंत्र म्हणून मराठींत अर्थ सांगितला. नंतर वधूवरांनी परस्परांस सुताचे हार घातले. टाळ्यांचा गजर झाला. सर्वांनी फुलें उधळलीं. वधूवरें वडील मंडळींच्या पाया पडलीं. मायेने आपले श्वश्रूश्वशुर पाहिले. त्यांच्या पायांवर तिने डोकें ठेवलें. त्यांनी तिला जवळ घेऊन आशीर्वाद दिले. रमेशबाबूंनी प्रेमाने थबथबलेला हात उभयतांच्या विनम्र मस्तकांवर ठेवला. वधूवरांस कितीतरी किसानांनी हार घातले, किसान बायांनीहि घातले.

रात्रीं सर्वांना साधें परंतु रुचकर जेवण देण्यांत आलें. माया व रामदास जवळ जवळ जेवावयास बसलीं होतीं. भोजनें झालीं. मंडपांत पुन्हा सारी मंडळी बसली.

रामदासने दिलरुबा वाजवला. मायेने वंदे मातरम् हें गाणें म्हटलें.

✦ ✦ ✦

## विद्यार्थी-संघ : : २०

कामगार-संघटना व किसान-संघटना देशांत उभ्या राहूं लागल्या. आतां विद्यार्थी संघटनेची आवश्यकता होती. शहरांतील कामगार व खेड्यांतील किसान यांना जोडणारा दुवा म्हणजे विद्यार्थी.

आनंदमूर्तीस आता हें काम सांगावें असें मुकुंदरावांच्या मनांत येत होतें. आनंदमूर्ति मुकुंदरावांचा शब्द म्हणजे वेदवाक्य मानीत. आजपर्यंत ते खादी खपवीत होते. ऊन असो, पाऊस असो, त्या व्रतांत त्यांनी खंड पडूं दिला नाही. मुलांमध्ये प्रिय झाले होते. त्यांचें गोड बोलणें, गोड हसणें, सुंदर गाणीं यांचा सर्वांवर जादूसारखा परिणाम होई. घोड्याजवळ उभे आहेत, सुंदर रुमाल बांधलेला आहे, अशा स्वरूपांत त्यांचे किती तरी फोटो लोकांनी घेतले. खादीचें त्यांनी लोकांना वेड लावलें; कारण त्यांचें वेड लोकांना लागलें होतें. कधी खिशांत खाऊ घेऊन जात व खेड्यांतील मुलांना वांटीत. कधी हिवतापाच्या गोळ्या बरोबर घेऊन जात. शांतेने कांही कांही औषधें त्यांना सांगितलीं होतीं. तीं ते सांगत व लोकांना गुण येई. एखादे दिवशीं एखाद्या गावीं ते जात तर त्यांच्या पाया पडण्यासाठी बायामाणसें येत.

"माझ्या कशाला पाया पडतां ?" ते कावरेबावरे होऊन म्हणत.

"तुमच्या औषधामुळे पोराला गुण आला." एखादी माता म्हणे.

"तुमच्या औषधाने बायकोला आता गोड वाटतें." दुसरा कोण म्हणे.

"देवाची कृपा. त्याला आठवा." आनंदमूर्ति म्हणत.

"आमचे देव तुम्ही. ते एक दीनबंधु रामदास आहेत. दुसरे तुम्ही आलेले." कोणी म्हातारा म्हणे.

"आणि आम्हांला देवकळा देणारे ते मुकुंदराव, दे देवाचे देव-महादेव आहेत." आनंदमूर्ति म्हणत.

"खरें आहे. त्या मुकुंदरावाला सर्वांची काळजी." शेतकरी म्हणत.

आनंदमूर्ति असें नांव त्या तरुणाला कामगारांनी दिलें होतें.

आज सोनखेडीच्या आश्रमांत मुकुंदरावांनी त्यांना बोलाविलें होतें.

ते वाट पहात होते. शेवटीं ते उठले व मायेच्या घरीं गेले. माया फुलझाडांना पाणी घालीत होती.

"माया, आनंदमूर्ति नाही ना आले ?" मुकुंदरावांनी विचारलें.

"येणार आहेत की काय ?" तिने विचारलें.

"हो. परंतु वेळ तर झाली." ते म्हणाले.

"घोडा अडला असेल वाटेंत." ती म्हणाली.

"त्यांचा घोडा कधी अडत नाही, पडत नाही. कृष्ण भगवान् गीता सांगत असतांना अर्जुनाचे घोडेसुद्धा नाचत, रथाचे अणुपरमाणूहि रोमांचित होत. तसें आनंदमूर्तीस बघतांच, त्यांचा शब्द ऐकतांच, त्यांचा स्पर्श होतांच घोडा नाचूं लागतो." मुकुंदराव म्हणाले.

"स्वामी रामतीर्थांसारखे दिसतात ते. रामतीर्थांच्या मुखावर असेंच गोड अद्वितीय स्मित असे. त्यांच्याशीं वादविवाद करण्याच्या हेतूने लोक जात, परंतु त्यांच्या तोंडावरील हसूं पाहून वादविवाद करण्याचें विसरून जात. प्रणाम करून परत येत." माया म्हणाली.

इतक्यांत घोडा आला.

"आंत बसूं या मायेच्या दिवाणखान्यांत." आनंदमूर्ति म्हणाले.

"चला." मुकुंदराव म्हणाले.

दोघे आंत गेले. तेथे खेडयांतील हातसुताचा सुताडा पसरलेला होता. दोघे बसले. आनंदमूर्ति लगेच चरख्यावर कातूं लागले. मुकुंदराव टकळीवर कातूं लागले.

"कशाला बोलावलेंत मला ?" आनंदमूर्तींनी विचारलें.

"तुम्हांला विद्यार्थीसंघ सर्वत्र स्थापण्याचें काम सांगणार आहें. मागें तुमच्याजवळ बोललों होतों या बाबतींत. तुम्हीं केला विचार ?"

"हो, केला. कांही शाळा-चालकांजवळहि बोललों. मुलांजवळहि चर्चा केली. मुलें तयार आहेत. परंतु कोणी शंका विचारतात. विद्यार्थीदशा संपल्यावर पडावें या भानगडींत असें म्हणतात. विद्यार्थ्यांनी विद्या मिळवावी, राजकारणांत पडूं नये, असें म्हणतात. संघाचें ध्येय काय विचारतात." आनंदमूर्ति म्हणाले.

" मनुष्याला दोन धर्म असतात : नित्यधर्म व नैमित्तिक धर्म. विद्यार्थ्यांस नित्यक्रम म्हणून राजकारण नाहीं; परंतु नैमित्तिक राजकारण आहे." मुकुंदराव म्हणाले.

" म्हणजे काय ? "

" त्याचा अर्थ असा : स्वातंत्र्यदिन आला तर त्यांत सर्व विद्यार्थी सामील होतील. राजबंदीदिन आला, त्यांत सामील होतील. किसानांची प्रचंड चळवळ चालली असेल तर सहानुभूति म्हणून एखादे दिवशीं संप करतील."

" विद्यार्थ्यांची विद्यार्थीदशा संपल्यावर एकदम अपरिचित समुद्रांत येऊन पडलों असें त्यांस वाटतां कामा नये. आजूबाजूस सामाजिक, राजकीय, धार्मिक वगैरे विचारांच्या ज्या अनंत प्रक्षुब्ध लाटा उसळत असतात, त्याच्याशीं त्यांचा थोडाफार परिचय करून दिला पाहिजे. नाही तर उद्या घाबरायचा. यासाठी जे असे प्रसंग येतात त्या वेळीं मिरवणुकींत वगैरे त्याला घेतलें पाहिजे. गाणींगर्जना त्यांच्या कानांवर गेल्या पाहिजेत. त्यांच्या आत्म्याला याप्रमाणे जरा वारा लागतो. आलें ना लक्षांत ?" मुकुंदरावांनी विचारलें.

" नैमित्तिक राजकारणाची आली कल्पना. आता विद्यार्थी-संघाचा नित्यधर्म कोणता ?" आनंदमूर्तींनी प्रश्न केला.

" शाळेंत न मिळणारें शिक्षण ते आपल्या अभ्यासमंडळांतून घेतील. निरनिराळ्या वर्तमानपत्रांतील माहितीचीं कात्रणें कापून चिकटबुकें करतील. ज्ञान कसें मिळवावें तें शिकतील. देशांतील विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांच्या फोटोचीं आल्बम्स् तयार करावीं. देशांतील सुंदर देखावे जमवावे. सुट्टीच्या दिवसांत खेड्यांतून जावें. शाळेचा अभ्यास सांभाळून अशा अनेक गोष्टी करतां येतील." मुकुंदराव म्हणाले.

" विद्यार्थी-संघाची प्राणभूत कल्पना काय ?"

" विद्यार्थी तेवढे एक ही भावना जागृत करणें. आज जातीय वाद धुडगूस घालीत आहेत. महान् भारताचें हसें होत आहे. ब्राम्हण-ब्राम्हणेतर, स्पृश्यास्पृश्य, हिंदु-मुसलमान, असे तुकडे पडले आहेत. हे तुकडे कोणीं सांधावयाचे ? नवभारत निर्मिणाऱ्या तरुणांनी तरी अखंड भारत डोळ्यां-

समोर ठेवावा. विद्यार्थ्यांनी हें ध्येय डोळ्यांसमोर ठेवावें. ही प्राणभूत कल्पना. निदान माझ्या अंतरंगांतील विद्यार्थी-संघाची ही प्राणभूत कल्पना. आनंदमूर्ति, तुम्ही हा संदेश घेऊन जा. माझे विचार तुमच्या ओठांतून अधिक गोड होऊन बाहेर पडतील." मुकुंदराव थांबले. ऐकतां ऐकतां आनंदमूर्तींचा बाहेरचा चरखा थांबला. हृदयाचा चरखा सुरू झाला. डोळ्यांतून पाणी गळूं लागलें. ते डोळे मिटून समोर बसले. जणु अंतर्बाह्य पोकळ होऊन मुकुंदरावांचे विचारवारे स्वतःच्या जीवनांत भरून येत होते. त्यांची समाधि लागली होती.

मुकुंदरावांनी समोर पाहिलें तो तो अद्‌भुत देखावा. जणु हिमालया-वरचा शिवशंकरच पाझरत आहे. ती पावन समाधि त्यांना भंगवेना. तेहि समरस होऊन शांत बसले. आनंदमूर्तींनी डोळे उघडले. शांत प्रेमाने ते समोर पाहात होते.

"तुमची वेणू बनण्याचें भाग्य माझें आहे का? तुमच्या ओठांतून पवित्र उदात्त विचार गंगेप्रमाणे धों करीत येतात. त्या भाग्यवान् ओठाशीं समरस होण्याचें भाग्य माझ्या दुबळ्या ओठांचें आहे का? तुमच्या ओठांतील विचार माझ्या ओठांतून पडतील का बाहेर?" आनंदमूर्तींनी विचारलें.

"पडतील, अधिकच सुंदर व पवित्र होऊन बाहेर पडतील." मुकुंद-राव म्हणाले.

"जातों मी." आनंदमूर्ति म्हणाले.

"आज कोणत्या गावीं खादीफेरी?" मायेने विचारलें.

"आतां विद्यार्थ्यांत फेरी. आता विद्यार्थ्यांचें रान उठवायचें. त्यांच्यांत राम ओतायचा. किसानसंघटना, कामगारसंघटना, विद्यार्थी-संघटना. शेवटीं तिन्ही एका स्वातंत्र्यसंग्रामांत होमावयाच्या. त्या होमांतून मंगल क्रांतीचा जन्म व्हावयाचा." असें म्हणून घोड्यावर थाप मारून तो गोड परंतु तेजस्वी घोडेस्वार दौडत वाऱ्याप्रमाणे निघून गेला.

✦ ✦ ✦

## अमर दिवस : : २१

किसानांत, कामगारांत, विद्यार्थ्यांत सर्वत्र नवचैतन्य संचरूं लागलें. नव राष्ट्रीय धर्म येऊं लागला. खऱ्या स्वातंत्र्याच्या स्वच्छ व स्पष्ट कल्पना येऊं लागल्या. परंतु यामुळे मुकुंदरावांवरती अनेकांचा रोष होऊं लागला. जे त्यांना पूर्वी भजत तेच त्यांच्या नांवाने जळफळूं लागले. मित्र होते तेहि शत्रु होऊं लागले. पांढरपेशांची सहानुभूति शेवटीं श्रमपेशांकडे जातांना कमी पडते.

त्या दिवशीं मुकुंदराव धनगावला आपल्या खोलींत होते. एका बाजूला निवांत अशी ती खोली होती. आजूबाजूला घरें नव्हती. त्या खोलींत दोन घोंगड्या होत्या. एक चरखा होता. सूत गुंडाळावयाचा एक फाळका होता. कांही वह्या होत्या. अत्यंत स्वच्छ अशी ती खोली होती. कांही नसणें हेंच तेथील सौंदर्य होतें. स्वच्छ प्रकाश हीच शोभा.

मुकुंदराव शांतपणें चरख्यावर कातीत होते. मुखाने अभंग गुणगुणत होते.

**एक वेळ करी या दुःखावेगळें**
**दुरिताचें जाळें उगवावें.**
**आठवीन पाय हा माझा नवस**
**पुरवावी आस पांडुरंगा**

हे तुकारामाचे चरण घोळून घोळून ते म्हणत होते. ते का जगाला कंटाळले, निराश झाले ? या जगांत दंभ आहे. त्याचें का त्यांना वाईट वाटत होतें ?

त्यांच्या खोलीचें दार लोटलेलें होतें. कोणीं टकटक वाजविलें. मुकुंदरावांचें लक्ष नव्हतें. पुन्हा कोणी टकटक वाजविलें.

"उघडा दार, लोटा, कडी नाही." मुकुंदरावांनी सांगितलें.

दगडूशेट, चंदनमलशेट, त्रिंबकराव वगैरे त्यांच्याकडे आले होते. मुकुंदरावांनी आणखी एक घोंगडी पसरली. ते सारे बसले.

"काय काम आहे ?" मुकुंदरावांनी नम्रपणें विचारलें.

" तुमच्याजवळच कांही बोलण्यासाठी म्हणून आलों आहोंत. मोकळे-पणाने बोलण्याची इच्छा आहे." दगडूशेट म्हणाले.

" निःशंकपणें बोला. मजजवळ आंतबाहेर कांही नाही. " मुकुंदरावांनी सांगितलें.

" मुकुंदराव, अलीकडे तुमचा जो प्रचार चालू आहे त्याची आम्हांला धास्ती वाटते. शांतीच्या मार्गाने काम करण्याची ही पद्धत नव्हे. शेतकरी अडाणी असतात. हीं भुतें उठवाल, परंतु उद्या आवरतां येणार नाहीत." चंदनमल म्हणाले.

" कामगारामध्येहि तोच प्रचार होत आहे. परवाच मिलमध्ये गडबड होणार होती; परंतु टळली. केव्हा भडका उडेल याचा नेम नाही. मुकुंदराव, तुम्हीं हें भूत येथे आणलेत. तुमच्यामुळे इतर कामगार कार्यकर्ते येऊं लागले. कामगारांचीं मनें भडकूं लागली. तुम्ही याला जबाबदार आहांत." त्रिंबकराव म्हणाले.

" शाळेंतील चालकहि असेंच म्हणत होते. मुलें अविनयी होत आहेत. मास्तरांना कोणी जुमानीत नाही. तुम्ही खुशाल सांगतां मुलांना की, संप करा." दगडूशेट म्हणाले.

मुकुंदराव सूत कातीत होते. ऐकून घेत होते. त्यांचीं बोटें थरथरत होतीं. ओठ हालत होते. कापत होते. ते आपल्या भावना आवरीत होते. तें सूत त्यांना संयम शिकवीत होतें.

" तुम्ही कांहीच बोलत नाही. तुमच्याबद्दल आम्हांला आदर आहे. परंतु हल्लीचे प्रकार जरा गैरशिस्त वाटतात. तुम्हांला आम्ही आमचे समजत होतों. सत्य, अहिंसा या मार्गाचे समजत होतों. तुमचें पाऊल चुकीचें पडावें, तुमच्या तोंडून शिव्या याव्या, हें बरं वाटत नाही. इतर लोकांचें सोडून द्या." चंदनमल म्हणाले.

मुकुंदरावांचें कातणें थांबलें. ते म्हणाले," तुम्हांला माझ्याबद्दल आदर वाटतो याविषयी मी तुमचा ऋणी आहें. तुम्ही मला स्वतःचा मानीत होतां हें ऐकून बरें वाटलें. मी आजपर्यंत शिव्या देत नव्हतों, आताच कां देऊं लागलों याचें तुम्हाला आश्चर्य वाटतें; परंतु तुम्हीच आपल्या मनांत कां नाही विचार केला ? आजपर्यंत शिव्या न देणारा शिव्या कां देऊं लागला ?

आजपर्यंत शांत राहणारा कां अशान्त झाला ? आजपर्यंत गोड गोड बोलणारा आज कां आग पाखडूं लागला ? याचा तुम्ही मनांत विचार केलात का ? त्या कामगारांच्या चाळींतील विहिरींत किती किडे पडले आहेत पाहा म्हणावें जाऊन. सांगितलें, ती विहीर जरा नीट करा. तर उत्तर मिळालें आम्ही का बांधलेले आहोंत ? तुम्ही कामगारांस पिळून टाकण्यासाठी बांधलेले आहांत वाटतें ? त्या दिवशीं तो एक कामगार मास्तरांचे पाय चेपीना म्हणून त्याला काढून टाकण्यांत आलें. शाळांतून तोच गुलामीचा प्रकार. अमकें केलेंस तर नादारी बंद करूं; अमुक केलेंस तर शाळेंतून हाकलूं. मुलें म्हणजे का मेंढरें ? मुलांना कांही मन आहे की नाही ? मुलांना म्हणे स्वतःचें कळत नाही. सांगावें तिकडे जातात तुम्ही सांगतां तिकडे कां वळत नाहीत ? मुलांचीं मनें निर्मळ असतात. त्यांना अधिक चांगलें दिसलें की एकदम तिकडे जातात. पुष्कळ वेळा मुलेंच सज्ञान असतात. वयांत आलेले बरबटलेले दगड बनतात. लहान मुलांना देव पट्कन् मिळतो. सत्याच्या सूर्याचा प्रकाश तेथें लौकर पडतो. विद्यार्थ्यांनी राजकारणांत पडावें की पडूं नये असल्या चर्चा या आजच्या करंट्या देशांतच चालू राहतात. तुम्ही मला सांगायला आलांत; ठीक. संपूर्ण अहिंसा माझ्या जीवनांत अनंत जन्मांनी येईल. ती यावी, मला इच्छा आहे. कठोर शब्द माझ्या तोंडांतून जातात. धीरगंभीर शांत पर्वतहि कधीकधी ज्वालामुखी होऊन आग ओकूं लागतात, मग आमच्यासारख्यांची कथा काय ? किसान-कामगारांची बाजू घेतांना माझ्या तोंडून रागानें शब्द गेला तर देव माझ्यावर फार रागवेल असें मला वाटत नाही. तो तसा जाऊं नये म्हणून मी प्रयत्न करीन. दुसरें मी काय सांगूं ?"

ती मंडळी उठून गेली. मुकुंदरावांनी प्रणाम केला. दार लावून ते पुन्हा आपल्या घोंगडीवर बसले. ते उठले व खिडकीजवळ उभे राहिले. कोणाकडे पाहात होते ? त्यांचे डोळे वाहूं लागले. त्यांना अश्रूंचा पूर आवरेना. दगड्-शेटांसारख्यांनी का मला सत्य-अहिंसेचा उपदेश करावा ? खोटेंनाटें करण्यांत रंगलेले हे लोक, यांनी मला येऊन हिंसक ठरवावें ? परंतु मला अहंकार कशाला ? मी त्यांच्याकडे कशाला बघूं ? होऊं दे मला निर्मळ, निर्दोष. किती विचार त्यांच्या हृदयांत उसळत होते. डोंगरावरून पावसाळ्यांत शतप्रवाह वाहात असतात, तसे मुकुंदराव दिसत होते. परंतु शांत झाले.

दार उघडून ते कोण दोन आले आहेत ? असे चोरासारखे कां उभे आहेत ? असे काय त्यांचे डोळे ? हातांत काय आहे त्यांच्या तें ? मारेकरी का आहेत ? मुकुंदरावांवर मारेकरी ? प्रेमावर मारेकरी ?

दोघे एकदम पुढे घुसले. त्यांनी मुकुंदरावांना पाडलें. एकजण छातीवर बसला. एकाने तोंड धरून ठेवलें. मुकुंदरावांनी प्रेमळपणें पाहिलें. किती वेळ ते एकमेकांकडे पाहात होते. शेवटीं मुकुंदरावांच्या डोळ्यांतील प्रेम-शक्तीने छातीवरचा तरुण विरघळला. तोंड धरणाराहि विरघळला. ते दोघे दूर झाले.

"मला मारायचें आहे ? त्याने जगाचें कल्याण होणार असेल तर खुशाल मारा, कचरूं नका. माझ्या देहाचें मडकें कृतार्थ होईल." मुकुंदराव शांतपणें म्हणाले.

"आम्ही अजून पुरे पशु नाही झालों. काय करावें ? अजून आम्ही हिंदुच आहोंत." एक तरुण म्हणाला.

"म्हणजे काय ?" मुकुंदरावांनी विचारलें.

"आम्हांला बिनदिक्कत सुरा भोसकतां आला पाहिजे. लाठी मारतां आली पाहिजे. एरव्ही हिंदूंची संघटना होणार नाही. मुसलमान शिरजोर झाले. हिंदूहि बलवान् झाले पाहिजेत." दुसरा तरुण म्हणाला.

"परंतु तुम्हांला तर पशु व्हावयाचें आहे. तुम्हांला पशूंची संघटना करावयाची आहे का हिंदूंची ? अजून तुम्ही हिंदु आहांत. तें हिंदुत्व तुम्हांला विसरावयाचें आहे होय ? आपले सद्‌गुण सर्व गमवावयाचे आहेत का ?" मुकुंदरावांनी विचारलें.

"मुसलमानांची आम्हांला चीड येते. आमच्या बायका पळवतात, त्यांची अब्रू घेतात." एक तरुण म्हणाला.

"पंढरपुराला अनाथ अर्भकालयांत जा म्हणजे हिंदूंचाहि त्या बाबतींत पराक्रम दिसेल. मित्रांनो, एखादी सारी जातच का वाईट असते ? वाईट लोकांना वाईट म्हणा. अहरार पक्ष केवळ राष्ट्रीय आहे. सरहद्द प्रांतांत राष्ट्रीयता उसळत आहे. मागील सत्याग्रहांत एका सरहद्द प्रांतांतून पंधरा हजारांवर सत्याग्रही तुरुंगांत गेले. मी काय सांगू ? मी क्षुद्र आहें. या लहानशा हृदयाची होळी होते रे गड्यांनो—"

मुकुंदराव थांबले. त्यांच्याने बोलवेना. "आम्हांला असें कोणी सांगत नाही. वर्तमानपत्रांतील मुसलमानांच्या अत्याचारांचीं कात्रणें तेवढीं आमच्या बौद्धिक वर्गांत वाचण्यांत येतात." एकजण म्हणाला.

"तुम्ही असे आंधळे होऊं नका. बुद्धीचा डोळा बंद करूं नका. माझी बुद्धि सूर्याप्रमाणें स्वच्छ व निर्मळ राहो ही तर आपली प्रार्थना. हा तर पवित्र गायत्री मंत्र. बुद्धिच मारली तर वेदधर्म कोठे राहिला? वेदधर्म म्हणजे विचारधर्म. व्यापक विचारावर उभारलेला धर्म. विचार सारखा वाढत आहे. माझा धर्महि नवीन विचार घेऊन वाढेल. मोठे व्हा. जगांतील जास्तींत जास्त प्रगत असा विचार हृदयाशीं बाळगा." मुकुंदराव म्हणाले.

"हैद्राबाद सत्याग्रह का अन्याय्य होता?" दुसऱ्याने विचारलें.

"अरे, आधी कमी गुंतागुंतीच्या संस्थानांत प्रयोग करूं या. ज्या संस्थानांतून आधीच शेकडो सत्याग्रहींनी प्रचार केलेला आहे, जीं संस्थानें छोटीं एकजिनसी आहेत, जेथे एक भाषा आहे, तेथे चळवळ करूं या. त्या चळवळीचा परिणाम दुसऱ्या बड्या संस्थानांवर होतो. अरे, ज्याने हिंदुस्थानची मान वर केली, हिंदुस्थानांत माणसें राहतात असें जगाला कळविलें, लाखो बेकारांना काम दिलें, शिक्षणाची नवदिशा दाखविली, राष्ट्रीय भाषेला चालना दिली, हरिजनांना जवळ घेतलें, स्त्रियांचा आत्मा जागा केला, खेड्यापाड्यांत चैतन्य ओतलें, अरे त्याचे केवढे उपकार? आपल्या कातड्याचे जोडे त्यांच्या पायीं लेववूं तरी तें ऋण फिटेल का? पूज्य विभूतींच्या पूजा न केल्याने आपलें श्रेय दुरावतें. गड्यांनो, मोठ्या मनाचे बना, क्षुद्रता जाळा. प्रांतीय भेद गाडा. भारतांत कोठेहि पुढारीपण असो, तें आपलेंच आहे; सारा भारतवर्ष माझा. किती मी सांगूं?"

मुकुंदराव पुन्हा शांत राहिले. पुन्हा त्यांना उमाळा आला व म्हणाले, "भाषेचीहि आमचीं भांडणें. हिंदी संस्कृतप्रचुर हवी की उर्दूबहुल हवी? अरे, समोरच्या लोकांना समजेल अशी हवी. सरहद्दप्रांतांत गेलें तर उर्दू शब्द अधिक वापरा; गंगातटाकीं कमी वापरा."

ते दोघे तरुण ऐकत होते. ढेकळाप्रमाणे ते विरघळले. मुकुंदराव पुन्हा म्हणाले, "तुम्ही कवाईत करा. सरळ उभे राहा. शिस्तीचें महत्त्व पटवा.

शरीर बळकट करा. परंतु बुद्धीला एखाद्या सबंध जातीच्या द्वेषाचें खाद्य देऊं नका. तुमच्यांतील कांही 'तूं माणूस आहेस की मुसलमान आहेस?' असा शब्दप्रयोग करूं लागले आहेत. 'माणूस आहे की जनावर आहेस?' असें म्हणण्याऐवजी हा प्रयोग! अरे, सारे मुसलमान का जनावरें? केवढा द्वेष! केवढा अधःपात! तुम्ही तरुण निर्मळ मनाचे, निर्मळ दिलाचे. हें सारें जरबट फेकून नवभारताचें उज्ज्वल भविष्य डोळ्यासमोर ठेवून उभे राहा."

ते तरुण प्रणाम करून उठले. मुकुंदरावांनी त्यांच्या पाठीवरून हात फिरविला.

✦ ✦ ✦

## रामदासला अटक : : २२

माया व रामदास यांचा सुखाचा नवसंसार सुरू झाला होता. रामपूर येथील स्वतःच्या वाड्याचा रामदासने सार्वजनिक दवाखाना केला. ती एक सुंदर संस्था झाली. संस्थेसाठी त्याने एक कायम निधि करून दिला. संस्थेमार्फत एक फिरता डॉक्टर ठेवण्यांत आला होता. त्याला रविवारची सुट्टी. उरलेले सहा दिवस त्याने खेड्यावरून हिंडावें, मोफत औषधें द्यावीं. शेतकऱ्यांस मोठाच आधार झाला. दीनबंधु रामदासला दुवा मिळूं लागला. रामदास स्वतः खेड्यापाड्यांतून हिंडे. शेतकऱ्यांचीं सुखदुःखें पाही. एकदा एके ठिकाणीं एक म्हातारी जात्यावर दळीत होती. रामदास चावडीवर पुढाऱ्यांशीं बोलत होता. माया गावांत हिंडत होती. त्या म्हातारीला तिनें दळतांना पाहिलें. एकटी दळीत होती. जातें जड येत होतें. तेथें माया गेली. "मी लावतें तुम्हांला हात. तुम्ही ओव्या म्हणा." असें म्हणून खरोखर दळूं लागली. "नको आई, तूं कशाला?" म्हातारी म्हणाली. "माझी आई तूं. माझी आई लांब आहे हजार मैलांवर. येथील आई तुम्हीच. आईला मदत करूं दे." माया म्हणाली. म्हातारी ओव्या म्हणूं लागली. रामसीतेच्या ओव्या. मायेला आनंद होत होता. आसपासच्या बायका पाहायला आल्या. इतक्यांत रामदास तेथे आला.

" तुला किती शोधायचें ? म्हटलें बंगालमध्यें पळालीस की काय ?" रामदास हसून म्हणाला.

" चल बरें रस्ता खणायला !" त्याने सांगितलें.

" चला, दाखवतें खणून." असें म्हणून माया उठली. म्हातारीहि उठली. मायेच्या कपाळावर घाम आला होता. म्हातारीने तो आपल्या पदराने पुसला.

" देवमाणसें आहांत तुम्ही." ती म्हणाली.

" खरीं देवमाणसें तुम्ही. तुमची पूजा करून, सेवा करून, आम्हांला थोडें पवित्र होऊं दे." माया म्हणाली.

रामदास व माया निघाली. मायेच्या हातून गावचा रस्ता दुरुस्त करण्याचा समारंभ व्हावयाचा होता. गावांतील तरुण तेथे जमले होते.

" ही घे कुदळ व मार चार घाव." रामदास म्हणाला.

मायेने पदर बांधला, ओचा खोचला. कुदळ घेऊन ती खणूं लागली. कठिण होता रस्ता, तो का खणला जातो ?

" पुरे आता. आम्ही करतों काम. टिकमने खणलें पाहिजे." एक तरुण म्हणाला.

" हें कांही स्वयंपाकघर नाही. पळीच्या दांड्याने सारवण्याआधी खरपुड्या काढतेस तसें नाही तेथें. चल आता." रामदास म्हणाला.

अशा सुंदर रीतीने दोघांचा वेळ जात होता.

एके दिवशीं रामदास पावसांतून आला. पागोळ्यांचें पाणी त्याने हातांत आणून तें मायेवर उडवलें. माया रागावली. " हें काय कांही तरीच ? वेड तर नाही ना लागलें ?" ती म्हणाली. " तूं रागावलीस म्हणजे बरें वाटतें. परंतु फार नको हो रागावूं. नाही तर स्वयंपाक मला करायला लागायचा." तो म्हणाला. माया एकदम गंभीर झाली. तिचें लक्ष कोठें तरी दूर गेलें. रामदास तिच्या चेहऱ्यावरील फरक पाहात होता.

" काय झालें माये ?" त्याने विचारलें.

" मला प्रद्योतची आठवण झाली." माया म्हणाली.

" माया, तूं महाराष्ट्रांत आलीस म्हणून तुला वाईट वाटतें का ?" रामदासने प्रश्न केला.

"काय हें विचारतां? तुम्ही पुरुष की नाही निष्ठुरच. प्रद्योतची आठवण होणेंहि का पाप आहे? मी माणूस नाहीं? भावाची आठवण नसती का मला आली?" माया बोलली.

रामदास जरा खिन्न व गंभीर होऊन निघून गेला. मायाहि अश्रुसिंचन करीत बसली. रामदासाने हळू येऊन डोळे पुसले. "कशाला पुसतां डोळे? आधी रडवायचें व मग डोळे पुसायचे. मायेचें कोणी नाही, कोणी नाही." असें म्हणून तिला अधिकच हुंदका आला. तिने आपली मान रामदासाच्या खांद्यावर ठेवली. त्याने तिला शांत केलें.

त्या दिवशीं रामदास बराच दूर जाऊन हिंडून आला होता. जेवून तो पडला. परंतु त्याच्या पायांची मनस्वी आग होत होती. माया सर्व आटोपून आली तो रामदासाचे डोळे उघडेच.

"नेहमीप्रमाणे अंगावर शाल घालायला आलें होतें. आज झोप नाही वाटतें येत?" तिने विचारलें.

"झोपेंतच अंगावर शाल घालावी व जागेपणीं घालूं नये असा बंगाली कायदा आहे वाटतें?" त्याने विचारलें.

"बंगाली कायदा महाराष्ट्रांत कोण चालू देणार?" ती म्हणाली.

"माया, पायांना थोडें दूध चोळतेस का? सारखी आग होत आहे." तो म्हणाला.

"चोळतें हो." असें म्हणत माया गेली. ती दूध घेऊन आली. रामदासचा पाय मांडीवर घेऊन ती दूध चोळूं लागली.

"किती पटापट जिरतें आहे दूध! पायांत नव्हतेंत वाटतें घातलेंत? पायांत घातल्याशिवाय जात जाऊं नका म्हणून कितीदा सांगितलें. हट्टी आहांत तुम्ही." ती म्हणाली.

"मग मार मला." तो म्हणाला

"लहान असतात तर मारलें असतें." ती म्हणाली.

"होणार आहें लवकरच लहान. आणखी चार पांच महिन्यांनी. मग तुझ्या पायांवर लोळेन, हातांत खेळेन. या मोठ्या रामदासावर रागावलेली असलीस म्हणजे त्या छोट्या रामदासाच्या गालांवर चापट्या बसून ते लाल होतील." रामदास म्हणाला.

"कांही तरी बोलतां." ती म्हणाली.

"माया, पुरे. कोणी तरी हाका मारते आहे. जा, दार उघड. जा." तो म्हणाला.

माया बाहेर आली. तिने दार उघडलें. तो तेथे कांही पोलिस व स्वत: फौजदार उभे. माया चकित झाली.

"कोण पाहिजे ?" तिने विचारलें.

"दीनबंधु रामदास." फौजदार म्हणाले.

"कांही काम का आहे ? बरें नाही वाटत म्हणून जरा पडले आहेत." ती म्हणाली.

"त्यांच्यावर वॉरंट आहे. त्यांना अटक करण्याचें कटूकर्तव्य मला करावयाचें आहे. दुर्दैवी माझे हात." तो म्हणाला.

पोलिस व फौजदार आलेली वार्ता गावांत तात्काळ गेली. गावांतील स्त्री, पुरूष, मुलें सर्वांची तेथे गर्दी झाली. आश्रमांतून दयाराम, पार्थ, चुडामण तेथे आले. रामदासहि उठून बाहेर आला. फौजदार, पोलीस आंत येऊन बसले. रामदासने वॉरंट पाहिलें. राजद्रोह, खून करणें वगैरे कलमांखाली अटक होती.

"ही काय भानगड ?" रामदासने विचारलें.

"आम्हांला तरी काय माहीत ?" फौजदार म्हणाला.

"शेतकऱ्यांचे रस्ते करणारा, त्यांच्या विहिरी बांधून देणारा, त्यांच्या जमिनी परत देणारा, त्यांच्यासाठी दवाखाने घालणारा, त्याला का अटक ? तो अपराधी ?" गावांतील म्हातारे चिमाआप्पा म्हणाले.

"सरकारला जमीनदार आवडतात, जमिनी देणारे आवडत नाहीत." दयाराम म्हणाला.

"बरें चला. निघा." फौजदार म्हणाले.

"खरेंच का नेणार यांना ?" माया रडत म्हणाली.

"आम्ही हुकमाचे बंदे." फौजदार म्हणाले.

"ही बंगाली बाधा आहे. बंगाली मुलीमुळे सरकारला संशय आला. ब्रिटिश सरकार आम्हांला सुखाचें लग्नहि नाही का करूं देणार ? बंगालच्या

पाठीमागे नेहमीच का हात धुऊन लागणार ? माझा दुर्दैवी बंगाल." ती दुःखाने म्हणाली.

"भाग्यवान बंगाल." दयाराम म्हणाला.

"माया, रडूं नको. वंगकन्येला रडणें शोभत नाही. दयाराम, तूं आहेसच. मुकुंदराव, मोहन यांना कळेलच. शिवतरला जाऊन बाबांना व आईला तूं धीर दे. माया, तूं घरीं सविस्तर पत्र लिही. चिमाआप्पा वगैरे आहेतच तेथें. या मायबहिणी आहेत. उगी. रडूं नको. चला फौजदारसाहेब." रामदास शांतपणें म्हणाला.

दयारामने येरवडाचक्र व सुंदर पेळू आणून दिले. मायेने घरांतून कपडे आणून दिले. घोंगडी वगैरे सारें दिलें.

"ही अंगावर असूं दे हं." ती स्फुंदत म्हणाली.

"हो. तें संरक्षण आहे. तें सर्वस्व आहे." रामदास म्हणाला.

फौजदार, पोलिस रामदासला घेऊन गेले. दयाराम थोड्या वेळाने आश्रमांत गेला. माया शून्य दृष्टीने पाहात खिडकीशीं उभी होती.

✦ ✦ ✦

## अमर रात्र : : २३

त्या दिवशीं मुकुंदराव मंगरूळ गावीं होते. एका गरीब शेतकऱ्याच्या घरावर जप्ती येणार होती. तो सावकार अति निष्ठुर होता. त्याला न्याय-नीति माहीत नव्हती. मुकुंदराव त्याला भेटले होते. शेतकऱ्याची सर्व स्थिति त्यांनी त्याला सांगितली होती. परंतु सावकार नुसता हसला. मेलों तरी चालेल, पण ही जप्ती होऊं द्यायची नाही असें मुकुंदरावांनी मनांत ठरविलें होतें.

त्या शेतकऱ्याच्या दारांत ते रामनाम जपत बसले. जप्तीवाले आले. मुकुंदराव त्यांना आंत जाऊं देईनात. ते तेथे उभे राहिले.

"अहो, हा कायदा आहे. कायदा आहे तोपर्यंत असेंच चालणार. तुम्ही करा क्रांति, बदला कायदे. व्हा दूर. समजूतदार लोक तुम्ही. लोकांचे पुढारी

ना व्हायचें आहे तुम्हांला ? मग असें करून कसें चालेल ? " कारकून म्हणाला.

मुकुंदराव स्तब्ध होते. पाटील वगैरे त्यांना ओढूं लागले. मुकुंदराव प्रतिकार करूं लागले.

"अहो, हें पोरासारखें काय चालवलें आहे तुम्हीं ? ही एक जप्ती नाही झाली म्हणून देशांतील लाखो जप्त्या का थांबणार आहेत ?" सावकाराचा गुमास्ता म्हणाला.

"आधी वीज एकलें." मुकुंदराव म्हणाले.

"तुम्ही निघा येथून. सारे चोर. खबरदार मुकुंदरावांच्या अंगाला हात लावाल तर." एक तेजस्वी तरुण पुढें येऊन म्हणाला.

"तुरुंगांत जायचें आहे वाटतें ?" पाटलाने विचारलें.

"फाशीं जायचें आहे." तो म्हणाला.

दुसरेहि शेतकरी आले. तेथे गर्दी होऊं लागली.

"तुम्ही सारे शांत रहा." मुकुंदराव म्हणाले.

"त्यांना शांत राहा सांगतां, आणि तुम्ही येथे आडमुठेपणा करतां." गुमास्ता म्हणाला.

"कोणाला रे खाटका आडमुठा म्हणतोस ?" धावत येऊन एका तरुणाने विचारलें.

"माझ्यावर तुमचें प्रेम असेल तर तुम्ही सर्व दूर रहा. शांतपणें जें कांही होईल तें पाहा. आपणांला शिव्या देण्याची जरुरी नाही. मला ओढीत फरफटत नेऊं दे. तें मला पाहिजे आहे." मुकुंदराव म्हणाले.

गुमास्ता जरा गोंधळला. परिस्थिति कदाचित् अधिकच बिकट होईल हें त्याने हेरलें. त्याने बरोबरच्या सरकारी लोकांस दूर बोलावून कांही खलबत केलें. ती सारी मंडळी निघून गेली, हसत हसत निघून गेली.

परंतु मुकुंदराव का त्या गावीं नेहमी राहणार होते ? त्यांना सतरा ठिकाणीं कामें. सर्वत्र त्यांचें हिंडणें फिरणें, सर्वत्र प्रचार. एक वेळचें मरण जरा दूर गेलें. तें मरण टळणार होतें थोडेंच ? मुकुंदरावांना अटक होण्याचाहि संभव होता.

" तुम्ही जाल' देवा व ते राक्षस पुन्हा येतील." शेतकऱ्याची बायको येऊन म्हणाली.

" हे तरुण मरायला उभे राहतील." मुकुंदरावांनी आश्वासन दिलें.

दुपारीं मुकुंदराव गावांतच होते. तो कांही तरुणांनी रामदासला पकडून नेल्याची वार्ता आणली.

" कोणीं सांगितलें?" त्यांनी विचारलें.

" तीं सरकारी माणसेंच बोलत होतीं. 'त्या रामदासला पकडलें. आता यांनाहि सरकार पकडील. फार चावटपणा चालवला आहे यांनी' असें चावडीवर बोलत होते." एक तरुण म्हणाला.

" धरपकडीला तयार राहा. मरणाला तयार राहा. भारतीय तरुणांची लौकरच सत्त्वपरीक्षा होईल." मुकुंदराव भराभर बोलूं लागले.

" करूं जिवाचा धडा, फोडूं साम्राज्यशाहीचा घडा."

" त्याला गेला आहे तडा, आधींच कोणी मारला आहे खडा."

" सारा किसान राहील खडा, घेईन स्वातंत्र्याच्या गडा."

ते तरुण काव्य करूं लागले. स्वातंत्र्याचें संगीत त्यांच्या रोमरोमांतून नाचूं लागलें.

" मी जातों. पुन्हा कधी भेटेन देव जाणे." मुकुंदराव त्या तरुणांना म्हणाले.

" तुम्हांला भेटायला तुरुंगांत येऊं, वर स्वर्गांत येऊं." ते म्हणाले.

मुकुंदराव निघाले. बैलांना फार टोचतात म्हणून ते बैलगाडींत बसत नसत. " तुम्ही बैलांना फार टोचतां, फार मारतां. बैलांना जोपर्यंत तुम्ही टोचता तोपर्यंत साम्राज्य सरकार तुम्हांला टोचील." असें ते म्हणत. ते पायीं नेहमी जायचे. परंतु आज बराच पल्ला गाठावयाचा होता. ते झपझप जात होते. क्रांतीचीं गाणीं गात जात होते. त्या गाण्यांच्या पंखांनी जण ते उडत जात होते. ते चालत आहेत का उडत जात आहेत! मुकुंदरावांच आत्मा धुळींतून चालण्यासाठी जणु नव्हता. तो चिदंबरांत उडण्यासाठी होता. त्यांच्या जीवनांत ओढाताण होती. आत्म्याची उसळी वर होती परंतु ही देहाची खोळ खाली ओढी. आत्मा उंच उडूं बघे. परंतु देहाचें वजन

खाली खेची. जीवनांतील ती ओढाताण, ती धडपड त्यांच्या त्या चालण्यांत दिसत होती.

त्यांनी प्रथम रामपूरचा रस्ता घेतला. परंतु कांही मैल चालून गेल्यावर त्यांचा बेत बदलला. रामपूरपेक्षा धनगावलाच जावें, त्यांच्या मनांत आलें. रामदासला पकडून धनगावलाच नेलें असण्याचा अधिक संभव होता. रामपूर का धनगाव? देहपूर सुटलें नाही, तोवर कोठलें रामपूर?

त्यांनी पावलें वळविलीं. धनगावकडे ते निघाले. दहा कोस जावयाचें होतें. तिसरा प्रहर होत आला होता. ते खूप वेगाने जात होते. एकदम गार वारा सुटला. पावसाचीं चिन्हें दिसूं लागलीं.

मुकुंदरावांच्या छातींत एकाएकीं कळ आली. बरेच दिवसांनी ती कळ आली. ते एकदम बाजूला मटकन् बसले. भूमातेच्या मांडीवर लोळले. छाती घट्ट धरून ते पडून राहिले. पाऊस जोराने येणार होता. चिंता करून काय होणार? मुकुंदराव मुकाटयाने डोळे मिटून पडून राहिले.

दुरून घोडयांच्या टापांचा टापटाप आवाज ऐकूं आला. आनंदमूर्ति येत आहेत की काय? त्यांनाहि रामदासच्या अटकेची वार्ता कळली असेल व भरधाव येत असतील. दुसऱ्या कोणाचा असणार घोडा अशा वादळांत? मुकुंदराव बसते राहिले व आवाज ऐकूं लागले. आवाज जवळ जवळ येत होता. होय, आनंदमूर्तिच होते ते. तो पाहा त्यांचा मंदील पाठीवर उडत आहे. जणु पहिले बाजीराव, जणु विश्वासराव.

घोडेस्वार एकदम थबकला. तो खाली उतरला. मुकुंदरावांना बघून आनंदला, चकित झाला.

"तुम्ही येथे कसे?" आनंदमूर्तींनी विचारलें.

"धनगावला जात आहें. रामदासला अटक झाल्याचें कळलें. गेलेंच पाहिजे. पाऊस येईल या भीतीनें वेगाने जात होतों. त्यामुळे छातींत कळ आली." मुकुंदराव म्हणाले.

"आता कशी आहे कळ? छाती चेपूं का हलक्या हाताने? का जरा पडता?" आनंदमूर्तींनी विचारलें.

"आता बरें वाटतें." मुकुंदराव म्हणाले.

आनंदमूर्तींनी मुकुंदरावांनां घोड्यावर बसावयास मदत केली. मुकुंदराव दोन्ही हातांनी घोड्यावर धरून बसले. पाठीमागे आनंदमूर्ति बसले. त्यांनी एका हाताने लगाम धरला, एका हाताने मुकुंदरावांस धरून ठेवलें. पुढें दोन्ही हातांनी लगाम धरून ते हात मुकुंदरावांच्या वक्ष:स्थळावर ठेवले.

"घाबरूं नका. मीं नीट धरून ठेवलें आहे. पडूं देणार नाही." ते म्हणाले.

: घोडा भरधाव जात होता. वरून जलधारा भरधाव येऊं लागल्या. दोघे भिजून ओलेचिंब झाले.

"रामदासला अटक झाली म्हणून आकाश रडत आहे बहुधा. माया घरीं रडत असेल. शांता रडत असेल. रामदासचे आई-बाप रडत असतील." आनंदमूर्ति म्हणाले.

"रडत नाहीत. देशासाठीं पकडला गेला म्हणून साखर वाटतील." मुकुंदराव म्हणाले.

"आता पिटाळतों घोडा. सावध रहा." असें म्हणून आनंदमूर्तींनी घोड्याला दौडविलें. वाऱ्यासारखा तो वारू निघाला. जणु पाण्याचा लोंढाच जोराने चालला होता, जणु बिजली होती.

"पडेन, पडेन मी. घट्ट धरा." मुकुंदराव घाबरून म्हणाले.

"पडलों तर एकदम पडूं. परंतु मी पडूं देणार नाही. त्या चढणीवर आता चढूं." आनंदमूर्ति धीर देत म्हणाले.

दुरून धनगावचे दिवे दिसूं लागले.

"तें पाहा धनगांव. दिसला प्रकाश." मुकुंदराव म्हणाले.

"तुम्ही आता कोठे जाणार रात्री ?"

"आपण मोहनच्या खोलीकडे आधी जाऊं. त्याला सारी हकीगत विचारूं." मुकुंदराव म्हणाले.

"माझ्या खोलींत येतां ? कोरडें धोतर नेसा, कोरडा शर्ट घाला."

"तुम्ही तर पायजमा घालतां. तुमच्याजवळ आहे का धोतर ?"

"हो."

"आहे का माझ्या अंगचा सदरा ?"

"जुना आहे. होईल बघा."

"चला मग आधी तुमच्या खोलींत."

आनंदमूर्तींनी घोडा पुन्हा दौडविला. बरीच रात्र झाली होती. त्यांच्या खोलीकडच्या रस्त्यावर कोणी चिटपाखरूहि नव्हतें. पावसांतून कोण बाहेर पडणार? कोणाला आहे मुसळधार पावसाचें वेडें प्रेम?

खोली उघडण्यांत आली. मेणबत्ती लावण्यांत आली.

"तुम्ही मेणबत्ती वापरतां वाटतें?"

"हो. मेणबत्ती माझें ध्येय. मेणबत्ती लहानशी असली तरी स्वतः जळून वितळून जगाला थोडा का होईना प्रकाश देते."

"हें घ्या धोतर."

"आणि सदरा?"

"तो बराच जुना आहे. पुष्कळ वर्षांपूर्वीचा आहे. पाहा झाला तर; हा घ्या."

मुकुंदराव धोतर नेसले. त्यांनी तो सदरा हातांत घेतला.

"याचा रंग गेला वाटतें?"

"हो. एके काळीं मी संन्याशासारखीं भगवीं वस्त्रें वापरीत असें. परंतु पुढे सोडलीं. संन्याशाच्या वृत्तीचें स्मरण राहावें म्हणून ती आठवण मीं ठेविली आहे." आनंदमूर्ति म्हणाले.

"सदरा ठीक झाला."

"जरा घट्ट होतो नाही?"

"असूं दे. रात्रभर तर घालायचा."

"तुम्ही नेसा ना कोरडें काही."

"तुम्ही जरा बाहेर छत्री घेऊन घोड्याजवळ उभे राहा. मी तोवर घालतों कपडे."

"तुमचे पायजमेबियजमे. लाज वाटत असेल!"

मुकुंदराव बाहेर छत्री घेऊन उभे राहिले. आनंदमूर्तींनी दार लावून घेतलें. ट्रंकेंतून कपडे काढून परिधान केले.

"झालें, या आंत." आनंदमूर्ति हळूच म्हणाले.

मुकुंदराव आंत आले तो तेथे कोणी दिसेना. तेथे दाराआड कोणी तरी लपलें होतें. कोण होते ते? मुकुंदराव तटस्थ झाले. ध्यानस्थ झाले. अनिमिष

नेत्रांनी ते बघूं लागले. शेवटीं त्यांनी डोळे मिटले. मान खाली घातली. कोण होतें तेथें ? तेथे एक दिव्य देवता उभी होती. तलम खादीचें हिरव्या रंगाचें पातळ नेसून ती तेथे उभी होती. केस पाठीवर मोकळे सोडलेले होते. तोंडावर अपार प्रसन्नता होती व प्रेमाची कोवळीक होती

"आनंदमूर्ति, मी जातों. तूं पुन्हा पहिली आनंदमूर्तिच हो. तरच मला आनंद मिळेल."

असें म्हणून मुकुंदराव घरांतून त्या खोलींतून बाहेर पडले व पळतच निघाले, ते मोहनकडे आले. तो तेथे कुलूप ! कोठे गेला मोहन ? मायेचें समाधान करायला गेला का ?

मुकुंदराव पुन्हा निघाले; तो तिकडून मोहन येत होता.

"काय रे मोहन, कोठे गेला होतास ?"

"शांता प्रसूत झाली. पोट दुखूं लागलें म्हणून तिला दवाखान्यांत नेलें. तेथेच आहे. मुलगी झाली."

"क्रांति जन्माला आली. आजची केवढी काळरात्र ! अशा काळरात्रीच क्रांति जन्मते. काळीकुट्ट रात्र. जणु कधी न संपणारी अमर रात्र." मुकुंदराव म्हणाले.

✦ ✦ ✦

## तूं माझा भाऊ हो : २४

मायेला काय करावें समजेना. घरीं वडिलांना तार करावी असें तिच्या मनांत आलें. परंतु उगीच घाबरतील असें पुन्हा मनांत येऊन तिने तार केली नाही. सर्व हकीगतीचें पत्र तिनें लिहिलें. येथे धीर देण्यास मुकुंदराव, मोहन, दयाराम, आनंदमूर्ति किती तरी माणसें आहेत, घाबरूं नका; परंतु तिकडे कांही चौकशी करा. धागादोरा कांही सापडतो का पाहा वगैरे तिनें लिहिले होतें.

रामदासचा भयंकर अपराध म्हणून त्याला जामिनावर सोडण्यास सरकार तयार होईना. धनगावच्या लॉकपमध्ये रामदास होता. माया आता धन-

गावला रहावयास आली. मुकुंदरावांच्या खोलीशेजारींच तिने दोन खोल्या घेतल्या होत्या. ती रोज पतीला जेवण घेऊन जाई. तिला वाईट वाटे. पति तिला धीर देई. आनंदमूर्तिहि मायेची करमणूक करीत तिला हसवीत.

घरीं पत्र मिळाल्यावर रमेशबाबू सचिंत झाले. बंगालमध्ये असतांना रामदास क्रांतिकारकांत सामील झाला होता की काय ?

रमेशबाबू अक्षयकुमारांकडे आले. अक्षयकुमार चैतन्यचरित्रामृत वाचीत होते. त्यांनी मित्राचें स्वागत केलें. परंतु मित्राचा आज हसरा चेहरा नव्हता. रमेशबाबू म्हणजे जरा रंगेल माणूस. तोंडांत सदा पान असायचें. आनंदी दिसावयाचे. एखादें गाणें गुणगुणत यावयाचे. परंतु आज तोंडांत तांबूल नव्हता, ओठांवर गाणें नव्हतें, चेहऱ्यावर आनंदाची सहज छटा नव्हती.

"आज असे कां बरे दिसता ? आणि आता अवेळीं कां बरे आलेत ? मायेकडे खुशाल आहे ना ? प्रद्योतचा पत्ता नाही. तुमची माया तरी सुखी असू दे." अक्षयबाबू म्हणाले.

रमेशबाबूंनी मायेचें पत्र मित्राच्या हातीं दिलें. मित्राने वाचलें. दोघे स्तब्ध व सचिंत बसले.

"काय आता उपाय ? मी जाऊं का मायेकडे ? तिला धीर दिला पाहिजे. पर प्रांतांत एकटी रडत असेल बिचारी." रमेशबाबू जवळजवळ रडतच बोलले.

"तुम्ही इतक्यांत नका जाऊं. तेथे तिला धीर देणारीं माणसें आहेत. ते मुकुंदराव आहेत आणि माया धीराची मुलगी आहे. रडकी असती तर इतकी लांब जातीच ना." अक्षयबाबूंनी सांगितलें.

"मग का स्वस्थ राहावयाचें ? जें जें होईल तें तें नशिबावर सोपवून बसावयाचें ? तुम्हीच काय तें सांगा. तुम्हीहि दुःखी व मीहि दुःखी." रमेशबाबू म्हणाले.

"माझ्या मनांत एक विचार आला आहे. कलकत्त्यास गुप्त पोलिस खात्यांत एक बडा अधिकारी आहे. तो आमच्या शाळेंत लहानपणीं होता. मी बराच पुढे. तो मागे. तरीहि आम्ही एकमेकांस ओळखीत असूं. त्याला जाऊन भेटावें. बघावें काय होतें तें." अक्षयबाबू म्हणाले.

"कांही हरकत नाही. आजच निघूं या." रमेशबाबू म्हणाले.

दोघे मित्र कलकत्त्यास आले. त्या बड्या अधिकाऱ्याच्या घरचा पत्ता मिळवून सायंकाळीं ते त्या घरीं गेले. त्यांनी घंटा वाजविली. एक नोकर बाहेर आला.

"काय पाहिजे ?" त्याने विचारलें.

"आनंदमोहनबाबू घरीं आहेत का ?"

"नाही. ते नऊनंतर येतील. कांही निरोप आहे का ?"

"ते येईपर्यंत आम्ही येथेंच थांबतों. मी त्यांचा जुना स्नेही आहें." अक्षयकुमारांनी सांगितलें.

"मी आंत विचारून येतों" असें म्हणून नोकर गेला व पुन्हा परत आला. "बाईसाहेबांनी दिवाणखान्यांत बसायला सांगितलें आहे." तो म्हणाला. दोघे मित्र आंत येऊन बसले. तेथे मोठें टेबल होतें, त्यावर कागदच कागद होते. वर्तमानपत्रें होतीं. रमेशबाबूंनी एक उचललें. रामदासाच्या अटकेची त्यांत हकीकत होती. तांबड्या पेन्सिलीच्या खुणा होत्या. इतक्यांत बाईसाहेब बाहेर झाल्या. आनंदमोहनांनी लग्न बरेंच उशिरा केलें होतें. "घरीं यायला उशीर होईल. मुलें जेवत आहेत. जेवण व्हायचें असेल तर चला." त्यांनी सांगितलें. अक्षयबाबूंनी जेवण वगैरे नको सांगितलें. "तुम्ही त्यांचे जुने मित्र, कदाचित् बरोबर जेवाल." असें जरा हसून त्या म्हणाल्या. परंतु हसण्याची त्यांना सवय नव्हती किंवा त्यांचें हसणें मारलें गेलें असावें.

इतक्यांत मुलांचें भांडण आंत सुरू झालें व माता तें सोडविण्यासाठीं निघून गेली. मुलें जेवून बाहेर आलीं. पाहुण्यांकडे निरखून पाहूं लागलीं. नरेंद्र जरा धीट होता. तो रमेशबाबूंजवळ गेला.

"काय वाचतां तुम्ही ?" त्याने विचारलें.

"धरपकड वाचतों आहें." रमेशबाबू म्हणाले.

"महाराष्ट्रांतील कोणी पकडला गेला आहे व त्याचें लग्न बंगाली मुलीजवळ लागलें होतें. का हो ! बंगाली मुलगी तिकडे कशी गेली ? ती का कट करायला गेली ? " त्याने विचारले.

"तिचें त्याच्यावर प्रेम असेल." महेश म्हणाला.

"इतक्या लांब प्रेम ?" त्याने शंका विचारली.

" काय म्हटलेंस ऐकलें मीं. आल्यावर सांगतें हो. चुरुचुरु बोलायला अलीकडे शिकला आहे. मार पाहिजे आहे चांगला याद राहीलसा " आई मोठ्याने म्हणाली.

तीं कोकरें घरच्या कोंडवाड्यांत गेलीं. आपण तुरुंगांत तर नाही ना असें आलेल्या मित्रांस वाटूं लागलें. जुनी ओळख पटते की नाही, नीट बोलतात की नाही, असा संशय मनांत आला. शेवटीं एकदाचें देवदर्शन झालें. आनंद-मोहन आले. पत्नी बाहेर आली. तिने हातांतील हॅट घेऊन ठेवली. त्यांनी कोट काढून दिला तो ठेवला. ते आंत गेले. साहेबी पोषाख सर्व काढून बंगाली पोषाखांत बाहेर आले. पुढे निऱ्या सोडलेलें धोतर, अंगांत एक सदरा व शाल असे बाहेर आले.

" येतों, बसा हं. हातपाय धुऊन येतों." असें सांगून ते गेले. साहेबी पोषाख जाऊन बंगाली पोषाख आला म्हणून मित्रांना आशा वाटूं लागली. घरांत शिस्तीचें साम्राज्य अधिक असेल एवढेंच आता त्यांना वाटलें. आनंद-मोहन बाहेर आले, आरामखुर्चीत बसले. विजेचा पंखा सुरू झाला.

" आपण कोठले ?" त्यांनी प्रश्न केला.

" पुष्कळ वर्षांनी मी आपणांस भेटत आहें. आपण एका शाळेंत होतों. वादविवादोत्तेजक सभेंत मी बोलत असें. माझें नांव अक्षयकुमार. शाळेंत ते एक विक्षिप्त व्यायामशिक्षक होते. आठवतें का ?" अक्षयकुमारांनी विचारलें.

" आठवलें, सारें आठवलें. त्या व्यायामशिक्षकांस आपण रस्त्यांत नमस्कार करीत नसूं म्हणून ते एके दिवशीं रागावले तर सर्व मुलांनी रस्त्यांत, या गल्लींतून, त्या गल्लींतून पुढे येऊन, ' मास्तर नमस्कार, मास्तर नमस्कार ' सारखें करून त्यांना कसें भंडावलें ? अक्षयबाबू, किती दिवसांनी आपण भेटत आहोंत ! त्या लहानपणच्या जगांत जात आहोंत ! नाही तर हें रोजचें माझें जिणें, यमदूताचें जिणें. " ते म्हणाले.

" आनंदमोहन, हे माझे मित्र रमेशबाबू. आम्ही एकाच गावीं राहतों. यांना एकच मुलगी व मला एकच मुलगा. " ते म्हणाले.

" मग दोघांचें लग्न लावलेंत की काय ?" ते हसून म्हणाले.

" आमची तशी होती इच्छा. " रमेशबाबूंनी सांगितलें.

"परंतु मुलांनी ऐकलें नाहीं, होय ना? अलीकडचीं मुलें फारच व्रात्य. मीं माझ्या मुलांना कडक शिस्तींत ठेवलें आहे. हूं की चूं करणार नाहीत. लहानपणापासून जरब असली म्हणजे सारें नीट सुरळीत चालतें." आनंदमोहन म्हणाले.

"एकुलती एक मुलगी. लाड पुरवीत होतों. शांतिनिकेतनांत ठेवली शिकायला." रमेशबाबू सांगूं लागले.

"झालें मग. शांतिनिकेतनांत पूर्ण स्वातंत्र्य. म्हणे सृष्टीच्या पवित्र सान्निध्यांत मुलें शिकतात. कांही तरी मोठ्या लोकांचीं खुळें. पूर्वी का कोणी शिकले नाहीत? नवीन खूळ काढायचें व त्याला अगडबंब क्रांति नांव द्यावयाचें." आनंदमोहनांचें व्याख्यान सुरू झालें.

"तेथे एक महाराष्ट्रीय तरुण होता. त्याच्यावर तिचें प्रेम बसलें. शेवटीं निरुपाय म्हणून त्याच्याशीं दिलें लग्न लावून." रमेशबाबू दुःखाने म्हणाले.

"तोच हा तरुण की काय? रामदास का त्याचें नांव?" साहेबांनी विचारिलें.

"हो. त्याला पकडण्यांत आलें आहे. म्हणून तुमच्याकडे आलों आहें. कांही करा, परंतु मुलीचें सौभाग्य वाचवा. म्हातारपणीं नाही नाही तें नको पाहृला." रमेशबाबू हात जोडून म्हणाले.

आनंदमोहन गंभीर झाले, ते स्तब्ध बसले.

"आरोप तरी काय आहे त्यांच्यावर?" अक्षयबाबूंनी प्रश्न केला.

"भयंकर आरोप. ब्रिटिश राज्य उलथून टाकण्याचा कट; बाँब, पिस्तुलें जमविण्याचा कट. मी तरी काय करूं? एखाद्या मुलीचें सौभाग्य वाचवण्याचें पुण्य लाभत असेल तर तें का मी गमावीन?" साहेब म्हणाले.

"परंतु तो तरुण तसा नव्हता." रमेशबाबू म्हणाले.

"काय नेम सांगावा?" साहेब उत्तरले.

"तो खादीचा भक्त आहे. चरख्यावर सूत कातती. त्याच्या घराशेजारीच सुंदर आश्रम आहे. त्या आश्रमाला त्याचीच मदत असते. असा कुठून हिंसेकडे कसा वळेल?" रमेशबाबूंनी विचारलें.

"अहो, शंका येऊं नये म्हणून हें खादीचें सारें सोंग करावयाचें.

हें पाहा, भरपूर पुरावा आहे माझ्याजवळ. बंगालमधील दहशतवाद्यांकडून त्यांना गेलेलीं पत्रें माझ्याजवळ आहेत. तुम्हांला दाखवलीं तर तुम्ही सुद्धा निःशंक व्हाल. " अधिकारी म्हणाले.

" परंतु त्याचें उत्तर इकडे कोणाला आलेलें आहे का? पत्रें इंग्रजींत आहेत की बंगालींत ? " अक्षयबाबूंनी शंका काढली.

" अक्षयबाबू, तुम्ही माझे लहानपणीचे मित्र. सारें तुमच्यासमोर मांडतों. " असें म्हणून आनंदमोहनांनी पुराव्याचीं तीं पत्रें त्यांच्यासमोर ठेवलीं.

" माझ्याकडेच आहे हें काम. मलाच सर्व पुरावा पुरवायचा आहे. अद्याप पूर्ण तपास झाला नाही. " ते म्हणाले.

दोघे मित्र तीं पाहूं लागले. बंगालमधून गेलेलीं, बंगालकडे आलेलीं पत्रें त्यांनी सूक्ष्म रीतीने पाहिलीं. त्यांतील हस्ताक्षर वगैरे पाहिलें. अक्षयकुमार एकदम उठून बाहेर गेले.

" आहेत ना पत्रें ? " आनंदमोहनांनी विचारलें.

" परंतु येणाऱ्या व जाणाऱ्या पत्रांतील हस्ताक्षर एक दिसतें. तुम्ही नीट पाहा. कांही तरी गोंधळ आहे. " रमेशबाबू म्हणाले.

" अक्षयकुमार कोठे आहेत ? अक्षयबाबू ! " त्यांनी हांक मारली.

अक्षयबाबू आंत आले. त्यांचा चेहरा गंभीर होता.

" तुम्हांला काय वाटतें ? " रमेशबाबूंनीं विचारलें.

" सांगा. मत सांगायला काय झालें ? मला मदत होईल. " साहेब म्हणाले.

" आनंदमोहन, हीं सर्व पत्रें माझ्या मुलाचीं आहेत. प्रद्योतचें हें हस्ताक्षर. बिलकूल शंका नाही. प्रद्योतचें मायेवर प्रेम होतें. त्याचा हा सूड आहे. सारा उलगडा झाला. रामदास निर्दोष आहे. अपराधी माझा मुलगा आहे. " अक्षयकुमार अतिदुःखाने बोलले.

" बरें. आधी जेवूं चला पोटभर. रिकाम्या पोटीं बुद्धि नीट चाल-णार नाही. चला, उठा. " ते म्हणाले.

तिघे मित्र जेवायला बसले. प्रद्योत मायेचें लग्न झाल्यापासून कसा बेपत्ता झाला आहे, तुला मी मरेपर्यंत त्रास देईन, वगैरे मायेला कसें म्हणे,–साऱ्या गोष्टी जेवतांना दोघा मित्रांनी आनंदमोहनांस सांगितल्या.

" वाचवावें पोरीच्या नवऱ्याला वांचवितां आलें तर." पत्नी म्हणाली.

" तूं नको सांगायला. तुझी बुद्धि चुलीजवळ ठेव. बाहेरून आलों तर हॅट ठेवावी, हातांतील काठी घेऊन ठेवून द्यावी; हीं कामें तूं आपली करीत जा. पुरुषांना अक्कल शिकवूं नये विचारल्याशिवाय." साहेब रागाने बोलले.

तिघे मित्र बाहेर आले. साहेब धूर सोडीत बसले. मित्रद्वयाने पान घेतलें.

" हें पाहा, मी त्या धनगावाला जातों. तुम्हांला मी तार करीन, नाही तर पत्र लिहीन. मीं बोलावलें म्हणजे तुम्ही यायचें. घाबरूं नका. मजेदार दिसते केस." आनंदमोहन म्हणाले.

" माझा जावईहि वांचवा व यांचा प्रद्योतहि वांचवा." रमेशबाबू म्हणाले.

" बरें, बरें. बघतों मी सारें. तुम्ही येथेच झोपतां का ? " त्यांनी विचारलें.

" आम्ही आता जातों. आम्हांला गाडी आहे. घरींहि काळजींत आहेत सारीं." रमेशबाबू म्हणाले.

" तेंहि खरेंच, मग तुमची निघण्याची वेळ झाली. चिंता नका करूं. तुमच्या प्रद्योतला माझी बहीण देऊन टाकूं. ती आज येथे नाही. या मित्राची मुलगी नाही तर या मित्राची बहीण. माझी सर्वांत धाकटी बहीण मोठी सुरेख आहे. बरें तें पुढें पाहूं."

दोघे मित्र गेले. साहेब थोडें पोचवायला जाऊन परत आले. बराच वेळ ते तो पत्रव्यवहार न्याहाळीत होते. शेवटीं ते उठले. " मला आताच्या आता जायचें आहे, समजलीस का ? माझी तयारी करून दे. ऐकलंस का ग ? निजली की काय ? हिला सतरांदा बजावलें आहे की, मी निजल्याशिवाय निजत जाऊं नको म्हणून." असें रागाने मोठ्याने बोलूं लागले. पत्नी डोळे चोळीत जरा घाबरत परत आली.

" निजली होतीस ना ? तडाके हवेत तुला त्या दिवसासारखे. तयारी कर माझी. मोठी गमतीची केस आहे. मी आताच निघतों. बघतेस काय अशी ? छडी हवी आहे वाटतें ? जांभया देत आहे; आळशी कुठली ! " ते बडबडत होते.

पत्नीने सारी तयारी करून दिली. आनंदमोहन निघाले.

" परत कधी येणार ? " तिनें भीत भीत विचारलें.

" आमचा नेम नसतो कशाचा म्हणून शंभरदा सांगितलें आहे. अगदी मठ्ठ आहेस. नुसती लठ्ठ. फटके हवेत." ते म्हणाले.

बिचारी पत्नी. ती कांही बोलली नाही. होता होईतों ती कधीच विचारीत नसे. उणाअधिक शब्द बोलत नसे. परंतु एखादे वेळेस चुकून तोंड उघडलें जाई व शिव्या खाव्या लागत.

आनंदमोहन निघून गेले.

धनगावच्या त्या टेकडीवर एक तरुण सायंकाळ संपून रात्र येऊं लागली तरी बसला होता. एकदम बंगाली गाणें तो गाऊं लागला. 'येतों, तुला मी भेटायला येतों. कोण तुला माझ्याजवळून हिरावून नेईल बघतों.' अशा अर्थाचें तें गाणें होतें. गाण्याच्या भरांत आपल्याजवळ कोणी दुसरें येऊन उभें आहे, याचें त्याला भानहि नव्हतें. गाणें संपल्यावर त्यानें जवळ कोणी आहे असें पाहिलें.

" घाबरूं नका. मी बंगालमधलाच आहें. किती तरी दिवसांनी बंगाली गाणें ऐकायला मिळालें. इकडे कोठे आलांत तुम्ही ?" त्या गृहस्थाने त्या तरुणास विचारलें.

" मी एक स्वैरसंचार करणारा मुसाफर आहें. माझ्या एका मित्राला येथे अटक झाली आहे. तो मित्र महाराष्ट्रीय आहे. त्याची पत्नी बंगाल-मधील आहे. तिला धीर देण्यासाठी मी आलों आहें." तो तरुण म्हणाला.

" चांगलें केलेंत."

" मी आता जातों. ती एकटी खोलींत रडत बसली असेल." असें म्हणून तो तरुण उठला व टेकडीवरून पळतच खाली उतरला.

माया खोलींत एकटी होती. आनंदमूर्ति नुकतेच येऊन गेले होते. मुकुंदराव कामगारांच्या सभेला गेले होते. शांतेची मुलगी क्रांति जरा आजारी होती. नाही तर ती आली असती. आरामखुर्चीत माया डोळे मिटून पडली होती. कोणी तरी हळूच दार उघडून आंत आलें. ती व्यक्ति मायेच्या आरामखुर्चीच्या पाठीमागे उभी राहिली. माया निजली आहे की काय त्याने वाकून पाहिलें. त्याचा कढत श्वासोच्छ्वास मायेला लागून ती एकदम डोळे उघडून पाहूं लागली. तो कोण तेथे उभा ?

" प्रद्योत, चोरासारखा येऊन काय करणार होतास ?"

"चोर मी नाही. चोर हा महाराष्ट्रीय भामटा, माझें चोरलेलें रत्न मी पुन्हा पकडणार होतों. माये, तूं माझी आहेस. हे तुझे ओठ माझे आहेत. हा माझा अमृताचा पेला त्याने पळविला." प्रद्योत पुढे सरकणार होता.

"खबरदार जवळ येशील तर. प्रद्योत, लाज नाही वाटत परांगनेला स्पर्श करायला ? " ती क्रोधाने थरथरत म्हणाली.

" तूं परांगना नाहीस. तूं माझी आहेस. लहानपणापासून मीं माझा शिक्का तुझ्यावर मारला आहे. तूं रागाने पाहिलेंस म्हणून मी जळणार नाही. पाषाणि, माझ्या सर्व आशांचें भस्म करावयास तुला कांही वाटलें नाही? आणखी रागाने पाहा. प्रद्योत भाजला जाणार नाही. एक बंगालकन्या महाराष्ट्रीय माकडाला मिठ्या मारीत आहे, हें आम्हांला बघवत नाही. प्राणावर उदार होणारे बंगाली तरुण--त्या तरुणांतील मी एक आहें. तुला महाराष्ट्रीय भुताशीं विलासचेष्टा मी करूं देणार नाही. तूं पाप केलेंस-स्वजन-द्रोहाचें पाप केलेंस. तुझ्या हातून तें पाप पुढे होऊं नये म्हणून मीं डाव रचला. त्याला अडकवलें. आतां तें माकड पडेल बंदिशाळेत. माया परत बंगालमध्ये चल; तूं माझी हो. " प्रद्योत थांबला.

माया दृष्टींतून अंगार वर्षत होती. सती पार्वतीसारखी जणु कोपाय-मान झाली होती. तिच्याहि भावना भडकल्या. तिचाहि ज्वालामुखी जागृत झाला व गर्जूं लागला.

"माकड, माकड. कोणाला रे म्हणतोस माकड? ते का माकड आहेत? त्यांचा महान् आत्मा आहे. सारा भारतवर्ष त्यांना आपला वाटतो. सर्व प्रांतांतील गुण घ्यावे, असें त्यांना वाटतें. तें तुमच्या वंगभूमींत, तुमच्या संस्थांतून राहिले. तुमच्या गुणांचें कौतुक करते झाले. महापूर आले तर स्वयंसेवक झाले. पूजादिवसांत वंगीय स्वयंसेवकसंघ घरीं गेले, पण हे काम करीत राहिले. अरे, ही दगडधोंड्यांची भूमि म्हणवूं नकोस. दगडां-तून देवमूर्ति निघतात. अरे, येथील मजुरांनी अंगांतील कपडे महापुराच्या वेळेला बंगालमध्यें पाठवले. त्या मजुरांच्या पायांची धूळ लाव. पवित्र हो. महाराष्ट्र ही त्यागभूमि आहे, पवित्र भूमि आहे. येथील अणुरेणु मला पवित्र वाटतो. रामरायाचे पाय या भूमीला लागले.

"एका भगिनीची अब्रू धुळींत मिळवूं पाहात आहेस, हा मात्र वंगीय

तरुण-तरुणींचा अपमान आहे. परस्त्रीला वाटेल तें बोलणें हा खरा त्यांचा अपमान आहे. त्यांना हें कळेल तर तुझे तुकडे करतील. बंगाली तरुणी तुला फाडून खातील. प्रद्योत, किती अमंगळ बोललास ! आणि माझ्या सौभाग्यावर घाला घालून काय मिळविलेंस ? माझ्या डोळ्यांतून अखंड अश्रुधारा चालाव्यात यांतच का तुझा आनंद ! कशाला श्रीरामकृष्ण, अरविंद, विवेकानंद, रवीन्द्र यांचीं पवित्र नांवें उच्चारितोस ?

"तूं त्यांना तुरुंगांत घातलें आहेस, तूं माझा भाऊ हो. मी तें सारें विसरेन. भ्रातृप्रेमांत सारें पाप धुऊन निघेल. त्यांच्या दवाखान्यांत मी सेविका होईन व ते सुटून येईपर्यंत त्यांचें स्मरण करीत अब्रूनें राहीन. माझ्या पोटांत बाळ वाढत आहे. त्याच्याकडे बघून दिवस नेईन. एक दिवस ते येतील. कदाचित् लौकरच येतील. प्रद्योत, नाही तुला दया येत ? नाही तुला बहिणीची करुणा येत ? तुला बहीण नाही, मला भाऊ नाही. माझी बहीण माया असें म्हण."

मायेने प्रद्योतच्या पाठीवर हात ठेवला. तो जणु अगतिक होऊन गेला होता. तिच्या खांद्यावर मान ठेवून तो रडूं लागला. तिने त्याला आरामखुर्चीत बसविलें. थोडया वेळाने भावना शांत झाल्या, प्रद्योत उठला व निघाला.

"कोठे जातोस भाऊ ?" मायेने विचारलें.

"माया, तुझ्या पायां पडूं दे. मला क्षमा कर. मी जातों व हें जीवन गंगेला अर्पण करतों." तो म्हणाला.

"प्रद्योत, भाऊ झालास तो का मरण्यासाठी ? भावाचा आनंद मला दे. पश्चात्ताप झाला की पुनर्जन्मच तो. हें शरीर फेकण्याची कांही जरूरी नाही. मन निराळें झालें की सारें निराळें. अक्षयबाबूंना आधार दे, आनंद दे. त्यांना किती दुःख होतें ! त्यांचें तुझ्यावर किती प्रेम ! खरें ना ? तुझा पत्ता नाही म्हणून ते रडत बसतात. जा त्यांना शांतव. घरीं जा. भाऊबीजेला बहिणीकडे येत जा. वेडें वेडें नको मनांत आणूं." माया त्याला प्रेमाने म्हणाली.

"मी हें तोंड बाबांना कसें दाखवूं ?" तो म्हणाला.

" मी तुझ्याबरोबर आलें असतें. परंतु येथे खटल्याचें काम आहे. कसें करूं ? " ती म्हणाली.

" माया, तुझ्या पतीला सोडवीन तेव्हांच आता घरीं जाईन. हीच प्रतिज्ञा. तुझे अश्रु थांबवीन तेव्हांच माझ्या पित्याचे अश्रु मी पुसूं शकेन. ताई, जातों मी. " तो म्हणाला.

" कोठे जातोस ? येथेच राहा. जेव. ताईच्या हातचें जेव. " माया म्हणाली.

" मला माझ्या खोलींत गेलें पाहिजे. ताई, तुझा पति तुला आणून देईन, मग तुझ्या हातचें जेवेन. जाऊं दे मला. "

प्रद्योत निघाला. पुन्हा त्याचे डोळे भरून आले. तो बाहेर पडला. तो तेथे कोण ते काळे लोक ? पोलिस उभे होते. शिट्टी झाली. माया एकदम बाहेर आली.

" तुम्हांला अटक आहे " अधिकारी म्हणाला.

" ठीक. " प्रद्योत म्हणाला.

" त्यांना अटक, आता माझ्या प्रद्योत भाईलाहि अटक ? " माया रडत म्हणाली.

" ताई, सारें मंगल होईल. आता धीर धीर. " तो म्हणाला.

✦ ✦ ✦

## कामगारांचा संप : २५

शेवटीं धनगावला पगारवाढीचा लढा सुरू होणार असें दिसूं लागलें.

नवरात्राचा त्या दिवशीं आरंभ होता. वास्तविक किसान-कामगार चळवळींत धार्मिक रूढींना महत्त्व नाही. कामगार हिंदुहि आहेत; मुसलमानहि आहेत. सर्व धर्मांचे आहेत.

धनगावचे कामगार तेथील महिषासुराला मऊ करण्यासाठी, त्याला वेसण घालण्यासाठी, त्याला शरण आणण्यासाठी, नवरात्राचे दिवशीं उभे राहिले. तेथील कामगार-चळवळींतील तो नवदिवस होता, ती नवरात्र

होती. आदल्या दिवशीं आठ हजार कामगारांनी मशालींची प्रचंड मिरवणूक काढली. आठ हजार कामगारांच्या घरची हजारो मंडळी त्यांत सामील झाली. वनगावचे शेकडो विद्यार्थी त्यांत येऊन मिळाले. आसपासच्या दशक्रोशींतील हजारो किसान ती पेटती व पेटविणारी मिरवणूक पाहायला आले.

सारें शहर त्या मिरवणुकीने हादरलें, जागृत झालें. सर्वांची सहानुभूति त्या उपाशी कामगारांकडे वळली. दुसऱ्या दिवसापासून संप सुरू झाला. अत्यन्त व्यवस्थित संप. उजाडलें नाही तोंच हजारो कामगार मैदानावर जमत. तेथून लाल व तिरंगी झेंडे घेऊन गावांत मिरवणूक काढीत व आपापल्या मिलला गराडा देऊन बसत.

एके दिवशीं जरा गडबड होणार होती. एका मिलच्या मॅनेजरची मोटार येत होती. कामगार ती दरवाजांतून आंत जाऊं देत ना. " आमच्या अंगावरून न्या मोटार, भितां कां ? आमच्या रक्तावर तर कारखाने चालले आहेत. आणखी थोडें सांडायला का भितां ? चिरडा आम्हांला, येऊं द्या मोटार पों पों करीत. " कामगार म्हणूं लागले. मोटार गेली. कामगारांनी जयघोष केला.

साऱ्या गावची आर्थिक रचना ढासळली.

कामगार जगणार कसे ? त्यांना उपवास पडूं लागले. धान्य वाटलें जात होतें. ज्यांना अत्यंत जरूरी त्यांना आधी दिलें जाई. स्वयंसेवक दूध नेऊन वांटीत. ज्यांचीं लहान मुलें त्यांना दूध पुरविण्यांत येई. कामगार पुरुष एक वेळेला जेवूं लागले.

तडजोडीचे पुन्हा एकदा प्रयत्न करावे, असें कांहींच्या मनांत आलें. युनियनचा चिटणीस मोहन होता. तो आजारी होता. तरी सारखें काम करीत होता. त्या दिवशीं तो मालकांच्या कचेरीत जात होता. त्याने वर चिठी पाठवली. परंतु उत्तर नाही, तेव्हा तो जिना चढून वर जाऊं लागला. मालक, त्याचे मॅनेजर, कांही इतर डायरेक्टर तेथे जमलेले होते. मोहन एकदम जाऊन उभा राहिला.

" साला बदमाष. येथे कसा आला ? हाकल याला. " एक मॅनेजर म्हणाला.

" मी तुम्हांला कांही विचारायला आलों आहें ! " मोहन शांतपणें म्हणाला.

" भुके मरतां; आता विचारायला येतां. निघा येथून. वेळ नाही आम्हांला. कोण आहे रे ? याला हाकल, कुत्ता वर कशाला येऊं दिला ? ने ओढीत तिकडे. " तो मॅनेजर बडबडला.

नोकरांनी मोहनला ओढलें व जिन्याजवळ नेलें.

" वर कशाला गेलास? आम्हांला शिव्या मिळतात ना" असें म्हणून त्यांनी त्याला ढकललें. मोहन जिन्यावरून खाली पडला की त्याला घेरी आली ? का भावनांमुळे तो बेहोष झाला होता ? तो खाली पडला खरा. ते नोकर जरा घाबरले. त्यांनी जाऊन सांगितलें. " तो जिन्यावरून खाली पडला, "

" मरूं दे. येथे वेळ नाही. " कोणी बोलले.

मोहन तेथेंच पडलेला होता. मुकुंदराव, श्यामराव व अहमद मोहन अजून कां येत नाही म्हणून पाहावयाला आले. तों तेथे मोहन पडलेला. येथे कसा मोहन पडला ? मुकुंदराव वर गेले.

" युनियनचा चिटणीस येथे पडला आहे; तरी तुम्ही येथे बसलेले ? " ते शांतपणें म्हणाले.

" आम्हांला काय करावयाचें आहे ? पडला असेल. आम्हांला काय माहीत ? युनियन करील व्यवस्था ! " एक डायरेक्टर म्हणाले.

मुकुंदराव शांतपणें परत फिरले. तों एक लहान मुलगा तेथे आला व म्हणाला, " या नोकरांनी ढकललें यांना. ते कचेरींतील कोणी म्हणाले, द्या कुत्र्याला ढकलून. यांनी ओढीत आणून ढकललें. "

अहमद गेला व गाडी घेऊन आला. मोहनला दवाखान्यांत नेण्यांत आलें, त्याला एका खाटेवर ठेवण्यांत आलें. त्याची शुश्रूषा सुरू झाली. मोहनला ढकलून दिल्याची वार्ता विजेप्रमाणे पसरली. त्याला कुत्रा म्हटल्याची हजारो कामगारांना चीड आली. वातावरण गंभीर झालें. परंतु कामगारांचा राग गिरण्यांवर होऊं नये म्हणून एकदम ' कामगार मैदानावर सभा, कामगार मैदानावर सभा ' अशी कर्ण्यांतून दवंडी सर्वत्र देण्यांत आली. सारे कामगार जमले. मुकुंदरावांनी सर्वांना शांत करणारें भाषण केलें. ते म्हणाले, ' आपण चिडून जातां कामा नये. चिडलों तर सारें बिघडेल. मोहनला

त्यांनी ढकललें. त्यांनी मोहनला नाही ढकललें, तर स्वतःच्या भांडवलशाहीला ढकललें आहे. कामगाराला ढकलला तर कशावर जगाल ? शूर कामगारांना सर्व देशांत अशा प्रसंगांतून जावें लागलें. आपणांतील अनेकांना मरावें लागेल. क्रांति आपल्या बलिदानांतून येईल. मोहनच्या अपमानाचा बदला घेणें म्हणजे मिलवर दगड फेकणें नव्हे. एक दिवस सत्ता आपल्या हातीं घेऊं तेव्हांच खरा बदला घेतला असें ठरेल. आपला व्यक्तीशीं झगडा नाही. एका जुलमी व अन्याय्य समाजरचनेशीं झगडा आहे. जोंपर्यंत आपण शांत आहोंत तोंपर्यन्त आपला जय आहे. सरकारची लाठी व बंदूक वाट पाहात आहे. वाट पाहातच बसू दे. आपण लाठीला व बंदुकीला भितों असा याचा अर्थ नव्हे. शांतपणें प्रतिकार करीत असतां खुशाल लाठ्या येवोत, गोळ्या येवोत. शूराप्रमाणे घाव छातीवर झेलूं. कामगारावरचा प्रत्येक घाव या भांडवलशाहीवरच घाव आहे. भांडवलशाहीचेच त्याने तुकडे तुकडे होतील. मोहन मरणशय्येवरून तुम्हांला शांत राहा सांगत आहे. मोहनच्या आत्म्याला क्लेश होतील, असें कांही करूं नका. भांडवलशाहीने मोहनचा देह लाथाडला. परंतु तुम्ही जर अत्याचार कराल तर मोहनचा आत्मा लाथाडलात असें होईल. भांडवलशाहीने मोहनच्या शरीराचा बळी घेतला असें होईल. "

कामगारांच्या भावना जरा शांत झाल्या. कांही दंगाधोपा नाही झाला. असे दिवस चालले. कामगारांना मदतीची फार जरूरी होती. हिंदुस्थानांतील ठिकठिकाणच्या कामगार–संघटनांकडून सहानुभूतीचे संदेश व थोडी फार मदत आली, परंतु ती कितीशी पुरणार ? उपाशीपोटी दसऱ्यासारखा सण गेला. कोजागिरी गेली. कामगार प्रक्षुब्ध होऊं लागले. पानपतच्या लढाईचे वेळेस मराठे भाऊसाहेबांना म्हणाले, "आम्हाला उपाशीं कां मारतां ? उपाशी मारण्याऐवजी शत्रूवर हल्ला करून काय तो सोक्षमोक्ष लावूं द्या." कामगार अशीच भाषा बोलूं लागले. सरकार व मालक शांत होते. बोलणें–चालणें सारें बंद. दिवाळी जवळ येत होती. कामगारांच्या घरीं शिमगा होता. तेथे बोंबाबोंब होती. होळी पेटली होती. मुकुंदरावांना चिंता वाटूं लागली. पोराबाळांची उपासमार किती दिवस पाहणार ?

" तुम्ही आज फार गंभीर दिसत आहांत ? " आनंदमूर्तींनी विचारलें.

" मग का हसूं खेळूं ? कामगारांच्या सहनशीलतेचा शेवटचा तंतु तुटण्याची वेळ येत आहे. काय करावें ? दिवाळी जवळ येत आहे. पोरें-बाळें उपाशीं ? " मुकुंदराव म्हणाले.

" मी मदत आणूं का कोठून ? " त्यांनी विचारलें.

" कोठून आणणार तुम्ही ? "

" आणीन कोठून तरी. येऊं जाऊन ? "

" लौकर या. येथें परिस्थिति बिकट होत चालली आहे. रामदासहि तुरुंगांत. मोहन मरणशय्येवर. शांतेची मुलगीहि आजारी आहे. लोकांना शांत राखलें पाहिजे. तुमची प्रसन्न व प्रेमळ मुद्रा पाहून लोक शांत राहतात. मदत घेऊन, ओलावा घेऊन लौकर या. " मुकुंदराव म्हणाले.

चार दिवशीं दिवाळी होती. परंतु गावांत कोणाला सुचत नव्हतें. सारे हवालदिल होते. आठ हजार कामगार व त्यांच्या घरची मंडळी, वीस हजार माणसें शहरांत उपाशी असणें हा सर्वांना धोका होता. केव्हा लूट होईल, केव्हा भुकेचा वणवा भडकेल, नेम नव्हता. सर्वांनी प्राण जणु मुठींत ठेवले होते. त्या दिवशीं प्रचंड सभा भरली. उत्साह कायम ठेवण्यासाठीं सभा-मिरवणुका सुरू असत.

निरनिराळीं भाषणें झालीं. परंतु ती एक कामगार भगिनी म्हणाली,

"आमचीं हाडें घाला म्हणावें आता गिरणींत. स्वस्त मिळतील. पोरेंबाळें मरत आहेत. मजूर मरत आहेत. गिरणीला होईल म्हणावें जळण. कामगारांच्या प्राणांचे कोळसे घाल तुझ्या भट्टींत व निघूं दे काळाकुट्ट धूर, हजारो संसारांच्या राखरांगोळीचा धूर. आमच्या प्राणांचे दगड पायामध्ये बसव व बांध तुझा बंगला-भूत बंगला व चालूं दे तेथें गाणें, चालूं दे नाचरंग. दिवाळी येत आहे. आमच्या प्राणांचें उरलेंसुरलें तेल घे व पेटव तुझे दिवे-कर तुझी दिवाळी, कर तुझें लक्ष्मीपूजन ! आमचें मरणें तें यांचें जगणें, भयाण राक्षसांचें जगणें. आग लागो त्या जिण्याला."

अशीं भाषणें होऊं लागलीं. भावना भडकूं लागली. शेवटीं शांत करणारी मुकुंद-वेणू सुरू झाली. इतक्यांत आनंदमूर्ति आले. मदत घेऊन

आले. आनंदमूर्ति की जय, इन्किलाब झिंदाबाद गर्जना झाली. मुकुंदरावांनी त्यांना बोलण्याची विनंती केली. आनंदमूर्तींची गोड मूर्ति उभी राहिली. सर्वांना आनंद झाला. सौंदर्य क्षणभर भुकेची विस्मृति पाडतें. आनंदमूर्ति म्हणाले, " संप शेवटपर्यंत शांतपणें चालूं दे. आपण मरूं पण हार जाणार नाही. आपल्या मरणांतून उद्यांच्या कामगारांना सुखाचें स्वाभिमानी जीवन मिळेल. दिवाळी येत आहे. दिवाळीच्या दिवशीं प्रत्येक कामगाराला एकेक रुपया देण्यांत येईल. माझ्या मित्राने दहा हजार रुपये मदत तुम्हांला दिली आहे. दिवाळी गोड होऊं दे. " ते शब्द ऐकतांच टाळयांचा कडकडाट झाला. उत्साह संचारला. त्या उत्साहांतच सभा संपली.

असा हा ऐतिहासिक संप चालला होता. परंतु किती दिवस चालणार? त्याला कांही सीमा होती की नाही?

✦ ✦ ✦

## सुटका : : २६

रामदासकडे मायेकडून जेवण जात असे. प्रथम ती स्वत: नेऊन देत असे. रामदासजवळ कुशलवार्ता बोलूं शकत असे. परंतु पुढे तें बदललें. माया रामदासच्या दृष्टीस पडूं शकत नसे. शिपाई पुढे येई व डबा घेऊन नेऊन देई. माया बाहेर बसे. प्रद्योतसंबंधीची वार्ता रामदासला कळली नाही. वकील वगैरे कांही नको; पुढे पाहूं, रामदास म्हणे.

आनंदमोहन अलीकडे धनगावलाच होते. त्यांनी रमेशबाबू व अक्षय कुमार यांना निघून येण्याविषयी लिहिलें. त्यांचे मायेला ' येत आहोंत ' असें पत्र आलें. दयाराम सोनखेडीहून आला होता. रमेशबाबूशीं त्याचा परिचय होता. मायेच्या विवाहाच्या वेळचा परिचय. दयाराम स्टेशनवर गेला. त्याने दोघींना मायेच्या खोलींत आणलें. मायेला रडूं आलें. रमेशबाबूंनीं तिला शांत केलें. मायेने प्रद्योतची सर्व हकीगत घरीं कळविलीच होती. आनंदमोहन यांनी प्रद्योत व माया यांचीं बोलणीं, प्रद्योतचें परिवर्तन सर्व कांहीं बाहेरून पाहिलें होतें. त्यांनीहि साद्यंत वृत्त अक्षयबाबूंस लिहिलें होतें व शेवटीं सारें चांगलें होईल, असें भविष्य कळविलें होतें.

" माया, प्रद्योतला शेवटीं तूं मुक्त केलेंस. वेडेपणांतून मुक्त केलेंस. आमचे उपाय हरले होते. परंतु तुझी पुण्याई उपयोगी पडली. " अक्षय-बाबू म्हणाले.

" माझी पुण्याई नाही अक्षयकाका. ही तुमची पुण्याई. स्वतःच्या मुलाची निराशा दिसत असूनहि तुम्हीं मला आग्रह केला नाही. माझ्या लग्नाला आशीर्वाद दिलांत. तुझा संसार सुखाचा होवो, असें मोठ्या मनाने म्हटलेंत. त्या आशीर्वादाच्या बळावर हें सारें होत आहे. त्या आशीर्वादाने हीं संकटें आम्ही तरून जाऊं. " माया म्हणाली.

इतक्यांत आनंदमोहन तेथे आले. दोघां मित्रांनी त्यांचें स्वागत केलें.

" माये, हे आनंदमोहन. माझे जुने मित्र. यांच्यामुळे हें सारें शेवटीं गोड होणार आहे. यांची मदत. " अक्षयकुमार म्हणाले.

" माया, माझ्या बहिणीशीं शेवटीं प्रद्योतचें लग्न लावून दे बरं का. तूं नाही केलंस तर नाही. परंतु दुसरी बायको त्याला देशील की नाही ? मृणालिनी चांगली आहे, तुला आवडेल. " आनंदमोहन म्हणाले.

" कोण मृणालिनी ? ती महापुराच्या वेळेला स्वयंसेविका झाली होती का ? " मायेने विचारिलें.

" हो, झाली होती. तिच्या मामाबरोबर ती गेली होती. तिचे मामा महापूर साहाय्यक समितींत होते. " आनंदमोहन म्हणाले.

" मृणालिनी आहे माझ्या ओळखीची. प्रथम तिचें व माझें भांडण होई. ती बंगालची अभिमानी. महाराष्ट्रीय लोकांना नांवें ठेवी. परंतु पुढे मत पालटलें. ती व मी मैत्रिणी झालों. तिच्या मनांत एका महाराष्ट्रीय मजुराच्या आलेल्या शर्टाने क्रांति केली. मृणालिनी सुंदर आहे. बाबा, तुमच्या मायेपेक्षा ती किती तरी सुंदर आहे. प्रद्योतला बंगालचा अभि-मान, मृणालिनीलाहि तसाच अभिमान. दोघांची जणु पत्रिका जुळली. परंतु प्रद्योतचें लग्न मृणालिनीशीं होण्यापूर्वी मी तुम्हांला अट घालीन ती पार पडली पाहिजे. " माया म्हणाली.

" नोकरी सोडण्याशिवाय इतर कोणतीहि अट घाल. " आनंद-मोहन म्हणाले.

" बरें, पुढे पाहूं. " माया हसून आंत गेली.

आनंदमोहनांनी विचारविनिमय केला. अक्षयकुमार व रमेशबाबू यांच्या जबान्या होणार होत्या. त्या कशा द्यावयाच्या तें ठरलें. मायेचीहि जबानी होणार होती. प्रद्योत स्वतःची जबानी देणार होता. रामदासलाहि आनंदमोहन भेटून आले होते.

खटल्याची सुनावणीची तारीख आली. आज हजारो किसान व कामगार कोर्टाभोवती जमले होते. दीनबंधु रामदासला किती तरी दिवसांत त्यांनी पाहिलें नव्हतें. माया, अक्षयकुमार, रमेशबाबू कोर्टांत येऊन बसलीं. आनंदमोहन आले. पोलिसांच्या पहाऱ्यांत तो पाहा रामदास आला. 'दीनबंधु रामदास की जय, दीनबंधु रामदास निर्दोष आहे, दीनबंधूची सुटका करा.' अशा आरोळ्या हजारो कृतज्ञ कंठांतून एकदम बाहेर पडल्या. प्रद्योतहि पाठीमागे पहाऱ्यांत येत होता. रामदासबद्दलचें जनतेचें हें प्रेम पाहून त्याला काय बरें वाटलें? रामदास माकड नसून महान् आत्मा आहे, असें त्याचें हृदय त्याच्याजवळ आंत म्हणालें असेल.

कोर्ट भरून गेलें होतें. रामदासने त्या बंगाली तरुणाला पाहिलें. हाच का तो प्रद्योत? त्याला माहीत नव्हतें. त्याने प्रद्योतला कधी पाहिलें नव्हतें. प्रद्योतने मात्र रामदासचीं मायेनें काढलेलीं चित्रें पाहिलीं होतीं. न्यायाधीश आले. सर्वत्र सामसूम झालें. सरकारतर्फे रामदासावरचे आरोप मांडण्यांत आले. तीं सर्व पत्रें पुढे मांडण्यांत आलीं. त्यानंतर रामदासने आपलें म्हणणें मांडलें. तो म्हणाला, "मला वकील वगैरे देण्याची जरूरी नाही. हें जें कारस्थान करण्यांत आलें आहे, त्याची मला माहिती नाहीं. हीं पत्रें माझीं नाहीत. असलीं पत्रें मी कधी कोणाला लिहिलीं नाहीत; मला कधी कोणाचीं आलीं नाहींत.

"मी अहिंसा व सत्य मानतों. खादी माझा प्राण. त्याबरोबरच किसान–कामगारांची संघटना व्हावी, असेंहि मला वाटतें. परंतु हे प्रश्न अनत्याचाराने सुटावे, असें माझें मत आहे. खेड्यापाड्यांतून मी जें सांगतों, तें सरकारला माहीत आहे.

"कोणताहि गुन्हा मीं कधी केलेला नाही. वंगकन्येशीं लग्न लावणें हा जर गुन्हा असेल तर तो मात्र मीं केला.

"मी जास्त वेळ घेत नाही. हीं पत्रें वगैरे सारें काल्पनिक आहे. केवळ

असत्यावर उभारलेलें एक कारस्थान आहे. इतके दिवस मला कां डांबून ठेवण्यांत आलें, जामिनावरहि कां सोडलें नाही, याचें मला आश्चर्य वाटतें."

नंतर मायेची अत्यंत महत्त्वाची जबानी झाली. ती म्हणाली, "समोर उभा असलेला बंगाली तरुण प्रद्योत माझ्याच गावचा. माझे वडील व त्याचे वडील परम मित्र. प्रद्योत माझा भाऊ असें मला वाटे. परंतु प्रद्योतच्या मनांत निराळे विचार खेळत होते. मीं त्याची पत्नी व्हावें असें त्याला वाटूं लागलें. त्याची ही इच्छा मला दिसूं लागली. मी प्रथम म्हणत असें की, मला लग्नच करायचें नाही. माझा खरोखरच तसा विचार होता. परंतु शांतिनिकेतनांत हे रामदास आले. त्यांना मीं पाहिलें व मला निराळें वाटूं लागलें. एकदम जीवनांत नवीन मंगल, मधुर, गंभीर, असें सुंदर दालन उघडलें. माझ्या हृदयाचे ते सम्राट झाले.

"पुढे आमचा विवाह झाला. प्रद्योतची फार निराशा होऊं नये म्हणून त्याच्या डोळ्यांआड इकडे सोनखेडीला येऊन मी विवाहबद्ध झालें. परंतु प्रद्योतला ही गोष्ट कळल्यावर तो अदृश्य झाला. त्याला पकडलें त्याच्या आधी अर्धा तास तो मला अकस्मात् भेटला. तो मला बंगालमध्ये चल म्हणत होता. महाराष्ट्रीयाशीं कशाला लग्न, बंगाल का ओस पडला होता, हा बंगाली तरुणांचा तू अपमान केलास, वगैरे बोलला. मींहि त्याला खूप बोललें व त्याला डोळ्यांत पाणी आणून म्हटलें, 'प्रद्योत. तूं माझा भाऊ हो. मला भाऊ नाही, तुला बहीण नाही. आपण बहीणभाऊ होऊं ये.' प्रद्योतला शेवटीं पश्चात्ताप झाला. त्यानेच माझ्या पतीवर निराशेमुळे हें संकट आणलें. त्याने तें कबूल केलें व म्हणाला, 'तुझ्या पतीला मुक्त करीन तेव्हांच आता तोंड दाखवीन."

प्रद्योतने आपली जबानी दिली. तो म्हणाला, "मायेने सांगितलें त्यांतील अक्षर नि अक्षर खरें आहे. हीं मींच लिहिलेलीं पत्रें.

"रामदास निर्दोष आहे. अपराधी फक्त मी. गुन्हेगार मी. मी क्षमा नाही मागत. मला चांगली शिक्षा करा. या लहरी व विकारी तरुणाला कारागृहांत कोंडा."

रमेशबाबूंची छोटी जबानी झाली. अक्षयकुमारांचीहि झाली. अक्षयकुमार म्हणाले, "प्रद्योत माझा मुलगा. मायेवर त्याचें फार प्रेम. तिच्यासाठी

तो झुरे. मायेचें लग्न झाल्यावर तो खोलींत तासन् तास बसून राही. कधी बोलत नसे, कधी हसत नसे. एके दिवशीं तो निघून गेला. आम्हांला पत्ता नाही. आमची स्थिति काय झाली असेल, तुम्ही कल्पना करूं शकतां. माझ्या मुलानें सारा अपराध कबूल केला आहे. त्याला पूर्ण पश्चात्ताप झाला आहे. सरकारनें शिक्षा करून त्याच्या जीवनांत पुन्हा निराशा निर्मू नये. या दुःखीकष्टी पित्याचे अश्रु पाहून मुलाला क्षमा करावी. पित्याचा कोर्टानें दुवा घ्यावा."

गुप्तपोलीस अधिकारी आनंदमोहन यांनींहि प्रद्योतचें परिवर्तन समक्ष पाहिल्याचें सांगितलें. इतरहि गोष्टींचें त्यांनी स्पष्टीकरण केलें. प्रद्योतच्या वडिलांनी हें अक्षर माझ्या मुलाचें असें प्रामाणिकपणें एकदम सांगितलें, वगैरे सर्व गोष्टी त्यांनी सांगितल्या. सरकारतर्फे सांगण्यांत आलें की, आम्ही खटला मागे घेतों. न्यायाधीश म्हणाले, "रामदास निर्दोष आहे. प्रद्योतनें हें कारस्थान रचलें. परंतु एकंदर परिस्थिति लक्षांत घेऊन व त्याचें परिवर्तन लक्षांत घेऊन त्यालाहि सोडून देणें योग्य. त्याने मानसिक शिक्षा आजपर्यंत भोगिली ती पुष्कळ आहे. मायेचें मी कौतुक करतों. अक्षय–कुमारांनी हें अक्षर माझ्या मुलाचें एकदम सांगितलें, या त्यांच्या सरळ स्वभावाचें मला कौतुक वाटतें. खटलाच काढून घेण्यांत येत आहे. तेव्हां उगीच अधिक कशाला बोलूं ?"

कोर्टांत टाळ्यांचा गजर झाला. 'दीनबंधु रामदास झिंदाबाद' अशी गर्जना नभाला भिडली. प्रद्योत व रामदास रामलक्ष्मणांप्रमाणे परस्परांस भेटले. त्यांचे डोळे प्रेमाश्रूंनी भरून आले होते. रामदासच्या गळ्यांत अगणित हार पडले. किसानबंधु, कामगारसंघ, विद्यार्थीसंघ, कॉंग्रेस कमिट्या, ठिकठिकाणचे आश्रम, भगिनीमंडळें, व्यापारी संघ, सर्वांनी हार घातले. रामदासची मिरवणूक काढण्याचा कामगारांनी व शेतकऱ्यांनी हट्ट धरला. एका मोटारींत रामदास बसला. त्याच्या एका बाजूस माया होती. दुसऱ्या बाजूस प्रद्योत होता. मायेचे व प्रद्योतचे वडील होते. पाठीमागे दुसरी एक मोटार होती. तींत आनंदमोहन, मुकुंदराव, दयाराम, आनंदमूर्ति, शांता, रामदासचे आईबाप वगैरे बसले होते. प्रचंड मिरवणूक निघाली. मिरवणूक संपल्यावर रामदास म्हणाला, " हजारो कामगार संप लढवीत

आहेत. ते उपाशी आहेत. तरीही आपली भूक विसरून ते माझें स्वागत करण्यासाठी धावून आले. मी त्यांचा ऋणी आहें. त्यांचा संप यशस्वी व्हावा अशीच मी तुरुंगांत प्रार्थना करीत होतों. तुमच्या संपांत भाग घेतां यावा म्हणून सुटण्याची उत्कंठा होती. तुमच्या खांद्याशीं खांदा लावून मी उभा राहीन; परंतु शांतीने काम करूं या. तुम्ही इतके दिवस शांत राहिलांत. धन्य तुमची. आम्हांला दोन दिवस उपवास पडले तर कोण अस्वस्थता येते ? किती आदळआपट आम्ही करतों. तुमच्या सहनशीलतेला माझा प्रणाम आहे."

रामदास सर्व पाहुण्यांसह सोनखेडीच्या घरीं गेला. सर्वांनीं आश्रम पाहिला. सर्वांना समाधान झालें.

"माये, मग काय ? माझ्या प्रश्नाचें काय ?" आनंदमोहन म्हणाले.

"मी प्रद्योतशीं बोललें. तो म्हणाला, ताई, तूं करशील तें प्रमाण. मृणालिनी सुंदर आहे मुलगी. परंतु माझी एक अट आहे." माया म्हणाली.

"हुंडा पाहिजे का ? किती हजार रुपये देऊं ?" त्यांनी विचारलें.

"हुंड्याचें बंड नको. पैसे फार असतील तर आमच्या आश्रमाला द्या." माया हसून म्हणाली.

"महाराष्ट्रांतील व्यवहार एवढ्यांत शिकलीस वाटतें ?" प्रद्योतने विचारलें.

"मग कोणती अट ?" आनंदमोहन पुन्हा म्हणाले.

"सांगूं ? तुम्ही रागावणार नाही ना ?" मायेने विचारलें.

"मी घरच्यावर रागावतों; दारच्यावर नाही." ते म्हणाले.

"मी तुम्हांला क्रांतिकारक बनायला सांगणार आहें." माया म्हणाली.

"माझी नोकरी टिकेल ?"

"हो टिकेल."

"अशी कोणती बुवा क्रांति ?"

"स्वत:च्या जीवनांतील. आनंदबाबू, मृणालिनी मजजवळ मोकळेपणें बोले. तुम्ही घरीं कसे वागतां तें सांगे. तुम्ही पत्नीला मारतां, वाटेल तसें बोलतां. जणुं पत्नी म्हणजे मोलकरीण. मोलकरणीलाहि स्वाभिमान असतो,

तुम्ही स्वत:च्या मुलांनाहि फार मारतां. हें सारें बदला." माया कळकळीनें बोलली.

सारें वातावरण गंभीर होतें.

"माये, तूं माझी गुरु आहेस. मी सुशिक्षित असून पशु होतों. दारच्याजवळ गोड, घरच्याजवळ कडू. बाहेरच्यांना हसवीतसें. घरच्यांना रडवीतसें. साहेबाजवळ कुत्रा व घरच्याजवळ वाघ. माये, अत:पर मी निराळा होईन. प्रद्योतमध्ये तूं क्रांति केलीस, या आनंदमोहनांतहि केलीस, तुझ्यासारखी मैत्रीण मृणालिनीला मिळाली. तिचें भाग्य, आता प्रद्योतहि तिला मिळणार हें आणखी भाग्य." आनंदमोहन सद्‌गदित होऊन म्हणाले.

"माये, परंतु माझ्या लग्नाला तूं आली पाहिजे. तूं तुझ्या लग्नाला कोणाला बोलावलें नाहीस. मी सर्वांना बोलावणार. रामदास, तुम्हीहि या. माझे बाबा सर्वांना बोलावतील." प्रद्योत म्हणाला.

"मायेला आताच बरोबर नेलें म्हणून काय झालें ? प्रद्योतचें येत्या मार्गशीर्षांत लग्न करूं. मायेला कांही दिवसहि गेले आहेत. पहिलें बाळंतपण घरीं माहेरीं होईल. बाळबाळंतीण मग परत येतील." रमेशबाबू म्हणाले.

"काय माये, तुझी इच्छा प्रमाण." रामदास म्हणाला.

"तुमची इच्छा प्रमाण." ती म्हणाली.

"वडिलांची इच्छा प्रमाण." प्रद्योत म्हणाला.

मायेने जावें असें ठरलें. भावाला घेऊन बहीण बंगालमध्ये गेली. सर्वांना आनंद झाला. परंतु कामगारांच्या संपाचें काय ? त्यांची उपास-मारींतून सुटका झाली का ?

✦ ✦ ✦

## हिंसा-अहिंसा : : २७

दवाखान्यांत मोहन मरणशय्येवर होता. शांतेची मुलगी लहान. परंतु मुलीला घरीं ठेवून ती दवाखान्यांत येत असे.

मोहन पडून असे. 'संपाचे काय झालें ?' मध्येच विचारी. एखादे वेळेस शांता जवळ बसलेली पाहून म्हणे, "मीं म्हटलेंच होतें की, तिकडे कामगार मरतील; परंतु तूं माझा हात हातांत घेऊन बसशील; ऊठ, जा

तिकडे. मोहन मरूं दे, मजूर जगूं दे." शांतेचे डोळे भरून येत व मोहनच्या हातावर ती अश्रूंचें अर्घ्य देई., स्वतःच्या प्राणांचें पाणी देई.

मोहनची आशा नव्हती. श्रमाने मोहन थकलेला होता. शांतेचें लग्न झाल्यावर जरी तो बरा झाला होता, वजन जरी वाढलें होतें तरी तो खरा बरेपणा नव्हता. या संपांत फारच दगदग झाली. संपाचे आधीहि खूप काम. त्याला ते अतिश्रम झेपले नाहीत. अशा पोखरलेल्या शरीराला तें जिन्यावरून पडणें म्हणजे मोठाच आघात होता. तेव्हाच तो राम म्हणावयाचा. परंतु मरण तयार नव्हतें. वरचें वॉरंट लिहिलेलें नव्हतें.

मुकुंदराव मोहनची प्रकृति पाहावयास आले होते. शांता तेथे बसली होती. ती मुकुंदरावास म्हणाली, " आज कांही बरें लक्षण दिसत नाही. यांना घरीं घेऊन जावें, स्वतःच्या झोपडींत न्यावें. येथे नको." मुकुंदराव "बरें" म्हणाले. मोहनने विचारलें, "संपाचें काय?" मुकुंदराव म्हणाले, "सुरू आहे." तो क्षीण स्वरांत म्हणाला, "किती दिवस कामगार उपाशी राहणार? माझ्या डोळ्यांसमोर त्यांचे उपाशी चेहरे सारखे दिसत असतात. मी आता देवाकडे जातों फिर्याद घेऊन" शांतेने मोहनच्या मुखकमलावरून हात फिरविला, त्याच्या डोक्यावरून हात फिरविला.

"मोहन, तुला घरीं नेणार आहोंत." मुकुंदराव म्हणाले.

"होय घरीं न्या. आता घरीं जायला उत्सुक आहें. देवाच्या घरीं. झोपडींतून देवाकडे लौकर जातां येईल. शांतेची गरीब पवित्र झोपडी, न्या, मला घरीं न्या." तो म्हणाला.

एका मोटारींत मोहनला अलगत उचलून ठेवण्यांत आलें. शांता मांडीवर डोकें घेऊन बसली होती.

"मोटार कशाला आणलीत? गरिबांच्या अंगावरून जाणाऱ्या मोटारी. मोटारींतून माझ्या घरीं का लौकर जाईन? त्या वरच्या माहेरीं का लौकर पोचेन?" त्याने विचारलें.

"तुम्ही बोलूं नका." शांता दीनवाणी होऊन म्हणाली.

"नको बोलूं? तुझी आज्ञा. बोलणें बंदच होईल. देवाचीहि तीच आज्ञा होणार आहे. 'बोलणेंचि नाही। आता देवावीण कांहीं।' असा दयाराम एक अभंग म्हणत असतो." मोहन म्हणाला.

झोपडीजवळ मोटार आली. मोहनला अंथरुणावर ठेवण्यांत आलें. स्वच्छ साधें अंथरूण. मोटार गेली.

त्या एका खोलींत सारा संसार. तेथेच पाळणा होता. तेथेच स्वयंपाक, तेथेच अभ्यास, तेथेच सारें.

" मोहन, कसें वाटतें. ?" मुकुंदरावांनी विचारलें.

" छान वाटतें. उद्या अगदी छान उजाडणार आहे. " तो थांबत खोल आवाजांत बोलला.

मुकुंदराव निघून गेले. शांता जवळ बसली होती. पाळण्यांत क्रांति रडूं लागली. आंदळून राहीना. शांतेने प्यायला घेतलें तरी राहीना. "त्रास देते चांडाळीण !' शांता रागाने बोलली व तिने पाळण्यांत त्या लहान लेकरास टाकलें. मोहन डोळे उघडून पाहात होता.

" शांता, क्रांति जरा रडली तर तूं अशान्त होतेस. कामगारांनी कशी ग शांति धरावी ? क्रांतीला प्रेमाने व शांतीने वाढव. तरच ती वाढेल. तिला शिव्या द्यायच्या होत्या तर पोटांत वाढवलेंस कशाला ? " तो म्हणाला.

पुन्हा कांही वेळ गेला व म्हणाला, " जगेन तर पोरांचें लेंढार लागेल शांतीच्या मागे. नको ती भानगड. "

" माझी शपथ आहे मोहन तुला. शांत राहा पडून. " शांता म्हणाली.

" मला प्रेमाने 'तूं' म्हटलेंस. आता ऐकतों हं. शांत राहतों. शांतेचा मोहन शांत राहिला. शांते, माझ्या हातांत दे ग पाळण्याची दोरी." त्याने हात पुढें केले.

शांतेने पाळण्याची दोरी पतीच्या हातीं दिली.

" मुकें आंदुळणें मला नाही आवडत. " तो म्हणाला.

" मग गाणें म्हणा. " ती म्हणाली.

" म्हणूं गाणें ? जुनीं गाणीं नकोत. नवीन म्हणतों. माझ्या प्राणांचें गाणें म्हणतों. हळूहळू एकेक कडवें म्हणेन. मी थाबत थांबत म्हणेन हो." मोहन हसून म्हणाला.

शांता पतीच्या अंगावर हात ठेवून बसली होती. गीता जवळच पायांशी होती. मोहन गाणें म्हणूं लागला. क्रांतीचा पाळणा म्हणूं लागला.

मोहन एकेक कडवें थांबून थांबून म्हणत होता. एकेका कडव्याबरोबर त्याची प्राणशक्ति कमी होत होती. आपल्या जीवनरसांत बुडवून एकेक कडवें तो जगाला देत होता. आवाज खोल खोल जात होता. शेवटच्या कडव्यांत मोहनने, आपले उरलेसुरले प्राण क्रांतीला अर्पण केले. त्याने शांतीकडे अनंत अर्थाने, अनंत भावनेनें, अनंत प्रेमाने बघत शांतपणें डोळे मिटले. " क्रां–ति, शां–ति " हे त्याचे शेवटचे शब्द !

पाळण्यांत चिमुकली क्रांति हसूं-खेळूं लागली. पाय हालवूं लागली. मोहनची सारी हालचाल थांबली होती. थकलाभागला मोहन अनंत निद्रेशीं एकरूप झाला होता. का अनंत चैतन्याशीं एकरूप झाला होता ?

" मोहन ! " एकच हाक शांतेने मोहनला मिठी मारून मारली. तिने डोळयांच्या घडयांतील पाण्याने मोहनला शेवटचें स्नान घातलें. क्रांतीला मांडीवर घेऊन शांता तेथे गंभीर व खिन्न स्थितींत डोळे मिटून बसली. गीता गीताईंतील श्लोक म्हणत होती. शांता मोहनच्या अंगावर कलंडली; मोहन कुशीवर होता. शांतेची मान मोहनच्या अंगावर पडली. गीतेच्या गीताईचा पाठ डोळे मिटून चाललाच होता. सारें काम डोळे मिटून शांतपणें चाललें होतें.

तिकडे रात्रीं प्रचंड सभा चालली होती. मालक लोक दूरच्या गांवाहून मोटार लॉऱ्या भरून हजार मजूर आणीत होते. त्या लॉऱ्या उद्या यावयाच्या होत्या. मुकुंदराव 'शांत रहा, उद्या कसोटी आहे,' असें सांगत होते. ते म्हणाले, " मोहनची शाश्वती नाही. उद्या उजाडण्याचे आंत प्रिय मोहनचे प्राण कदाचित् देवाघरीं उडून जातील. त्याचा शेवटचा संदेश शांत राहा असा आहे. उद्यां परप्रांतीय मजुरांच्या लॉऱ्या आल्या तर त्यांच्यासमोर आधी मी उभा राहीन. माझ्या अंगावर जाऊं दे लॉरी. माझ्या रक्ताने ती लॉरी नाही थांबली तर आनंदमूर्ति तिच्यापुढे पडतील व आपल्या प्राणांनी अडवूं बघतील. ना थांबतील तर ? दयाराम पुढे येईल व बलिदान करील. तरीहि न थांबली तर ? अहमद पुढे येईल व आडवा पडेल. पांचवा बळी पार्थाचा. उद्याचे हे पांच बळी आम्ही निश्चित केले आहेत. हत्यारी पोलिस उद्या फिरत राहतील, बंदुका जिकडे तिकडे दिसतील. शांत राहा. मोहनचा संदेश म्हणजे आपणांस आज्ञा. अनंताकडे जाणाऱ्याची

आज्ञा कोण मानणार नाही ? सारे शांत राहणार ना ?" हजारो कामगार स्त्री-पुरुषांनी हो म्हणून उंच हात केले. इन्किलाब होऊन सभा गंभीरपणें संपली.

मुकुंदराव, रामदास, दयाराम, आनंदमूर्ति, अहमद, नथू, गणपत सारे मोहनच्या झोपडीकडे वळले. मोहनच्या झोपडींत मंद दिवा होता. दार उघडेंच होतें. अनंत जीवनाचें स्वागत करण्यासाठी तें उघडें होतें. सारी मंडळी हळूहळू शांतपणें तेथे आली. मुकुंदराव दारांत उभे राहिले. तो आंत अनंताच्या घरचें दृश्य. गीता गीताईचा तेजस्वी परंतु गोड मंजुळ पाठ डोळे मिटून म्हणत आहे. तिच्याकडे पाठ करून शांता मोहनच्या कुशीवर मान ठेवून कलंडली आहे. शातेच्या मांडीवर चिमुकली क्रांति दिव्याकडे बघत हसत आहे; मुठी हलवीत आहे, नाचवीत आहे.

"मोहन." मुकुंदरावांनी हाक मारली. सारें शांत.

"शांता." त्यांनी सद्‌गदित होऊन हाक मारली. सारें शांत.

"ताई." रामदासने दीनवाणी हाक मारली. सारें शांत.

मुकुंदराव मुके झाले. सारी मंडळी मुकी झाली. डोळे स्रवत होते. जीभ लुळी होती. सर्वांचे ओठ, हातांचीं बोटें भावनांनी थरथरत होतीं.

"गेली. दोघें गेलीं." मुकुंदराव उद्‌गारले.

"त्याचें एकमेकांवर अपार प्रेम. मोहनचा शांता प्राण व शांतेचा मोहन प्राण." रामदास रडत म्हणाला.

"असें प्रेम दुर्मिळ." आनंदमूर्ति म्हणाले.

"क्रांति पोरकी झाली." दयाराम म्हणाला.

"लहान घरांतून ती बाहेर पडली. एका आईच्याऐवजी तिला कोटयवधि आया आता वाढवतील, कडेखांद्यावर घेतील. तिला कोटयवधि मायबाप सांभाळून मोठी करतील. क्रांति मोठी होईल. चिमुकली, चिमणी, लहानुली, सानुली माझी क्रांति मोठी होईल." मुकुंदराव म्हणाले.

ती वार्ता बाहेर तावडतोब फैलावली. हजारो कामगार स्त्रीपुरुष झोपडीकडे आले. जणुं त्यांचा राजा त्या झोंपडींत होता. त्यांचा जीवनसम्राट् त्या झोपडींत होता. झोपडीकडे रीघ लागली. मोहन व शांता यांचें शेवटचें दर्शन घेण्यासाठी अलोट यात्रा लोटली. त्यांचे देह कामगार-मैदानावर सर्वांना

दिसतील अशा रीतीने ठेवायचें ठरलें. गीतेने क्रांतीला घेतलें. तिरंगी व लाल झेंड्यांत ते देह गुंडाळले गेले. बिहारमधील सती पार्वतीच्या त्या डबींतील कुंकू गीतेने शांतेच्या कपाळीं लावलें. मोहनच्याहि कपाळीं लावलें. ते पुण्यमय देह कामगारांच्या मैदानावर आणण्यांत आले. विशाल आकाशाच्या खालीं देवाचीं तीं दोन लेकरें श्रमून झोपलीं होतीं.

खेड्यापाड्यांतून वार्ता विजेसारखी गेली. सोनखेडी, शिवतर, मंगरूळ, साळवें, वाघोड, मारवड, खिरोदें, असोदें–शेकडो गांवांहून स्त्री-पुरुषांची मुंग्यांसारखी रांग लागली. धनगावला महान् यात्रेचें स्वरूप आलें. मोहन व शांतेचें महान् निर्याण होतें. महाप्रस्थान होतें. त्यांची महान् यात्रा सुरू झाली होती.

आज परप्रांतीय मजुरांच्या लॉऱ्या येणार होत्या. आजचा सूर्य काय पाहणार देव जाणे. सूर्य उगवला म्हणजे फुलें डोळे उघडतात. आज धनगावला किती फुलें डोळे मिटणार होतीं देवाला माहीत. सारें शहर अस्वस्थ होतें. प्रक्षुब्ध होतें. थरथरत होतें. भावनांच्या लाटांवर हेलावत होतें. खालीवर होत होतें.

लॉऱ्या येत नाहीत अशी बातमी आली. हजारो कंठांतून 'क्रांतीचा जय असो' गर्जना बाहेर पडली. कदाचित् प्रेतयात्रा संपेपर्यंत लॉऱ्या आणू नयेत, असा सरकारी हुकूम गेला असेल. शक्यता होती. हजारो हार मृत देहास घालण्यांत आले. फुलांचे खच पडले. हारांच्या राशी झाल्या. शांतेचें तें पतिव्रतेसारखें इच्छामरण यामुळे सर्वांना चटका लागला. सर्व जातींच्या व धर्मांच्या बायका शांतेला वंदन करून गेल्या. मुलांमुलींनी वंदन केलें.

प्रेतयात्रा निघाली. आपला खांदा लागावा, अशी सर्वांना इच्छा. शांतेचा देह आम्ही उचलतों, असें कामगार बाया म्हणाल्या. "असें करीत नाहीत." कोणी तरी म्हणालें, "ही क्रांति आहे" गीता चिमण्या क्रांतीला पोटाशीं धरून म्हणाली. शेवटीं शांतेचा देह भगिनींनी उचलला. मोहनचा पुरुषांनी उचलला. शांतेच्या पाठीमागे चारचारांच्या रांगेंत हजारो स्त्रिया उभ्या होत्या. मोहनच्या पाठीमागे चारचारांच्या रांगेंत हजारो पुरुष होते. दोन्ही रांगांमधून लाल बावट्यांचे स्त्री-पुरुष स्वयं-सेवक हातांत झेंडे घेऊन व्यवस्था ठेवण्यासाठी अंतराअंतरावर खडे होते.

"इन्किलाव झिन्दाबाद" गाणें सुरू झालें. विद्यार्थीसंघाचा बँड पुढे होता. एक मोठा तिरंगी झेंडा व एक मोठा लाल झेंडा फडकत होता. क्रांतीचा आवाज दशदिशांत घुमूं लागला. दोन्ही चिता रचल्या गेल्या. शांता व मोहन यांचे पवित्र आत्मे आधीच देवाकडे गेले होते. त्यांचे देह अग्निनारायणाने आत्मसात् केले. मुकुंदरावांनी अग्नि देण्यापूर्वी दोनच शब्द सांगितले. "मोहन-शांता सर्वांना शांत रहा व लढा असें सांगत आहेत. मोहन व शांता आपल्या जीवनांत अमर आहेत. त्यांचे देह गेले. त्यांचा संदेश सदैव आपणांजवळ आहे."

मंडळी माघारी फिरली. कामगार-मैदानावर पुन्हा मिरवणूक जाणार होती व तेथून विसर्जन पावणार होती. इतक्यांत " मजुरांच्या लॉऱ्या आल्या. " एकच हांक झाली. सारें वातावरण प्रक्षुब्ध झालें. मुकुंद-रावांनी कर्ण्यांतून "शांत रहा, काल रात्रीं सांगितलेलें विसरूं नका" असें गंभीरपणें सांगितलें. बँड माघारा गेला. सर्वांच्या पुढे मुकुंदराव व आनंद-मूर्ति झेंडे धरून उभे राहिले. त्यांच्या पाठीमागे दयाराम व अहमद. त्यांच्या पाठीमागे पार्थ आणि मागे हजारो स्त्रीपुरुषांचा व्यवस्थित चार-चार रांगी समह. लॉऱ्यांना अडवायला निघाला जथा. वंदूकवाले पोलिस गर्दी करूं लागले. जथ्याला अडवूं लागले. गर्दी होणार, दंगा होणार, लक्षणें दिसूं लागलीं. ती पाहा एक कामगार-भगिनी चवताळून निघाली. मॅनेजरच्या अंगावर थुंकणारी रमा, तीच ही. कोठे निघाली ही वाघीण, ही नागीण? कोणावर आहे रोख? ती पाहा शिपायाच्या हातांतील बंदुक तिने ओढून घेतली. तो शिपाई बावळटासारखा पाहात राहिला. रमाने बंदूक उंच केली "ही पाहा साम्राज्य सरकारची बंदूक आपल्या हातीं आली. ही पाहा खरी सत्ता आपल्या हातीं आली." ती ओरडली. इन्किलाबची कानठळ्या बस-विणारी गर्जना झाली. ती बंदूक त्याच्या हातीं अशी नाचूं लागली. परंतु रामदास एकदम धावून आला. "चावटपणा काय आहे हा! गंभीर परि-स्थिति आहे, समजत नाही?" त्याने ती बंदूक परत दिली. "गोळीबार करूं नका, आम्ही शांत राहतों." मुकुंदराव सांगत होते.

इतक्यांत मोटार लॉऱ्या दुसऱ्या रस्त्याने जात आहेत असें दिसलें. मुकुंदराव धांवले. वाऱ्याच्या वेगाने निघाले. एकच "क्रांति" अशी आरोळी

त्यांनी मारिली. ती पहा पहिली लॉरी येत आहे. तिच्या पाठीमागून आणखी येत आहेत. मुकुंदराव लाल झेंडा घेऊन उभे राहिले. परंतु लॉरीवाला ऐकेल का ? तिच्यांतील कामगार अरे, अरे, म्हणत आहेत; तोंच ती लॉरी मुकुंदरावांना पाडून त्यांचे अंगावरून गेली ! तोच आनंदमूर्ति तेथे येऊन पडले. त्यांच्याहि अंगावरून गेली ! आंतील कामगारांनी ड्रायव्हरला ओढलें. त्यानें थांबविली गाडी. हजारो कामगार धावले. दोन जीव तेथे रक्तबंबाळ होऊन पडले होते. कामगार खवळले. रामदास मोटार लॉरीवर उभा राहिला. तो कर्ण्यांतून सर्व शक्तीनें व निश्चयी स्वरांत म्हणाला, " शांत राहा. मुकुंदराव शेवटच्या श्वासाने शांत राहा सांगत आहेत आणि हे बाहेरच्या कामगारांनो, तुम्ही आमचे भाऊ. तुमच्या मायबहिणी, तुमचे भाऊ येथे उपाशी मरत असतांना, तेजस्वी लढत असत असतांना, तुम्ही येतां कसे ? कामगारांनी का कामगारांची मान कापावी ? आम्ही तुम्हांला पाप करूं देणार नाही. तुमच्या लॉऱ्यांसमोर आमच्या रक्ताचे सडे घालूं. तुम्हांला पापापासून परावृत्त करण्यासाठी आम्ही आमचे प्राण जमिनीवर पसरूं. माणुसकी असेल तर खाली उतरा व शूर संपवाल्या कामकऱ्यांत मिसळा. हे पाहा थोर मुकुंदराव येथे रक्ताने न्हाले आहेत. आसुरी भांडवलशाहो, रक्ताला चटावलेली भांडवलशाही, तिला साथ देणार का लाथ देणार ? टाका उड्या खाली ! या यज्ञमूर्तींचें हें बलिदान पाहा. उतरा खाली."

मोटार लॉऱ्यांतील कामगार खाली उतरले. त्यांनी खाली माना घातल्या. एकच इन्क्लिाबची रणगर्जना झाली. परंतु मुकुंदराव व आनंदमूर्ति ! त्यांचे अद्याप प्राण होते. त्यांना दवाखान्यांत नेण्याचें ठरलें. तिकडे कामगार मैदानावर प्रचंड सभा सुरू झाली. दयाराम, अहमद, नथू तिकडे गेले. रामदास व पार्थ हुतात्म्यांना घेऊन दवाखान्यांत आले. " हिंसा-अहिंसेचा लढा " मुकुंदराव म्हणाले. " दिव्य लढा " आनंदमूर्ति म्हणाले.

✦ ✦ ✦

## चिर-मीलन : : २८

दवाखान्यांतील एका प्रशांत दालनांत दोन खाटा होत्या. एकीवर मुकुंदराव पहुडले होते. दुसरीवर कोण आहे तें ? हे आनंदमूर्ति नव्हत. कोण आहे तें ?

" मरणाच्या दारीं आपण आहों. आताहि या गरीब मीनेकडे नाही का पाहणार? मरतांना तरी आपलें लग्न लागूं दे. जें जीवनाने झालें नाही तें मरणाने होऊं दे. मंगल मरण. रामदास, त्यांना माझ्या-कडे तोंड करायला सांगा. त्यांना वळवत नसलें तर माझी खाट उचलून तिकडच्या बाजूला न्या. मी त्यांच्याकडे वळून बघेन. " मीना डोळ्यांत पाणी आणून म्हणाली.

रामदास तेथे रडत होता. काय करील विचारा ?

" तुम्ही वळता का त्या बाजूला ? नका निष्ठुर होऊं. मरतांना सर्वांनी मृदु व्हावें. मुकुंदराव, मीं तुम्हांला सांगावें असें नाही. मीनाबाईची इच्छा पूर्ण करा. मरतांना तरी त्यांच्याकडे मीना म्हणून बघा. त्यांचा हात हातांत घ्या. वळवूं का कुशीवर ? " रामदासने विचारलें.

" नको रामदास. आता सर्व लक्ष देवाकडे वळूं दे. बाकीचे सारे विचार, सारे विकार गळूं देत. " मुकुंदराव म्हणाले.

रामदास, दयाराम, अहमद तेथे बसले होते. इतक्यांत रामदासला भेटण्यासाठी कोणी तरी आलें म्हणून तो बाहेर गेला.

" रामदास. " मुकुंदरावांनी हाक मारली.

" तो बाहेर गेला आहे. कोणी तरी आलें महत्त्वाच्या कामासाठीं, येईल लवकरच. " दयारामने सांगितलें.

रामदास आंत आला.

" कशाला हाक मारलीत ? " त्याने विचारलें.

" कामगार शांत आहेत ना ? ते शांत राहावे म्हणून मी प्रार्थना करीत आहें. " मुकुंदराव डोळे मिटूनच म्हणाले.

" मालकांनी तडजोडीसाठी बोलावलें आहे. आताच एक डायरेक्टर भेटायला आले होते. मी व अहमद जातों. जाऊं ना ? " रामदासने विचारलें.

"जा. कामगारांची उपासमार संपो. किती दिवस शांत राहिले ?" ते म्हणाले.

"मीसुद्धा किती दिवस शांत राहिलें? मरेपर्यंत शांत. पाहा ना माझ्याकडे वळून. माझ्याकडे पाहणें म्हणजेहि का पाप ? त्या दिवसापासून मी मीना आहे हें तुम्हांला कळलें होतें. पुरुषाच्या वेषांत मी असलें म्हणजे बघवतें वाटतें माझ्याकडे ? मला पुरुषाचा पोषाख द्या रे कोणी! हे डोक्यावरचे केस कापा नाही तर झाका. काय करूं मी ? साऱ्या जगाला सुखवूं बघतां व एका प्रेमळ सतीला मात्र रडवतां" मीना बोलूं लागली.

"दयाराम, माझ्या खोलींत जा व तेथे कपाटांत एका सुंदर रुमालांत एक शाल गुंडाळलेली आहे ती घेऊन ये." मुकुंदराव हळूच म्हणाले.

दयाराम गेला. तेथे आता कोणी नव्हतें. मीना पलंगावरून उठूं बघत होती. तिला उठवत नव्हतें. शक्ति नव्हती. परंतु सारी शक्ति ती एकत्र करूं पाहात होती. खाटेचा आवाज कुरकुर होत होता. मुकुंदराव एकदम चमकले, ते एकदम कुशीवर वळले व "मीना उठूं नको. पडशील. येथे कोणी नाही." ते म्हणाले. "कोणी नाही ? तुम्ही आहांत ना ? कोणी नाही म्हणूनच उठूं दे. तुम्हांला मिठी मारून मरूं दे. तुमच्या पायीं कुडी पडूं दे. मी येणार भेटायला. तुमची मिनी या नात्यानें तुम्हांला उठतें भेटायला. ही पाहा उठलें, आलें." असें म्हणून बावरलेली मीना खरेंच उठूं लागली.

"मीना, माझें नाही ऐकायचें ?" मुकुंदरावांनी विचारलें.

"तुमचें नाहीं ऐकावयाचें तर कोणाचें ?" ती म्हणाली.

"मग पडून राहा, उठूं नको. तूं का माझ्या जीवनांत नाहीस ? तूं दिलेली शाल, दिलेली नाही तर मीं तुझी खूण म्हणून पळविलेली शाल माझ्याजवळ आज इतकीं वर्षे झालीं तरी आहे. नीज, पडून राहा, थोडी कळ सोस. हे देहाचे पडदे पडतील व आत्मे कायमचे भेटतील. देहाचा अंतरपाट धरून मृत्यु मंगलाष्टकें म्हणेल व अंतरपाट पटकन् टाळी वाजवून दूर करून तुझ्या-माझ्या आत्म्याचें चिर लग्न लावील. मीना, पडून राहा." मुकुंदराव म्हणाले.

"परंतु माझ्याकडचें तोंड तिकडे नका पुन्हा वळवूं. तुम्हांला माझ्या-

कडे नसेल बघायचे तर तुम्ही डोळे मिटून पडून राहा. मी तुम्हांला पाहात राहीन. तुम्हांला बघत बघत जीवनांत साठवीत मीना डोळे मिटील. मीने चें मीनत्व मरेल व मीना म्हणजे तुम्हीच व्हाल." ती म्हणाली.

दोघें शांत होतीं. दयाराम शाल घेऊन आला.

"दयाराम, ही शाल माझ्या अंगावर घाल. ही शालच माझं प्रेतवस्त्र होऊं दे." मुकुंदराव म्हणाले.

दयारामने ती शाल त्यांच्या अंगावर घातली.

"किती सुंदर दिसतां तुम्ही !" मीना म्हणाली.

"तो परमेश्वर किती सुंदर असेल." मुकुंदराव म्हणाले.

"माझे परमेश्वर तुम्ही ! मीना लहान आहें. तिला लहान देव पुरे. साडेतीन हात देहांतील देव पुरे. तुम्ही मोठे आहांत. तुम्हांला विश्वंभर पाहिजे. तुम्हांला तो डोळे उघडे ठेवून दिसणार नाही. डोळे मिटून त्याला पाहावें लागेल. परंतु माझा देव मला उघडया डोळ्यांनी दिसतो. गोड गोड देव." मीना म्हणाली.

"मुकुंदराव, मीनाबाई, तुम्ही बोलूं नका. थकवा येईल." दयाराम म्हणाला.

"वेळ तर थोडा आहे. बोलून घेऊं दे. साऱ्या आयुष्यांतील शेवटच्या क्षणीं बोलून घेऊं दे. आता थकवा नाही. उलट अपार उत्साह वाटतो आहे."

"मिने, मी येथे आहें हें तुला कसें कळलें ?" मुकुंदरावांनी विचारलें.

"मी हिंदुस्थानभर भटकल्यें. किती संकटांतून गेल्यें. विश्वभारतींत तुमचा पत्ता लागला. तेथे तुमचा मोठा फोटो पाहिला. किती आनंद झाला तेव्हां. भेटले भेटले असें मीं नाचत. म्हटलें. तेथील मंडळींनी मला वेड लागलें आहे असें ठरवलें. मी वेडीच होत्यें. प्रेमवेडी. मुकुंदाची वेडी." मीना म्हणाली.

"ते दहा हजार रुपये आणलेस तेव्हा वडील काय म्हणाले? त्यांच्याकडूनच आणलेस, मी समजलों." मुकुंदराव म्हणाले.

"मी तुमची वेडी व वडील माझ्यासाठी वेडे. ते रोज गावाबाहेर टेकडीवर जात व माझी वाट बघत. एक दिवस मिनी येईल असें म्हणत.

आणि मला समोर पाहतांच रडूं लागले. आलीस, दया आली पित्याची,. असें म्हणूं लागले. मला जायचें आहे लगेच, असें जेव्हां सांगितलें तेव्हा म्हणाले, जा. हें सारें तुझें आहे. घेऊन जा. मला दहा हजार रुपये आता द्या, मीं म्हटलें. त्यांनी पुडकीं आणून दिलीं. मी निघतांना ते म्हणाले, ' मिने, मी आता वाचणार नाहीं. तूं गेलीस म्हणजे तुझ्यासाठी थांबलेले प्राण उडून जातील. ही सारी इस्टेट कोणाला देऊं, सांग. ' मीं सांगितलें, ' सोनखेडीच्या दयारामच्या आश्रमाच्या नांवें करा. ' ते म्हणाले, ' बरें, तसें करून कागद पाठवीन. ' परंतु त्या दिवशीं पावसांतून तुम्हांला आणलें. ओळखलेंत का मला ? " तिनें विचारलें.

" मला फक्त त्या कित्येक वर्षांपूर्वीच्या गोष्टीची आठवण झाली. मला घेऊन अशीच तूं घोडा पळवीत होतीस. मीं ओळखलें नाही. परंतु दारापाठीमागे लपून उभी राहिलीस तेव्हा ओळखलें व पळालों. भीतीने का आनंदाने, देवाला माहीत. मी आता डोळे मिटतों. तूंहि मीट. " ते म्हणाले.

" मृत्यूला येऊन भेटूं दे. आपण उघडेच ठेवूं. ओठ बोलूं देत, डोळे बघूं देत, कान ऐकूं देत. माझी खाट जरा जवळ ठेवायला सांगा. म्हणजे हातहि हातांत राहील. हातांत हात घेऊन स्वर्ग चढूं म्हणजे पडणार नाही. खरें ना ? हसलेत. हसा जरा. मीनेकडे बघून गोडसें हंसा. " ती म्हणाली.

इतक्यांत रामदास आला.

" काय बातमी ? " दयारामने प्रश्न केला.

" पगारवाढ २० टक्के नाही, परंतु १७॥ टक्के मिळाली. तडजोड केली. मागील पगार पूर्वीचाच. उद्यापासून नवीन करार. या पहा कामगारांच्या विजयगर्जना. ' क्रांति यशस्वी होवो ' गर्जना. " रामदास म्हणाला.

" मी आता सुखाने झोपतों. सुखाने झोपतों. " मुकुंदराव म्हणाले. मीना व मुकुंदराव दोघांना ग्लानि आली होती.

" ते पाहा माझे बाबा वर चालले. आपल्यापुढे त्या पाहा शांताबाई, ते मोहन. चला, चला. " मीना जणुं वातांत बोलत होती.

बाहेर हजारो कामगारांचा समुद्र उचंबळत होता.

" माझी खाट जरा सरकवा ना तिकडे. " मीना म्हणाली.

रामदासने मीनेची खाट मुकुंदरावांजवळ आणली. मीनेने मुकुंदरावांचा हात घेऊन हातांत ठेवला. दोघांचे डोळे मिटले होते. इतक्यांत गीता आली. चिमुकली क्रांति तिच्या हातांत होती. तिने ती लहानगी क्रांति मुकुंदराव व मीना यांच्याजवळ नेली.

" क्रांति चिरायु होवो ! " हजारो किसान-कामगार बाहेर गर्जले. मुकुंदराव व मीना यांनी डोळे उघडले. तों त्यांच्याजवळ कोण होतें ? ती छोटोशी विटुकली धिटुकली क्रांति. दोघांनी आपले हात क्रांतीच्या अंगावरून फिरविले.

" क्रांति चिरायु होवो. " दोघांनी क्षीण स्वरांत म्हटलें.

गीता क्रांतीला घेऊन उभी राहिली. रामदास, दयाराम, अहमद उभे राहिले. मीनेने मुकुंदरावांचा हात अधिकच एकदम बळकट धरला, दोघांनी एकमेकांकडे पाहिलें व कायमचे डोळे मिटले. चिर-मीलन झालें. चिर-जीवन आलें.

• ✦ ✦ ✦

## भविष्यवाणी : : २९

माहेराहून माया मनोहर बालक घेऊन परत आली होती. प्रद्योतचें लग्न लावून आली होती. गीतेचा व दयारामचा विवाह झाला होता. आश्रमाला मीनेच्या वडिलांची मदत आली होती. क्रांति सर्वांची होती. एकाच पाळण्यांत कधी कधी क्रांति व क्रांतिकुमार यांना झोपवण्यांत येई.

एके दिवशीं रात्रीं प्रार्थना झाल्यावर तेथेच अंगणांत सारीं बसलीं होतीं. दयाराम, रामदास, गीता, माया तेथे होतीं. मायेच्या मांडीवर मुलगा झोपला होता. परंतु क्रांति खेळत होती. ती आता रांगू लागली होती. स्वैरसंचार करूं लागली होती. एकदम रामदास तेथून उठून गेला व गच्चींत जाऊन उभा राहिला. दूर पाहूं लागला.

" काय पाहतां दूर ? " मायेने खालून विचारलें.

" ते पाहा पहाड पेटले आहेत. वर या, बघा. लाल लाल शिलगले आहेत." रामदास म्हणाला.

सारी मंडळी वर आली. तो भव्य भीषण देखावा बघूं लागली.

"असाच भडका उडेल एक दिवस. मुकुंदराव, मोहन, शांता, मीना यांनीं बी पेरलें, क्रांतीचें बी पेरलें. त्याचा महावृक्ष होईल. त्यांनी ठिणगी पेटविली, त्यांतून आगडोंब उठेल. सर्वत्र अशांतता आहे. जगांत युद्धाचे गडगडाट होत आहेत. प्रचंड उलथापालथी होतील. लहानशी क्रांति विश्व व्यापून उरेल." रामदास जणू भविष्यवाणी बोलत होता.

"सर्व देशांतून क्रांति होईल. जगांतील पिळले जाणारे सारे एक होतील. जगांतील श्रमजीवी जनता एक होईल. सर्व जगाचा एक झेंडा होईल. महान् स्वप्न सत्यसृष्टींत येईल. सारा संसार सुखाचा होईल. जगड्व्याळ क्रांति खरीखुरी शांति आणील." दयाराम म्हणाला.

" क्रांति, होशील ना तूं मोठी ? व्यापशील का सारें जग ?" गीतेनें विचारलें.

लहानग्या क्रांतीने चिमुकले हात पसरले.

इन्किलाब झिन्दाबाद !

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
नों. दि. ........
........ क्र. ........
क्रमांक
नों. दि.
IRBK-0108247
IRBK-0108247

२११६ ३।७।६१

# संभवनीय प्रश्न

(१) या कादंबरींतील कथा थोडक्यांत सांगा.

(२) मुकुंदराव भाषण करीत आहेत, अशी कल्पना करून 'महाराष्ट्राची संस्कृति' या विषयावर वीस ओळीचें भाषण लिहा.

(३) दत्तविधान झाल्यावर रामदासांत कोणता बदल झाला? त्याने मिळालेल्या इस्टेटीचा कसा उपयोग केला?

(४) क्रांति म्हणजे काय?

(५) या कादंबरीला वैकल्पिक शीर्षकें सुचवा आणि तीं योग्य कां आहेत तें सांगा.

(६) या कादंबरीचा नायक कोण? कशावरून?

(७) विश्वभारतीमध्ये रामदास व मुकुंदराव यांना काय दिसलें?

(८) क्रांतीमध्ये भाग घेणाऱ्या प्रमुख व्यक्ति कोणत्या? त्यांच्या स्वभावांची थोडक्यांत माहिती सांगा.

(९) 'प्रद्योत हा या कादंबरीचा खलपुरुष होय' या विधानाची चर्चा करा.

(१०) मिनी नाहीशी झाल्यावर श्रीनिवासराव कसे वागत होते?

(११) शहरांत गेल्यावर शांतामध्ये बदल झाला. कोणता? पुढे ती योग्य मार्गावर केव्हां आली?

(१२) स्वातंत्र्यदिनाच्या सभेंत मुकुंदरावांनी कोणता उपदेश केला?

(१३) बंगालमधील महापुराचें वर्णन करा.

(१४) विद्यार्थी संघाची कल्पना स्पष्ट करा.

(१५) वेश बदलून मीनाने कोणतें कार्य केलें?

(१६) कामगारांच्या संपाची माहिती सांगा.

(१७) या कादंबरींतील कोणता प्रसंग तुम्हांला आवडतो? तो कां आवडतो तें सांगा.

(१८) सानेगुरुजींच्या भाषाशैलीची चर्चा करा.

(१९) ही कादंबरी प्रचारात्मक आहे. कोणत्या कल्पनांचा प्रचार येथे दिसून येतो?

(२०) या कादंबरींत भांडवलवाल्यांबद्दल कोणते विचार मांडले आहेत?